ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते जून २०२५ (जोडअंक)

महाराष्ट्र साहित्य परिषद




अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

**मा. डॉ. तारा भवाळकर**

**अध्यक्ष, ९८ वे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**



९८ व्या, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मा. खासदार शरदचंद्रजी पवार, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. डॉ. तारा भवाळकर आणि मा. रवींद्र शोभणे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय
१० एप्रिल २०२५ पासून पुढील तीन वर्षांसाठी
पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आले.
साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे यांनी महामंडळाचा कार्यभार
नवनियुक्त अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्याकडे सुपूर्द केला.









महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

**अंक क्र. ३८६**

**जानेवारी ते मार्च २०२५**

**एप्रिल ते जून २०२५ (जोडअंक)**

संपादक । **सुरेश देशपांडे**

प्रकाशक । **सुनिताराजे पवार** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

दूरभाष । ०२०–२४४७५९६३

संकेतस्थळ । www.sahityaparishad.org

ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।

सकाळी ९.३० दुपारी १२.३०

दुपारी ५.०० ते रात्री ८.००

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

# मसाप पत्रिका


**जानेवारी ते मार्च २०२५**
**एप्रिल ते जून २०२५ (जोडअंक)**
**अंक ३८६**

संपादक
**सुरेश देशपांडे**

मुद्रक–प्रकाशक
**सुनिताराजे पवार**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मूल्य : **८० रुपये**



संपादक मंडळ

**प्रा. मिलिंद जोशी**
**सुनिताराजे पवार**
**विनोद कुलकर्णी**
**वि. दा. पिंगळे**
**अंजली कुलकर्णी**
**शिरीष चिटणीस**
**जयंत येलूलकर**


---


या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

**मसाप पत्रिका** **। जानेवारी ते मार्च २०२५ एप्रिल ते जून २०२५ (जोडअंक)**


संपादकीय । **सुरेश देशपांडे । ५**

अध्यक्षीय भाषण । **डॉ. तारा भवाळकर । ६**

नवी दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनसमयी
पंतप्रधानांचे भाषण...। **पंतप्रधान नरेंद्र मोदी । ५४**

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्वागताध्यक्ष
मा. शरद पवार यांचे भाषण । **शरदचंद्रजी पवार । ५८**

लोकसंस्कृतीच्या स्त्रीवादी अभ्यासक । **वर्षा गजेंद्रगडकर । ६५**

दिल्लीत मराठीचा अखिल भारतीय जागर । **ज्योत्स्ना चांदगुडे । ७६**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच कशासाठी? । **प्रा. मिलिंद जोशी । ८०**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे – एक दृष्टिक्षेप । **सुरेश देशपांडे । ८६**

मराठी साहित्यसंमेलने अधिकाधिक लोकाभिमुख व्हावी **। ९०**

विलास वरे लिखित 'बहिष्कृतांचे अंतरंग' : करुणेचा गहिवर । **डॉ. वैभव ढमाळ । ९२**

कार्यवृत्त **। ९९**

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
## कार्यकारी मंडळ (२०२१–२०२६)


### विश्वस्त मंडळ

**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** **डॉ. पी. डी. पाटील** **यशवंतराव गडाख**

### पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

अध्यक्ष । **डॉ. रावसाहेब कसबे**

उपाध्यक्ष । **विद्याधर अनास्कर** उपाध्यक्ष । **डॉ. तानाजीराव चोरगे** उपाध्यक्ष । **राजीव बर्वे**

कार्याध्यक्ष । **प्रा. मिलिंद जोशी** प्रमुख कार्यवाह । **सुनिताराजे पवार**

कोषाध्यक्ष । **विनोद कुलकर्णी** पत्रिका संपादक । **सुरेश देशपांडे**

### स्थानिक कार्यवाह

व्याख्याने व स्मृतिदिन । **शिरीष चिटणीस**
विशेष पारितोषिके । **मृणालिनी कानिटकर–जोशी**
वार्षिक ग्रंथ पारितोषिके । **अंजली कुलकर्णी**
परीक्षा विभाग । **माधव राजगुरू**
ग्रंथालय विभाग । **वि. दा. पिंगळे**
अतिथीनिवास–वास्तू देखभाल । **ॲड. प्रमोद आडकर**

### सदस्य

**डॉ. आशुतोष जावडेकर** (पुणे शहर)
**डॉ. सतीश देसाई** (पुणे शहर)
**ज्योत्स्ना चांदगुडे** (पुणे शहर)
**रावसाहेब पवार** (पुणे जिल्हा)
**राजन लाखे** (पुणे जिल्हा)
**डॉ. पुरुषोत्तम काळे** (पुणे जिल्हा)
**रवींद्र बेडकिहाळ** (सातारा जिल्हा)
**सोपानराव चव्हाण** (सातारा जिल्हा)
**पद्माकर कुलकर्णी** (सोलापूर जिल्हा)
**ॲड. जे.जे. कुलकर्णी** (सोलापूर जि.)
**कल्याण शिंदे** (सोलापूर जिल्हा)
**नंदकुमार सावंत** (सातारा जिल्हा)
**प्रकाश देशपांडे** (कोकण)
**राजीव जोशी** (ठाणे जिल्हा)
**पद्माकर शिरवाडकर** (ठाणे जिल्हा)
**सुरेश देशपांडे** (ठाणे जिल्हा)
**प्रकाश होळकर** (नाशिक जिल्हा)
**ॲड. नितीन ठाकरे** (नाशिक जिल्हा)
**चंद्रकांत पालवे** (अहमदनगर जिल्हा)
**जयंत येलूलकर** (अहमदनगर जिल्हा)
**प्राचार्य तानसेन जगताप**(जळगाव जिल्हा)
**डॉ. शशिकला पवार** (धुळे जिल्हा)
**प्रा. दशरथ पाटील** (सांगली जिल्हा)
**राजन मुठाणे** (कोल्हापूर जिल्हा)

# संपादकीय

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा अंक सादर करताना मनात संमिश्र भावना आहेत.

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेसारख्या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादकपद मिळणे ही आनंदाची बाब; पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही मनात आहे. पूर्वसूरींच्या प्रथा-परंपरा न सोडता वाङ्मयीन संकेत पाळून नावीन्याचा स्वीकार करण्याचे मनात आहे.

एका अपवादात्मक परिस्थितीत संपादकपदाची जबाबदारी स्वीकारावी लागली. हाताशी असलेल्या अल्प काळात लेखन सामग्रीची जुळवाजुळव करणे हे मोठेच आव्हानात्मक काम होते; परंतु संपादक मंडळाच्या सहकार्याने हे आव्हान पेलू शकलो आणि आता हा अंक आपल्यासमोर सादर होतोय.

फेब्रुवारी २०२५ मध्ये राजधानी दिल्लीत दिमाखात साजरे झालेले ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि त्याआधी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा या दोन घटनांनी मराठी मन सुखावले आहे, यात शंका नाही.

हा अंक साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर निघत असल्याने साहित्य संमेलनाचे वृत्त आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष माननीय डॉ. ताराबाई भवाळकर यांचे भाषण तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणारा लेख या अंकात आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या आद्य साहित्य संस्थेने आपल्या शाखांसह सातत्याने प्रयत्न केले होते. हजारो पत्रे पाठवण्यापासून ते प्रत्यक्ष राजधानी दिल्लीत आंदोलन करणे असे अनेक मार्ग चोखाळले होते. ते सर्व प्रयत्न सुफळ संपूर्ण झाले. आता हा दर्जा टिकवणे आणि मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि जोपासना करणे ही आपण सर्व मराठी भाषकांची जबाबदारी आहे. भाषा ही केवळ संपर्काचे माध्यम नाही तर संस्कृतीचे वहन करणारी आणि देशाला आणि लोकांना जोडणारेही साधन आहे हे लक्षात घ्यायला हवे.

मराठी साहित्यात मोलाचे योगदान देणाऱ्या मा. नरेंद्र चपळगावकर, मीना प्रभू, रा. रं. बोराडे आणि प्रा. अनंत भावे या ज्येष्ठ साहित्यिकांचे निधन झाले, त्याची दखलही या अंकात घेण्यात आली आहे.

एक महत्त्वाची नोंद घ्यायला हवी ती म्हणजे २०१६ या वर्षी सध्याच्या कार्यकारिणीने घटना दुरुस्तीचे जे आश्वासन दिले होते ते पूर्ण करण्यात आले आहे.

आणखीन एक महत्त्वाची नोंद म्हणजे पुढच्या वर्षीपासून म्हणजेच एप्रिल २०२५ पासून अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे कार्यालय, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथे आले आहे. त्या संदर्भातील अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचा लेख या अंकात आहे. तीही जबाबदारी मसापकडून अत्यंत सक्षमतेने पार पाडली जाईल, असा विश्वास आहे.

नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

■■

**सुरेश देशपांडे**

# अध्यक्षीय भाषण



**डॉ. तारा भवाळकर**

''नमस्कार... दोन कमी शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या साहित्यिक उत्सवानिमित्त आपण येथे जमलेलो आहोत. या संमेलनाचे उद्‌घाटक भारताचे सन्माननीय पंतप्रधान, संमेलनाचे स्वागताध्यक्ष महाराष्ट्रातील जाणते नेते श्री. शरदचंद्रजी पवार, भारतीय राजनीतिज्ञ... राजनीतिज्ञ हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरत आहे कारण, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा शब्द त्यांच्या 'आज्ञापत्र' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक रामचंद्रपंत अमात्य यांनी वापरलेला आहे. राजनीती हा शब्द मला राजकारणी या शब्दापेक्षा जास्त अन्वर्थक आणि अर्थवाही वाटतो. तर सर्व विचारधारांचे राजनीतिज्ञ, संमेलनाच्या विविध उपक्रमांत सहभागी होणारे विविध वक्ते, विचारवंत, लेखक, कवी, कलावंत आणि मराठी मायबोलीवर मनापासून प्रेम करणाऱ्या माझ्या मित्र मैत्रिणींनो...

गेली ९७ वर्षे एखादा अपवाद सोडता दरवर्षी हा साहित्य उत्सव साजरा होत आलेला आहे. प्रारंभी 'ग्रंथकार संमेलन' अशा नावाने सुरू झालेला हा साहित्य उत्सव, आपल्या विस्तृत कक्षांना सामावून घेणाऱ्या 'साहित्य संमेलन' या अन्वर्थक नावाने आता साजरा होतो आहे. याचा सर्वांनाच आनंद आहे. यंदाच्या संमेलनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये प्रारंभीच नोंदविणे मला आवश्यक वाटतं.

''पहिली बाब म्हणजे हे संमेलन देशाच्या राजधानीत भरत आहे. याचे उद्‌घाटक देशाचे सन्माननीय पंतप्रधान आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून मराठी भाषकांची, साहित्यकांची, विचारवंतांची दीर्घकाळची खटपट आणि प्रयत्न फलद्रूप झालेले आहेत आणि शासनाकडून अभिजात दर्जा बहाल केल्याचा निर्णय जाहीर झाल्याबरोबर अक्षरश: दुसऱ्या दिवशी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षांची निवड आणि संमेलनाचे दिल्ली हे स्थळ जाहीर झाले आणि संमेलनाध्यक्ष म्हणून महाराष्ट्रातील साहित्य परिषदेच्या सर्व घटक संस्था, मराठी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी या सर्वांच्या वतीने महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषाताई तांबे यांनी

दूरध्वनीवरून मला ही सुवार्ता साभिनंदन आणि साभिमान सांगितली. तसेच पाठोपाठ महामंडळाचे लेखी पत्र आले आणि सर्व घटक संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी यांचे दूरध्वनीही आले. या सर्वांची आणि आपणा सर्व मराठी जनतेची मी कृतज्ञ आहे.

''हे संमेलन ज्या ठिकाणी होत आहे, ते तालकटोरा ठिकाणही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभिमानाची खूण आहे. प्राचीन काळापासून मराठी माणूस निरनिराळ्या कारणांनी अक्षरश: जगभर संचार करीत आलेला आहे. त्या तपशिलात न जाता तालकटोराबद्दल थोडक्यात बोलायचं झालं, तर इ.स. १७३५ मध्ये राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर या उमद्या मराठी लढवय्यांच्यासह बाजीराव पेशवे यांनी उत्तरेकडे मुघल प्रांतात चौथाई वसुलीसाठी स्वाऱ्या केल्या. दिल्लीवर आक्रमण केले. त्या वेळी बाजीराव आपल्या सैन्यासह तालकटोरा येथे छावणी टाकून राहिलेले होते. त्या तालकटोरा येथे हे संमेलन भरत आहे. दिल्ली आणि महाराष्ट्र यांच्या पौराणिक, ऐतिहासिक काळापासून अक्षरश: आजपर्यंतच्या संबंधाचा समग्र इतिहास आमचे मित्र श्रीयुत संजय सोनावणे यांनी या संमेलनाच्या निमित्ताने 'महाराष्ट्र आणि दिल्ली ऐतिहासिक संबंधाचा आढावा' लिहून 'सरहद' या आयोजक संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. जिज्ञासूंनी ते पुस्तक अवश्य पाहावे.

''अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने महाराष्ट्राबाहेर फार कमी झालेली आहेत. त्यातही देशाच्या राजधानीत होणारे हे अवघे दुसरेच संमेलन आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर जागतिक कीर्तीचे विद्वान आदरणीय लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोश या अद्वितीय प्रकल्पाचे संपादक, अनेक विद्वन्मान्य ग्रंथांचे लेखक, परंपरा आणि आधुनिकता यांचा सम्यक अभ्यास आणि विचार करणारे आणि स्पष्टपणे आणि परखडपणे तो मांडणारे लोकोत्तर विचारवंत आदरणीय लक्ष्मणशास्त्री जोशी, ७० वर्षांपूर्वी दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या वेळचे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे उद्घाटक होते आणि महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री मा. काकासाहेब गाडगीळ हे स्वागताध्यक्ष होते. या सर्वांचे या प्रसंगी सादर स्मरण होत आहे.

''आजही भारताचे सन्माननीय पंतप्रधान उद्घाटक आहेत आणि महाराष्ट्रातील नेते शरदरावजी पवार हे स्वागताध्यक्ष आहेत. या निमित्ताने माझ्या वैयक्तिक दोन आठवणी नोंदवाव्याशा वाटतात. मा. शरद पवारांच्या संपादकत्वाखाली 'राष्ट्रवादी' हे मुखपत्र काही वर्षांपूर्वी प्रकाशित होत होते. ते बरीच वर्षे माझ्याकडे येत असे. २०१३ च्या आसपास बहुधा ६ व्या वर्षीच्या एका अंकात राष्ट्रवादीचे त्या वेळचे कार्यकारी संपादक श्री. सुधीर भोंगळे यांनी पुणे विद्यापीठातल्या एका चर्चासत्रात माझं विवेचन ऐकून माझी एक मुलाखत राष्ट्रवादीमध्ये प्रकाशित केलेली होती. नंतर त्याच वर्षीच्या एका अंकात कुठेतरी बोलताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संदर्भामध्ये या संमेलनाचे अध्यक्ष भावी काळात कोण कोण व्हावेत अशा पाच-सहा लोकांची नावे मा. शरदरावजी पवार यांनी घेतली होती, त्यात माझं एक नाव होतं. ते आता विसरले असतील; पण माझ्यासारख्या लहान व्यक्तीच्या दृष्टीनं ही आठवण मला महत्त्वाची वाटते आणि गंमतशीर योगायोग म्हणजे आज मी अध्यक्ष आहे आणि शरदरावजी हे स्वागताध्यक्ष आहेत.

''मराठी भाषेला अभिजात म्हणून शासन मान्यता मिळाली याचा सर्व मराठी भाषकांप्रमाणे मलाही आनंद झाला. शासकीय दर्जा मिळाल्याने काही आर्थिक लाभ महाराष्ट्राला, मराठी लेखक, कवी, संशोधक आणि महाराष्ट्रातील साहित्यिक उपक्रम राबवणाऱ्या संस्थांना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मराठी संस्थात्मक पातळीवर, विद्यापीठीय पातळीवर भरीव कार्य करेल आणि करावे अशी अपेक्षा आहेच.

त्याची किती पूर्तता होते हे येणारा काळ ठरवील. अर्थात त्यासाठी मराठी जनांची सर्वातोपरी प्रयत्न करण्याची तयारी पाहिजे आणि ती अपेक्षा आहे. ही अपेक्षा बाळगत असताना काही धोक्याचे लाल बावटेही समोर फडकत आहेत. भाषा आणि संस्कृती या सजीव संस्था आहेत. भाषेचे चलन जोपर्यंत समाजात सर्वसामान्य माणसांच्या व्यवहारात, आचरणात ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात भाषा विकासाची शक्यता असते. भाषेद्वारा सांस्कृतिक अभिव्यक्ती होत असते, अर्थात मराठी संस्कृतीचे भवितव्यही भाषिक चलनाशी बांधलेले आहे. आता माझ्या वयाचे जवळजवळ शतक पार करत असताना सामाजिक क्षेत्रात आणि विशेषत: शिक्षण क्षेत्रात सजगपणे दीर्घकाळ वावरणारी एक भारतीय व्यक्ती म्हणून मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल मला साधार साशंकता वाटते. जो समाज उच्चशिक्षित, आर्थिकदृष्ट्या काहीसा स्थिरस्थावर झालेला असतो, ज्याची आकांक्षा सर्व स्तरांवर जागतिकतेशी स्पर्धा करण्याची असते, तो अभिजनांचा एक महत्त्वाचा स्तर आहे.

''स्वातंत्र्योत्तर काळामध्ये, यंत्रयुगोत्तर काळामध्ये आणि विशेषत: आता तंत्र वैज्ञानिक युगाच्या काळामध्ये त्यांची संख्या चढती वाढती आहे. अशा काळात सर्वसामान्यांच्या मराठीचे काय होणार अशी शंका मनाला साधार भेडसावते आहे कारण, मराठीला जो अभिजात दर्जा मिळाला त्याच्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न झाले, आमच्या आधुनिक विद्वानांनी त्याच्याबद्दल संशोधनात्मक अक्षरश: शेकडो पानी अहवाल सादर केले; पण त्याच्याआधी जवळजवळ मध्ययुगापासून आमच्या लेखक, कवींच्या मनामध्ये मराठीला हवा तो दर्जा मिळत नाही याबद्दल खंत असे. त्याच्यामध्ये आमचे संत, निरनिराळ्या पंथांचे आचार्य यांचा समावेश होता. म्हणजे ही इतकी जुनी गोष्ट आहे की, माझ्यामते सुरुवातीचे जे भक्तिपंथ होते, त्याच्यामध्ये महानुभाव हा एक महत्त्वाचा भक्तिपंथ होता. त्याच्याही आधी सातवाहन राजाच्या काळामध्ये काही लेखन होत होते विशेषत: 'गाथासप्तशती' सारखे आणि गाथासप्तशतीमधूनसुद्धा जो मराठी व्यवहार आहे, मराठी जीवन आहे त्याचे अतिशय बारकाईने वर्णन केलेले होते. म्हणजे जात्यावरच्या ओव्या बायका म्हणत असत आणि शेतातली कामं करीत असत, अशी वर्णने गाथासप्तशतीमध्ये केलेली आहेत. आज मी बऱ्याच वेळेला जात्यावरच्या ओव्या सांगते तेव्हा लोकांना आश्चर्य वाटतं; पण त्याच्या आधीही जात्यावरची ओवी आहे म्हणजे जैन प्राकृतामध्ये बायका दळताना आणि कांडताना गाणी म्हणत होत्या याचे उल्लेख आहेत आणि त्याच्यामध्ये त्यांनी असं म्हटलेलं आहे की, जेव्हा कांडपिनी म्हणजे कांडप करणाऱ्या बायका, 'कांडपिनी, जई कुट्टीनी, विस्सरम् गायंती, तत हत हिदया, तुम किम् आकुली भवसि' याचा अर्थ हे माझ्या हृदया, ज्या वेळेला कांडपिनी अतिशय व्याकुळ स्वरामध्ये गाणी म्हणतात तेव्हा माझ्या हृदया तू का बरं व्याकुळ होतोस? याचा अर्थ श्रम करताना बायका जी गाणी म्हणत होत्या ती व्याकुळ करणारी गाणी होती. हे जैन प्राकृतामध्ये म्हटलेलं आहे, म्हणजे आधुनिक मराठीची आधीची जी अवस्था आहे प्राकृताची, त्यात आणि निरनिराळ्या प्राकृतामध्ये जैन प्राकृत आणि उद्योदन सुरीचे ग्रंथ हे महत्त्वाचे मानले जातात. ही इतकी जुनी गोष्ट आहे.

महानुभाव वाङ्मय तर ज्ञानेश्वरांच्या आधी थोडा काळ आहे म्हणजे इसवी सनाच्या ११ व्या-१२ व्या शतकात. ज्ञानेश्वर इसवी सनाच्या १३ व्या शतकाच्या शेवटचे! आपण इतिहासाचा हा क्रम लक्षात घेतला पाहिजे कारण, हे काहीही लक्षात न घेता बऱ्याच वेळेला शेरेबाजी केली जाते आणि इतिहासाचा जो सगळा टप्पा आहे तो लक्षात घेऊन ज्याला तौलनिक म्हणता येईल त्या तौलनिक पद्धतीने केला पाहिजे. तर

आमच्या महानुभाव पंथियांमधले जे नागदेवाचार्य होते व आचार्य चक्रधरांचे शिष्य आणि त्यांच्या काळामध्ये काही संस्कृत पंडितही होते, कारण प्रत्येक पंथामध्ये संस्कृत पंडित असतातच. आता आपल्या वारकरी पंथामध्येसुद्धा ज्ञानेश्वर महाराज आणि एकनाथ महाराज संस्कृतचे चांगले जाणकार होते, तसे महानुभाव पंथामध्येसुद्धा होते, त्या वेळेला केशवदेव नावाचा एक संस्कृतचा जाणकार होता, तो चक्रधरांचे तत्त्वज्ञान जे महानुभव पंथाचे आचार्य होते ते तत्त्वज्ञान अतिशय रसाळपणे पण संस्कृतात सांगायला लागला, त्या वेळेला नागदेवाचार्यांनी सांगितले, 'नको गा केशवादेया। तुमचा अस्मात्, कस्मात् नेणेचिगा। (तू हे जे काही अस्मात् कस्मात् संस्कृत बोलतोयेस ते आम्हाला कळत नाही.) येणे माझी म्हातारिया मराठीया नागवतील की। (कारण तू जर संस्कृत बोलायला लागला, तर सर्वसामान्य मराठी माणसांना ते समजणार नाही) 'म्हातारिया मराठीया' म्हणजे सर्वसामान्य मराठी माणसं, 'म्हातारा' हा शब्द वृद्ध या अर्थाने वापरला जात नव्हता. मी सुरुवातीलाच सांगितलं की, मी वयाचे जवळजवळ शतक पार करत आले. माझ्या गावाकडे आणि अजूनही काही ठिकाणी ग्रामीण भागांमध्ये ज्येष्ठ व्यक्तींच्यासाठी 'म्हातारा' हा शब्द वापरला जातो. म्हणजे माझी आई माझ्या धाकट्या भावाच्या वेळेला तो बाळ असताना आलेली होती गावाकडे, ती जेमतेम तीस एक वर्षांची असेल, त्या वेळेला गावातले लोक विचारायचे, 'का गं तुझी म्हातारी आली का? म्हातारा काय म्हणतो?' आता इतक्या लहान वयात कुणी कोणाला म्हातारी म्हातारा म्हणायला लागलं तर शहरातल्या लोकांना अपमान वाटेल; परंतु ही आमची बोलण्याची शैली आहे, हा मराठीचा व्यवहार आहे, ही मराठी जनांमध्ये चालत आलेली मराठी भाषा आहे. तेव्हा 'माझी मराठीया नागवतील की, माझी म्हातारिया मराठी' या सर्वसामान्य माणसांसाठी हा म्हातारी हा शब्द होता, तर ते नागवतील, 'त्यांना काही कळणार नाही रे' आणि मग तुझ्या पांडित्याचा उपयोग काय आहे? सर्वसामान्य माणसापर्यंत जर ते पांडित्य पोहोचलं आणि त्याचा उपयोग झाला तर! म्हणून तुझ्या पांडित्याचा उपयोग व्हावा असं जर तुला वाटत असेल तर, 'श्रीचक्रधरे निरुपिली मराठी। तियेची पुसा।', श्रीचक्रधरांनी जी मराठी सांगितली तिच्यातून तू बोल, काय तुला बोलायचे आहे ते, 'अस्मात् कस्मात्' मध्ये बोलू नको. म्हणजे आज जसं होतं, जे स्वत:ला शहाणे समजणारे लोक, विद्वान समजणारे लोक एकदम इंग्रजीत फाड्फाड् सुरू करतात आणि फाड्फाड् इंग्रजीमध्ये बोलणं म्हणजे जणू काही आपली विद्वत्ता आणि आपली प्रतिष्ठा ही सिद्ध होते असं मानतात. एक टप्पा असा होता की, तो मान संस्कृतला होता आणि इसवी सनाच्या ११-१२व्या-१३व्या शतकामध्ये ही परिस्थिती होती की, संस्कृतमध्ये ग्रंथरचना करण्यामध्ये, बोलण्यामध्ये, वादविवाद करण्यामध्ये प्रतिष्ठा होती. त्याप्रमाणे सर्वसामान्य माणसांना जर ते शहाणपण शिकायचं असेल तर सर्वसामान्य माणसांची जी भाषा आहे, बोलीभाषा जी आहे त्या बोलीभाषेमध्ये व्यवहार झाले पाहिजेत, असा आग्रह त्या वेळच्या काही विद्वानांचा होता. ते विद्वान संस्कृतचे जाणकार होते. ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट, आणि म्हणून त्यांनी सांगितले की, हा व्यवहार सामान्य माणसांच्या भाषेमध्ये व्हावा. नाहीतर मग ज्ञानेश्वरांना मराठीमधून ती ज्ञानेश्वरी सांगायची गरज काय होती? ते संस्कृतामध्ये भाष्य करू शकले असते. इतर अनेकांनी भगवत्‌गीतेवर भाष्ये केली त्याप्रमाणे किंवा एकनाथ महाराजांनी 'भावार्थ रामायण' आणि 'एकनाथी भागवत' हे मराठीमध्ये कशाला रचले असते? ते संस्कृतमध्ये करू शकले असते; परंतु एकनाथ महाराजांनी नुसतीच भागवताची रचना केली नाही, नुसतीच अभंगांची रचना केली नाही तर लोकशैलीमध्येही रचना केल्या. 'भारूड' म्हटलं की

**गोव्यामध्ये पोर्तुगीज आले आणि तेथे फादर स्टीफन्सनसारखा माणूस आला आणि मग तो ज्ञानेश्वरीच्या शैलीमध्ये मराठीचं वर्णन करू लागला.**

**'जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी।**
**की परिमळांमाजी कस्तुरी,**
**तैसी भासामांजी,**
**साजिरी भासा मराठी।।'**

**असं एक ख्रिश्चन धर्मगुरू म्हणतो.**

आपल्याला एकनाथ महाराजांचं भारूड आठवतं. भारूड करणारे जे पारंपरिक लोक कलावंत आहेत ते आजही प्रतिष्ठेचं म्हणून नाथांचं भारूड सादर करीत असतात. नाथांच्या भारुडामध्ये जी लकब आहे, जी शैली आहे म्हणजे अभिजात मराठीमध्ये बोलायचं झालं तर जो 'फ्लेवर' आहे, तो 'फ्लेवर' नाथांच्या भारुडामध्ये आहे आणि मग नाथांनी भारुडं रचली. संतांनी काय केलं, की जे आपल्या रचनेचे छंद आहेत ते छंद, लोकपरंपरेतले छंद उचलले. ओवी हा लोकपरंपरेतला अतिशय सुगम आणि सोपा छंद आहे. जी ओघाओघात येते ती ओवी, बोलताबोलता येते ती ओवी, शब्द होता होता येते ती ओवी, मग ती बाळाला झोपवायची असू दे, जात्यावरची असू दे, सडा सारवण करायच्या बायकांच्या ओव्या असू दे किंवा एकनाथ महाराजांची ओवी वेगळी, ज्ञानेश्वर महाराजांची ओवी वेगळी. त्याला निरनिराळी नावे दिली. मग त्याचं वर्गीकरण केलं की, काही साडे तीन चरणी, साडे चार चरणी, पाच चरणी, तीन चरणी, अडीच चरणी वगैरे... परंतु ही ओवीच, आणि सर्व संतांनी ओवी या छंदामध्ये रचना केली. आपण अभंग अभंग म्हणतो तो अभंग म्हणजे तरी काय, तीन ओव्यांचा एक तुकडा की ज्याच्यामध्ये एक विचार, एकच भावना व्यक्त केलेली असते म्हणजे तो सहा चरणी अभंग झाला. चार ओव्यांच्यामध्ये जर रचना झाली तर तो आठ ओळींमधला तो एक अभंग. तेव्हा संतांनी ज्या रचना केल्या त्या लोकशैलीमध्ये केल्या कारण त्या सामान्य शैली आहेत. अक्षरगणवृत्ताच्या गोंधळामध्ये ते पडले नाहीत कारण ती पंडिती परंपरा ही वेगळी आणि लोकपरंपरा ही वेगळी परंपरा आहे आपल्याकडे. एकाच वेळेला पंडिती परंपराही चालू आहे आणि लोकपरंपराही चालू आहे आणि ज्यांना आपण विद्वान मंडळी म्हणतो ती एकनाथ महाराजांच्या सारखी आणि ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखेही सर्वसामान्य माणसांच्या बोलीमध्ये भाषेमध्ये, रचना करत होती. म्हणून आपल्याकडे आजही म्हटलं जातं किंवा त्या वेळच्या पुस्तकामध्ये तुम्हाला शब्द मिळतील की, ज्ञानेश्वरांनी प्राकृतमध्ये ज्ञानेश्वरी सांगितली. आपण त्याला 'जुनी मराठी' म्हणतो, त्या जुन्या मराठीला प्राकृत मराठी म्हटलेलं आहे आणि मराठी भाषेचा जो आपण अभ्यास करत असतो महाविद्यालयामध्ये तिथे मराठी भाषा कशी निर्माण झाली त्याचे टप्पे सांगितलेले असतात, की संस्कृतमधून अपभ्रष्ट भाषा निर्माण झाल्या, मग त्याच्यातनं प्राकृत भाषा निर्माण झाल्या, मग निरनिराळ्या प्राकृतांमधून निरनिराळ्या आधुनिक बोली निर्माण झाल्या आणि मग भारतामध्ये ज्या प्राकृत बोली होत्या त्याच्यामध्ये महाराष्ट्री ही प्राकृत आहे, शौरसेनी प्राकृत आहे, मगधी आहे, अवधी आहे. अवधी आणि मगधीमधून उत्तरेकडच्या संतांनी रचना केलेली आहे. कबीरदासजींनी आणि मलूकदासजींनी आणि आपल्याकडच्या संतांनी अलीकडच्या या छंदामध्ये रचना केलेली आहे. ओवी, अभंग या छंदामध्ये रचना केलेली आहे. तर हे लोकपरंपरेमध्ये असलेले छंद हे संतांनी वापरलेले आहेत आणि त्याला प्राकृत म्हटलेलं आहे. इतकंच नव्हे तर मी जे म्हटलं की, गेली अनेक वर्षे या भाषेला उच्चस्तरीयांनी मान द्यावा, अशा प्रकारची मागणी

अप्रत्यक्षपणे या सगळ्या संतांनी केलीये. त्याला 'अभिजात भाषेचा दर्जा' वगैरे असं काही म्हटलेलं नाहीये; परंतु पंडितांनी तिला जर डावललेलं असेल, तर तिला तो सन्मान मिळावा अशी मागणी सर्वांनी केली आहे.

''ज्ञानेश्वर महाराजांची वचनं आता आपण वारंवार देतो की – 'अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।।' इतकेच कशाला एकनाथ महाराजांनी म्हटलेलं आहे, 'संस्कृत भाषा देवे केली। प्राकृत काय चोरापासून आली।।' ती काय चोरांनी केली, ती देवांनीच केलेली आहे ना! 'संस्कृत भाषा गोड वाणी' तिला आम्ही नावं नाही ठेवत. तिला आम्ही हलकी नाही मानत. ती गोड आहे, चांगली आहे. 'संस्कृत भाषा गोड वाणी, जैसे खोल आडातील पाणी। परि ते दोर पात्रावाचूनी आक्त जना केवि मिळे।' सर्वसामान्य माणसांना ते कठीण आहे, ते सुगम करून सांगितले पाहिजे, ते कसे मिळेल, तर मराठीतून! फार कशाला, परदेशी लोक ज्या वेळेला भारतामध्ये आले आणि भारतामधल्या सामान्य माणसांच्यामध्ये त्यांना काय त्यांच्या विचारांचा प्रसार करायचा असेल, भले धर्माचाही प्रचार करायचा असेल; पण त्यांना त्यासाठी सामान्यांची मराठी शिकणे भाग पडले.

''गोव्यामध्ये पोर्तुगीज आले आणि तेथे फादर स्टीफन्सनसारखा माणूस आला आणि मग तो ज्ञानेश्वरीच्या शैलीमध्ये मराठीचं वर्णन करू लागला. 'जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी। की परिमळांमाजी कस्तुरी, तैसी भासामांजी, साजिरी भासा मराठी।।' असं एक ख्रिश्चन धर्मगुरू म्हणतो, पोर्तुगालमधून आलेला आणि त्यांनी ते मराठीचं जसं सगळं वर्णन केलेलं आहे ते फार महत्त्वाचं आहे. आमच्याकडचे लोक मग नंतर धर्मांतर करून ख्रिस्ती झाले; पण ख्रिस्ती झाल्यानंतरसुद्धा त्यांनी ख्रिस्तांच्यामध्ये नेलं काय? तर पुन्हा मराठी लोकशैली नेली. म्हणजे रेव्हरंड नारायण वामन टिळक हे ख्रिस्ती झाले आणि त्या मंदिरांमध्ये म्हणजे चर्च म्हणतात ती मंदिरं, त्या चर्चमध्ये त्यांनी भजनं आणि कीर्तनं सुरू केली. म्हणजे येशू ख्रिस्तावरच्या कथा त्यांनी कीर्तनशैलीत सांगायला सुरुवात केली. आपल्याकडे राम–कृष्णांच्या कथा कीर्तनकार सांगतात त्याप्रमाणे! त्यामुळे ही जी देवाण–घेवाण आहे, परभाषकांशी देवाण–घेवाण, परधर्मीयांशी देवाण–घेवाण, ज्या वेळेस झाली त्या वेळेला सगळ्यांना इथल्या देशी भाषेचा आश्रय घेणं भाग पडलं कारण, सर्वसामान्य माणसांच्यापर्यंत पोहोचायचं असेल, तर त्यांना हे भाषेद्वारे करणे आवश्यक होते आणि त्यामुळे महाराष्ट्रामध्ये किंवा भारतामध्ये ज्या वेळेला यंत्रयुग आलं, युरोपियन लोकांनी आणलं, छपाईची यंत्रं आणली, त्या वेळेला मराठीतले अतिशय महत्त्वाचे ग्रंथ या युरोपियन मंडळींनी प्रथम छापले. मराठीतलं पहिलं व्याकरण हे मिशनऱ्यांनी छापलं, मराठीतला 'बृहद्‌कोश' मोल्सवर्थचा हा युरोपियन लोकांनी मराठीत छापला. त्यामुळे नुसता फादर स्टीफन्सन ओव्यांचं कौतुक करून थांबला नाही तर मराठी मनांच्यामधे जर जागा करायची असली, तर त्या भाषेच्या माध्यमातून गेलं पाहिजे याचं भान या सगळ्यांना होतं. फार कशाला आपल्याकडचे जे युरोपियन गव्हर्नर आले आणि त्याच्यापेक्षा कलेक्टर त्या भागातले तर त्या कलेक्टरांना त्या त्या प्रदेशातली भाषा शिकणं हे अनिवार्य होतं, आणि त्यांनी त्या त्या प्रदेशातल्या भाषा शिकून, तिथली जी स्थानिक माहिती होती, त्या स्थानिक भाषेमध्ये ती माहिती एकत्र करून छापायला सुरुवात केली. 'गॅझेटीयर' असं म्हणतात त्याला आणि या युरोपियन मंडळींच्या काळात सगळ्या प्रांतांतल्या कलेक्टर्सनी ही गॅझेट्स अतिशय चांगल्या रीतीने केली. मी ज्या वेळेला सबंध भारतभर हिंडले, लोककलांचा अभ्यास करण्यासाठी, तेव्हा त्या त्या ठिकाणी मला जर सगळ्यात मोठी मदत कुठली झाली असेल तर त्या त्या ठिकाणच्या गॅझेटची

मदत झाली. आज ती गॅझेट्स तेवढ्या साक्षेपानी छापली जातात की नाही, मला माहिती नाही; परंतु त्या काळात त्या कलेक्टरच्या अखत्यारीमध्ये जो भूप्रदेश असेल त्या प्रदेशातलं गावन्‌गाव, तिथली मंदिरं, तिथले उत्सव, ते कुठल्या काळात होतात, काय होतात, तिथल्या प्रमुख जाती जमाती कुठल्या, त्या चालीरीती, रूढी कशा आहेत त्या सगळ्यांच्या नोंदी या मंडळींनी केल्या आणि त्या सामान्य माणसाच्या जीवनातल्या नोंदी आहेत. ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे आपल्याच देशामध्ये जर आपलं काय असेल हे शोधायचं असेल तर मला या गॅझेट्सची मदत खूप मोठ्या प्रमाणावर त्या काळामध्ये झाली आणि आजही कदाचित होत असेल, मला माहीत नाही.

''आपल्या देशातल्या विविध भाषांतील लोककथा व लोकगीतांची संकलने प्रथम युरोपियन लोकांनी केली. पुढे दुर्गाबाई भागवतांनी त्यांची मराठीत भाषांतरे केली. त्याआधी संस्कृतमध्ये लोककथांची संकलने होती. 'कथासरित्सागर' किंवा 'हितोपदेश' इ. तर हा जो सगळा व्याप आहे, भाषेचा.. ती भाषेची देवाण-घेवाण जी आहे ती देवाण-घेवाण एकारले पद्धतीने होत नाही, उभयपक्षी त्याच्यासाठी एक तयारी असावी लागते आणि मग ती तुमची प्रांत, देश, धर्म याच्या पलीकडे असते, आणि म्हणून आजही ज्याला आपण सीमाप्रदेश म्हणतो, ते कुठलेही सीमाप्रदेश घ्या, त्या सीमाप्रदेशातली जी भाषा असते, नुसतीच भाषा नाही समग्र संस्कृती, तिची संमिश्रता असते. कारण आता पुन्हा संस्कृती म्हणजे काय तर संस्कृती ही कुणीतरी एका धर्मगुरूंनी किंवा एखाद्या विद्वानांनी सांगितली आणि मग ती प्रसारित झाली अशी होत नाही. ही एक नैसर्गिक, जैविक प्रक्रिया आहे भाषेसारखीच. माणूस जेव्हा केव्हा जन्माला आला असेल विश्वामध्ये तेव्हापासून तो आपल्या भोवतालच्या वातावरणातून बऱ्याच गोष्टी शिकत आला आहे. चाली, रीती, रूढी या तिथल्या निसर्गाने त्याला शिकवल्या आणि त्याच्या गरजांनी, हवामानांनी शिकवल्या. हे सगळं निसर्ग माणसाकडून करून घेत आलेला आहे आणि माणूस त्या निसर्गाला साद-प्रतिसाद देत, त्याच्या ज्या भावना निर्माण झाल्या, त्याच्या श्रद्धा निर्माण झाल्या, त्याचे आचरण निर्माण झाले, त्याची घरे निर्माण झाली, त्याचं बोलणं निर्माण झालं, त्याच्या देवता निर्माण झाल्या, अन्न निर्माण झालं हे तिथल्या निसर्गानी घडवून आणलं आणि याला आपण म्हणतो ही संस्कृती. ही आदिवासींची संस्कृती, ही अमक्याची संस्कृती, तमक्याची संस्कृती! आता आदिवासींची संस्कृती म्हणजे काय? त्या काळामध्ये जो भूगोल होता, त्यांच्या भोवताली, त्या भूगोलानं त्यांच्याकडून हे सगळं करून घेतलं. खायचं काय? निसर्ग देईल ते. घरं कशी बांधायची? निसर्गाने त्या भागामध्ये जी साधनं उत्पन्न केली असतील ती घेऊन! म्हणून माणसाला पहिल्यांदा झोपडी बांधायचंही ज्ञान नव्हतं, तो तयार गुहेमध्ये राहायला लागला नंतर झोपडी बांधायला लागला. चिमण्यांची घरटी पाहून, निसर्गानं त्याला शिकवलं, माणसाला. याला आपण म्हणतो 'मानववंशशास्त्र' (Anthropology). मानववंश जन्माला आल्यापासून ते आजपर्यंत जी स्थित्यंतरे झाली, जी निसर्गाने आणि भोवतालच्या वातावरणाने झाली, मग नंतरच्या काळामध्ये निरनिराळ्या संस्कृतींच्या लोकांच्या सरमिसळीमुळे झाली, देवाण-घेवाणीमुळे झाली, ही Anthropology, हे मानववंशशास्त्र. माणसाच्या वंशाने हे सगळं निर्माण केलं, स्वीकारलं, काही गोष्टी नाकारल्याही. काळाच्या ओघामध्ये काही गोष्टी अनावश्यक वाटायला लागतात, काही गोष्टींत सुधारणा करावीशी वाटते. काही गोष्टी एकदम सोडून द्याव्याशा वाटतात, काही थोडंसं परिवर्तन करून मग त्या वापराव्याशा वाटतात. या सगळ्याचा जो इतिहास आहे हा

माणसाचा इतिहास आहे. ज्याला आपण 'समाजशास्त्र' म्हणतो. हा समाज कसा घडत आला तर निसर्ग, माणूस आणि 'मी आणि माझ्या भोवतालचं जग', यांच्यामधला जो नातेसंबंध आहे त्याच्यातून हे मानववंश, समाजशास्त्र! त्याच्या पाठीमागचं माणसाचं मन आणि मग त्याच्या श्रद्धा असतील, त्याच्या देवदवता असतील, त्याच्या भावभावना असतील, त्याच्या संवेदना असतील या सगळ्या देवाण-घेवाणीतून माणूस घडत आलेला आहे आणि त्याला आपण संस्कृती म्हणतो. आमच्या संस्कृतीत असं आहे अन् तुमच्या संस्कृतीत तसं आहे. अहो साधी गोष्ट आहे, घाटावरचा गणपती आला की त्याला गूळ खोबऱ्याचा नैवेद्य चालतो किंवा गूळ खोबऱ्याचा मोदक चालतो आणि कोकणामधल्या गणपतीला ओल्या नारळाचा मोदक चालतो हे कुणी शिकवलं, हे काय गणपतीनं सांगितलं, हे तिथल्या निसर्गाने सांगितलं कारण कोकणामध्ये नारळ विपुल आहेत, ओलं खोबरं कोरडं होईपर्यंत शिल्लकच राहत नाही. तोपर्यंतच संपून जातं. इथे घाटावर ओलं खोबरं मिळणं ही मुश्कील गोष्ट काल परवापर्यंत होती. आता व्यापाराच्या सोयी झाल्यामुळे कुठेही काहीही मिळतं, जगाच्या पाठीवर, अगदी युरोपमध्ये आणि अमेरिकेमधल्या पटेलच्या दुकानातसुद्धा ओलं खोबरं मिळतं. जे सगळं व्यापारानंतर झालं, देवाण-घेवाणीनंतर सुरू झालेलं आहे; परंतु क्रमाक्रमाने माणसाचा जो विकास होत गेला त्यात खाणं-पिणं, राहणं, कपडेलत्ते-माणसाने कपडे कुठले वापरावेत, हे तिथला निसर्ग ठरवतो. तुम्ही नाही ठरवू शकत काय करायचं ते. थंडी कडकडीत पडली की, तुम्ही काय असेल ते पांघरता, जनावराचं कातडंसुद्धा पांघरता आणि जर उकडायला लागलं तर उघडेबंब राहता, हेसुद्धा निसर्ग ठरवतो. मग हे यंत्रतंत्र युग आलं, त्यातनं निरनिराळी वस्त्रं निर्माण झाली वगैरे वगैरे, फॅशन वगैरे आल्या; परंतु निसर्गाने आम्हाला जगायला शिकवलं आहे आणि तो प्रवास आजपर्यंत चाललेला आहे म्हणून याला 'लोकसंस्कृती' म्हणायचं आणि हा जो धर्म आहे त्याला मी 'लोकधर्म' असे म्हणते. सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये आजतागायत आजसुद्धा जो प्रचलित आहे तो लोकधर्म जास्त आहे. त्याला तुम्ही कुठलातरी शिक्का, हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन वगैरे तुम्ही काहीही शिक्के मारा; परंतु लोकांच्या जगण्यातून जो आपोआप निर्माण झालेला आहे तो 'लोकधर्म' आहे आणि म्हणून मग तुम्हाला असं दिसेल की, रूढार्थाने इथला धर्म जरी बदलला आणि भौगोलिक परिस्थिती तीच असली तरी चालीरीती, रूढींच्यामध्ये फारसा फरक पडत नाही आणि म्हणून धर्मांतर करूनसुद्धा संस्कृत्यंतर होतंच असं नाही.

''मी जे सारखं सांगते की, ८५ वर्षांचं माझं आयुष्य नुसती जगले नाही, लहानपणापासून मी विविध अनुभव घेत आले. माझ्या सुदैवाने वडिलांची बदलीची नोकरी असल्याने मला खूप निरनिराळ्या ठिकाणी राहण्याची संधी मिळाली. मला मित्रमैत्रिणी खूप निरनिराळ्या जातीधर्माचे मिळाले. मुंबईसारख्या ठिकाणी रेल्वेच्या चाळीमध्ये राहत असताना मला ख्रिश्चन, मुसलमान मित्रमैत्रिणी होते, त्याच बरोबर सर्व जातीधर्माचे होते. त्या वेळी मग घरामधून काही विरोध वगैरे व्हायचे; पण माझ्यामध्ये जरा जन्मजात बंडखोरी असल्यामुळे असेल, मी या सगळ्यांमध्ये मिसळून असायची. मी जे म्हटलं धर्मांतर झालं तरी संस्कृत्यंतर होत नाही. म्हणजे संस्कृती बदलत नाही. त्याची आधुनिक उदाहरणं पुष्कळ सांगेन; पण माझ्या अनुभवातली काही सांगावीशी वाटतात. आमच्या चाळीमध्ये कल्याणला दोघी जणी मुस्लीम बहिणी होत्या. आम्ही आपले सातवीत-आठवीत होतो. त्या मुलींची तेव्हा गावाकडे लवकर लग्न झाली आणि त्या ज्या वेळेला गावाकडून आल्या, मी म्हटलं त्या लग्न होऊन येतात म्हणजे कशा असतात बुवा,

आपल्याकडे लग्न झालेली मुलगी कशी असते ते साधारण आपल्याला माहिती असतं. तर त्या आपल्या हिरवी साडी नेसलेल्या, हिरवी काकणं घातलेल्या, गळ्यामध्ये काळं डोरलं घातलेल्या होत्या, फक्त कपाळावर कुंकू नव्हतं आणि बाकी आपल्यासारखं हातात हिरव्या बांगड्याबिंगड्या सगळं होतं. मी म्हटलं, ''अगं का गं हुरमत आणि रेहमत, तुमच्यात हे असं असतं?''... ''हो, मग ती सगळ्यांच्यातच नसतं का?'' ती म्हटली. म्हणजे तिला आपला धर्म वेगळा आहे आणि काहीतरी वेगळं असायला पाहिजे हे वगैरे माहिती नव्हतं. आमच्या डोक्यामध्ये भोवतालच्या वातावरणाने ते शिरवलेलं होतं, की हे वेगळ्या धर्माचे आहेत वगैरे.

''तशी आणखी एक माझ्या संपर्कामध्ये त्याच वातावरणामध्ये एक मुलगी आली, ख्रिश्चन! आणि तिच्याकडेही असंच होतं, की तिच्या घरचे लोक आले तरी त्यांच्या चालीरीती, रूढी... फक्त काय असायचं की ते नाताळचा सण आला की दिसायचं! त्यातही त्यांच्याकडे मिठाई वगैरे तयार करायचे. तर आपल्यासारखीच तर सगळी मिठाई म्हणजे लाडू, करंज्या वगैरे असंच सगळं तयार करायचे. ती म्हणाली, 'तुमच्याकडे दिवाळीला नाही का करत तसं आमच्याकडं करतात.' फक्त मग रोट वगैरे नावाचा एक थोडासा वेगळा प्रकार असायचा. हे मी अत्यंत लहानपणापासून पाहत आले. नंतरच्या काळात, जाणत्या वयामध्ये ज्याला अत्यंत उच्चशिक्षित मैत्रिणी म्हणता येईल अशा म्हणजे सांगली, मिरजेला आल्यानंतर मला अनेक ख्रिश्चन आणि इस्लाम मित्रमैत्रिणीही भेटल्या, कल्याणलाही आमच्या वर्गामध्ये एक अल्बर्ट बाप्तिष्टा नावाचा ख्रिश्चन मुलगा होता. तर त्याच्याकडूनही मला बऱ्याच गोष्टी समजल्या. तर सांगली मिरजेला आल्यानंतर ज्या ख्रिश्चन मुली होत्या, त्या ख्रिश्चन मुलींच्याकडून आणि त्या कुटुंबीयांच्याकडून मला इतक्या गोष्टी मजेशीर जाणवल्या, की हे कोणी वेगळे आहेत असं मला वाटलंच नाही. म्हणजे आपल्या मिरजेच्याच एका डॉक्टरांचे कुटुंब होते, नाव आता सांगत नाही मुद्दाम आणि नाताळच्या सणात येशू जन्मल्याचा सीन ते उभा करायचे. म्हणजे आपल्याकडे जसं ते गोकुळाष्टमीचं चित्र/दृश्य उभं करतात किंवा हळदी कुंकवाला देखावे मांडत असतात तसे! येशू जन्माला कुठे आला, तर त्याच्या कथा आहेत. जशा आपल्याकडे कृष्णाच्या कथा आहेत, रामाच्या जन्माच्या कथा आहेत तशा येशूच्या जन्माच्या कथा आहेत, की त्याच्या आईला काही चांगलं ठिकाण बाळंतपणाला मिळालं नाही आणि एका गाईच्या गोठ्यात ते बाळ जन्माला आलं, आणि मग तिने त्या गवताच्या पेंढीच्यामध्ये त्या बाळाला म्हणजे येशूला ठेवलं. तो येशू ही एक दैवी शक्ती होती म्हणून मग त्याच्यावर आकाशातून एक मोठा प्रकाशझोत पडला आणि ते बाळ काहीतरी वेगळं आहे, असं जाणवलं. या मिरजेच्या डॉक्टरांच्या घरामध्ये हा सगळा देखावा उभा करायचे आणि त्या ठिकाणी असाच गोठ्याचा देखावा असे. तिथे गवत-बिवत अंथरलेलं, त्या बाळाची बाहुली एका टोपलीमध्ये ठेवलेली आणि मग दिव्याचा एक प्रकाशझोत. हा लोकोत्तर असा बाळ जन्माला आलेला. मला कृष्ण जन्माची आठवण झाली कारण आपल्याकडे कृष्ण असाच जन्माला आला. तो गवळ्याचाच पोर ना, आणि तो कुठे तर तुरुंगामध्येच जन्माला आला आणि मग नंतर त्याला गोकुळामध्ये आणलेलं आहे. या चमत्कार कथा ज्या आहेत; लोकोत्तर व्यक्तींच्या आयुष्याशी निगडित असलेल्या, त्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या अंतापर्यंतच्या; या जगाच्या पाठीवरच्या सर्व जाती जमातींच्यामधे आहेत हे जाणवतं. मग त्याच्यावर पुस्तकं लिहिलेली मला मिळाली म्हणजे ती माझ्याच मैत्रिणींनी लिहिलेली आहेत, त्यातल्या दोन मैत्रिणींच्या पुस्तकांना माझी प्रस्तावना आहे. एकीचं नाव मला मुद्दाम सांगावंसं

**महाराष्ट्र हा उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्या तळयात मळयात एकएक पाय टाकून उभा आहे कारण उत्तरेकडील संस्कृती आहे ती आर्यबहुल संस्कृती आहे आणि दक्षिणेकडील संस्कृती ही द्रविडबहुल संस्कृती आहे आणि आर्य आणि द्रविड या प्रदेशांचा सीमा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र! आणि म्हणून महाराष्ट्र हा सांस्कृतिकदृष्ट्या फार एकारलेला कधीही झाला नाही.**

वाटतं आपल्या वसईची सिसिलिया कार्व्हालो. सिसिलिया कार्व्हालोने अगदी सुरुवातीच्या काळामध्ये पुस्तक लिहिलेलं आहे आणि 'हिंदोळ्यावर' नावाच्या त्या पुस्तकामध्ये ती ज्याला आपण धर्मांतर झालेली ख्रिस्ती मंडळी म्हणू अशी ती मुळामध्ये वसईच्या वाडवळ नावाच्या एका मूळ आदिवासी जमातीमधली मंडळी ख्रिश्चन झाली. तर सिसिलियाने वाडवळ जमातीतल्या विवाह संस्थेबद्दल लिहिलेलं आहे. त्या विवाह संस्थेतली जी सगळी वर्णनं केलेली आहेत, ती म्हणजे विवाहातली गाणी, त्या नवरानवरीची वर्णनं ही जी सगळी आहेत... ती सगळी, तुमच्या माझ्या घरामध्ये असावीत, थोड्याफार फरकांनी अशा प्रकारचीच गाणी आहेत. त्या पुस्तकाला माझी प्रस्तावना आहे. त्यात ओव्या आहेत आणि त्या ओव्या अशा आहेत की, लग्नातले जे विधी आहेत त्याची वर्णने त्यात आहेत. त्यांच्याकडे मुलगी कशी बघतात त्याचे विधी आहेत, हळदीचे विधी आहेत. एक मला अतिशय आश्चर्याची गोष्ट वाटली या सगळ्यांकडे डोळसपणे पाहताना. अभ्यास वगैरे नाही म्हणत मी, मला हे आपोआप मिळालं मग, ते इस्लाम असू देत, ते ख्रिश्चन असू देत, आपल्याकडच्या आदिवासी जमाती असू देत, उच्चवर्णीय असू देत... काही विधी हे सर्वत्र समान असतात. विशेषत: हळद हा जो विधी आहे, तो आदिवासी जमातींच्यापासून धर्मांतरित जमातींपासून ते महाराष्ट्रातल्या उच्चवर्णीयांच्यापर्यंत भारतीयांत सर्वत्र हळदीचा विधी आहे. त्याचे तपशील वेगळेवेगळे असतील; परंतु हळद हा विधी सगळीकडे आहे. तर हा इस्लाममध्येही आहे. अनुपमा निरंजन उजगरे यांनी 'ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या' या पुस्तकात धर्मांतरित ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ज्या ओव्याचे संकलन केले आहे ते सर्व बहुजन मराठी स्त्रियांच्या ओव्यांचेच जणू संकलन आहे. फक्त 'विठ्ठल' देवाऐवजी येशूचे नाव या ओव्यांत आहे. धर्मांतराने संस्कृती पूर्णपणे बदलत नाही याचे हे उदाहरण आहे.

''सांगलीतच मिळालेली माझी आणखी एक मुस्लीम मैत्रीण होती. अत्यंत उच्चशिक्षित, हिंदीची प्राध्यापक होती. तिने अनेक पुस्तकं लिहिलेली आहेत आणि त्या पुस्तकांच्यामध्ये तिचं मला मोठं विलक्षण पुस्तक वाटतं ते म्हणजे तिने त्यांच्यामध्ये जी सगळ्यांत मोठी यात्रा असते, हजची यात्रा. हजची यात्रा करणारे लोक कमी असतात, तर ती हजची यात्रा ती करून आली होती आणि त्यानंतर तिने जे पुस्तक लिहिलं त्यालाही माझी 'पाठराखण' आहे. त्या पुस्तकाचं नाव मोठं अन्वर्थक आहे. पुस्तकाचं नाव 'कृष्णा ते जमजम'... 'कृष्णा ते जमजम' म्हणजे काय तर मुळात हे कुटुंब कृष्णाकाठी राहणारं. लहानपणी ती ज्या गावामध्ये राहत होती, त्या गावामध्ये शिवशंकराच्या पूजेचं प्राबल्य होतं. तिच्या पूर्वजांच्यामध्येही काही लोक शिवभक्त होते. शिवरात्रीचा उपवास करणारे होते आणि कृष्णा नदीवर स्नान करणं, कृष्णेच्या उत्सव काळात हे सगळे जण अतिशय भक्तिभावाने उत्सव साजरा करणारी मंडळी होती आणि नंतर तिने ती हजची यात्रा केली. त्या हजच्या यात्रेचं असं वैशिष्ट्य असं आहे की, तिथे गेल्यानंतर काबाचा जो प्रस्तर

आहे, त्याच्या समोर एक झरना आहे, झरा आहे आणि त्या झऱ्याला –'जमजम' असं म्हणतात. 'आबे जमजम' आबे म्हणजे आप, पाण्याचा झरा. तर तो पाण्याचा झरा आहे त्याच्यात स्नान करणं हे पवित्र आहे. म्हणजे 'एकीकडे मी कृष्णेचीही स्नाने केली आणि एकीकडे जमजमचंही स्नान केलं असा माझ्या आयुष्याचा सगळा प्रवास झाला,' असे तिने लिहिले आणि मला वाटतं की, सांस्कृतिक सेतूच्या दृष्टीने याच्यापेक्षा दुसरी उदाहरणे नसतील. याच्यापेक्षा जास्त ज्याला ऐतिहासिक उत्खनन आणि विद्वत्ताप्रचुर व्याख्यानं वगैरे देण्याचीही गरज नाही. आज अनेक उदाहरणे, व्यक्ती, ग्रंथ मला आयुष्यामध्ये भेटत गेले आणि हे ग्रंथ माझ्या संग्रही आहेत. आजही जुन्या काळापासून तर ख्रिश्चन असू देत, इस्लाम असू देत किंवा भाषिक सीमा प्रदेशांमध्ये ही संस्कृतीची देवाण–घेवाण इतकी चालते की, काही विचारता सोय नाही.

''आज दिल्लीला हे संमेलन भरते आहे त्या तालकटोरा, यापासून इथपर्यंत आले ती निष्कारण चर्चा नाही, याचाही एक अनुबंध आहे कारण दिल्लीची जी सरहद्द आहे, दिल्लीची जी सीमा आहे ती ओलांडल्यानंतर आपल्याला उत्तरेकडे जाता येतं. दिल्लीच्या ज्या निरनिराळ्या व्युत्पत्ती सांगितल्या जातात, त्यातली एक व्युत्पत्ती आहे 'देहली'... देहली म्हणजे उंबरठा. दिल्ली या देशाचा उंबरठा आहे, त्यामुळे प्राचीन काळापासून निरनिराळ्या राजवटी आल्या त्यांची राजधानी ही दिल्ली किंवा दिल्लीचा परिसर होता. अगदी महाभारताच्या राजवटीतसुद्धा. म्हणजे कौरव पांडवांची ज्या वेळेला यादवी झाली, त्या वेळेला पांडवांना जे राज्य दिलं ते इंद्रप्रस्थाचं दिलं आणि त्या वेळेस ते खांडववन होते. 'ते खांडववन तुम्ही जाळा आणि तिथे तुमची राजधानी वसवा' असं भीष्मांनी पांडवांना सांगितलं. आज ती वसाहत आहे, दिल्लीच्या परिसरामध्ये ते होतं. सांगायचं तात्पर्य, महाभारतापासून किंवा त्याच्या आधीपासून दिल्लीचं महत्त्व राजधानी म्हणून आहे कारण हा उत्तरेकडच्या आणि दक्षिणेला सांधणारा असा भूप्रदेश आहे आणि त्याला खूप मोठी ऐतिहासिक, पौराणिक अशी परंपरा आहे. तीच गोष्ट महाराष्ट्राची आहे कारण महाराष्ट्र हा उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्या तळ्यात मळ्यात एकएक पाय टाकून उभा आहे. कारण उत्तरेकडील संस्कृती आहे ती आर्यबहुल संस्कृती आहे आणि दक्षिणेकडील संस्कृती ही द्रविडबहुल संस्कृती आहे आणि आर्य आणि द्रविड या प्रदेशांचा सीमा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र! आणि म्हणून महाराष्ट्र हा सांस्कृतिकदृष्ट्या फार एकारलेला कधीही झाला नाही. येथे दोन्ही संस्कृतींची देवाण–घेवाण, उदारमनस्कता ही सातत्याने राहिली. ती भाषेमध्ये राहिली आहे. गंमत म्हणून दोन्ही भाषक एकमेकांची टिंगल करत असतात, नाही असं नाही. म्हणजे आता नाटककार गडकऱ्यांनी म्हटलेलं आहे, कन्नड भाषेचं वर्णन करताना की, एका गाडग्यामध्ये खडे टाकावेत आणि गडगड गडगड आवाज करावा, तसे कन्नड लोक बोलताना आवाज करतात आणि तिकडचे कन्नड लोक मराठीचे वर्णन करत असतात, 'इकड्डे – तिकड्डे' असं म्हणणारे जे असतात ते मराठी असतात. दक्षिणेकडचे लोक मराठी लोकांचे वर्णन करत असताना प्राकृतमध्ये असं करतात की, 'धडधाकट, काळ्या रंगाचे 'दिणल्ले गहिल्ले' म्हणतात, सावळ्या वर्णाचे, 'दडमडह सामलंगे, कलहसीले, तथ्थ मरहठ्ठे' अशी ही परंपरा आहे. ही आजपर्यंत टिकते, कारण आमचा एकही कौटुंबिक किंवा सामाजिक असा भाग नाही की, जिथे भांडणं होत नाहीत. म्हणजे लग्नं असलं तरी भांडणं होतात, बारसं असो किंवा बारावं असो भांडणं हा मराठी माणसाचा गुण. काहीतरी खुसपट काढून भांडायचं. राजकारणातलं तर काही विचारूच नका. त्यामुळे ते गंमतीने घ्यायचं; आणि माणसं धडधाकट, शामल वर्णाची अशी असतात. फार गोरे वा फार काळे नाहीत, मध्यम मार्ग आणि मग देवाण–घेवाण जी

असते ती महाराष्ट्राची आणि कर्नाटकाची सर्वत्र आहे म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीमध्ये कन्नडचा प्रभाव किती मोठ्या प्रमाणावर आहे याच्यावर कन्नडचे (बेळगावचे) एक गृहस्थ, आमचे रं. शा. लोकापूर नावाचे मित्र यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे. 'ज्ञानेश्वरीवर कन्नडचा प्रभाव!' तेव्हा आजतागायत सुद्धा ही भाषिक देवाण-घेवाण, सांस्कृतिक देवाण-घेवाण ही सातत्याने होत आहे. मराठी भाषेत कितीतरी शब्द, कितीतरी वाक्प्रचार हे कानडी सीमाभागातील आहेत. पुष्कळदा ज्याला आपण बालगीते, बडबडगीतं म्हणू त्या बडबडगीतात अशी उदाहरणे पुष्कळ आहेत. असे खाद्यपदार्थ कितीतरी आहेत, जे देवाण-घेवाणीतून दोन्ही प्रदेशात रुजले आहेत. उत्तरेकडे भाजणी नाही. थालीपिठाची संस्कृत व्युत्पत्ती सांगताना 'स्थालीपीठ' वगैरे करून सांगतात. सगळ्यात मोठे उदाहरण 'पुरणपोळी.' ही महाराष्ट्राची आणि कानडी प्रदेशांची खासीयत आहे. कन्नड 'हुरण हुळगी' मराठीत 'पुरणपोळी' होते आणि पुरणाचे 'कडबू' कर्नाटकात प्रिय होतात. अशी कितीतरी देवाण-घेवाण ही दक्षिणेकडे आणि महाराष्ट्रामध्ये सहज होते कारण समान संस्कृती येथे नांदते आहे, कारण हा जो सगळा सीमाप्रदेश आहे, या सीमाप्रदेशात खाद्यपदार्थ, कपडे, भाषा, चालीरीती, रूढी, लग्नातले व्यवहार यांमध्ये विलक्षण सारखेपणा आहे. एके ठिकाणी मी मुद्दाम विस्तृतपणे कर्नाटक आणि महाराष्ट्रामधली जी विवाहपद्धती आहे, त्या विवाह पद्धतीत किती सारखेपणा आहे त्याबद्दल लिहिले आहे आणि मग त्यातल्या बारीक बारीक बाबी वर्णन केल्या आहेत. स्त्रियांची नऊवारी सकच्छ साडी आणि विवाहात वधूला हिरवे वस्त्र व बांगड्या या फक्त महाराष्ट्र व कर्नाटकात आहेत.

''आमच्या नाशिकच्या बाजूला, मी 'आमचं' नाशिक म्हणते आहे कारण मी दीर्घकाळ नाशिकलापण राहिले त्यामुळे म्हणते. तिथली संस्कृती अनुभवली व पाहिली आहे. त्या नाशिकच्या पलीकडे जो प्रदेश आहे 'डांग' प्रदेश हा गुजरात सीमेवर आहे. ज्या वेळेला संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला तेव्हा 'डांग प्रदेशासह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' वगैरे आरोळ्या आम्ही शाळेत असताना देत होतो. त्या वेळी कळत नव्हतं; पण पुढे जाणत्या वयामध्ये जेव्हा मी डांग प्रदेशात फिरले, विशेषत: सापुताऱ्याला हिल स्टेशन आहे मोठं आणि ते डांग प्रदेशालगत आहे. तिथे गेले आणि तिथल्या आदिवासी आणि शेतकरी बायका मी पाहिल्या, तेव्हा संस्कृती संगम म्हणजे काय, ते समजलं. हे तुम्हाला कुठल्या ग्रंथात दिसणार नाही, प्रत्यक्ष पाहिले की दिसते. म्हणजे कसं, की त्या ग्रामीण बायका साडी नेसलेल्या होत्या; पण त्यांनी साडी कशी नेसलेली - कमरेपर्यंत; आपली एखादी कष्टकरी मराठी बाई जशी साडी नेसेल तशी, म्हणजे गुडघ्यापर्यंत कासोटा-बिसोटा घातलेली नऊवारी नेसलेली आणि वरचा पदर कमरेच्या वरचा तो गुजराती पद्धतीने घेतलेला असा होता. तेव्हा गुजराती आणि मराठी यांचं जे संमिश्रण आहे ते त्या सीमाभागातल्या स्त्री पोशाखामध्ये आपल्याला दिसतं, भाषेमध्ये तर खूप असतं. मुंबई व्यापाराच्या दृष्टीने सोयीची होती म्हणून इंग्रजांनी मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी केली; पण सांगायचं तात्पर्य, सांस्कृतिक आणि भाषिक देवाण-घेवाण, सीमाप्रदेश ओलांडून, धर्म ओलांडून, जात ओलांडून होत असते; पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली असते आणि म्हणून एकारलेपणा जो असतो, कुठल्याही बाबतीत, तो टिकत नाही. 'हे शुद्ध आणि ते अशुद्ध,' मग ते धर्माच्याबाबतीत असेल, भाषेच्याबाबतीत असेल, चालीरीती, रूढींच्याबाबतीत असेल, माणसाच्या आचरणात म्हणूनच हे असत नाही. लोकाचरण महत्त्वाचं (शास्त्रात रुढीर्बलीयसि) शास्त्रापेक्षा रूढी, चालीरीती प्रभावी असतात. मी इतका वेळ हा शब्द टाळत होते; पण ही लोकसंस्कृती आचरणात असते. 'लोक' हा शब्दच मुळी

बहुवचनात आहे, तो एकवचनात नाहीये आणि त्यामुळे लोकांचे म्हणून जे काही असेल ते त्या संस्कृतीमधील व्यक्ती, त्या लोकांच्या मधला एक घटक असते. म्हणून मी आणि माझ्या भोवतालचं जग महत्त्वाचे! लोकसंस्कृती ही सबंध भारताच्या सांस्कृतिक, धार्मिक जीवनाला व्यापून राहिलेली आहे आणि आजतागायत ती आपल्याला दिसेल.

''जाता जाता एक आणखी महत्त्वाची नोंद 'लोकसंस्कृती' केवळ ग्रामीण, केवळ जुनी असते असा अलीकडे शहरवासीयांचा एक गैरसमज रूढ झाला आहे. प्रत्यक्षात लोकसंस्कृती व नागर संस्कृती यात सतत आदान-प्रदान होते. किंबहुना 'लोक' जीवनात ज्या बाबी लोकप्रिय असतात, त्या नागरजन- अभिजन जाणीवपूर्वक उचलतात आणि त्यात काही फेरफार करून तिचे जाणीवपूर्वक नागरीकरण - संस्कृतीकरण करतात. ही प्रक्रिया जीवनाच्या सर्व अंगात सतत चालू असते. संस्कृतीचे थोर अभ्यासक एम्. एन्. श्रीनिवासन त्याला 'संस्कृतीकरण संस्कृतायझेशन' (लोकनागर प्रक्रिया) असं म्हणतात. उदा. पारंपरिक विध्यात्मक लोककला उणावत असताना त्यातील कलात्मक घटकांचा उपयोग विजय तेंडुलकर ('घाशीराम कोतवाल') किंवा सतीश आळेकर ('महानिर्वाण') सारख्या नाटकात करतात व 'लोकनागर रंगभूमी' निर्माण होते. म्हणून लोक संस्कृतीचा प्रवाह आदिम ते अद्यतन संस्कृतींच्या सर्व अंगात चालूच आहे. लोकसंस्कृती ही काळानुसार बदलणारी एक प्रवाही प्रक्रिया आहे.

आपण लोकसंस्कृतीच्या व्यापकतेबद्दल बोलत होतो. लोकसंस्कृती ही माणसांच्या सर्व अस्तित्वाला व्यापून राहिलेली आहे. लोक हा शब्दच नेहमी समूहवाचक आहे. बऱ्याच लोकांचे जरा समज वेगळे असतात, त्यांच्यासाठी थोडं स्पष्टीकरण की, इंग्रजीमध्ये जे फोकलोअर (folklore) शब्द आहे त्याच्यासाठी 'लोकसाहित्य' हा शब्द मराठीमध्ये रूढ झालेला आहे. आता हा शब्द रूढ करत असता अनेक लोकांच्या चर्चा झालेल्या आहेत, वाद झालेले आहेत, या सगळ्या चर्चांमध्ये न शिरता इंग्रजीमध्ये जो 'फोकलोअर' मधला जो फोक (folk) शब्द आहे, लोक याअर्थी तो बऱ्याच वेळेला तुच्छतादर्शक वापरला जातो. मराठीमध्ये मात्र किंवा भारतीय संदर्भामध्ये मात्र तो तसा नाही कारण आपल्याकडे 'लोक' हा शब्द नेहमी आदरवाचक आहे. म्हणजे लोकमत, लोकसत्ता, लोकभावना यांचा आदर करणारा! तेव्हा लोक हा शब्द भारतामध्ये हा नेहमी आदरसूचक अशा प्रकारे निरनिराळ्या भाषांच्यामध्ये वापरलेला आहे. या शब्दासाठी म्हणजे 'फोकलोअर' या शब्दासाठी मराठीमध्ये किंवा भारतीय भाषांच्यामध्ये निरनिराळे शब्द सुचवले गेलेले आहेत; कारण त्याची जी व्यापकता आहे ती मघाशी म्हटलं तसं लोकसंस्कृतीमध्ये खूप व्यापक आहे. लोकसाहित्यामध्ये 'साहित्य' या शब्दाचा आपला मराठीमध्ये रूढ अर्थ हा केवळ शब्दसाहित्य एवढाच आहे, म्हणजे शब्दांनी घडलेलं साहित्य- कथा, नाटक, कादंबरी वगैरे वगैरे. त्याला मी शब्दसाहित्य म्हणते; परंतु 'साहित्य' हा शब्द इथं साधनवाचक आहे, लोअर या अर्थाचा आहे. त्यामुळे फोकलोअरच्या शब्दामध्ये लोकसंस्कृतीची जडणघडण ज्या ज्या साहित्यांमुळे होते, ज्या ज्या साधनांनी होते, तो साधनवाचक शब्द आहे. त्याच्यात शब्दसाहित्यपण आहे आणि शब्देतर साहित्यपण आहे. म्हणजे मघाशी म्हटलं तसं चालीरीती, रूढी, श्रद्धा, माणसांचं खाणंपिणं, घरंदारं, कपडेलत्ते ही जी सगळी जीवनाची जडणघडण करणारी साधने आहेत या सगळ्यांना मिळून साधनवाचक असा 'साहित्य' हा शब्द आहे. इंग्रजीमध्ये एक मोठा कोश आहे, लोकसंस्कृतीबद्दलचं विवेचन करणारा 'Dictionary of folklore mythology and legend'... 'Folklore of mythology and legend...' मध्ये मारीया लिच ह्यांनी (१९५३ च्या आसपास रचलेला)

खूप मोठा कोश आहे आणि त्याच्यामध्ये तिने ज्या folklore च्या व्याख्या दिलेल्या आहेत, त्या निरनिराळ्या युरोपियन विद्वानांनी केलेल्या आहेत आणि त्याच्यामध्ये folklore मध्ये शब्दसाहित्य आणि शब्देतर साहित्य या सर्वांचा समावेश केलेला आहे. मराठीमध्ये मात्र साहित्य म्हणजे आपण फक्त शब्द साहित्य – कथा, गीत वगैरे किंवा फार तर म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, चालीरीती एवढाच अर्थ घेतो. त्याच्यापेक्षा व्यापक अर्थाने शब्द वापरलेला आहे. दुर्गाबाई भागवतांनी मराठीमध्ये प्रथम folklore किंवा 'लोकसाहित्य' या शब्दाचे विवेचन केले आहे, 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथामध्ये! त्याच्यामध्ये साहित्य हा शब्द त्यांनी साधनवाचकच घेतलेला आहे म्हणजे चालीरीती, रूढी, परंपरा वगैरे या सगळ्यांना उद्देशून त्यांनी लोकसाहित्य हा शब्द वापरलेला आहे. राजवाड्यांना प्रथम मराठीमध्ये विसाव्या शतकात जुनी काही गीते सापडली, काही कथा सापडल्या आणि त्याच्यासाठी त्यांनी 'लोककथा' आणि 'लोकगीतं' हे शब्द प्रथम राजवाड्यांनी वापरले आणि मग त्याच्यावरून लोकसाहित्य हा शब्द अनेकांनी वापरायला सुरुवात केली. नंतर ज्यांनी प्रथम कोश निर्माण केले त्यात ना.गो.चाफेकर, शंकर गणेश दाते यांनी लोकसाहित्य हा शब्द रूढ केलेला आहे आणि विशेषत: शंकर गणेश दात्यांचं वैशिष्टच असं आहे की, लोकसाहित्याची व्याख्या करत असताना किंवा लोकसाहित्याची व्यापकता सांगत असताना त्यांनी अन्य भाषिक लोकसाहित्य घेतलेलंच आहे. म्हणजे जसे म्हटले सीमाप्रदेशातले साहित्य तसे अन्य धर्मीयांच्या लोकसाहित्याचा विचारही त्यांनी त्यात केलेला आहे आणि त्यांच्या कोशामध्ये त्यांनी त्याचे विवेचन केलेले आहे. त्यामुळे मराठीमध्ये यापूर्वीही लोकसाहित्याची ही जी व्यापकता आहे की, देश, धर्म, भाषा याच्या पलीकडे जाणारी संस्कृती या अर्थाने लोकसाहित्य किंवा लोकसंस्कृती शब्द रूढ केला आहे. नंतर 'लोकविद्या' हा शब्द दत्तो वामन पोतदारांनी वापरण्याचा प्रयत्न केला की, विविध प्रकारच्या ज्या विद्या आहेत, त्या म्हणजे लोकविद्या! Folklore या अर्थाने तो शब्द वापरला; पण तो फारसा काही रुळला नाही. पुढे ग्रामसाहित्य, लोकयान, जानपदगीतं अशा प्रकारचे शब्द मराठीमध्ये वापरले गेले. आपल्याकडे ग.ल. ठोकळांच्या ज्या कविता होत्या त्यांच्यासाठी 'जानपदगीतं' असा शब्द वापरलेला आहे. पंडित कृष्णदेव उपाध्याय हे हिंदीमधले लेखक त्यांनी मात्र 'लोकसंस्कृती' हा शब्द मात्र वापरलेला आहे.

''लोकसंस्कृती या शब्दाबद्दल मराठीमध्ये डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी 'लोकसाहित्यासाठी लोकसंस्कृती हा शब्द जास्त उचित आहे,' असे मांडलेले आहे. त्यामुळे लोकसाहित्य आणि लोक संस्कृती हे बऱ्याच वेळेला समानार्थी शब्द वापरले जातात, मात्र मराठीमधलेच लोकसाहित्याचे आणखीन एक विवेचक प्रभाकर मांडे यांचे म्हणणे असे आहे की, 'लोकसाहित्यातून लोकसंस्कृती अभिव्यक्त होते व त्यांच्यामध्ये एक छोटीशी सीमारेषा आहे की, लोकसंस्कृतीचे वर्णन करण्यासाठी जी परिभाषा वापरली जाते ती लोकसाहित्याची असते.' मात्र दुर्गाबाई भागवतांच्या नंतर मराठीमध्ये लोकसाहित्य हा शब्द, लोकसंस्कृती या अर्थाने जवळजवळ रूढ झालेला आहे, आणि तो आजतागायत चालत आलेला आहे. या लोकसंस्कृतीचे निरनिराळे आयाम आहेत, ज्याचा पुष्कळ लोकांनी अभ्यास केलेला आहे. त्यामधल्या एका महत्त्वाच्या अभ्यासकाचा मला या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो. हिंदीमध्ये वासुदेव शरण अग्रवाल नावाचे मोठे विवेचक पंडित होऊन गेलेले आहेत आणि त्यांनी 'प्राचीन भारतीय लोकधर्म' नावाचे पुस्तक लिहिलेले आहे. ज्याला आपण वैदिक

म्हणतो त्या साहित्यापासून किंवा वैदिक चालीरीती, रूढी, विधिविधानं म्हणजे यज्ञसुद्धा, तर त्याच्या पलीकडे जाऊन लोक परंपरेमध्ये समकक्ष असलेल्या विधिविधानांचा उल्लेख केलेला आहे, आणि त्याच्यासाठी लोकपरंपरेमधील परिभाषा वापरलेली आहे. त्यांचं म्हणणं असं आहे की, संस्कृतमध्ये यज्ञासाठी 'मह' किंवा 'मख' असा शब्द आहे आणि मग त्या निरनिराळ्या यज्ञाच्या लोकविधींच्या रूपांना तो शब्द लावलेला आहे. अशा प्रकारचे शब्द प्राकृत भाषेमध्ये प्राचीन काळापासून वापरले गेलेले आहेत फक्त निसर्गाशी संबंधित असलेल्या ज्या जत्रा यात्रा होत्या त्यांना उद्देशून त्यांनी 'यज्ञ' या अर्थाने 'मह' किंवा 'मख' आहे तसा शब्द वापरलेला आहे कारण शेवटी आपण वेदांच्यामध्ये जरी गेलो तरी जी वर्णनं केलेली आहेत ती निसर्ग तत्त्वांचीच केलेली आहेत. म्हणजे नदी, सागर, पर्वत, वृक्ष, जंगलं यांची वर्णनं, उषादेवीचं वर्णन, सागर देवाचं वर्णन केलेलं आहे. फार कशाला आपल्याकडे आदिवासींची जी गीतं आहेत, या ठिकाणी फार विस्तार करायला मला अवकाश नाहीये; परंतु आदिवासींच्या गीतांमध्ये जी लग्नाची गीतं आहेत त्या लग्नाच्या गीतांमध्ये नदी, सागर, पर्वत, झाडं, वृक्ष यांचा उल्लेख केलेला आहे. म्हणजे आपल्याकडे लग्नामध्ये जो विधी असतो मंगलाष्टकांचा आणि त्या मंगलाष्टकांच्यामध्ये शेवटचं जे पालुपद असतं त्या मंगलाष्टका झाल्या की, विवाह विधी संपन्न झाला असं आपण म्हणतो. 'शुभ मंगल सावधान!' तर त्या आदिवासींची जी गीतं आहेत त्या आदिवासींच्या गीतांमध्ये जे आवाहन केलं जातं, त्यांच्या देवदेवतांना तर ते सगळ्या निसर्ग तत्त्वांनाच आवाहन केलं जातं म्हणजे 'सागर देवा साविध रे व्हा,' 'नदीय देवा साविध रे व्हा,' 'रुखीया देवा साविध रे व्हा' 'शुभमंगल सावधान!' असा आशय त्याच्यामधून व्यक्त होत असतो, तेव्हा ती आदिवासी गीत असूदेत, अभिजनांची संस्कृतप्रचुर असूदेत

**लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्माच्या निर्मितीची जी भूमिका सांगितली आहे त्याच्यामध्ये सांगितले आहे, लौकिक आणि अलौकिक यांना जोडणारा दुवा धर्मात आहे. भूमी आणि आकाश यातून सगळ्याची निर्मिती झालेली आहे, म्हणजे ऐहिकतेसाठी धर्माची निर्मिती झाली आहे.**

त्याच्या पाठीमागच्या ज्या भावना आहेत त्या निसर्ग तत्त्वांशी नातं जोडणाऱ्या भावना आहेत, आणि हा लोकसंस्कृतीचा फार मोठा भाग आहे. याच्याबद्दल आपण जरा गंभीरपणाने विचार करायला पाहिजे असं वाटतं. 'प्राचीन भारतीय लोकधर्मा'मध्ये वासुदेवशरण अग्रवालांनी म्हटलेलं आहे की, 'आजतागायत ज्याला आपण गावामधल्या जत्रा यात्रा म्हणतो, त्या जत्रा यात्रा तिकडच्या पाणवठ्याशी बांधलेल्या असतात, देवांशी बांधलेल्या असतात किंवा एखाद्या पर्वताशी बांधलेल्या असतात, म्हणजे देवतेचे स्थान जास्त करून ते कुठल्यातरी डोंगरावर असतं किंवा नदीच्या काठी असतं किंवा पाणवठ्याजवळ असतं.' तर हे आपण पाहतच आहोत म्हणजे अगदी तो मग तुमचा सिंहस्थ असूदेत किंवा एखादं पर्व असूदेत पाण्याशी बांधलेलं असतं, नदीशी बांधलेलं असतं, सागराशी बांधलेलं असतं. अगदी आपली गोकुळाष्टमी जरी म्हटली किंवा नारळी पौर्णिमा जरी म्हटली तरी सागराशी संबंधित अशा प्रकारचा उत्सव आहे, ती मंडळी तो साजरा करत असतात. म्हणून त्यांनी म्हटलंय आपल्याकडे लोकपरंपरेमध्ये जे यज्ञ आहेत त्याला 'मह' म्हटलंय. उदा. पव्वय मह प्राकृत आहे. पव्वय म्हणजे पर्वत, पव्वय मह–पर्वत मह म्हणजे पर्वताचा यज्ञ, नदी मह, सागर मह, रुख्व मह म्हणजे वृक्ष, नदी. जत्ता हा प्राकृत शब्द आहे, नदीची जत्रा, सागराची जत्रा, ही आजही चालू आहे. शब्द बदलले,

आपण कृष्णाकाठी राहणारी मंडळी, कृष्णामाईचा उत्सव दरवर्षी करतो की नाही? वाईला कृष्णामाईचा उत्सव जोरदार असतो. नाशिकला आपण गेलात, तर गोदामाईचा उत्सव असतो. गंगेचा उत्सव तर तिथली मंडळी करतच असतात. तेव्हा ज्या ज्या गावामध्ये हे जलाशय आहेत त्यांचे उत्सव त्यांना 'मह' म्हटलेले आहे, 'मख' म्हटलेले आहे. हे उत्सव म्हणजेच लोकपरंपरेतले यज्ञ! यज्ञासाठी दर खेपेला समिधाच जाळल्या पाहिजेत आणि यज्ञकुंड पेटवली पाहिजेत असं नाही. तेव्हा 'मख' हा प्राकृत शब्द आहे, फार कशाला अगदी अलीकडे 'स्वयंवर' नावाचं जे मराठी नाटक आहे त्याच्यामध्ये किर्लोस्करांनी जे वर्णन केलेलं आहे ते कृष्ण आणि रुक्मिणीची पहिली भेट कुठे झाली? तर रैवतक पर्वतावर! पर्वताचा उत्सव चालू असताना तिथे त्यांची भेट झाली, म्हणजे पुन्हा तो पर्वत मह, पर्वत जत्रा आणि त्या जत्रेमध्ये कृष्ण–रुक्मिणीची पहिली भेट झाली. त्यामुळे ह्या ज्या सगळ्या परंपरा आहेत, या आदिम अवस्थेपासून त्या आजपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्याच्या खाणाखुणा आपल्याला दिसतात. काळाप्रमाणे शब्दांच्या उच्चारामध्ये बदल झाले असतील; परंतु त्याच्या पाठीमागची तत्त्वे आणि कृती या कायम आहेत, आणि म्हणून आपल्याला साधार असं म्हणावंसं वाटतं की, ही लोकसंस्कृती जी आहे तिचा प्रवास आदिम ते अद्यतन म्हणजे आदिम काळापासून सुरू झालेल्या माणसाच्या श्रद्धा, भावना, चालीरीती, रूढी या काळ बदलला तरी थोडीशी नामांतरं होऊन, रूपांतरे होऊन आजतागायत तुमच्या माझ्या जीवनामध्ये चालू आहेत. आजपण अगदी अभिजन पातळीवर गेलो असं जरी म्हटलं, अभिजात भाषा बोलणारे जरी म्हटलं तरी आपल्या मनामध्ये या गोष्टींच्याबद्दल आस्था आहेच. नाहीतर मग आता त्या कुंभमेळ्यासाठी एवढी गर्दी झाली नसती आणि त्याचा उत्सव झाला नसता. तर या ज्या आदिम काळापासून आजपर्यंत श्रद्धा आहेत त्या नामांतराने, रूपांतराने या टिकून राहिलेल्या आहेत. तेव्हा लोकसंस्कृती ही अशी सर्वव्यापक आहे आणि याचे भान आपल्याला असणे आवश्यक आहे. फार कशाला रैवतक पर्वताचं जसं सांगितलं तशी साताराच्या जवळ एक लहानशी टेकडी आहे, सीतामाईचा डोंगर म्हणतात त्याला, आणि दरवर्षी संक्रांतीला तिथे सीतेच्या बरोबर वाणवसा वसायला बायका जातात आणि तिथे सीतामाई आहे असं समजून त्या वाणवसा वसतात आणि तिथे सीतामाईची गाणी, ओव्या दिवसभर त्या गात असतात. त्यामुळे पर्वताशी संबंधित असे निरनिराळ्या प्रकारचे उत्सव हे सगळीकडे चाललेले असतात. त्याला मग निरनिराळ्या देवदेवतांशी, नदी, पर्वतांशी जोडलेले असते त्यामुळे निरनिराळ्या पद्धतीने ही लोकसंस्कृती अस्तित्वात असते. आपल्याकडे मी बोलता बोलता सांगितलेलं होतं की, ह्या लोक संस्कृतीतली जी तत्त्वे आहेत त्यातली काही आहेत ती कृतिप्रधान आहेत आणि काही शब्दप्रधान आहेत. आपण लोककलांबद्दल ज्या वेळेला विचार करतो त्या वेळेस मराठी माणसांना पटकन 'गोंधळ', 'जागरण' यांनाच फक्त लोककला म्हणायचं असं वाटतं. खरं म्हणजे या लोककला नसून ही विधिनाट्ये आहेत कारण कुठल्यातरी देवतेशी संबंधित तो विधी असतो. गोंधळ असला तर तो स्त्री देवतेशी संबंधित असतो, मग ती रेणुका असेल आणखीन कुठली असेल, तिचा गोंधळ असतो. जागरण म्हटलं की, ते खंडोबाचं जागरण असतं आणि त्याच्यामध्ये स्त्रिया आणि पुरुष दोघेही असतात. खंडोबा म्हटलं की, त्याच्याबरोबर वाघ्या असतो आणि ते नृत्य, गीत, कथा गाऊन देवाची आराधना करायची असा हा त्याचा मूळ हेतू आहे. आता वर्षातले काही ठरावीक दिवस त्या उत्सवाचे दिवस असतात. त्या विधीनाट्य काळामध्ये गोंधळ, जागरण अशा प्रकारची जी विधि नाट्ये आहेत म्हणजे काय? विधी हे मूळ उद्देश, नाट्य हे अनुषंगिक येतं

आणि नाट्य हा शब्द कसा आहे नाट्य – नृत्. नृत् म्हणजे तालबद्ध हालचाली म्हणजे भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये वर्णन केलंय की, नृत् त्याच्यातून मग नाट्य आलं, पुढे म्हटलंय – 'पदाभ्याम् तालमादिशेत?' पायांनी जो ताल दिला जातो त्याच्यातून नृत् येतं आणि ते नृत् विकसित झालं की नृत्य होतं आणि ते नृत्य नाट्यामध्ये येत असतं. म्हणजे, एक प्रकार नृत्यनाट्य झालं. तर असा जो विकासक्रम आहे सगळा, तोच आपल्या लोकपरंपरेमधल्या कलांमधून दिसतो. तात्पर्य, मुळामध्ये ते विधी आहेत, माणसाच्या मनामधल्या श्रद्धा आहेत. या श्रद्धा अभिव्यक्त करण्यासाठी माणूस त्या देवतेबद्दलच्या कथा गातो, ती कथा गीतातून गातो म्हणजे आता इथे शब्दसाहित्य आलं. तिथे शब्दातून गीतही निर्माण होतं आणि त्यातून कथाही सांगितली जाते. मग ती रेणुकेची असेल, खंडोबाची असेल, कोणाचीही असेल. मग गीत आलं की, त्याला साथीला वाद्य आलं कारण त्याच्याशिवाय संगीत पूर्ण होत नाही. 'गीतं वाद्यं तथा नृतं, त्रयं संगीतमुच्चते!' संगीताची व्याख्या अशी आहे की, गीत, वाद्य, नृत्य मिळून संगीत होतं. त्यामुळे आपल्याकडची जी सगळी कला आहे, ती कला, ज्याला आपण एकसमयावच्छेदे करून 'समवाय' म्हणू एकत्रितपणे या कला सादर होत असतात. त्याच्यात गीत आहे, नृत्य आहे, नाट्य आहे, कथा आहे, गीत आहे आणि ह्याच्यातून जे अभिव्यक्त होत असते ती समाजाची श्रद्धा त्या देवतेबद्दलची श्रद्धा. म्हणून विधी हा महत्त्वाचा उद्देश त्याच्यातून अभिव्यक्त होणारं ते नृत्यनाट्य. म्हणून लोककलांना 'Total Expression of Life' म्हणजे जीवनाची समग्र अभिव्यक्ती म्हणतात. ती लोककलेतून होते. सर्व कलांचा एकत्र संगम तेथे होतो. गीत, वाद्य, नाट्य, अभिनय, संपादणीचे गद्य संवाद – सर्व मिळून लोककला होते.

''आता काय होतं की, काळाच्या ओघामध्ये आपण म्हणतो सुधारणा झाल्या. सुधारणा झाल्या म्हणजे काय झालं? तर इंग्रजोत्तर काळामध्ये आपल्याकडे आपल्या परंपरेची चिकित्सा सुरू झाली, तशी ती आधीपासूनच सुरू होती. गौतम बुद्धांच्या आणि चार्वाकांच्या काळापासून; पण आता ती विश्लेषणे सुरू झाली किंवा याच्यामधलं योग्य काय आणि अयोग्य काय, यातले ठेवण्याजोगं काय आणि न ठेवण्याजोगं काय, हल्लीच्या भाषेत बोलायचं झालं तर खरी श्रद्धा कुठली आणि अंधश्रद्धा कुठली? अशा प्रकारे इंग्रजोत्तर काळामध्ये युरोपियन लोकांच्या संगतीने त्याच्याबद्दलची विश्लेषणे सुरू झाली. आपल्याकडे सुधारकांचा एक पंथ आला आणि त्या सुधारकांच्यामध्ये म्हटलं जायचं, काही कर्ते सुधारक आणि काही बोलते सुधारक. म्हणजे आगरकरांसारखे प्रत्यक्ष कृतीमध्ये आणणारे; पण तेही कुठेतरी कमी पडले आणि ते पूर्णपणे कर्ते सुधारक होऊ शकले नाहीत आणि बोलते सुधारक राहिले आगरकरांच्यासारखे लोक म्हणायला लागले, 'पटेल ते बोलणार, जमेल ते करणार!' आणि बहुतेक सुधारकांची अवस्था आजही अशीच आहे, की 'पटेल ते बोलणार आणि जमेल ते करणार', तर ही परंपरा जुनी आहे. त्याच्यातून मग या श्रद्धांचं विश्लेषण सुरू झालं, श्रद्धेला तडा जायला लागला आणि मग माणसं म्हणायला लागली, 'हे योग्य आहे, हे अयोग्य आहे,' वगैरे वगैरे... आणि मग हे श्रद्धा बिद्धा जर ह्याच्यातून काढून टाकली तर उरतं काय? तर कलात्मक घटक– वाद्य, नृत्य, गीतं हे कलात्मक घटक आहेत आणि मग ते कलात्मक घटक उरतात. म्हणून मग त्याचं विश्लेषण करताना काही अभ्यासक नंतरच्या काळात म्हणायला लागले, विधी गौण ठरू लागले, त्यातून नाट्यात्मक विधी निर्माण झाले. म्हणजे नाट्यप्रधान आधी आणि विधी आनुषंगिक अशा प्रकारचे! लग्नानंतर गोंधळ वगैरे घालतात, तर तो नाट्यात्मक विधीच असतो. नाट्यात्मक विधीचे उदाहरण देत असताना त्या

**लोकजीवनातले अनेक कंगोरे संत साहित्यामधून व्यक्त झालेले आहेत. संत साहित्याने बोधाचे काम करावे, अशा प्रकारची एक भूमिका संतांची होती. संत काय करत आले, तर 'बोध' करत आले, लोकांना शहाणपण शिकवत आले, परिवर्तनाच्या वाटा सांगत आले आणि लोकसंस्कृतीने तेच करावं अशी अपेक्षा आहे.**

विश्लेषकांनी सांगितले की, आपल्याकडचा विवाहविधी जो आहे, हा विवाह हाच 'नाट्यात्मक विधी' आहे. त्याच्यामध्ये नाट्य जास्त आणि विधीची श्रद्धा कमी आहे कारण आता ते भटजी जे काही मंत्र म्हणत असतात, त्याच्यात त्या नवरा-नवरीचं किती लक्ष असतं आणि अर्थ किती कळतो हे कळत नाही कारण, त्यांनी मंत्र म्हणताना असं म्हटलं आहे की, ती वधू जी आहे ती 'लक्ष्मीरूपेण वधू' आणि तो 'विष्णुरूपेण वराय' तो वर हा श्रीविष्णुरूप आहे. त्यामुळे ते जे लग्न आहे ते विष्णू-लक्ष्मीचं अशा प्रकारचं लग्न आहे, म्हणजे देवतांचा विधी आहे. आता आपण माणसांना देवता कुठे मानतो, ते तर नवरा-नवरी आहेत. मानवांच्या सुफलन विधी (Firtility rite) असतो. म्हणून वधुवरांना लक्ष्मी-विष्णू देवता मानून मग त्यांना हळद लावायची, त्यांची पूजा करायची, त्यांचे पाय धुवायचे, त्यांना वस्त्रं नेसवायची, त्यांना अलंकार घालायचे, त्यांच्यासाठी मंत्र म्हणायचे वगैरे वगैरे हे नाट्य सगळं केलं जातं, आणि मग ते नाट्य कसं असतं? 'आकाशाशी जडले नाते, धरणी मातेचे स्वयंवर झाले सीतेचे!' असे काव्यात्मक म्हटलेलं आहे, तसं त्या संस्कृत मंत्रात, श्रौत मंत्र जे भटजी म्हणत असतात त्याच्यामध्ये त्यांनी म्हटलेलं आहे. त्या मंत्राचा अर्थ हाच आहे की, आकाश तत्त्व आणि भूमी तत्त्व यांचा इथे विवाह लागला. 'द्यौहम पृथ्वीस्त्वं!' सप्तपदी चालत असताना वर जो मंत्र म्हणतो 'द्यौहम- मी आकाश तत्त्व आहे, पृथ्वीस्त्वं तू पृथ्वी तत्त्व आहेस.' 'वयं विवहावहे'- आपण दोघे जण एकत्र येतो, कशासाठी, पुढची पिढी निर्माण करण्यासाठी! वंश सातत्यासाठी! म्हणजे पुन्हा त्याचं उद्दिष्ट काय? म्हणजे भौतिकपूर्ती करणे हे उद्दिष्ट की, भौतिक सुखाची उत्पत्ती करणं हे उद्दिष्ट? म्हणून संपूर्ण विवाहविधी किंवा कुठलेही धार्मिक विधी असतील, त्याचं उद्दिष्ट काय तर भौतिक स्वास्थ्यासाठी हे करणं आणि याचं खूप सुंदर विश्लेषण आपल्या दिल्लीलाच झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ७० वर्षांपूर्वीचे लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेलं आहे. त्यांनी धर्माच्या निर्मितीची जी भूमिका सांगितली आहे त्याच्यामध्ये सांगितले आहे, लौकिक आणि अलौकिक यांना जोडणारा दुवा धर्मात आहे. भूमी आणि आकाश यातून सगळ्याची निर्मिती झालेली आहे, म्हणजे ऐहिकतेसाठी धर्माची निर्मिती झाली आहे. आपण तरी देवाधर्माचे विधी करून करून काय मागत असतो देवाजवळ, 'अमुक देहि, तमुक देहि' म्हणजे काय, 'विद्या देहि, धनं देहि, पुत्रं देहि, फलं देहि' म्हणजे 'मला दे दे दे दे.' ऐहिक स्वास्थ्यासाठीच धर्मविधींची निर्मिती झाली आहे. लक्ष्मणशास्त्रींनी फार सुंदर विवेचन केलेलं आहे आणि लक्ष्मणशास्त्रींच्यासारखा परंपरेचा पूर्ण अभ्यास करून आधुनिक संपूर्ण वाङ्मय आणि तत्त्वज्ञान वाचून, पाश्चिमात्य, संपूर्ण संस्कृतीचा अत्यंत विश्लेषक असा अभ्यास करणारा सुधारणावादी, मार्क्सवादी आणि नंतर रॉयिस्ट झालेला, चारी वेदांचा जो अभ्यास करणारा जो वेदशास्त्रसंपन्न, तो पुढे रॉयिस्ट (मानवतावादी) होतो. केवढा मोठा पल्ला त्यांच्या अभ्यासाचा आणि विवेचनाचा आहे आणि त्यांनी ही भूमिका सांगितलेली आहे. हे मी सांगते म्हणून तुम्ही मान्य करू नका.

लक्ष्मणशास्त्री जोशींच्या संपूर्ण साहित्याचे अलीकडे १८ खंड आमच्या डॉ. सुनिलकुमार लवटेंनी प्रकाशित केलेले आहेत. त्यातले फक्त छोटंसं सूत्र या विषयाशी संबंधित असलेलं मी आपल्याला सांगते आहे. याच निमित्ताने लक्ष्मणशास्त्री जोशींशी माझा छोटासा अनुबंध आला तोही स्पष्ट करावासा वाटतो. पहिल्या साहित्य संमेलनाचे दिल्लीतले ते अध्यक्ष होते आणि ७० वर्षांनंतर लक्ष्मणशास्त्रींच्या किंचित सहवासात राहिलेली आणि त्यांना आदरणीय मानणारी त्यांची एक वैचारिक छोटीशी वारसदार म्हणून मला आता हे पद मिळालेले आहे. तर लक्ष्मणशास्त्रींच्या आयुष्यात अत्यंत शेवटच्या काळात मी त्यांच्या सहवासात आले त्याच्यात ही महत्त्वाची गोष्ट मला सांगावीशी वाटते की, लक्ष्मणशास्त्री जोशींनी ज्या वेळेला विश्वकोश निर्माण केले त्या विश्वकोशाचे २४ खंड झाले. त्यानंतर त्यांनी २४व्या खंडाच्या अखेरीस आणि २५व्या खंडाच्या सुरुवातीचा विचार करताना 'लोकसाहित्य' हा शब्द कोशासाठी प्रथम मराठी कोशात आणला. तोपर्यंत अनेक कोश झाले होते, इंग्रजीत झाले, मराठीत झाले; पण लोकसाहित्य या शब्दाला एवढ्या मोठ्या बृहदकोशात कधीही स्थान मिळालेलं नव्हतं; परंतु लक्ष्मणशास्त्री जोशींना याचं महत्त्व पटलं आणि त्यांनी तो शब्द विश्वकोशामध्ये आणला आणि माझ्यासारख्या त्या वेळेला, आता लहान आहेच मी पण त्या वेळेला, आणखीन वयानंही लहान असलेल्या मुलीला त्यांनी अतिथी संपादक म्हणून निमंत्रित केलेलं होतं. तेव्हा लक्ष्मणशास्त्री जोशींशी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या काळात आणि माझ्या आयुष्याच्या सुरुवातीच्या उमेदीच्या काळात त्यांचा सहवास मला किंचित काळ लाभला, कारण दर महिन्याला मला त्या कामासाठी काही दिवस वाईला जाऊन राहावं लागत असे आणि त्यांच्या शेजारच्या खोलीमध्ये माझा निवास असे. ते माझ्याशी संध्याकाळच्या वेळेला काही शिळोप्याच्या गप्पा मारल्यासारख्या गप्पा मारत असत. ते वृद्ध झाले होते, थकले होते आणि मला ते सगळं नवंनवं, हवंहवं असं वाटत होतं. मग ते बऱ्याच गोष्टी सांगत असत. दुर्दैव असं की, ते काम माझं पूर्ण झालं आणि मी शेवटची भेट घेऊन आले आणि नंतर थोड्याच दिवसांमध्ये ते निवर्तल्याची बातमी आली. या निमित्ताने लक्ष्मणशास्त्री जोशींशी असलेला अनुबंध मला व्यक्त करावासा वाटला. लोकसाहित्याबद्दलची लक्ष्मणशास्त्रींची आस्था विश्वकोशामध्ये त्यांनी पहिल्यांदा मांडली. मग नंतर इतर कोशकारांनी त्याचा वापर केला. 'समाज विज्ञान कोश'– स. मा. गर्गे, विवेकच्या कोशांनी नंतर वापर केला, दुसऱ्याही कोशांनी वापर केलेला आहे, त्याच्यातही मी लिहिलेलं होतं तो भाग वेगळा. सांगायचं तात्पर्य, हा प्राचीन काळापासून चालत आलेला जो सर्वसामान्य माणसांच्या आचारातला, विचारातला, भावनातला, संवेदनातला हा जो धर्म याला मी 'लोकधर्म' असंच म्हणते. त्यामुळे आपला धर्म हा अमुक आहे तमुक आहे अशा एकारलेपणामध्ये कधी मला अडकावंसं वाटलं नाही सुदैवाने. फार कशाला आमचं संत साहित्य जे सगळं आहे, ते वारकरी मराठी संत साहित्य प्रामुख्याने अतिशय उदारमनस्क साहित्य आहे, नुसतं उदारमनस्क साहित्य नाहीये तर संत साहित्याला मराठीमधल्या डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे या संत साहित्याच्या आणि लोकसंस्कृतीच्या मोठ्या अभ्यासकाने म्हटलेलं आहे की, 'संत साहित्य हे परमार्थीकृत लोकसाहित्य आहे. परमार्थ हे उद्दिष्ट आहे; पण ते लोकसाहित्य आहे.' त्याचं थोडं विश्लेषण मी सुरुवातीला केलं होतं की, नाथांची भारुडं ही लोकशैली आहे इत्यादी; परंतु लोकजीवनातले अनेक कंगोरे संत साहित्यामधून व्यक्त झालेले आहेत. संत साहित्याने बोधाचे काम करावे, अशा प्रकारची एक भूमिका संतांची होती. संत काय करत आले, तर 'बोध' करत आले, लोकांना शहाणपण शिकवत

आले, परिवर्तनाच्या वाटा सांगत आले आणि लोकसंस्कृतीने तेच करावं अशी अपेक्षा आहे. म्हणजे आपल्याकडे मग नंतरच्या काळात जी भारुडं झाली, जागरणाची गाणी झाली त्याच्यामध्ये, अगदी इंदिरा गांधींच्या २० कलमी कार्यक्रमापर्यंतचे बोधाचे सगळे किंवा सुधारणेचे सगळे प्रवाह त्यात आलेले दिसतात, म्हणजे दारूबंदी असेल, हुंडाबंदी असेल, मुलींची लग्नं लहान वयात करू नये म्हणून असेल, हे विषय लोकसाहित्यातल्या भारुडासारख्या रचनांच्यामधून आणि लोककलावंतांच्या या रचनांच्यामधून आलेले आहेत. फार कशाला, संपूर्ण लोकसंस्कृतीतल्या या कलात्मक साहित्याने निरनिराळ्या चळवळींना प्रेरणा देण्याचे फार मोठे काम केलेले आहे. म्हणजे ऐतिहासिक काळात मध्ययुगामध्ये तर ज्ञानेश्वरांपासून ते अगदी रामदासांपर्यंत सगळ्यांनी त्यांच्या त्यांच्या पद्धतीने बोधात्मक उपदेश करण्याचं काम केलेले आहे. 'शहाणे करून सोडावे सकळ जन। जे जे आपणासी ठावे, ते ते दुजासि सांगावे।' संतसाहित्याने कधीही लोकांना अंधश्रद्धा शिकवली नाही. उलट ती अंधश्रद्धा दूर कशी करायची हे संत साहित्याने आणि विषेशत: तुकारामांसारख्या संत लोकांनी सांगितले. हे मध्ययुग जे आहे हे संपूर्ण भारतभर संत चळवळीचं युग आहे. इसवी सनाच्या ९व्या-१०व्या शतकापासून ते १७व्या शतकापर्यंत म्हणजे शिवाजी महाराजांचा उदय होईपर्यंत एकीकडे इस्लामची आक्रमणं होत होती, ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्या वेळेस पहिल्यांदा अल्लाउद्दीन खिलजी दक्षिणेमध्ये आला. यादव काळामध्ये आणि सगळ्या संतांचा जो काळ आहे म्हणजे निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरांची भावंडं झाली, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास इथपर्यंतचे जे संत आहेत या सगळ्या संतांच्या काळात महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर कुठे ना कुठेतरी इस्लामची राज्यं होती आणि त्या काळामध्ये हे संतांनी प्रबोधन करण्याचं काम केलेलं आहे आणि म्हणून शिवाजी महाराजांनी ज्या वेळेला राज्य स्थापना केली, त्याचं ऐतिहासिक विश्लेषण करत असताना न्या. महादेव गोविंद रानडे यांनी (Rise of the Maratha Power) 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात असं म्हटलेलं होतं की, शिवाजी महाराजांना या सगळ्या पार्श्वभूमीवर खेड्यापाड्यातल्या, ग्रामीण भागातल्या मावळ्यांना हाताशी धरून एकदम जनजागृती करण्याची प्रेरणा कुठून मिळाली किंवा ते त्यांना कसं शक्य झालं? न्या. महादेव गोविंद रानडेंनी सांगितलेलं आहे, संतांनी केलेलं जनजागरण. संतांनी पहिल्यांदा मराठी भाषा जिवंत ठेवली आणि भाषा त्या देशाच्या अस्मितेचा फार मोठा भाग असतो. 'महाराष्ट्र धर्म,' असं शिवाजी महाराज म्हणत आले. महाराष्ट्र धर्म टिकवण्याचं काम अप्रत्यक्ष रीतीने संत साहित्याने भाषेतून आणि त्यांच्या रचनेतून केलं आणि सर्वसामान्य लोकांचं प्रबोधन केलं. इतकेच नव्हे, पुढे इंग्रजोत्तर काळात कामगार चळवळींमध्ये सगळे जे शाहीर आहेत निरनिराळे, त्यांनी लोकप्रबोधनाचं काम केलं. कामगार चळवळीमध्ये शाहीर पिराजीराव नाईकांच्यापासून ते अण्णा भाऊ साठ्यांच्यापर्यंत जी सगळी शाहीर मंडळी आहेत, त्या शाहीर मंडळींनी कामगार चळवळीमध्ये प्रबोधनाचं काम केलं. पहिल्यांदा ब्रॅडले आणि त्यांचे डांगे, मिरजकर आणि सहकारी यांनी चळवळी कशा केल्या याचं विवेचन या सगळ्या शाहिरांनी केलेले आहे. इतकेच नाही तर त्या काळातले शाहीर प्रत्यक्ष त्या कामगार चळवळीत उतरलेले आहेत. नारायण सुर्वेसारखा कवी म्हणतो, 'मला पहिल्यांदा मार्क्स भेटला तो कामगारांच्या एका मोर्चामध्ये.' त्यामुळे आधुनिक काळामध्ये ज्याला आपण आर्थिक जनजागरण झालं म्हणतो ते आर्थिक जनजागरण करायलासुद्धा लोकसंस्कृती आणि शाहीरच कारणीभूत झाले. 'डांगे, मिरजकर आणि ब्रॅडले। नेते लाभले हिंमतवाले। उठविला त्यांनी सारा कामगार।

वर्गयुद्धाचा करून निर्धार। भांडवलदारी केली बेजार।।'
– (अण्णा भाऊ साठे)

''फार कशाला, ज्याला आपण स्त्री स्वातंत्र्याची चळवळ, स्त्री स्वातंत्र्याची चळवळ म्हणतो, या चळवळीमध्ये स्त्रियांच्या जनजागरणाचं काम जर कोणी केलं असेल तर पुन्हा लोकसंस्कृतीतील कलाकारांनी! 'मुलगी झाली हो' सारखं नाटक तर आहेच; पण त्याच्या आधी स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जो काळ मी अनुभवला, त्या स्वातंत्र्यपूर्व काळात जनजागरण करण्यासाठी राष्ट्रसेवा दलाचे जे मेळे होत असत किंवा ज्या कलात्मक अशा प्रकारच्या ज्या चळवळी होत्या, त्याला काय म्हणायचे 'कलापथक'! त्या कलापथकांमधून सगळी जनजागरणाची गाणी असायची. त्याच्यामध्ये शाहीर वसंत बापटांसारख्या (ते शाहीर म्हणायचे स्वत:ला) आधुनिक कवींनी शाहिरी गाणी रचलेली आहेत. फार कशाला मी पुण्याला प्राथमिक शाळेमध्ये होते, त्या वेळेला अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुधा वर्दे, ज्या पुढे राजकारणामध्ये खूप पुढे आल्या, त्या विद्यार्थिनी होत्या आणि आमच्या शाळेमध्ये त्यांनी त्या कलापथकाचा कार्यक्रम केलेला होता, तिथे ते वसंत बापटांचं गाणं नाच करून म्हटलेलं होतं. 'बिजली नाचेल गगनात, वादळ होईल जोशात.' तेव्हाही स्वातंत्रपूर्व काळामध्ये जनजागरण करण्याचं कार्य निरनिराळ्या कलापथकांनी केलेलं आहे. ते लोककलाकारांच्या शैलीत केलं आहे.

''संतसाहित्यामध्ये संत कवयित्री हा एक स्वतंत्र विषय आहे. आपल्याकडे असा एक अपसमज आहे, मी अपसमज म्हटलं कारण आमच्या बायका जोपर्यंत त्यांना शाळा मिळाली नव्हती, तोपर्यंत अडाणी होत्या आणि त्यांना लिहिता वाचता यायला शिकवण्यासाठी ज्या वेळेला शाळा निघाली त्या वेळेला बायका शहाण्या झाल्या. आता जो आमचा सगळा संत साहित्याचा काळ आहे इसवी सनाच्या १७व्या – १८व्या शतकापर्यंतचा तोपर्यंत कुठेही बायकांसाठी आणि इतरांसाठी शाळा नव्हत्या. म्हणजे लिहायला वाचायला स्त्रियांना बंदी होती; पण बायका रचना करायच्या थांबत होत्या का? संत रचना बायकांच्या आहेत. त्या निरनिराळ्या जाती जमातीच्या संत स्त्रिया आमच्याकडे भारतभर इसवी सनाच्या ७व्या–८व्या शतकापासून ते १६व्या –१८व्या शतकापर्यंत आहेत. भारतभर सांगतीये मी, नुसत्या महाराष्ट्रामध्ये नाही. म्हणजे उत्तरेकडे गेलो तर लाल दीदी आहे, 'लल्लेश्वरी' असं तिला म्हणतात आणि या सगळ्या बायकांचं वैशिष्ट्य असं की, त्यांनी नवरेपणाला झुगारून दिलेलं आहे. त्या लल्लेश्वरीने म्हटलेलं आहे, 'वस्त्र लेवुन विरळ हवेचे नृत्य करितसे लल्ला मोदे।' मला इतर वस्त्रांची गरजच नाही. दक्षिणेकडची आमची अक्कमहादेवी आहे, त्या अक्कमहादेवींनी आपल्या नवऱ्याला, नवरा म्हणजे तो बिज्जल नावाचा राजा दक्षिणेकडचा. त्याला तिने अट घातली, 'मी शंकर भक्त आहे त्यामुळे माझ्या घरामध्ये शिवभक्त येणार त्यांचा आदर झाला पाहिजे, मी ज्या वेळेला शिवअर्चना करत असेन त्याच्यामध्ये मला विक्षेप चालणार नाही आणि याच्यामध्ये तीन वेळा मी माफ करीन. तीन वेळेला जर मला संधी दिली नाही, तर मी घर सोडून निघून जाईन.' हे सांगणारी अक्कमहादेवी, कर्नाटक, ज्याला आम्ही मागासलेला प्रदेश म्हणतो त्या बसवेश्वरांच्या पंथामधली. तिच्या पतीला ते मान्य करावं लागलं. तिने सासरी गेल्यानंतर स्वत:साठी मंदिर स्थापायला लावलं. ती मंदिरामध्ये अर्चना करायला लागली. ती दिसायला सुंदर होती ती म्हणून तर राजाने भाळून तिच्याशी लग्न केले. 'तुझ्या आई वडिलांना मारून टाकू' असा दम भरला आणि त्यामुळे तिने ते लग्न केले; परंतु तीन वेळेला त्याचे अपराध माफ केले. दोनदा तिचे शिवभक्त आले त्यांना त्याने अडवले म्हणून तिने माफ केले. नंतर एकदा शिवभक्त आले आणि ती त्यांच्या आदरसत्कारासाठी जायला

**मराठीमधलेच लोकसाहित्याचे आणखीन एक विवेचक प्रभाकर मांडे यांचे म्हणणे असे आहे की, 'लोकसाहित्यातून लोकसंस्कृती अभिव्यक्त होते व त्यांच्यामध्ये एक छोटीशी सीमारेषा आहे की, लोकसंस्कृतीचे वर्णन करण्यासाठी जी परिभाषा वापरली जाते ती लोकसाहित्याची असते.' मात्र दुर्गाबाई भागवतांच्या नंतर मराठीमध्ये लोकसाहित्य हा शब्द, लोकसंस्कृती या अर्थाने जवळजवळ रूढ झालेला आहे,**

लागली, तर त्या क्षणी राजा कामातुर झालेला होता. त्याने तिच्या वस्त्राला हात घातलेला होता. ती म्हणाली, 'या क्षणी जाऊ दे. ही तिसरी वेळ आहे.' त्याने ऐकलं नाही, तिने त्याच क्षणी ते वस्त्र तसंच त्यागलं आणि तशीच्या तशी बाहेर आली, हातामध्ये शिवमूर्ती घेतली आणि ती रस्त्यानी चालायला लागली, ती श्रीपर्वतावर गेली. हे धाडस संत स्त्रियांमध्ये उत्तरेकडच्या लल्लेश्वरीपासून दक्षिणेकडच्या अक्कमहादेवीपर्यंत अनेक संत स्त्रियांनी केलेलं आहे. त्यात महाराष्ट्रामधीलही संत आहेत. महाराष्ट्रामधल्या संत स्त्रिया आपल्याला नुसत्या ऐकून माहिती असतात. मुक्ताबाई, जनाबाई वगैरे; पण त्यातलं एकच महत्त्वाचं उदाहरण मला या ठिकाणी सांगावंसं वाटतंय. मुक्ताबाईंबाबतीत तर असं म्हटलेलंच आहे, नामदेवांनीच म्हटलं होतं की, 'मुक्ताईचे चित्त चिरंतर मुक्त' तिचे मन सदैव मुक्तच आहे, जनाबाई तर 'आई मेली बाप मेला। आता सांभाळी विठ्ठला।। मी तुझे गा लेकरु। नको मजसि अव्हेरुं।।' आई नाही बाप नाही, ती कुठल्या कुळात जन्माला आली याचा पत्ता नाही, 'विदुर सात्त्विक माझिये कुळीचा' असं म्हटले की त्यालाही आईबाप नाहीत, मी ही तशीच म्हणजे जणू काही बेवारस असल्यासारखी होते. तिचे आईबाप होते; पण ते अंत्यज जमातीतले होते आणि लहानपणीच तिला नामदेवांच्या दारामध्ये सोडलेली होती. नामदेवांचे वडील दामाशेटी होते. दामाशेटी म्हणाले, 'राहू दे, इथे बरीच माणसं असतात.' श्रीमंत घराणं होतं, त्यामुळे ती पोरगी राहिली तिथे आणि त्या घराण्याची सेवा करत करत तिने सगळं आपलं आयुष्य व्यतीत केलं. त्यामुळे संत जनाबाईंनी सगळे आपले अभंग जे रचले आहेत त्यांच्यामध्ये 'नामयाची दासी जनी' अशी ज्याला नाममुद्रा म्हणता येईल ती नाममुद्रा तिने लावली. या ठिकाणी दासी याचा अर्थ सेविका अशा अर्थाने नाही, तर 'शिष्या' या अर्थाने आहे कारण ज्ञानेश्वरांनीसुद्धा स्वत:ला 'निवृत्ती दास' म्हणवून घेतलेलं आहे. दास याचा अर्थ त्यांचं पादचरण आणि सेवा करणारा नव्हे. मी शिष्य आहे असा 'दास' याचा अर्थ! त्यामुळे ही गुरुपरंपरा जी आहे, त्या गुरुपरंपरेमध्येसुद्धा सबंध वारकरी संतांमध्ये किंवा संत परंपरेमध्ये गुरूच्या बाबतीत जातिभेद कुठेही नाही, म्हणजे कुठल्याही जातीचा गुरू हा कुठल्याही जातीचा शिष्य करीत असे. कारण 'तात मात सुत न भ्रात, मेरो पती सोई' असं म्हणणारी मीराबाई आहे, इथे जात पात कोणीही नाही, 'मेरे तो गिरीधर गोपाल, दूसरो न कोई' तो एक परमेश्वर हा माझा. ही भूमिका सर्व संतांची आहे. मग त्या स्त्रिया असू देत, पुरुष असू देत, त्या राजस्थानमधल्या असू देत, महाराष्ट्रातल्या असू देत कुठल्याही असू देत. महाराष्ट्रातलं फार मोठं उदाहरण म्हणजे संत बहिणाबाई! बहिणाबाई शिवुरकरीण, जी शिवुर गावची होती ती. तीन वर्षांच्या या मुलीचं तीस वर्षांच्या पुरुषाशी लग्न झालं! त्याचं तिसरं लग्न, कारण पोरीचं पहिलं लग्न 'अष्टवर्षाभवेत् कन्या,' आता काय झालं असेल त्या मुलीचं विचार करा. आणि मग तो नवरा ब्राह्मण! उच्च कुलीन आणि ही तर अबोध अवस्थेमधली; परंतु मनामध्ये परमेश्वराची प्रचंड ओढ

असलेली, अशी ही. तिने तुकारामांविषयी फक्त ऐकलं होतं. प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. तिच्या गुरूंच्या माध्यमातून तुकारामांची कीर्ती तिने ऐकली आणि तिला स्वप्नामध्ये तुकाराम महाराजांनी दृष्टान्त दिला, असं तिने तिच्या आत्मकथेत म्हटलेलं आहे. मराठीमध्ये दोनच संत स्त्रियांच्या आत्मकथा उपलब्ध आहेत, एक या बहिणाबाईंची आणि विठाबाईंची. अबोध अशा प्रकारची मुलगी विठा तिची. तर या बहिणाबाईंची आत्मकथा खूप प्रसिद्ध आहे. तिचा नवरा ब्राह्मण, उच्चकुलीन, अत्यंत वेदशास्त्रसंपन्न; परंतु स्त्रीच्याबाबतीमध्ये लंपट. तिचे मन तुकारामांच्याकडे ओढ घेत असलेलं, तिला गुरूने स्वप्नामध्ये दृष्टान्त दिला, असं तिने वर्णन केलेलं आहे; परंतु त्या नवऱ्याला ते सहन झालं नाही. का तर मी एवढा मोठा ब्राह्मण असून हा तुकाराम शूद्र जातीचा 'हिने ऐसा कैसा केला गुरू।' हिने या शूद्र तुकारामाला गुरू कसा केला? मी एवढा मोठा ब्राह्मण, व्युत्पन्न असूनसुद्धा आणि म्हणून त्याने तिचा खूप छळ केलेला आहे आणि तरीही ती स्वत:च्या सर्वस्वाचा त्याग करून तुकारामाला भेटायला गेलेली आहे. तुकाराम ज्या वेळेला भेटले त्या वेळेला मला किती समाधान झालं, माझं मन ओतप्रोत भरून गेलं आनंदाने, असे ती वर्णन करते. किती ओपप्रोत भरून गेलं, 'घट हा बुडावा जैसा डोहात। न बुटतां ओतप्रोत पाणी।। बहिणी म्हणे तैसें झालें माझ्या जीवा। तुकाराम खुणा दाखवी त्या।।' तेव्हा तुकारामांच्यामुळे मला ही एक परमानंदाची प्राप्ती झालेली आहे, असं स्वत: तिने वर्णन करून ठेवलेलं आहे. ही आमची बहिणाबाई, मी जाता जाता फक्त ज्याला आपण ट्रेलर म्हणावं अशी झलक सांगते आहे. तर संत स्त्रियांमध्ये विठाबाई ही तर फारशी कोणाला माहिती नाही; परंतु पुन्हा कर्नाटकातल्या एका अभ्यासकाला पंडित आवळीकरांना तिचे एक हस्तलिखित असलेली आत्मकथापर रचना सापडली.

''विठाबाईची अवस्थाही तशीच, लहानपणी लग्न झालेलं, पती हा लंपट. हे कुठल्याही पुरुषाच्या बाबतीत जसं असावं तसं, ती अबोध बालिका, आणि तिने ज्याला आपण निरागस वर्णन करावं असं निरागसपणे वर्णन केलेलं आहे. काय वर्णन केलेलं आहे? 'भ्रतार हो मजसि, ओढितो एकांती। मध्यरात्री जाणा समयासी।। ओढोनिया बहुत मारितो मजसि, भोगावे मजसि म्हणोनिया।।' या मराठी संत स्त्रिया आहेत इतक्या मोकळेपणाने लिहिणाऱ्या, म्हणजे आजसुद्धा जिथे प्रश्न निर्माण होतात आणि आमचे सुप्रीम कोर्टातले, उच्च न्यायालयामधले न्यायाधीश ज्या वेळेला वाद घालत असतात की, पतीने जर अत्याचार केला किंवा पतीने जर तिच्या परवानगीशिवाय संभोग केला तर तो गुन्हा मानावा का नाही, तो बलात्कार मानावा की नाही? इथे विठाबाईने हे सांगितलेलं आहे. तेव्हा काळाच्या किती पुढे गेलेल्या ह्या सगळ्या आमच्या संत स्त्रिया होत्या. यांच्याकडे आमचं कुणाचं फारसं लक्षच नाहीये.

ज्याला आपण स्त्री मुक्ती म्हणतो. ज्या वेळेला १९७५ मध्ये 'स्त्री मुक्ती वर्ष' नावाची भानगड आली आणि त्या वेळेला लोक सांगायला लागले की, हे पाश्चिमात्यांच्याकडून आलेलं आहे. 'पाश्चिमात्यांच्याकडून आलंय,' त्या वेळेला मला मोठं आश्चर्य वाटायला लागलं कारण माझ्याकडे या सगळ्या परंपरेतल्या स्त्रिया होत्या ना. मी म्हटलं, हे पाश्चिमात्यांच्याकडून आलेलं नाही. आमच्या बायका फार जबऱ्या होत्या हो! म्हणजे संत स्त्रिया तर होत्याच; पण जात्यावर दळण दळणाऱ्या आमच्या बायका होत्या, तिकडे मी येणार आहे. संत स्त्रिया पूर्ण करून येते तिकडे थोडीशी झलक दाखवण्यापुरती.

''तेव्हा आणखीन एक मोठी संत बाई जी चोख्याची महारी म्हणवते स्वत:ला. संत चोखोबा महार जमातीचा. आता सध्याच्या कायद्यानुसार जातिवाचक उच्चार करायचा नाही असं म्हणतात; पण

तो उच्चार त्यांनीच केलेला आहे आणि ती स्वत:ला 'चोख्याची महारी' म्हणवते. सोयराबाई तिचं नाव आणि ही चोख्याची महारी जी आहे, तिने एक अतिशय मूलभूत मुद्दा सांगितला म्हणजे पुन्हा स्त्री मुक्ती, स्त्री स्वातंत्र याच्या चर्चा आजही ज्या चालतात, राजकारणामध्ये चर्चा चालतात, धर्म पंडित चर्चा करत असतात. काय तर अमुक मंदिरामध्ये स्त्रियांनी जावे की नाही जावे? त्यांना प्रवेश मिळावा की न मिळावा? कारण का, स्त्रियांचा विटाळ होतो. आता विटाळ दोन प्रकारचा असतो, आपल्याकडे दोन प्रकारचे विटाळ. एक विटाळ म्हणजे जातीपातीचा विटाळ, की अमुक जातीचा माणूस उच्चवर्णीयाला शिवला तर विटाळ होतो आणि दुसरा स्त्रीचा, निसर्गधर्माने दिलेली तिची मासिक पाळी त्यालाही विटाळच म्हणायचं. आता ही बाई कुठल्याही शाळा कॉलेजात गेली नाही, कुठल्याही स्त्री मुक्तीवालीकडे गेली नाही, तिला कुठली सिमोन दि बोव्हा माहिती नव्हती. ती काय म्हणते? 'देहाचा विटाळ, देहीच जन्मला, शुद्ध तो जाहला कवण प्राणी।। उत्पत्तीचे मूळ विटाळाचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी।।' असा मला एखादा माणूस दाखवून द्या की, जो विटाळाच्या स्थानातून जन्माला आला नाही. आता आजही एखादा म्हणतो की, माझा जन्म जैविक नाही वगैरे, त्याच्यावर आपण किती विश्वास ठेवायचा हा भाग वेगळा; परंतु त्याचा भांडाफोड या आमच्या संत कवयित्रींनी १३-१४व्या शतकामध्ये केलेला आहे की, ज्या वेळेला लिपी आणि लिहिण्या-वाचण्याला त्यांच्या जीवनात स्थान नव्हतं. यांना स्त्री मुक्तीच्या उद्गात्या आणि झेंडा फडकवणाऱ्या म्हणायचं की नाही? म्हणजे आजच्या स्त्री मुक्तीच्या विचारांना मागे सारतील अशा प्रकारचे विचार आमच्या या स्त्रियांनी, संत स्त्रियांनी निरनिराळ्या जातीजमातीच्या स्त्रियांनी ज्यांना आपण अंत्यज जाती म्हणतो, ज्यांना आपण दुय्यम जाती म्हणतो, त्या जातीच्या स्त्रिया ज्या वेळेला बोलतात

**स्त्रियांच्या संस्कृतीने एक वेगळं वळण घेतलं गिरणी आल्यामुळे. अशा कितीतरी गोष्टी आपल्याला दिसतील. तेव्हा माझ्या जात्यावर दळण दळणाऱ्या बायकांनी ज्याला आपण स्त्रीमुक्ती, स्त्रीमुक्ती म्हणतो त्याचे उद्गार, फार जुन्या काळामध्ये काढलेले आहेत, संत स्त्रियांनी काढलेले आहेत. ज्याला आपण प्रबोधन, प्रबोधन म्हणतो ते लोकपरंपरेतल्या स्त्रियांनी, संतांनी, पुरुषांनी, लोक कलावंतांनी खूप मोठ्या प्रमाणामध्ये केलेलं आहे.**

त्या वेळेस त्यांची विचारशक्ती, प्रतिभाशक्ती आणि संवेदनशीलता, भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व या सगळ्या किती मोठ्या गोष्टी आहेत! निर्मितीच्या दृष्टीने, ज्याला आपण कला, कला म्हणत असतो ती कला म्हणजे दुसरं काय असतं? संवेदनशीलता नेमक्या शब्दांत उतरवणं, याच्यासाठी जी प्रतिभा लागते, ती प्रतिभा या बायकांजवळ उपजत आहे आणि ती अनुभवांतून परिपक्व झालेली आहे. ह्यांच्याकडे आम्ही या सबंध इतिहासाच्या प्रवाहामध्ये लक्ष देणार आहोत की नाही, असा हा महत्त्वाचा मुद्दा आहे. तिकडे लक्ष न देता आपण पुढे चाललेले आहोत आणि आम्ही सुधारलेले आहोत असं आपण म्हणत असतो. १९७५ साली ज्या वेळेला स्त्री मुक्ती वर्ष आल्यानंतर लोक म्हणायला लागले, हे पाश्चिमात्यांकडून आलंय, पाश्चिमात्यांकडून आलंय, आमच्या भारतामध्ये स्त्रियांना फार मोठं स्थान होतं वगैरे वगैरे! आपण स्त्रियांना पवित्र, महन्मंगल वगैरे मानतो, देवता मानतो. तर माझ्या जात्यावर दळणाऱ्या बायका, ह्या तर इतक्या परखडपणे बोलत आलेल्या आहेत; पण गंमत अशी आहे की, लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या आमच्या पुरुष

मित्रांनी एकानेही याचा उल्लेख केलेला नाहीये. त्या लोकसाहित्यामधल्या जात्यावरच्या ओव्यांच्यामध्ये बापाचं कसं कौतुक आहे, भावाचं कसं कौतुक आहे, नवऱ्याचं कसं कौतुक आहे, एवढ्या ओव्या सगळ्यांनी सांगितल्या आणि मी आईच्या मांडीवर बसून, झोपून कशी गाणी ऐकत होतो; पण अरे बाबा आईच्या मांडीचं तेव्हा काय होत होतं, त्याच्याकडे तुझं लक्ष गेलं का? ते कुणीही दिलं नाही. ते शेवटी दिलं आमच्या एका बाईनीच. ती बाई कोण? आमची इंदिरा संत! इंदिरा संतांना अगदी अलीकडच्या काळामध्ये काही ओव्या मिळाल्या आणि त्या कर्नाटकातल्या आहेत. महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रदेशामधल्या आहेत आणि त्याच्यामध्ये 'जातं ओढताना, बाई गं, माझ्या हाताला येती फोडं।' – हे कुरुंदाचं जात ओढता ओढता माझ्या हाताला फोड येतात, माझ्या हाताला गोळे येतात आणि माय माउलीचं मन ऐकुनि कळवळं।' माय माउलीला माझी दया येते; कारण माझ्या हाताला गोळे येतात. रोजच्या रोज रात्री उठायचं आणि तीन वाजता उठून दळायला बसायचं. दोन दोन, चार–चार पायली दळायचं ही काही साधी गोष्ट आहे? त्या बायका आपल्या गाणी म्हणत होत्या आणि दळत होत्या. दळताना काय म्हणत होत्या, 'गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा' आता करणार काय, कारण आमच्या केशवसुतांनी पुढे सांगितलं, केशवसुत काय म्हणाले, 'गाण्याने श्रम वाटतात हलके, हेही नसे थोडके।' हे त्यांनी श्रम न करता म्हटलेलं आहे; परंतु या श्रम करता करता बायका म्हणताहेत की 'गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा।। जात्या तू इसवरा नको मला जड जाऊ।। सयाच्या दुधाचा बया पाहतात अनुभवु।।' जात्या तू मला जड जाऊ नको रे बाबा, लोक माझ्या सयीचं दूध, सयीचं दूध म्हणजे आईचं दूध, 'मायमाउलीचं दूध माझ्या मनगटी खेळतं' कारण माझ्या माउलीची परीक्षा करतात लोक. 'आईने काय वळण लावलं तुझ्या,' 'आईने नाही का शिकवलं?' आजसुद्धा आईचा उद्धार होतो, तर तेव्हा तर होतच होता. तेव्हा माझ्या आईला कमीपणा यायला नको म्हणून मी ते सगळं करत असते, कष्टाची कामं करत असते. पुरुष वर्गाकडून माझ्यावर अन्याय होतो, अपमान होतो हे मला कळत नाही असं नाही. त्याच्याही शेकडो ओव्या आहेत, दोनतीन महत्त्वाच्या ओव्या ज्या अनेक वेळेला मी सांगते त्या परत सांगते, कडुविंद्रावन डोंगरी त्याचा रहावा– विंद्रावन नावाचं कडू फळ डोंगरात असते. 'कडुविंद्रावन डोंगरी त्याचा रहावा। पुरुषाचा कावा मला येडीला काय ठावा।।' आता हे तिचं येड पांघरून पेडगावला जाणे आहे की नाही? की पुरुषाचा कावा मला येडीला काय ठावा असं म्हणणारी जात्यावर दळण दळणारी जी बाई आहे तिला तथाकथित 'शुद्ध' बोलता येत नसेल; पण तिला 'शुद्ध' भान आहे, की काय चाललं आहे त्याचं आणि ही काही फक्त नवऱ्याबद्दल आणि सासरच्यांबद्दलची तक्रार आहे असं नाही. ज्या वेळेला बाप, भाऊ अन्याय करतात त्या वेळेला त्यांनासुद्धा तिने फटकारलेलं आहे. विशेषत: सवतीवर ज्या वेळेला बाप मुलगी देतो किंवा भाऊ बहीण देतो कारण तेव्हा काय या पोरी प्रेमविवाह करायला जात नव्हत्या, की पहिली बायको असताना दुसरीकडे गेला म्हणून बापच सवतीवर मुलगी द्यायचा, कारण पुरुषांनी कितीही लग्नं करायची, म्हणून मग ती ज्यांनी दुसरं लग्न लावून दिलं त्या बापालासुद्धा ती दोष देते. 'सवतीवर लेक दिली जशी साखरेची गोणी। बाप विकून झाले वाणी।।'– तेव्हा बाप विकतो मुलीला. अशा प्रकारच्या ओव्या बाई ज्या वेळेला म्हणते त्या वेळेला तिला वास्तवाचं केवढं मोठं भान असतं आणि इकडे मात्र इतर कोणाचंही लक्ष गेलेलं नाहीये, हे मला पुन्हा पुन्हा सांगावंसं वाटतं. जात्यावरची ओवी काळानुसार बदलत आली आहे. स्वातंत्र्य चळवळीचे पडसाद ओव्यांत उमटले आहेत. लो. टिळक, म. गांधी, जवाहरलाल नेहरू इत्यादींवरही बाईच्या ओव्या

आहेत. उदा. 'नका बायकांना नटू परदेशी या धिटाने। बुडतील कारखाने स्त्रियांचे।। असा स्वदेशीचा पुरस्कार आहे. त्या १९७५ सालच्या स्त्री मुक्ती वर्षात मी पहिल्यांदा (यात थोडासा आत्मस्तुतीचा दोष पदरात घेऊन सांगते की,) हे सांगायला सुरुवात केली आणि मग आमच्या सगळ्या स्त्री मुक्तीवाल्या ज्या आधुनिक बायका होत्या मुंबईच्या, पुण्याच्या वगैरे त्यांना हे भान आलं आणि मग या मौखिक साहित्याचा आपल्याला स्त्रीवादी दृष्टिकोनातूनही अभ्यास करायला पाहिजे असं सांगितलं. आमच्या कविवर्य नारायण सुर्व्यांनी मग 'लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा' हे पुस्तक माझ्याकडून लिहून घेतलं आणि त्याचं प्रकाशन करीत असताना नारायण सुर्वे म्हणाले होते की, 'ताराबाईंनी ही लोकसाहित्याची स्त्रीवादी समीक्षा प्रथम केलेली आहे' आणि मग ती अनेक अंगांनी पुढे अनेकांनी केलेली आहे.

''देव आणि भक्त यांच्यामधलं नातं, त्यातला आणखीन एक मजेशीर भाग आहे, बायका जात्यावर दळण दळताना जनाबाई, विठ्ठल आणि रुक्मिणी यांच्या नात्यामधला एक मजेशीर 'लव्ह ट्रँगल' दाखवतात की, विठ्ठल रुक्मिणीचा नवरा परंतु विठ्ठलाची ओढ कोणाकडे? जनाबाईकडे, कारण तो तिच्याबरोबर दळायला लागतो, शेणी भरायला लागतो, दळण कांडण करतो, धुणं धुवायला जातो, 'जनी आली घरी।। तेव्हा रुक्मिणी नाही घरी। जना बोलु घडी भरी। चल जाऊ माडीवरी।।' विठ्ठल म्हणतो. आता 'माडीवर जाणं' याला आपल्या परंपरेत एक वेगळा अर्थ आहे. कारण नवरा बायकोची झोपायची खोली बहुधा माडीवर असायची. ह्या बायकांनी रचलेल्या या ओव्या आहेत आणि विठ्ठल, रखुमाई आणि जनाबाईमधलं नातं काय असावं हे गंमतशीरपणे त्यांनी मांडलेलं आपल्याला दिसतं. अशा कितीतरी गोष्टी आहेत की, बायकांची प्रतिभा, बहुविध आणि बहुकल्पनांनी अशी सगळी वेढलेली आहे. नुसत्या जात्यावरच्या ओव्या घेतल्या, तर आपल्याला स्त्रियांच्या या प्रतिभेचं आणि त्यांचं जीवनाचं आकलन जे आहे ते किती सखोल आकलन आहे याची कल्पना येते.

''पुढे मग दळणाच्या गिरण्या आल्या. गिरण्या नव्हत्या तोपर्यंत बायकांना हे सगळं करावं लागतच होतं; पण गिरण्या आल्या आणि बायकांना सगळ्यात मोठा आनंद झाला. पुरुषांच्यापेक्षा बायकांना आनंद झाला. यंत्रयुगानंतर आर्थिक व्यवहार जाऊ दे बाजूला, बायका काय म्हणाल्या त्या ओव्यातूनच, 'आली गिरणं अनुसया। माझी जीवाची गं सखी। धाड बंधवा तिची पिठी।।' तर माझ्या भावा, तू आता ती गिरणी काढली आहेस, त्याची पिठी जरा मला पाठव कारण आता मला दळून दळून कंटाळा आलाय. 'सासू आत्याबाई दळु दळु मेल्या। (आमची सासू, आत्याबाई– आत्याबाई म्हणजे सासूच) 'आमच्या राज्यात बाई गिरणाबाई आल्या।।' असा आनंद ती व्यक्त करताना आपल्याला दिसते आणि मग एखादी खडूस सासू म्हणायला लागली, 'डाळीचं पीठ घरी दळलेलं चांगलं लागतं, भाजणी दळलेली घरी चांगली लागती.' तर मग ही नवीन आलेली सून म्हणायला लागली, गिरणीच्या जमान्यातली 'जळू जळू सासूबाई, जळू तुमचं जातं। दळं म्हणायाला तुमचं काय जातं।' काळ बदलला. काळ बदलल्यावर स्त्री बदलली त्यामुळे यंत्रयुग आलं. यंत्रयुगानं पुढे कायकाय झालं हा वेगळा भाग आहे; परंतु स्त्रीला थोडीशी मुक्तता मिळाली कष्टामधून आणि त्याच्या या पाऊलखुणा आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या संस्कृतीने एक वेगळं वळण घेतलं गिरणी आल्यामुळे. अशा कितीतरी गोष्टी आपल्याला दिसतील. तेव्हा माझ्या जात्यावर दळण दळणाऱ्या बायकांनी ज्याला आपण स्त्रीमुक्ती, स्त्रीमुक्ती म्हणतो त्याचे उद्गार, फार जुन्या काळामध्ये काढलेले आहेत, संत स्त्रियांनी काढलेले आहेत. ज्याला आपण प्रबोधन, प्रबोधन म्हणतो ते

लोकपरंपरेतल्या स्त्रियांनी, संतांनी, पुरुषांनी, लोक कलावंतांनी खूप मोठ्या प्रमाणामध्ये केलेलं आहे. लोकसंस्कृतीचा हा व्याप आमच्या सगळ्या आधुनिक संस्कृतीलासुद्धा व्यापून राहिलेला आहे की नाही, याचा विचार व्हावा.

''आज ज्या पद्धतीनं माणसांचं जीवन चाललेलं आहे, त्या पद्धतीमध्ये आपल्याला असं दिसतं आहे की, 'जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळुनि किंवा पुरुनी टाका' जुनं ते जाऊ द्या सगळं, आता नवीन काय ते पाहा, असं एकीकडे म्हणायचं आणि एकीकडे जुन्याचाच पुन्हा पुन्हा वापर कसा योग्य आहे हे सांगण्याचाही प्रयत्न करायचा आणि म्हणून विशेषत: लोकांना निरनिराळ्या कर्मकांडांत गुंतवून ठेवण्याचे उद्योग, देवाधर्माच्या नावावर, संस्कृतीच्या नावावर हे पुन:पुन्हा चाललेले दिसतात आणि त्याच्यामध्ये 'तथाकथित' शिक्षित स्त्रिया, मी 'तथाकथित' म्हणते मी सुशिक्षित म्हणत नाही, तथाकथित शिक्षित स्त्रिया त्याच्यामध्ये अडकतात. स्वत:च्या जगण्याचा लोकसंस्कृतीतल्या आणि संत स्त्रियांनी जेवढा विचार केला, तेवढा विचार या शिक्षित बाया करीत नाहीत. स्वत:ला पदवीधर म्हणवतात, उच्चशिक्षित म्हणवतात; परंतु आपण हे कर्मकांड का करतो आहोत, याचा विचार करत नाहीत असे दिसते. विधी श्रद्धेने केला जातो आणि ज्या वेळेला ज्या विध्यात्मकतेतली श्रद्धा बाजूला होते, त्या वेळेला जे उरतं नुसतं कर्म केलं जातं, नुसते विधी केले जातात त्याला कर्मकांड असं म्हणतात. की नुसतं करत राहायचं ते अमुक करा, तमुक करा, आणि मग त्याला साइंटिफिक रिझन देण्याचा प्रयत्न करायचा. स्युडो सायन्स. म्हणजे आता लोककलांच्यामध्येसुद्धा ही भानगड आलेली दिसते आहे. म्हणजे बायकांनी कपाळाला कुंकू का लावावं, परवा मी मुंबईला लोककलांचा एक कार्यक्रम पाहिला, आणि गंमत अशी आहे की, आधुनिक पद्धतीनं लोककला शिकवणाऱ्या एका संस्थेमधल्या एका मुलीने हा कार्यक्रम सादर केला. त्या कार्यक्रमामध्ये एक गोंधळ सादर केला. त्या गोंधळाचं गाणं आणि त्याच्यामध्ये तिने असं समर्थन केलं की, बाईनी कपाळाला कुंकू लावणं हे कसं आवश्यक आहे, आणि त्याला सायन्सची म्हणजे शास्त्रीय विधाने म्हणतात, ती वैज्ञानिक कारणे काय? तर बायकांना फार मानसिक त्रास असतो, कपाळाला इथे मधोमध दोन भुवयांमध्ये दाब बिंदू असतो, त्या दाब बिंदूवर कुंकवामुळे दाब पडतो आणि त्यामुळे त्यांचं मानसिक स्वास्थ हे सुरळीत होतं. त्या मुलीचं मी ऐकलं सगळं, मुंबईला, स्टेजवर आणि नंतर मी प्रश्न विचारला, 'ठीक आहे, त्या कुंकवाच्या दाब बिंदूमुळे स्त्रियांचं मानसिक स्वास्थ ठीक होत असेल, तर मानसिकदृष्ट्या जास्त स्वास्थ्याची गरज कोणाला आहे. लग्न झालेल्या बायकांना का विधवांना?' विधवांना जास्त गरज आहे! कारण मानसिकदृष्ट्या त्या जास्त असुरक्षित आहेत, तर विधवांना आम्ही कुंकू लावायचीच मनाई करणार. मग या 'सायंटिफिक रिझन'ला अर्थ काय आहे? मग याला आम्ही काय म्हणणार? 'फेक सायन्स', 'स्युडो सायन्स', 'व्याज विज्ञान/खोटं विज्ञान.' विज्ञानाच्या नावावर या खोट्या गोष्टी पसरवल्या जातात आणि मग याला वैज्ञानिक सत्य कसं आहे, हे ठासून सांगायचा उद्योग चालू झाला आहे. दुर्दैव म्हणजे 'तथाकथित' शिक्षित समाज याला बळी पडतो आहे. हा उलटा प्रवास सुरू झाला आहे, तो चिंताजनक आहे. अरे जर त्या बायकांचं स्वास्थ टिकायचं असेल, तर विधवांना जास्त गरज आहे तर त्यांना तुम्ही याची परवानगीच देत नाही कुंकू लावायची! बरं स्त्रियांना जर मानसिक अस्वास्थ असेल तर पुरुषांचं काय? सगळे पुरुष मानसिकदृष्ट्या स्वस्थ असतात का? नाही. तर आपण ज्याला सायंटिफिक रिझन देणे म्हणतो, वैज्ञानिक सत्य म्हणतो, त्याच्या पाठीमागच्या जो अप्रबुद्धपणा आहे, त्याच्याकडे

आमचं लक्षच नाहीये आणि ते आंधळेपणाने त्याचं आचरण चाललेलं आहे.

''तथाकथित उच्चशिक्षित स्त्रिया हे अत्यंत आंधळेपणाने करतायत असं मला सगळीकडे दिसतं. एखाददुसरी असेल वेगळी; परंतु बहुसंख्य ज्यांना आर्थिक स्वास्थ्य आहे, सामाजिक दर्जा आहे आणि त्यांचे मेंदू काम करत नाहीयेत, असं माझं स्पष्ट मत आहे. की यांचे मन आणि मेंदू हे मोकळे करायला पाहिजेत, चिमटीएवढे मेंदू असलेली ही माणसं आहेत की, जे आंधळेपणाने अशा प्रकारचे आचरण करतायंत, कर्मकांडांमध्ये गुंतून राहतायंत आणि त्याचं समर्थन करतायंत, यांना सुशिक्षित का म्हणायचं? त्या स्त्रिया असोत किंवा पुरुष असोत. हे साक्षर आहेत फक्त, म्हणजे शिक्षणाची व्याख्या इंग्रजोत्तर काळामध्ये 'लिहिता वाचता येणं म्हणजे शिक्षण' ही जी झालीये ती तोकडी आहे. त्यांना फक्त लिहिता वाचता येतं. सुशिक्षणाने स्वतंत्र विचार करण्याचं सामर्थ्य यावं आणि स्वतंत्रपणे आचरण करण्याचं धाडस यावं कारण ज्ञानाने धीर यायला पाहिजे, ज्ञानाने धाडस यायला पाहिजे, ज्ञानाने भीती वाढायला नको. अज्ञानाने भीती वाढते, ज्ञानाने भीती जायला पाहिजे आणि जर ज्ञानाने भीती जायच्याऐवजी ती जर वाढत असेल, तर या लिहिता वाचता येणाऱ्या या पदवीधरांना ज्ञानी म्हणायचं का, असा प्रश्न आपल्यासमोर उभे राहायला पाहिजे. ज्ञानामुळे माणूस निर्भय व्हायला पाहिजे आणि या देशातले लोक जर जास्त निर्भय व्हायचे असतील, तर त्यांनी या सगळ्या कोंडाळ्यातून बाहेर यायला पाहिजे, आणि जी लोकसंस्कृती आणि लोकविज्ञान म्हणते त्याचा सर्वांगाने नीट धांडोळा घ्यायला पाहिजे. केवळ जुनं आहे म्हणून नव्हे त्यातलं सगळं टाकाऊ असू शकतं, त्यातलं काही उपयुक्त असू शकतं. आमच्या नाटककार कालिदासांनी म्हटलं आहे की, 'जुनं असतं ते सगळं चांगलंच असतं असं नाही, नवं असते ते सगळं टाकाऊ असतं असं नाही.' शहाणी माणसं जी असतात ती विचार करतात आणि यातलं टाकाऊ काय आणि टिकाऊ काय याचे विवेकाने ग्रहण करत असतात.

''पुराणमित्येव न साधु सर्वम्। न चापि सर्वम् नव मित्यवद्यम्' – जे नवीन असतं ते सर्व टाकाऊ असतंच असं नाही, मग शहाणी माणसं काय करतात 'सन्त: परीक्षान्यतरन् भजन्ते' जी शहाणी माणसं असतात ती स्वत: परीक्षण करतात. स्वत:चं डोकं चालवतात. 'मूढ: परप्रत्ययनेयबुद्धि।।' आणि मूर्ख जे असतात ते दुसऱ्याच्या बुद्धीवर अवलंबून असतात. अमुकतमुक महाराजांनी सांगितलंय, व्हा शरणागत. या शरणागतीला ज्ञानाने विरोध केला पाहिजे, ज्ञानाने माणसाला निर्भय बनवलं पाहिजे, आणि ते जर निर्भय बनवत नसेल तर पुढे काय? त्यांना ज्ञानी म्हणायचं का?

''आर्टिफिशियल इंटेलिजन्सबाबत सध्या बरीच चर्चा आहे. परवा एका गृहस्थाने माझी मुलाखत घेतली, त्याचा शेवटचे सार सांगते फक्त, मी काही जाणकार लोकांना विचारलं 'ही कृत्रिम बुद्धिमत्ता नावाची काय गोष्ट आहे?' मग त्या त्या क्षेत्रातल्या काही चार लोकांनी मला लांबलचक निबंधच्या निबंध पाठवले इंग्रजीमध्ये, मराठी, हिंदीमध्ये वगैरे. त्याचे सार मग मी माझ्या अल्प मतीप्रमाणे काढण्याचा प्रयत्न केला आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) म्हणजे जो सजीव माणूस आहे तुमच्या माझ्यासारखा तो आजपर्यंत आपलं डोकं चालवून जे काही नवं जुनं असेल ते ठरवत होता. मी लेखक असेन तर माझं लेखन जे काही बरं वाईट असेल ते माझं मी करत असे. आणखीन कोण दुसऱ्या क्षेत्रातला असेल तर तो त्याची निर्मिती करीत असे. आता ही कृत्रिम बुद्धिमत्ता आल्यामुळे काय होणार आहे म्हणे? तर माणसाच्या कर्तृत्वशक्तीची बंधनं ही संपणार आणि ती जी आर्टिफिशियल इंटेलिजन्स नावाची गोष्ट जी

**आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे कलाकार नाहीसे होतील का, लेखक नाहीसे होतील का? आणि मग साहित्य संमेलनं कोणाची घेणार? असे प्रश्न निर्माण होतील आणि साहित्य संमेलन घेण्यासाठी प्राकृतिक माणसंच जर अस्तित्वात नसतील आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स जर सगळं साहित्य व कला निर्माण करत असतील, तर आज जे साहित्य संमेलन भरलेलं आहे आणि इथे आपण जी देवाण घेवाण करतो आहोत उलट सुलट विचारांची, जाणिवांची ती पटेल न पटेल, अशा विचारांची कशीही या ज्या संवेदना आहेत या संवेदनाच जर नाहीशा होणार असतील, तर मग या आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा आपण इतका उदो उदो करायचा का, असा प्रश्न निर्माण होतो.**

आहे ती तुमच्या बुद्धीपेक्षा जास्त क्षमतेने काम करणार आहे आणि त्यामुळे तुमच्या बद्धिमत्तेच्या पलीकडे ती जाते आहे. म्हणजे मी माझ्या बुद्धीने जर काही ठरवायचं म्हटलं तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स त्याच्यापेक्षा शतपटींनी पुढे जाणार आहे आणि माणूस तोकडा पडणार आहे तिथे. मला स्थानच नाही काही. मी एक लेखक असेन, मी काही बरा वाईट अनुभव घेऊन समजा एखादी कथा लिहिली, तर तो आर्टिफिशियल इंटेलिजन्स जिथे निर्माण होतो आहे, तो त्याच्याही पेक्षा आणखीन मोठ्या गोष्टी तयार करू शकतो, ॲटोमॅटिक तयार करू शकतो, असं मला सांगण्यात आलं, आणि मग मी जी तयार केलेली कथा आहे त्याला काहीच अर्थ नाही, म्हणजे उद्या कुणीही त्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या 'ॲप'ला सांगेल ते तारा भवाळकरांसारखं पुस्तक तुम्ही करा, तो फटाफट फटाफट करून देईल. मग तारा भवाळकरनी केलेलं त्याला काहीच अर्थ नाहीये, मोडीत गेली ती! आता प्रश्न कसा निर्माण होतो, माणसाच्या अस्तित्वाला किंमत राहणार की नाही? कारण माणूस ज्या वेळेला कुठलीही कृती निर्माण करत असतो, त्या वेळेस त्याच्या पाठीमागे त्याचा अभ्यास असतो, त्याचा विचार असतो आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट त्याची संवेदना असते. जर ती संवेदनाच कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नाहीशी होणार असेल जिवंत माणसाची, तर मग जिवंत माणसाचं काम काय? म्हणजे प्रकृतीने दिलेल्या आपल्या ज्या शक्ती आहेत, प्रकृती म्हणजे निसर्गाने! आपोआप मिळालेल्या आपल्या ज्या शक्ती आहेत, विचार करण्याची शक्ती असेल, संवेदनेची शक्ती असेल, सुख-दुःख ग्रहणाची शक्ती असेल या सगळ्यांच्या पलीकडे जर ती कृत्रिम बुद्धिमत्ता काम करणार असेल, तर मग माझ्या, माणसाच्या या अस्तित्वाला अर्थ काय, असा प्रश्न निर्माण होतो.

म. गांधींवर एके काळी आरोप होत असे की, त्यांचा यंत्र/विज्ञानाला विरोध आहे. ते मागासलेले आहेत. त्या वर महात्माजींचे उत्तर होते की, 'यंत्र तंत्र हे माणसासाठी आहेत. ते माणसाला गुलाम करण्याइतके वरचढ होऊ नयेत.' कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात तसे होण्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत. त्यासाठी जगभराच्या शासनकर्त्यांनी आणि वैज्ञानिकांनी सावध राहावे. उद्या जर कला आणि साहित्य यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेने आक्रमण केले, तर संवेदनशील कलावंत आणि साहित्यिक संपतील की काय? मग साहित्य संमेलने तरी होऊ शकतील का आजच्यासारखी, असे प्रश्न निर्माण होतात. थोडं नकारात्मक विचाराने, त्या विचारांचा रोबोट होत आहे; पण माणसाने आपली बुद्धिमत्ता आणि संवेदना सुरक्षित ठेवावी.

''या निमित्ताने खूप विस्ताराने एक विचार आपल्यासमोर ठेवण्याची संधी मिळाली; पण हे

आवाहन या पुढील भारतीय आणि प्रामुख्याने मराठी माणसाने स्वीकारावे, आपले संशोधन मराठीतून मांडावे आणि ते इतके लोकोत्तर असावे की, जगातील अन्य भाषकांना मराठी शिकल्याशिवाय गत्यंतर राहू नये. मग मला एक गोष्ट आठवते. एका अर्थाने ही लोक परंपरेतली गोष्ट म्हणावी की नाही मला माहीत नाही; पण एका आधुनिक लेखकाने लिहिलेली कथा खरे तर ही कादंबरी आहे, कथा हिंदीमधली आहे. १९६० च्या आसपास मला मिळालेली या कथेची ५ वी आवृत्ती निघाली आहे. कृष्णचंद्र नावाचे एक हिंदी लेखक होऊन गेले, ते फँटसी लिहिण्याबद्दल प्रसिद्ध होते. त्या फँटसीमध्ये त्यांची एक कथा आहे. 'उलटा वृक्ष' नावाची आपल्याकडे भगवतगीतेमध्ये एक संकल्पना आहे की, जीवन हा एक उलटा वृक्ष आहे. 'उर्ध्वमूल:अध:शाखा' की मुळं वर आहेत आणि शाखा म्हणजे फांद्या खालच्या बाजूला आहेत या जीवनवृक्षाच्या. ही मूळ कल्पना आणि या कल्पनेवर आधारित ही पूर्ण फँटसी आहे. वर वर दिसायला असं वाटतं की, लहान मुलांसाठी करमणूक म्हणून ही कथा लिहिली आहे की काय? कारण त्याच्यात जादूगार आहे, चमत्कार आहेत, परी आहे, जादूची छडी आहे, आकाशात उडत जाणारी सुलेमानी टोपी आहे, अशा ज्या काही जादूई कथेमध्ये मुलांच्या गोष्टी असतात अशा बऱ्याच गोष्टी आहेत. त्या सगळ्या आपण टाळून देऊयात. मूळ कथेचं सूत्र सांगते तुम्हाला; जे आपल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी जुळतंय, असं मला वाटतं. या कथेमध्ये एक उद्योगपती आहे आणि त्याने सबंध जगभरच्या संशोधकांना हाताशी धरलेलं आहे, एक अशा प्रकारचं घर उभं केलेलं आहे, आपल्या मुलाच्या स्वास्थ्यासाठी, पुढच्या आपल्या पिढीला स्वास्थ्य मिळावं म्हणून आज जी श्रीमंत आणि ज्याला आपण आत्मविश्वासू अशी जी माणसं आहेत त्यापैकी हा माणूस आहे. आपल्या मुलाला सर्व प्रकारचं स्वास्थ्य बसल्याजागी मिळायला पाहिजे, त्याला काही म्हणजे काही करायला लागता उपयोगी नाही. म्हणून त्यांनी एक आरसे महाल बनवलेला आहे काचेचा महाल. त्या काचेच्या महालात त्या मुलाला बसायला अतिशय आरामशीर असे एक आसन बनवलेलं आहे. त्याच्यासमोर एक मशीन आहे त्या मशीनवर बटन दाबलं की, त्या मुलाला काय पाहिजे ते हजर होतं तिथे, काय पाहिजे ते त्या मुलाला हालचाल/प्रयत्न करण्याची काही गरज नाही, आणि मग ते बटन दाबायला फक्त अंगठा लागतो, बाकी काही लागत नाही. मग त्या बापाने बघितलं की, या पोराचं आता काम बसल्याजागी होतंय अंगठ्याच्या जिवावर, बाकीच्या बोटांची काय गरज आहे. तो बाकीची बोटं छाटून टाकतो त्या पोराची. ते पोरगं तिथे राहतं. ते पोरगं राहतं; पण त्या पोराच्या मनाला आईची आठवण येत असते, बाबाची आठवण येत असते. पुढे हळूहळू हळूहळू तो पोरगापण बटन दाबता दाबता बाकी सगळं विसरून जातो आणि मग त्याच्यातून तो काय भूक लागली, तहान लागली, अमुक गरज लागली की, बटन दाबलं की हजर! बटन दाबलं की हजर! माणूस नाही, काणूस नाही, जनावर नाही, झाड नाही, वृक्ष नाही, काही काही नाही आणि त्या त्याच्या काच महालाच्या बाहेरच्या बाजूला एक श्रमकरी मुलगा आहे, आणि तो श्रमकरी मुलगा काहीतरी त्या मातीमध्ये धडपडत असतो, झाडाच्या तिथे धडपडत असतो, काहीतरी मातीची ढेकळं फोडत असतो. असले काहीतरी उद्योग करत असतो. कुठलाही सामान्य मुलगा जसं करतो तसा! ते याला खूप दूर वाटत असतं आणि त्या मुलाला या मुलाचं आश्चर्य वाटत असतं. एकदा नैसर्गिक अपघाताने तो मुलगा बाहेर फेकला जातो. आता फेकला गेल्यानंतर त्या मुलाने जगायचं कसं? कारण बटनं दाबून प्राप्त करायची जी यंत्रं आहेत ती सगळी यंत्रं उद्ध्वस्त झाली त्या अपघातामध्ये, आणि हा जो मुलगा आहे श्रमकरी मुलगा, तो श्रमकरी मुलगा त्यानं बघितलं एक खड्डा

पडलेला आहे आणि उर्ध्वमूल:अध:शाखा असं! ते खालच्या बाजूला एक झाड वाढतं आहे, त्या झाडावर काहीतरी खायला प्यायला वस्तू असतील असं वाटतं, आणि तो याला म्हणतोय, 'अरे तू ये... आपण दोघं जण मिळून खाली जाऊ. त्या झाडावर काहीतरी असेल खाली.' याला माहितीच नाही झाडं म्हणजे काय आणि जायचं म्हणजे कसं, आणि काय करायचं म्हणजे कसं? मग तो श्रमकरी मुलगा त्याला ओढून नेतो आणि त्या फांद्यांवरून खाली उतरायला लागतो. म्हणजे त्या फांद्या चढणं एका अर्थाने खाली उतरणं म्हणजे फांद्या चढणं, आणि त्या फांद्या चढता चढता लहानपणीची जी गोष्ट असते की, कोणीतरी जादूचे तीन मटारचे दाणे दिले आणि ते दाणे पेरल्यावर जमिनीवर झाड उगवलं तसं ते झाड त्या पोराच्याकडून उगवलेलं असतं आणि मग तो म्हणतो, 'तिथे वर कुठंतरी वर शेंड्यावर मटार लागलेले असतील. आपल्याला खायला काहीतरी मिळेल, तू चल, चल.' तो म्हणतो, 'चलू कसा? मला फांदीच धरता येत नाही,' आणि या मुलाला पाचही बोटं असतात आणि याला बोटंच नाहीत, हा श्रमकरी रामू म्हणतो, 'नाही तू चल चल, धडपड धडपड.' याला खरचटतंय, हाताला पकड म्हणून नाही. एका अंगठ्यानी, त्याच्या शरीराच्या नैसर्गिक शक्ती संपलेल्या आहेत. त्याच्या उलट त्या श्रमकरी मुलाला सगळ्या शक्ती आहेत आणि त्याची बुद्धी शाबूत आहे. तो त्याच्याकडून काही धडपड करण्याचा प्रयत्न करतोय. कथा पुष्कळ खूप मोठी आहे; पण पुढची एक मला फार मजेशीर गोष्ट वाटते की, तो अशी धडपड करता करता हा श्रमकरी मुलगा अडचणीत सापडतो. आता त्याला सोडवल्याशिवाय आपल्याला दुसरा आसरा नाही हे या अंगठ्यावाल्या मुलाला कळतं. मग तो काहीतरी धडपड करतो आणि आता आपल्याला जगलंच पाहिजे काहीतरी करून हे जाणवतं, आणि मग प्रयत्न करता करता तो त्याला ओरडत असतो, 'अरे तू ये ये. ती फांदी धर.' याला फांदीने खरचटते, डोक्याला खरचटते आणि मधेच तो ओरडतो, 'अरे माझ्या हाताला आता बोटं फुटायला लागली. माझ्या हाताला आता बोटं फुटायला लागली.' तात्पर्य : शेवटी प्राकृतिक देणं जे आहे, हे प्राकृतिक देणं ही माणसाची सगळ्यात मोठी शक्ती आहे. कथा पुढे पुष्कळ मोठी आहे. ते संपूर्ण पॉलिटिकल सटायर उपरोधात्मक विडंबन आहे, राजकीय विडंबन आहे. म्हणजे ती दिसायला जरी लहान मुलांची गोष्ट वाटली तरी ती जर बारकाईने वाचली, तर आजही ती तंतोतंत लागू पडेल, अशा प्रकारचं ते पॉलिटिकल सटायर आहे म्हणजे राजकीय अशी ती उपरोध कथा आहे. 'उलटा वृक्ष' या कथेला जवळ जवळ शंभर वर्षं होत आलेली आहेत! परंतु हा आमचा कृष्णचंद्र हा एक द्रष्टा लेखक आहे असं माझं मत आहे कारण भविष्याचा ज्याला खूप दूरवरचा खोलवर वेध घेता येतो, त्याला द्रष्टा लेखक असं म्हणतात. मला आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या बाबतीत असं वाटतं की, असा अतिरेक होत होत होत जर माणसाच्या सगळ्या प्राकृतिक शक्ती आणि प्राकृतिक संज्ञा नाहीशा झाल्या तर काय होणार? तर मनुष्य संपून जाईल. त्या माणसाच्या प्राकृतिक संज्ञा परत जाग्या होतील की नाही! आणि त्या होण्यासाठी काय व्हायला पाहिजे, तर हे जे निर्माण केलेलं अतिरेकी कृत्रिम आहे हे उद्‌ध्वस्त व्हायला पाहिजे. हे उद्‌ध्वस्त झाल्याशिवाय आपल्याला आपल्या प्राकृतिक शक्तींचं भान येणार नाही. आपण कृत्रिमतेमध्ये इतके अडकलेले आहोत की, आपलं प्राकृतिक काय आहे आपण विसरत चाललेले आहोत. त्या प्राकृतिकतेकडे जाण्यासाठी मला 'उलटा वृक्ष' ही कथा ही प्रतीकात्मक कथा म्हणूयात अशा प्रकारची वाटते आहे, तेव्हा आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे कलाकार नाहीसे होतील का, लेखक नाहीसे होतील का? आणि मग साहित्य संमेलनं कोणाची घेणार, असे प्रश्न निर्माण होतील आणि

साहित्य संमेलन घेण्यासाठी प्राकृतिक माणसंच जर अस्तित्वात नसतील आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स जर सगळं साहित्य व कला निर्माण करत असतील, तर आज जे साहित्य संमेलन भरलेलं आहे आणि इथे आपण जी देवाण घेवाण करतो आहोत उलट सुलट विचारांची, जाणिवांची ती पटेल न पटेल, अशा विचारांची कशीही या ज्या संवेदना आहेत या संवेदनाच जर नाहीशा होणार असतील, तर मग या आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा आपण इतका उदो उदो करायचा का, असा प्रश्न निर्माण होतो. या निमित्ताने खूप मोठा विचारांचा पैस आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो आहे आणि ती संधी मला आपण सगळ्यांनी दिलीत याबद्दल मी आपल्या सगळ्यांची ऋणी आहे मनापासून धन्यवाद!

''मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. याच्याबद्दल आपण आनंद व्यक्त करतोच याबद्दल वाद नाही. प्रश्न असा आहे, अभिजात म्हणजे नेमकं काय? मी मुद्दाम शब्दकोश काढून अभिजात आणि अभिजन या शब्दांचे अर्थ पाहिले. त्यात अभिजन म्हणजे कुलीन, सभ्य, उच्च, सुसंस्कृत असे पर्यायी शब्द दिलेले आहेत, आणि अभिजन म्हणजे उत्तम कुळ असलेला, कीर्तिवान म्हणजे अभिजन. आता प्रश्न असा येतो की, उच्च कुळामध्ये जन्माला न येऊनसुद्धा माणसे अधिक गुणवान होऊ शकतात की नाही? त्याची उदाहरणं आपल्या पुराणामध्ये, इतिहासामध्ये मोठ्या प्रमाणावर आहेत आणि त्याचं सर्वांना माहिती असलेलं उदाहरण म्हणजे कर्णाचं आहे. कर्णाने म्हटलेलं आहे की, 'जन्म कुठे झालाय हे महत्त्वाचं नाही, तर त्याचं कर्म काय आहे हे महत्त्वाचं आहे.' ते कर्णाचं वचन प्रसिद्ध आहे. 'दैवायत्तं कुले जन्म: मदायत्तं तु पौरुषम्।' जन्म कुठे मिळावा हे आपल्या हातामध्ये नसतं ते दैवाच्या हातात असतं; परंतु पौरुष, पराक्रम, गुणवत्ता वाढवणं हे आपल्या हातात असतं आणि त्याप्रमाणे माझा जन्म सूर्य कुळात झालाय का आणखीन कोणाच्या पोटी झालेला मला माहिती नाही; परंतु माझा पराक्रम कसा आहे, मी अर्जुनासारखा बाण मारणारा आहे की नाही, मी धनुर्धर आहे की नाही, मी त्याच्या तोडीचा धनुर्धर म्हणून उभा राहू शकतो की नाही या गोष्टी महत्त्वाच्या आहेत आणि हे केवळ कर्णाच्या बाबतीतच नाही तर अनेकांच्या बाबतीमध्ये आपल्याला दिसतं, मोठं उदाहरण म्हणून आपण हे उदाहरण घेतलेलं आहे. अलीकडचे मोठे उदाहरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे.

''आता प्रश्न असा आहे की, निरनिराळ्या ज्या बोली आहेत, त्या बोली, त्यांना आपण प्राकृत म्हणतो आणि प्रमाणभाषा आणि बोली याच्यामध्ये प्रमाणभाषेचा हा जो दर्जा आहे या दर्जाची संकल्पना केव्हा आणि कशी आली? तर इंग्रजोत्तर काळामध्ये आपल्याकडे लेखन-वाचन पद्धतीनं जी सार्वत्रिक शिक्षण देण्याची परंपरा सुरू झाली आणि नंतर आपल्याकडे शिक्षण म्हणजे लेखन-वाचन येणं अशा प्रकारची एक परिभाषा निर्माण झालेली आहे. जणू काही ज्यांना लिहिता वाचता येत नाही ते अडाणी, ते मूर्ख! अशा प्रकारे आजही लोकं समजताहेत. खरं म्हणजे आपण पुष्कळ उदाहरणं पाहिली की, लिहिता वाचता न येणारी मंडळी मग ती स्त्रिया असू देत, संत असू देत, अन्य कुळांमधली असू देत ही अतिशय विचक्षण असू शकतात, ती संवेदनशील असू शकतात, ती प्रतिभावंत असू शकतात आणि मग त्याच्यासाठी जात्यावर दळण दळणाऱ्या बायकांपासून ते संतसाहित्यातल्या स्त्रिया आणि पुरुषांपर्यंत विविध जातीजमातींची उदाहरणं आपल्याला सगळीकडे दृष्टोत्पत्तीस येतात. मग लिहिता वाचता येणंच म्हणजेच शिक्षण ही भूमिका कशी तयार झालेली असावी? तर इंग्रजोत्तर काळामध्ये शालेय पाठ्यपुस्तकं निर्माण करून ज्या शाळा निघाल्या त्या शाळांमधून मेकॉलेनी ती रूढ केली असे म्हणतात. त्या

वेळेलाही एक भूमिका होती की, मेकॉलेनी काय केलं? तर मास्तर आणि कारकून निर्माण करण्याच्या शाळा निर्माण केल्या. म्हणजे निरनिराळ्या शाळा निघाल्या पाहिजेत, तिथे शिकवायला मास्तर पाहिजेत आणि सरकारी कचेऱ्यांमध्ये कारकून पाहिजेत आणि त्या पद्धतीचे लेखनवाचन ज्यांना येतं ते शिक्षित आणि बाकीचे सगळे अडाणी आणि म्हणून आपल्याकडे मूठभर मंडळींमध्येच लेखन-वाचनाची परंपरा वंशपरंपरागत होती, आणि खरं सांगायचं म्हणजे स्वच्छ शब्दामध्ये बोलायचं झाले तर ब्राह्मण जमातीमध्ये ही परंपरा दीर्घकाळपासून होती, जुन्या काळापासून, असा आपला समज आहे; परंतु प्रत्यक्षामध्ये जर बघितलं तर सर्व ब्राह्मणांनासुद्धा लिहिता वाचता येत होतंच असं नाही. विशेषत: स्त्रियांच्या बाबतीमध्ये याची अनेक उदाहरणं आपल्याला साहित्यामध्येसुद्धा दिसतात. ज्यांनी सुरुवातीच्या काळामध्ये आत्मचरित्रे लिहिली, त्यात आमचे बेळगावचे गंगाधरपंत देशपांडे नावाचे काँग्रेसचे फार मोठे पुढारी होते आणि त्यांनी आपलं आत्मचरित्र लिहिलेलं आहे. ते बेळगावहून पुण्याला शिकायला आलेले होते कारण बेळगावमध्ये उच्च शिक्षणाची सोय नव्हती आणि बऱ्याच ठिकाणी इतर ठिकाणी जिथे शिक्षणाची सोय नाही तिथले लोक पुण्या-मुंबईला शिकायला जायचे आणि प्रामुख्याने पुण्याला शिकायला जायचे. तसे गंगाधरराव देशपांडे आले. त्या काळात मुलामुलींची लग्नं लवकर व्हायची म्हणजे मुलगे हायस्कूलमध्ये पंधरा-सोळा वर्षांचे असताना मुलांची लग्नं व्हायची आणि मुली म्हणजे त्यांच्या बायका नऊ -दहा- अकरा वर्षांच्या होत्या. तसे गंगाधरपंत देशपांड्यांचे लग्न हे लवकर झालेले होते आणि त्याप्रमाणे ते पुण्याला शिकायला जरी होते तरी पत्नीशी संपर्क असा फारसा येत नव्हता. एका सुट्टीमध्ये ते बेळगावला आले आणि बेळगावला आल्यानंतर ते बायकोला म्हणाले (कारण त्या घरातल्या पद्धतीप्रमाणे बायकोची भेट (पती-पत्नींची) ही फक्त रात्रीच व्हायची.) तर ते बायकोला म्हणाले 'मी तुझ्यासाठी पुण्याहून एक गंमत आणली आहे.' तिला वाटलं पुण्यावरून आपला नवरा काहीतरी शिकून वगैरे आलाय म्हणजे काहीतरी नव्या पद्धतीची साडी-बीडी, दागिना वगैरे असं काहीतरी असेल आणि मग ती बिचारी वाट बघत बसली की, रात्री काय आणतायत ते. तर रात्री त्यांनी पाटी, पेन्सिल आणि पुस्तक बाहेर काढलं आणि म्हणाले की, 'मी तुला आता लिहायला वाचायला शिकवणार आहे.' आता पाटी, पेन्सिल पाहिल्याबरोबर त्या बाईचं डोकं फिरलं. ती म्हणाली, 'असलं मला भलतं काही तरी सांगू नका!' उच्चवर्णीय, उच्चशिक्षित असं ते घराणं गंगाधरपंत देशपांड्यांचं, बेळगावमधले अतिशय प्रतिष्ठित घराणं, त्या घराण्यातली ही मुलगी म्हणते 'मला हे भलतं सलतं काही सांगू नका.' ते म्हणाले, 'अगं, आता पुण्या-मुंबईतल्या सगळ्या बायका सर्रास लिहायला वाचायला शिकतात.' ती म्हणाली, 'शिकत असतील! त्यांना लवकर विधवा व्हायचं असेल म्हणून त्या शिकत असतील.' समज असा होता की, बाई जर लिहायला वाचायला शिकली, तर सरस्वतीचा तिच्यावर कोप होतो आणि सरस्वतीच्या कोपाने ती विधवा होते! उच्च-वर्णीयांच्या स्त्रियांमध्ये असलेले समज दीर्घकाळपर्यंत होते. आता गंगाधरपंत देशपांडे हे महात्मा गांधींच्या चळवळीमध्ये काम करणारे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील तशी अलीकडची गोष्ट. इसवी सनाच्या १९ व्या शतकाच्या सुरुवातीची. त्या काळात जर लोकांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी इतका अपसमज असेल, तर मग बाकीच्या इतर जाती जमातींच्याबाबतीमध्ये तो किती मोठा असेल. तर स्त्रियांना शिकवू नये याबद्दल असे हे अपसमज होते आणि मग याच्यासाठी ही भीती घालायची आणि स्त्रीच्या बाबतीमध्ये सगळ्यात मोठी भीती म्हणजे तिने विधवा होऊ नये ही! अशा कितीतरी

घटना! म्हणजे त्या काळातलं साहित्य तुम्ही जर बारकाईने वाचले, तर अशा आणि अनेक घटना आणि अनेक प्रसंग पाहायला मिळतील. तर उच्च आणि कुलीन असं जे काही म्हटलं जातं त्यात या स्त्रिया उच्च कुळातल्या नव्हत्या का, त्या कुलीन नव्हत्या का, काही लेखन वाचन करायची त्यांना मुभा होती का? नव्हती!

''दुसरं उदाहरण की, सांगलीमध्ये नाटक पहिल्यांदा सुरू झाले. विष्णुदास भाव्यांनी नाटक सुरू केले वगैरे वगैरे म्हणतात, त्याचा मी बऱ्यापैकी अभ्यास केला. विष्णुदासांनी सुरुवातीला नाटक ज्या वेळेस इथे बसवले त्या वेळेस राजेसाहेबांनी काय केले? तर विष्णुदासांना सांगितले, तो मुलगा होता, अठरा-वीस वर्षांचा त्यांना कर्नाटकी नाटक पाहून म्हणाले, 'तू असं नाटक करशील का?' तर तो म्हणाला 'हो, करीन; पण मला नाटकात काम करायला मुलं पाहिजेत.' त्या वेळेस कोकणातून बरीच मुले पोट भरण्यासाठी संस्थानच्या ठिकाणी शहरामध्ये येत असत. तेव्हा सांगली हे संस्थान होते. संस्थानामध्ये कोकणातून आलेली तरुण ब्राह्मणांची मुलं होती, त्यांना पोट भरण्याचा उद्योग काय होता? तर मोठमोठ्या सरदारांच्याकडे किंवा पैसेवाल्यांच्याकडे पाणी भरायचं, पुरुषांची धुणी धुवायची 'धोतरं बडवणं' असा शब्द त्या काळामध्ये होता. धोतरं बडवायची. ही ब्राह्मणांची मुलं, ब्राह्मणांच्याच घरात काम करणारी. फक्त ती श्रीमंतांच्या घरी काम करत होती आणि पोट भरायला आलेली होती. तेव्हा राजेसाहेबांनी सांगितले की, 'इथे बरीच पाणकी मुलं आहेत, त्या पाणक्या मुलांना तू हाताशी धर आणि तू ते नाटक बसव.' त्याच्याबाबत मी सर्व विस्ताराने विष्णुदासांच्या चरित्रात लिहिलेलं आहे. ते नाटक बसवताना आता त्या नकला त्यांना पाठ करायला द्यायच्या, तर विष्णुदासांनी कधीही संपूर्ण संवाद लिहिले नाहीत, गाणी लिहिली आणि संवाद

**हा लोकाचार जो आहे तो लोकाचार जसा गणितमानी होत जातो तसा जीवनाच्या सर्व अंगांवर त्याचा परिणाम होत असतो. त्याचा भाषेवर परिणाम होत असतो, जगण्यावर परिणाम होत असतो, सगळ्या यंत्रणेवर परिणाम होत असतो आणि मग आपल्याला असे दिसते की, मुंबईच्या भाषेचे चलन आणि पुण्याच्या भाषेचे चलन ह्याच्यामध्येही फरक पडलेला आहे.**

उत्स्फूर्तपणे म्हणायचे कारण संवाद पाठ करायचे म्हटलं तर त्यांना लिहिता वाचता यायला पाहिजे आणि त्यांना तर लिहिता वाचता येत नव्हतं, आणि मग उत्स्फूर्तपणे संवाद बोलायचे. त्याचे साचे काही ठरलेले असायचे की, राजाने कसं बोलायचं, दासीने कसं बोलायचं, कोणी कसं बोलायचं... तमाशामध्ये जसं असतं तसं, तर त्याप्रमाणे ती मुलं उत्स्फूर्तपणे भाषण बोलायची. ब्राह्मणांच्या मुलांना सगळ्यांना लिहिता वाचत येत होतंच असं नाही. पाठांतर येत होतं; परंतु लिहिता वाचता येत नव्हतं. पाठांतर ही वेगळी गोष्ट आणि लिहिता वाचता येणं ही गोष्ट वेगळी आहे. पाठांतरावर त्या काळात भर असायचा, त्याचं महत्त्वाचं कारण असं की, लेखन वाचन ही फार दुर्मीळ गोष्ट होती. त्यामुळे मेकॉलेनी शाळा काढल्यानंतरसुद्धा फार कमी माणसं शिकायला लागली. ज्यांना शहरामध्ये, शाळेमध्ये, कचेऱ्यांमध्ये नोकऱ्या मिळवणं शक्य होतं ते ब्राह्मणाचे लोक हे शिकायला लागले. ब्राह्मणांच्या बायकासुद्धा फार उशिरा शिकायला लागल्या, असं आपल्याला दिसतं. त्याची पुष्कळ उदाहरणं आहेत. तर हा जो समज आहे की, अभिजन म्हणजे उत्तम कूळ असलेला, सभ्य, उच्च, सुसंस्कृत... पण हे मापदंड मोजायचे कसे, हा प्रश्न

आहे आणि मग ती मंडळी जी भाषा बोलत असत ती भाषा पुन्हा म्हणजे ते ज्या घरामध्ये काम करत असत त्या घरातल्या लोकांची भाषा आणि या कामकरी मुलांची भाषा याच्यामध्ये स्वाभाविकच फरक पडत असे आणि मग ज्याला आपण प्रमाणबोली म्हणतो ती प्रमाणबोली म्हणजे शुद्ध आणि ती प्रमाणबोलीची प्रमाण भाषा काही प्रमाण असू शकते का? भाषाशास्त्रज्ञ असे सांगतात, म्हणजे भाषा विज्ञानाचे मी छोटे अभ्यासक्रम डेक्कन कॉलेजमध्ये केले आणि अशोक केळकरांच्या हाताखाली केले. त्या वेळेस एक महत्त्वाची भूमिका अशी आहे की, खरे तर भाषा ही एक मानवी संकल्पना आहे आणि बोली हे वास्तव आहे. प्रत्यक्षामधे माणसं बोलतात आणि ते जे बोलणं आहे ते प्रत्येकाचं स्वतंत्र असतं म्हणजे 'पिंडे पिंडे मतिर्भिन्नं, कुंडे कुंडे नवा जलम्' तशी प्रत्येकाची बोलीची पद्धती ही वेगळी-वेगळी असते. समान स्तरामधून येणाऱ्या लोकांची एकमेकांच्या जवळची असेल; परंतु वेगळ्या परिस्थितीतून येणाऱ्या लोकांची आणखीन वेगळ्या प्रकारची बोली असू शकते. म्हणजे शेतकऱ्याच्या घरातनं येणाऱ्या मुलाची वेगळी असू शकेल आणि ब्राह्मणाच्या घरातनं येणाऱ्या मुलाची वेगळी असू शकेल; पण बोली हे वास्तव आहे आणि प्रमाणबोली आणि प्रमाणभाषा याच्यातही अंतर आहे; कारण लिहीत असताना कसे लिहायचे, 'हे असे झाले' व्याकरण सांगतं आम्हाला मोरोपंत दामल्यांचं; परंतु बोलताना माणूस कसा बोलतो सहजच 'हे असं झालं' म्हणजे प्रमाणबोली आणि प्रमाणलेखन याच्यामध्येही एक अंतर असतं कळत-नकळत आणि म्हणून बोली हे वास्तव. मग भाषा ही मानवी संकल्पना जर असेल, तर बोली हे प्रत्यक्ष चलन असतं आणि ते चलनामध्ये जोपर्यंत आहे तोपर्यंत ते टिकत असतं. मग भाषा लिपीबद्ध होणे हा उद्योग त्या शिक्षणाच्या काळामध्ये सुरू झाला. लिहिता येणं आणि वाचता येणं आणि लिहिण्यासाठी लिपीबद्धता. लिपीबद्धता आली की काय होतं? बंदिस्ती येते भाषेला, बोलण्यामध्ये जी लवचीकता असते, ती लवचीकता लिहिण्यामध्ये नाहीशी होते; कारण प्रत्येकाची उच्चाराची पद्धती वेगळी असते. ही उच्चाराची पद्धती आपली उच्चार इंद्रिये आपण कशी वापरतो त्याच्यावर अवलंबून असते. म्हणजे एकाच घरामधल्या एकाच परिस्थितीमध्ये वाढलेल्या दोन व्यक्तींची उच्चारणाची शैली पूर्णपणे वेगळी असू शकते कारण आपले दात, ओठ, जीभ, श्वास हे कोण कसे वापरते त्याच्यावर ते अवलंबून असते आणि म्हणून बोली आणि भाषा यातले अंतर आपण समजून घ्यावे. लिपीबद्धता आली की, त्याचे लिहिण्यासाठी प्रमाणीकरण करणे सोपं जाते आणि म्हणून आपल्याकडे लेखन-वाचन म्हणजे लिहिता-वाचता येणं. म्हणजे शिक्षण ही मेकॉलेप्रणीत पद्धती ज्या वेळेला रूढ झाली त्या वेळेला अगदी तथाकथित मध्यमवर्गीय पुणेरी बोली जिला 'शुद्ध बोली' असे म्हटले जाते किंवा प्रमाणबोली असे म्हटले जाते तिला प्रमाणत्व कशामुळे आले, तर दोन-तीन गोष्टींमुळे आले. एक तर पुण्याला शेवटचे राज्यकर्ते होते, देशी राज्यकर्ते म्हणजे पेशवे. दुसरे शिक्षणाची सुरुवात पुण्यामध्ये झाली, मुंबईमध्ये शिक्षणाची सुरुवात झाली ती मिशनरी लोकांनी केली. मिशनरी लोकांच्या शाळा पहिल्यांदा तिथे निघाल्या, बेळगावला मिशनरी लोकांच्या शाळा निघाल्या म्हणून म्हटले की, बाबा पद्मनजी मिशनरी लोकांच्या शाळांमध्ये शिकले. आपले महात्मा जोतिबा फुले मिशनऱ्यांच्या शाळेमध्ये शिकले त्यामुळे देशी लोकांनी ज्या शाळा काढल्या, त्या एक तर संस्कृत शिकवणाऱ्या शाळा होत्या, तात्या पंतोजीची शाळा म्हणायचे त्याला, संस्कृत पाठशाळा. मी सांगलीमध्ये आल्यानंतर दीर्घकाळपर्यंत गणपतीच्या मंदिरामध्ये पाठशाळा होती. आजही कदाचित असण्याची शक्यता आहे की, जिथे फक्त संस्कृतमध्ये आणि विशिष्ट स्तरातल्या मुलांना शिक्षण दिले जाते. तर

लिपीबद्धता आली की, भाषेला ती बंदिस्ती येते. पुणेरी बोली ही मग प्रमाणबोली अशी मानली गेली आहे दीर्घकाळपर्यंत आणि असे म्हटले जाते की, पुण्याची माणसं जी आहेत ना ती सगळ्यात शुद्ध बोलतात. 'स्टँडर्ड डायलेक्ट' - डायलेक्ट, लँग्वेज नाही. ती स्टँडर्ड डायलेक्ट तिथले उच्चार हे प्रमाण उच्चार. लहानपणापासून मी पुण्यामध्ये मोठी झाले आणि पुण्यातली 'शुद्ध' मराठी ज्या प्रदेशामध्ये असते, म्हणजे भौगोलिक भागात ती शनिवार पेठ, नारायण पेठ आणि सदाशिव पेठ या तीनही ठिकाणची मराठी मी ऐकत आले आणि त्या ठिकाणी आधी जे राज्यकर्ते होते ते कोकणातून आलेले पेशवे. त्यांच्या जातीची मंडळी मोठ्या प्रमाणामध्ये पुण्यामध्ये होती आणि आजही आहेत आणि त्यामुळे 'ब्राह्मणीकरण, ब्राह्मणीकरण' असे ज्या वेळेला म्हटले जाते, तेव्हा प्रामुख्याने ब्राह्मणांचा हा वर्ग डोळ्यासमोर असतो आणि ती मंडळी जे काही बोलतात ते प्रमाण! त्या मंडळींचे शिक्षण असेल ते प्रमाण! त्या मंडळींचे ज्ञान असेल ते प्रमाण! असे मानले जाते आणि ते मी ऐकत आले, त्या वेळेस माझ्या असे लक्षात आले की, या सगळ्या मंडळींचे बोलणेसुद्धा एकसारखे नसते, म्हणजे मी ज्या वाड्यामध्ये राहत होते विद्यामंदिर सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांच्या वाड्यामध्ये तिथे अस्सल कोकणातून आलेलं एक बिऱ्हाड होतं आणि त्या कोकणातून आलेल्या बिऱ्हाडामध्ये त्या आजी वेगळ्या पद्धतीने बोलत होत्या, सून वेगळ्या पद्धतीने बोलत होती आणि मुलाने एक व्यवसाय काढलेला होता, तो दुकानात गेल्यावर तिथे वेगळ्या पद्धतीने बोलत होता कारण कोकणातून आलेली ती बोली तो जर दुकानात बोलायला लागला असता तर त्याच्याकडे गिऱ्हाईक आले नसते. पुण्यामधले सर्वसामान्य माणसांचे जे बोलणे होते त्या वेळचे ते त्याला आत्मसात करणे भाग होते. तेव्हा ती भाषा तुम्हाला जगण्यासाठी आवश्यक त्या गोष्टींवर अवलंबून असते की, तुम्ही कुठल्या प्रदेशात राहता, आणि तुमच्या गरजा काय आहेत, आणि त्या कुठे पूर्ण होतात, त्याच्यावर अवलंबून असतं. त्यामुळे जो लोकाचार असतो तो लोकाचार हा अधिक लवचीक असतो, ज्याला आपण लोकसंस्कृती म्हणतो. तिची ती लोकभाषा असते प्रमाण, व्यवहारामध्ये असलेली, ती जास्त लवचीक असते. ती बदलती असते आणि त्यामुळे समग्र लोकसंस्कृती ही लवचीक असते, स्वाभाविक असते आणि प्रवाही असते. म्हणजे ती बदलती असते, गरजेनुसार ती बदलत असते आणि अभिजनांची जी भाषा, प्रमाणभाषा ती लिपीबद्ध झाली की, तिला एक प्रकारची बंदिस्ती येते. द. ग. गोडसे हे लोकसंस्कृतीचे मोठे अभ्यासक. त्यांनी दोन फार चांगले शब्द वापरलेले आहेत की, लोकभाषा आणि लोकसंस्कृती ही 'गतिमानी' असते आणि ती ज्या वेळेला अभिजनतेकडे जाते, नागरीकरणाकडे जाते त्या वेळेस ती 'गणितमानी' होते. ती 'गणितमानी होते' म्हणजे बंदिस्त होते आणि मग ती सगळ्या पातळ्यांवर गणितमानी होते. त्याचे एक उदाहरण... त्याच काळामध्ये संगीत नाटके होत असत. सुरुवातीला संगीत नाटकांचे आपण वर्णन असे ऐकतो, किर्लोस्करांच्या काळामधले की, रात्र रात्र संगीत नाटकं चालायची आणि एखादं गाणं म्हणण्यामध्ये तो जर गायक रंगला, तर तो दोन-दोन तास एक गाणं म्हणायचा वगैरे, त्याला वन्समोअर मिळत राहायचे.

''मुंबईला ज्या वेळेला व्यावसायिक नाटके व्हायला लागली मुंबईला गिरण्या-कारखाने आले आणि कचेऱ्यांमधून लोकं कामं करायला लागली. कचेऱ्यांची वेळ सकाळी ९ ते ५ अशी ज्या वेळेला ठरली त्या वेळेला सकाळी ९ ला जर घराच्या बाहेर पडायचं असेल तर पहाटे पाचपर्यंत 'प्रिये पहा..' गाणं ऐकून घरी जाऊन झोपून पुन्हा ताजंतवानं होऊन कचेरीमध्ये जाऊन काम करणं हे अशक्य झालं. परिणाम असा झाला की, मुंबईला पोलिसांनी कायदा

केला की, रात्री १२ च्या पुढे नाटकाचा प्रयोग चालता उपयोगी नाही. हे कशामुळे झालेले आहे? हा लोकाचार जो आहे तो लोकाचार जसा गणितमानी होत जातो तसा जीवनाच्या सर्व अंगांवर त्याचा परिणाम होत असतो. त्याचा भाषेवर परिणाम होत असतो, जगण्यावर परिणाम होत असतो, सगळ्या यंत्रणेवर परिणाम होत असतो आणि मग आपल्याला असे दिसते की, मुंबईच्या भाषेचे चलन आणि पुण्याच्या भाषेचे चलन ह्याच्यामध्येही फरक पडलेला आहे. दुसरी गोष्ट अशी की, मुंबईमध्ये जो समाज होता तो निरनिराळ्या जाती-जमातींचा, संमिश्र समाज होता आणि तो अधिक संपन्न होता. पुण्यामध्ये तसे नव्हते. पुण्यामध्ये एका विशिष्ट स्तरातीलच लोक होते आणि ते ज्याला आपण धनवान म्हणू असे फक्त पेशवाईमधून आलेले सरदार जे होते ते फक्त धनवान सरदार होते. सरदार-दरकदार जे होते ते! (आणि बहुजन समाजामधून आलेले काही शिंदे-होळकरांच्यासारखे; पण) ते सुद्धा (उत्तरेकडेच) नंतर जाऊन राहिले मध्यप्रदेशामध्ये! तर सांगायचं तात्पर्य, तुमचं जगणं हे अनेक गोष्टींशी बांधलेलं असतं आणि त्याच्यातून ती भाषा घडत असते. तेव्हा लोकसंस्कृती ही गतिमानी असते. तिची एक गती असते, लवचीकता असते, आणि ती अनेक गोष्टींवर अवलंबून असते तुमच्या उपजीविकेच्या साधनांवर अवलंबून असते आणि अभिजनांची जी शैली असते ती गणितमानी असते. अमुक वाजता उठायचं, तमुक वाजता पूजा करायची, तमुक वाजता जेवण करायचं हे असं त्यांनी आपल्याला गणितामध्ये बांधून घेतलेलं असतं. इतर व्यावसायिकांना तसं चालतच असं नाही, ज्या वेळेला नोकरीपेशावर लोकांची अवलंबून राहण्याची वेळ आली त्या वेळेला मग ही गणितं सुरू झाली. शाळा सुरू झाल्या, महाविद्यालयं सुरू झाली, कचेऱ्या सुरू झाल्या, मग दुकानं अमुक वाजता उघडायची, दुकानं तमुक वाजता बंद करायची. आमच्या लहानपणी गावामधल्या वाण्याचं दुकान जवळ जवळ २४ तास उघडे असायचे, केव्हाही गेले तरी. त्याच वाण्याचं दुकान पुण्यामध्ये बुधवार पेठेमध्ये झाले त्या वेळेस त्याच्यावर वेळेची बंदिस्ती आली. तर छोटी छोटी उदाहरणं सांगते, जी मी अनुभवली ती की, गतिमानी आणि गणितमानी याच्यातला फरक. दुसरी गोष्ट, अभिजन म्हणजे उत्तम कूळ असलेली. आता उत्तम कूळ हे कोण ठरवणार? म्हणजे ब्राह्मणाचे कूळ ते तेवढे उत्तम कूळ का? जे मध्ययुगातले राज्यकर्ते होते ते सगळे सरंजामशाही राज्यकर्ते होते. मराठा राज्यकर्ते होते, धनगर राज्यकर्ते होते मोठ्या प्रमाणावर आणि ते स्वत: जास्त कुलीन होते, जास्त सुसंस्कृत होते म्हणजे मराठा घराण्यातल्या स्त्रिया आणि पुरुष यांचं जे वर्तन असेल, वागण्याची जी पद्धत असेल ही जास्त मर्यादित अशी होती. विशेषत: स्त्रियांच्या बाबतीमध्ये कोणत्या अर्थानं मर्यादित होती की, कोणाशी कसं बोलायचे, अदब कशी राखायची, तर मग ब्राह्मणांच्या स्त्रिया फक्त कुलीन स्त्रिया आणि मराठा स्त्रिया ह्या अकुलीन म्हणायच्या का? मराठा लोकांचे उलट म्हणणे असे की, आमच्या स्त्रिया जास्त कुलीन आहेत का तर त्यांच्या डोक्यावरच्या पदरातून त्यांचा केससुद्धा दिसत नाही. कुलीनतेच्या संकल्पना ह्या प्रत्येक स्तरामध्ये वेगळ्यावेगळ्या असतात. नऊवारी साडी नेसल्यानंतर पायाचा घोटासुद्धा दिसता उपयोगी नाही, अशा प्रकारे साडी नेसणे हे कुलीनतेचे लक्षण होते. मराठा कुळातल्या, म्हणजे शाहू महाराजांच्या कुळातल्या आणि त्यांच्या सरदारांच्या कुळातल्या बायकांच्याबाबतीमध्ये होते. तर अशा कुलीनत्वाच्या कल्पना ज्या आहेत त्या कल्पनासुद्धा बदलत्या असतात. जात-जमातीनुसार बदलत्या असतात. म्हणून 'उत्तम कुळं' म्हणजे काय, हे कुणी ठरवायचे? परंतु एक आमच्याकडे समज असा आहे की, ब्राह्मणाचं कूळ जे उत्तम कूळ! का? ते मनुस्मृतीनी सांगितलेलं आहे म्हणून. म्हणून ते सगळ्यामध्ये उत्तम

कूळ आणि अभिजाततेचे उच्चत्व, कुलीनत्व, सुसंस्कृतता ह्या सुसंस्कृततेचे निकषसुद्धा त्यांनी ठरवलेले आहेत. बाकीच्यांच्यावर ते लादले जाण्याची शक्यता आपल्याला दिसते. त्यामुळे इंग्रजोत्तर काळामध्ये जो ब्राह्मण वर्ग शिकायला लागला, नोकरी करायला लागला, शहरामध्ये स्थिरस्थावर व्हायला लागला, आर्थिकदृष्ट्या तो स्थिर झाला. त्यांनी जी काही जीवनशैली आपली निर्माण केली ती जीवनशैली समाजामध्ये आदर्श ठरली आणि आजही त्यालाच बरंचसं महत्त्व दिलं जातं आणि प्रत्येकाचे प्रयत्न मग तो मध्यमवर्गीय ब्राह्मणीकरणाचा प्रयत्न असतो. तो कुठपर्यंत असतो? तर बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला, जागृती केली, ते शिकले, त्यांना नोकऱ्या मिळायला लागल्या, ते आर्थिकदृष्ट्या सुस्थिर झाले, त्यांची घरंदारं बदलली, घरातले चलन बदलले आणि मग त्यांच्यावर टीका व्हायला सुरुवात झाली. त्यांच्यातल्याच एका वर्गानी सुरुवात केली की, हे ‘डीबी’ झाले. डीबी झाले म्हणजे ‘दलित ब्राह्मण’ झाले. आमचे विलास वाघ हे या परंपरेमधले एक फार मोठे विचारवंत आणि क्रांतिकारक प्रकाशक होते. ते दरवर्षी एक विशेष अंक काढत असत आणि एक वर्ष त्यांनी या ‘डीबी’ या विषयावर एक विशेष अंक काढलेला होता आणि काही प्रश्नावली दिलेली होती आणि त्या प्रश्नावलीमध्ये त्यांनी म्हटलेले होते की, ‘दलितांचं ब्राह्मणीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे, हे योग्य आहे की अयोग्य आहे?’ माझं म्हणणं असं आहे की, ‘ब्राह्मणीकरण होत आहे म्हणजे काय होत आहे नेमकं?’ तर ब्राह्मणांना त्याच्यामध्ये कदाचित बरं वाटत असेल की, ब्राह्मणीकरण होत आहे म्हणजे आपल्यासारखे जरा जास्तीतजास्त लोक होत आहेत. तर त्याला एक प्रतिष्ठा मिळते आहे आणि प्रतिष्ठा मिळणे म्हणजे समाजामध्ये जास्त सुस्थिर होणे, मोठेपणा मिळणे. ते आर्थिक सुस्थिरतेमुळे असे होते आणि जिथे जिथे जो वर्ग हा शासक वर्ग असतो आणि आर्थिक सुस्थिर झालेला वर्ग असतो त्याचे अनुकरण बाकीचे आपोआप करत असतात. हे आपल्याला आजतागायत जागतिक पातळीवर समाज जातो त्या वेळेस कळते म्हणजे भारतामध्येसुद्धा इंग्रज लोक आले, मिशनरी लोक आले आणि मिशनऱ्यांच्याकडे ज्या वेळेला आमचे खानसामे नोकर म्हणून राहायला लागले. त्यांचे घोडे सांभाळणारे मदतदार म्हणून राहायला लागले त्या वेळेला त्या मिशनरी लोकांच्या, ख्रिश्चन लोकांचे अनुकरण ही मंडळी करायला लागली, म्हणजे काय? टेबलावर जेवायचं, काट्या चमच्यानं जेवायचं, त्यांची मड्डम जशी कपडे घालते तशी आपलीही कपडे घालायची, कारण ही मड्डम त्यांचे जुने कपडे द्यायची, त्या बाळाचे कपडे द्यायची.

‘‘दलितांचे ब्राह्मणीकरण होण्याची जी पद्धती आहे ते ब्राह्मणीकरण नसतं नुसतं, तर आपल्यापेक्षा जे उच्च आहेत त्यांचे अनुकरण करणे. मग आमची जी ब्राह्मण मंडळी होती ती ब्राह्मण मंडळीसुद्धा साहेबाची नोकर ज्या वेळेला झाली, इंग्रज ऑफिसर ज्या वेळेला आले ते मग कलेक्टर असतील, गव्हर्नर असतील आणखीन कोणी असतील आणि त्यांच्या हाताखाली काम करणारी जी ब्राह्मण मंडळी होती, ती साहेबाचं अनुकरण करायला लागली त्यामुळे आमच्या सगळ्यांच्या घरामध्ये खाली बसून स्वयंपाक करायचे कट्टे नाहीसे झाले आणि उभ्यानी स्वयंपाक करायचे कट्टे सगळीकडे आले. खाली बसून पाट मांडून जेवण्याची पद्धती नाहीशी झाली आणि टेबलावर बसून जेवणाची पद्धती ही सुरू झाली, ही कशामुळे झाली? तर या ब्राह्मणांचे ‘साहेबीकरण’ झाले असे मी म्हणते आणि आमच्या देशातून जसजसा साहेब गेला तसतसे या देशातल्या लोकांचे जास्त साहेबीकरण होतंय की काय; असा माझ्यापुढे आज प्रश्न पडतो आहे; कारण गेल्या दोनशे वर्षांपूर्वीचे आता आमच्या घरातसुद्धा काय राहिले आहे? स्वयंपाकघर ते शौचालयापर्यंत

आणि अंगावरच्या सर्व कपड्यांपासून ते बैठकीपर्यंत! सर्वांचे साहेबीकरण झाले आहे. आमच्याकडे आजसुद्धा आमची बरीच मुलं परदेशामध्ये जातात आणि परदेशामध्ये गेल्यानंतर तिथल्या जीवनशैलीचं ते अनुकरण करतात; कारण त्यात एक प्रतिष्ठा आहे. त्यांना त्यांच्यामध्ये जर मिळून मिसळून राहायचं असेल आणि प्रतिष्ठा मिळवायची असेल, तर त्यांचे अनुकरण करायला पाहिजे त्यामुळे नेहमी आपल्यापेक्षा ज्याला प्रतिष्ठा मिळते आहे त्याचे अनुकरण करण्याकडे एक ओढा असतो. तर हे प्रमाणभाषेच्या बाबतीतच होत असतं असे नाही तर 'प्रमाण' राहणीमानाकडे जायला लागते आणि मग हे राहणीमान सर्व पातळ्यांवर येत असते. म्हणून लोकसंस्कृती आणि अभिजन संस्कृती यांच्यातल्या सीमारेषा पुसट व्हायला लागतात बऱ्याच वेळेला. मग ग्रामीण भागातली मंडळी शहरीकरणाकडे जायला लागतात, त्यांचे अनुकरण करायला लागत असतात. ब्राह्मणी मध्यम वर्ग आणि राजघराणी, सरंजामशाही राजघराणी यांच्यामध्ये जे मधल्या काळामध्ये जे द्वंद्व सुरू झाले त्या वेळेस उच्च कुलीन नेमकं कोण? अशा प्रकारचे प्रश्न निर्माण व्हायला लागलेले आहेत. मग अभिजन प्रमाण लेखन आणि प्रमाणबोली यातला फरक जो होता तो ही सांगितला आणि म्हणून प्रमाणबोलीबद्दल आणि प्रमाणभाषेबद्दल एकच एक अशा प्रकारचं विधान करता येणं हे जवळजवळ अशक्य आहे असं वाटतं. जितक्या बोली जास्त तितकी प्रमाणभाषाही जास्त समृद्ध होत असते आणि म्हणून बोलीचे चलन मराठीमध्ये मोठ्या प्रमाणावर सतत चालूच राहते. प्रमाण बोली कितीही 'प्रमाण बोली' म्हणायचं म्हटलं तरीही ती प्रमाण बोली राहत नाही आणि मराठीमध्ये किंवा जगाच्या पाठीवरच्या कुठल्याही भाषेमध्ये 'बोली' या मोठ्या प्रमाणावर असतात. तशा मराठीमध्ये मोठ्या प्रमाणावर बोली आहेत. आता कालपरवाच एका मुलाने निरनिराळ्या बोलींमधला एक कथासंग्रह निर्माण केला. 'निरनिराळ्या बोली' आणि मग मराठीमध्ये किती बोली असाव्यात? तीस-पस्तीस बोलींमधल्या निरनिराळ्या कथा त्याने शोधून काढल्या आणि त्या मराठीच्या बोली आहेत. म्हणजे थोडासा प्रयत्न केला तर आपल्याला त्या सगळ्या समजू शकतात. त्याच्यामुळे बोलीमुळे प्रमाण मराठी भ्रष्ट होते का, असा एक प्रश्न निर्माण होतो, की ज्या वेळेला बहुजन समाजातली माणसं निरनिराळ्या क्षेत्रात यायला लागली विशेषत: शिक्षणाच्या क्षेत्रात, राजकारणाच्या क्षेत्रांत यायला लागली त्या वेळेला मध्यवर्ती पुणेरी बोलीवाल्या मंडळींना अस्वस्थता वाटायला लागली आणि ती अस्वस्थता कशासाठी वाटायला लागली की, त्यामुळे मराठी भाषा भ्रष्ट होते आहे! कारण आता ही बहुजन समाजातली माणसं ही शिक्षणाच्या क्षेत्रात येत आहेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे. आजही ती तक्रार आहे बऱ्याच लोकांची किंवा ही निरनिराळी मंडळी डॉक्टर होत आहेत, वकील होत आहेत त्यामुळे त्याचा दर्जा खालावतो आहे. जणू काही जोपर्यंत उच्चवर्णीयांमधलीच माणसं शिकत होती तोपर्यंत दर्जा हा फार उच्च होता असं लोक समजत होते की काय, असा माझ्यापुढे प्रश्न पडतो. ज्या वेळेला जुनं साहित्य आपण बारकाईने वाचू त्या वेळेस असे लक्षात येते की, शिक्षणाच्या क्षेत्रात काय किंवा इतर क्षेत्रात काय, आज जसे 'पाट्या टाकणारे' लोकं आहेत, तसेच त्या काळातही उच्चवर्णीय होते. नुसते पाट्या टाकणारे नाही; परंतु ते स्वत: विद्वान असतील; परंतु विद्यार्थ्यांना त्यांचे बोलणे कळत असेलच, त्यांचं शिकवणं कळत असेलच असे नाही. फार मोठं उदाहरण देते, धाडस करून देते, कारण त्याचं लेखन झालेलं आहे. पुण्याला हरी नारायण आपटे ज्यांनी कादंबऱ्या लिहिल्या आणि त्या सुधारणावादी कादंबऱ्या म्हणून प्रसिद्ध आहेत. या कादंबऱ्यांचे जे लेखक, हरी नारायण आपटे हे पुण्याच्या न्यू इंग्लिश

**विशिष्ट मंत्र तंत्र आणि देवदेवता म्हणजे संस्कृती असत नाही. माणसाची जगण्याची जी रीत आहे आणि जगण्यासाठी आवश्यक असलेली जी सर्व साधनं, ती मिळून संस्कृती होते. लोकसाहित्याची व्याख्या आपण पाहिली तर 'साहित्य', साहित्य म्हणजे साधनं!**

स्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून शिकत होते. सुरुवातीला ही शाळा ध्येयवादी मंडळींनी काढली हे आपल्याला माहिती आहे. टिळक-आगरकरांनी काढलेली ही शाळा आहे, नावं खूप मोठी आहेत, ते आपआपल्या क्षेत्रामध्ये विद्वान असलेले लोक आहेत; परंतु हरी नारायणांनी त्या काळामध्ये लिहिलेलं आहे, 'टिळक वर्गात आम्हाला गणित शिकवत असत; पण ते काय शिकवत असत हे आम्हाला कधीही कळले नाही; कारण ते वर्गात यायचे, विद्यार्थ्यांच्याकडे पाठ करायचे, फळ्याकडे तोंड करायचे आणि भराभरा भराभरा तोंडाने काहीतरी आकडेमोड करत राहायचे आणि आमच्याकडे न बोलता निघून जायचे.' हे हरी नारायण आपट्यांनी नोंदविलेले आहे. म्हणजे शिक्षक विद्वान जरी असला तरी शिकवणं ही एक वेगळी कला असते आणि इतर गोष्टी वेगळ्या असतात.

''वि. का. राजवाडे यांच्यासारखा विद्यार्थी, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे जे इतिहासाचार्य म्हणून आले. त्यांनी त्यांच्या वेळच्या महाविद्यालयातल्या, डेक्कन कॉलेजचे ते विद्यार्थी तिथे त्यांनी वर्णन लिहून ठेवलेले आहे की, तिथे आम्हाला जे देशी शिक्षक शिकवत होते, कुठल्याही विषयाचे त्यांचं शिकवणे आम्हाला काही कळत नव्हते; पण युरोपियन मंडळी आम्हाला शिकवत होती, ती अतिशय उत्तम तयारी करून येऊन आम्हाला शिकवत होती. आता त्या वेळेला डेक्कन कॉलेजमध्ये शिकवणारे शिक्षक तर सगळे उच्चवर्णीयच असणार, महाविद्यालयातले किंवा न्यू इंग्लिश स्कूलमधले. सांगायचं तात्पर्य की, अमुक जातीचेच शिक्षक आले किंवा अमुक जातीचेच लोक आले की, दर्जा खालावतो असे नाहीये. त्या त्या क्षेत्रामध्ये वेगळी वेगळी गुणवत्ता लागते आणि ती गुणवत्ता असेल, तर तो दर्जा टिकत असतो हे आपल्याला आजही दिसते; कारण ग्रामीण भागामध्ये अनेक दलित शिक्षकांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे कल्याण झालेले आपल्याला आजही विद्यार्थी सांगतात. आदिवासी भागांमधले शिक्षक आजही आदर्श शिक्षक म्हणून तिथे काम करताना दिसतात. त्यामुळे भाषेमुळे किंवा इतर जाती-जमातींच्या लोकांना जी अभिजात भाषा येत नाही म्हणून काहीतरी नुकसान होत आहे, ही जर संकल्पना मध्यमवर्गीयांच्या मनामध्ये असेल, तर ती चुकीची आहे. डॉक्टरच्या बाबतीतही तसेच किंवा इतर कुठल्याही पेशाच्या बाबतीमध्ये तसेच आहे. शेवटी हा नैतिकतेचा प्रश्न असतो. एक डॉक्टर नीतिमान असणे आणि अनीतिमान असणे हे जुन्या काळामध्येही होत होते आणि नव्या काळामध्येही होत असणार. त्यामुळे इंग्रजोत्तर काळातील मध्यमवर्गाच्या मनाने काही अपसमज निर्माण केलेले आहेत. त्या अपसमजातून आपण बाहेर यावं, त्याशिवाय आपल्याला या प्रमाण लेखनाचासुद्धा नीटसा उलगडा होईल. असे वाटत नाही.

''आणखी एक महत्त्वाची गोष्ट, लोकपरंपरा आणि अभिजन परंपरा यांच्याबाबतीमध्ये की, लोकपरंपरा ही बहुजन समाजाची, ही काहीतरी अडाणी लोकांची, असा एक सर्वमान्य जो समज आहे, तर आपण पाहिले की, लोकसाहित्य या शब्दासाठी जे निरनिराळे पर्यायी शब्द वापरलेले आहेत ते दुर्गाबाई भागवतांनी फोकलोअरसाठी 'लोकसाहित्य' हा शब्द रूढ केला, बाकीच्यांनी निरनिराळे शब्द वापरले होते. त्या गोमंतकामध्ये जो एक शब्द वापरला जातो तो मला मोठा अन्वर्थक वाटतो.

लोकसाहित्याला तिथे 'लोकवेद' असे म्हटलेले आहे. आमच्या सरोजिनीबाई बाबरांनी ज्या स्त्रियांच्या ओव्यांचा संग्रह केलेला आहे त्याच्यासाठी त्यांनी नाव दिलेले आहे 'जन लोकांचा सामवेद' वेद म्हणजे ज्ञान. वेद म्हटले की, आम्हाला फक्त ब्राह्मणी परंपरेतले चार वेद आठवतात आणि सगळं ज्ञान जे काही असेल, विद्वत्ता जी काही असेल ती त्या वेदांच्यामध्ये आहे. परत मला माझा अनुभव असा सांगावासा वाटतो की, या वेदांच्या बाबतीमध्येसुद्धा मी लहानपणी ज्यांच्या सहवासामध्ये लहानाची मोठी झाले आणि ज्यांचा मला चांगला सहवास मिळाला ते विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, ज्यांनी चारही वेदांची भाषांतरे केलेली आहेत, तर त्यांनी अथर्व वेदाच्या प्रस्तावनेमध्ये म्हटलेले आहे की, 'अथर्व वेद हे जगाच्या पाठीवरचं पहिलं लोकसाहित्य आहे.' याला त्यांनी असं का म्हटलं? तर अथर्व वेदामध्ये ज्याला आपण लोकपरंपरेमधले तोडगे, शुभाशुभ कल्पना, उतारे पातारे हे जे सगळं असतं तर ते सगळं त्या वेदामध्ये आहे, अथर्व वेदामध्ये आणि ते जणू काही लोकपरंपरेमधूनच आलेले आहे. हल्ली काळी जादू किंवा ब्लॅक मॅजिक म्हटलं जातं. खरं म्हणजे शुभ-अशुभ कल्पना, तोडगे हे जगाच्या पाठीवरचे सगळे लोक आचरणात आणत असतात आणि या शुभ-अशुभ कल्पना सर्वत्र असतात. 'काळी जादू'सुद्धा. मी गंमत म्हणून सांगते फक्त की, युरोपमध्ये म्हणजे इंग्लंडमध्ये १३ हा आकडा अशुभ मानला जातो. आता गंमत अशी होते की, एका ठिकाणी जी शुभ किंवा अशुभाची कल्पना असेल तिचा प्रसार नकळत सगळीकडे होतो. तेव्हा युरोपमध्ये म्हणजे इंग्लंडमध्ये १३ हा आकडा अशुभ मानला जातो, त्याचे अनुकरण अनेक जण करीत आले. मी ज्या वेळेला इंग्लंडमध्ये गेले आणि हिथ्रोच्या विमानतळावर उतरले तेव्हा मी कुठेतरी वाचलेलं होतं की, तिथे १३ नंबरचं विमानाचं डेकच नाहीये तिथे आणि मग मी सबंध तो विमानतळ हिंडून पाहिला आणि खरोखरच १३ नंबर नाहीये तिथे. हा आता सगळ्यात प्रगत झालेला देश असं आपण म्हणतो, ज्या इंग्लंडचं आपण अनुकरण करत आलो, त्या देशामध्येसुद्धा या शुभ-अशुभ कल्पना आजपर्यंत असतील तर आपण काय करायचं? तर त्यामुळे त्या जगाच्या पाठीवर सगळीकडे असतात आणि अथर्ववेदाला जर 'लोकवेद' असं म्हटलेलं असलं चित्राव शास्त्रींनी तर ते सगळीकडेच आहे. मग ते तोडगे वगैरे फक्त अथर्ववेदामध्ये नाहीये, तर बाकीच्या वेदांमध्येसुद्धा अशा प्रकारचे तोडगे खूप मोठ्या प्रमाणावर आहेत आणि त्याची मी दोन चार उदाहरणं निरनिराळ्या लेखांमधून दिलेली आहेत. 'लोकसाहित्याच्या पाऊलखुणा' याच्यामध्ये एक उदाहरण त्याचं खूप मोठं दिलेलं आहे की, सवतीबद्दलचा आकस ऋग्वेदामध्ये आहे, अथर्ववेदामध्ये तीच ऋचा आहे परत. म्हणजे एका वेदामध्ये जी ऋचा असेल ती दुसऱ्या वेदामध्ये पुनरूपात होताना आपल्याला अनेकदा दिसते. ऋचा काय आहे ती, तर 'सपत्नीनाशन सूक्त' ही ती ऋचा! 'सवतीचं वाटोळं होऊ दे.' अशा प्रकारचा मंत्र. ऋचा म्हणजे मंत्र. आता अशा प्रकारे सवतीबद्दलचा आकस हे तुमच्या-माझ्या लोकपरंपरेमधून सारखंच चाललेलं असतं. 'सवतीचं भांडण आणि राळ्याचं कांडण संपता संपत नाही' अशा प्रकारच्या म्हणी पण असतात तिथे. आता हे एका वेदामध्ये एक ऋचा म्हणून त्या ऋषीला का घालावंसं वाटलं, असा माझ्यापुढे प्रश्न आला कारण एकीकडे आपण म्हणतो की, वेद काळामध्ये स्त्रियांना फार मोठे स्वातंत्र्य होते. हा आपला समज आहे, उच्चकुलीनांचा आणि जर तिथे एवढे स्त्रियांना स्वातंत्र्य असेल आणि स्त्रियांना जर एवढा सन्मान असेल तर मग तिथे सवतीची कल्पना कशी आली? आणि ज्या समाजामध्ये सवत ही प्रथा चालू आहे तिथे स्त्रियांना सन्मान आहे असे म्हणायचे का, असे प्रश्न निर्माण होतात. असे प्रश्न आंधळेपणाने त्या परंपरेचा अभ्यास

करणाऱ्यांच्या मनामध्ये येत नाहीत आणि बरं हे तिथेच होऊन थांबते का? मी जे सातत्याने म्हणतीये की, 'अभिजन ते लोक' हा एक सरळ प्रवाह आहे. अभिजनांमध्ये ज्या धारणा आहेत, त्या तुमच्या-माझ्यामध्ये आजतागायत सरळ चाललेल्या आपल्याला दिसतात.

''बंगालमध्ये आशापूर्णादेवी नावाच्या एक मोठ्या कादंबरीकार होऊन गेल्या. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे. त्या आशापूर्णादेवींची 'प्रथमप्रतिश्रुती' नावाची गाजलेली कादंबरी आहे. त्या प्रथमप्रतिश्रुतीमधली जी नायिका आहे, ती एक छोटी मुलगी आहे आणि अत्यंत निरागसपणाने ती सगळी वर्णनं करते आहे. ती तिच्या सासरी जाते आहे आणि सासरची वर्णनं करते आहे. सासरी गेल्यानंतर तिला एक व्रत करावं लागतं. सगळ्या बायका करतात, त्या नवरी मुलीलाही ते व्रत करावं लागत. आपल्याकडे कसं मंगळागौरी आहे, हरतालिका करतात तसे ते करावे लागते. मग ते व्रत काय आहे? तर त्या व्रताला विशिष्ट नाव आहे. 'सेंजुती व्रत' त्याचं नाव आहे. तर ते व्रत करावे लागते आणि ते व्रत करता करता एक मंत्र म्हणावा लागतो, ते व्रत म्हणजे असे की रांगोळी काढायची, त्या रांगोळीमध्ये घरातल्या सगळ्या बायकांच्या वस्तू ज्या स्वयंपाक घरामध्ये लागतात. चूल असेल, उलथनं असेल, पळी असेल, झारा असेल, तवा असेल, ताटल्या असतील, तर त्या रांगोळींनी मुली काढतात आणि मग त्याच्या प्रत्येकाच्या पाठीमागे तिथल्या बोलीभाषेतले मंत्र म्हणतात. आता बोलीभाषेतले मंत्र म्हणजे काय? 'पळी पळी पळी, बसू दे सवतीची दातखिळी,' असले ते मंत्र आणि हे सेंजुती व्रत त्याला नाव आहे. त्या सेंजुती व्रतामध्ये अशी एक एक वस्तू रांगोळीने काढायची आणि त्या बोलीभाषेमधून त्या सवतीला एक शिवी घालायची आणि तिचं वाटोळं होऊदेत अशा प्रकारची इच्छा व्यक्त करायची. आता ती छोटी मुलगी आहे तिच्या असं लक्षात येतं की, त्या घरामध्ये तिचा एक दीर आहे आणि त्या दिराचं त्या सासऱ्यांनी पहिली बायको असताना दुसरं लग्न लावून दिलेलं आहे, आणि मग ती छोटी मुलगी विचारते, 'मग त्या पहिल्या वहिनीला काय वाटत असेल? तिनेपण दुसऱ्या वहिनीला अशाच शिव्या घालायच्या का?' ज्याला आपण 'स्त्रीवाद' म्हणू हा कसा हळूच आलेला आहे तिथे बघा. त्या सेंजुती व्रतामध्ये अशा प्रकारचं मग तिचं वाटोळं कसं होऊ दे, तिला गर्भ कसा न राहू दे, त्या गर्भाचं कसं वाटोळं होऊ दे हे त्या संस्कृत मंत्रात आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी त्यांनी कादंबरी लिहिली त्या वेळेस ते व्रत चालू होते. आता त्याच्या पुढचा टप्पा आमच्या जात्यावर दळण दळणाऱ्या बायका. या जात्यावर दळण दळणाऱ्या बायका ह्या सवतीच्या नावानी खडे फोडताना त्या ओव्यांमधून दिसतात आणि सवतीवर लेक देणारा बाप, नवरा, भाऊ या सगळ्यांना त्या दूषणं देताना दिसतात. म्हणजे एकीकडे वेदामधली ती ऋचा आणि दुसरीकडे लोकपरंपरेमधले हे व्रत, तिसरीकडे जात्यावर ओव्या म्हणणाऱ्या या बायका आणि चौथीकडे प्रत्यक्षात तुमचा माझा अनुभव. जरी द्विभार्या प्रतिबंधक कायदा झाला आणि काहीही झाले तरी कित्येक बायकांच्या पाठीमागची ही भीती संपलेली आहे का? नाही संपलेली अजून कारण, कुठल्याही क्षणी तो नवरा आपल्यावर दुसरी कोणीतरी सखी, मैत्रीण सवत आणू शकेल, अशी एक सुप्त भीती त्या बाईच्या मनामध्ये असू शकते.

''आदिम ते आद्यतन्' हा जो परंपरेतला प्रवाह आहे, बऱ्या वाईट सगळ्या गोष्टींचा शोध घेणं हा एक माझा उद्योग आहे आणि तो आपल्याला अनेकांना करता येतो आणि अनेकांनी तो केलेला आहे. हे करत असताना सबंध सामाजिकतेच्या पातळीवर आपल्याला असे दिसते की, अनेक देवदेवतांच्या बाबतीमध्ये या बहुजनांच्या देवता, या 'खालच्या

लोकांच्या' देवता, या उच्चवर्णीयांच्या देवता वगैरे वगैरे म्हणतात... आता काय आहे की, दर खेपेला असे असतंच असे नाही. उदा. खंडोबासारखा देव किंवा रेणुकेसारखी देवी हे कुळाचे मूळ, कुळदेव हे भटक्या जातींपासून उच्च जातींपर्यंत; पण हे सर्वच कुळदेवतांबाबत नसते. पुष्कळदा काय होते की, सर्वसामान्य माणसांच्या ज्या देवता आहेत, त्या देवता अतिशय लोकप्रिय असू शकतात. नुसत्या लोकप्रिय असतात असे नाही, त्यांच्या जत्रा यात्रा मोठ्या प्रमाणावर भरतात. जत्रा-यात्रा मोठ्या प्रमाणावर भरल्या की काय होते की, त्या देवतास्थानांना उत्पन्न मोठ्या प्रमाणावर मिळायला लागतं. मग अशा वेळेला पहिल्यांदा जो उच्चवर्णीय समाज असतो तो उच्चवर्णीय समाज त्या देवतेला पहिल्यांदा हिणकस मानायचा प्रयत्न करतो, की ती कशी टाकाऊ आहे, ती शुद्र लोकांची देवता आहे, तरीसुद्धा लोकांमधून तिची लोकप्रियता कमी होत नाही. मग काय करायचं, तर आपण त्याच्यात शिरायचं, आणि मग आपणही त्या देवतेची उपासना करायला लागायचं, त्या देवतेला उचलून धरायला लागायचे, त्याला 'उन्नयन प्रकिया' असे म्हटलेले आहे. एम. एन. श्रीनिवासन नावाचे एक समाजशास्त्रज्ञ होते, त्यांनी म्हटलेले आहे की, 'भारतामध्ये ही प्रक्रिया अखंड चालत आलेली आहे आणि ती संस्कृतीच्या सर्व अंगांत चालत आलेली आहे.' म्हणजे एखादी चाल, रीत, रूढी या सगळ्यांच्या बाबतीमध्ये पहिल्यांदा तिला हिणकस मानायचा प्रयत्न करायचा, उच्छेद करायचा प्रयत्न करायचा आणि उच्छेद होत नाही म्हटले की, तिला उचलून धरायचे आणि तिचा स्वीकार करायचा... तिचा स्वीकार केला की काय होते, त्याच्या उपासनेमध्ये आपल्याला शिरता येते आणि त्या उपासकांमधले जे महत्त्वाचे स्थान आहे ते उच्चवर्णीयांना पटकावता येते. असे कितीतरी मंदिरांच्या बाबतीत आणि देवतांच्या बाबतीत आपण बारकाईने अभ्यास केला, तर आपल्याला दिसते.

''एक खूप मोठं उदाहरण आपल्या सगळ्यांना माहिती असेल की, 'गणपती ही देवता' ही मुळामधली आदिम समाजामधली उग्र देवता. मुळात गणपती विघ्नकारक आहे, त्याला 'विघ्नहारक' केला आणि हिंसक देवता म्हणून त्या गणपतीला सगळं लाल रंगाचं लागतं, अशी आपण आता स्तोत्र-बित्र रचलेली आहेत आणि त्याच्यामध्ये म्हणतो की, 'रक्तवर्णम् सुपुजितं, रक्तपुष्पेन सुपुजितं' मग त्याला शेंदूर लावायचा, त्याला लाल रंगाचं जास्वंदीचं फूल पाहिजे. आता त्या देवाला अमक्या रंगाचं फूल पाहिजे हे कोणी ठरवलं? कोणाला पांढऱ्या रंगाचं फूल पाहिजे-शंकराला पांढऱ्या रंगाचं फूल पाहिजे, गणपतीला लाल रंगाचं फूल पाहिजे, तर हे ठरवलं कुणी? जो माणूस त्याचा उपासक असतो तो उपासक ठरवत असतो त्याचं काय करायचं ते आणि मग ही गणपती ही देवता ही आदिम, उग्र जनांची देवता, ती रक्तपिपासू देवता खरं सांगायचं म्हणजे. लढाई करताना एक दात त्याचा तुटलेला आहे म्हणून त्याला 'एकदंतम् चर्तुहस्तं, पाशमंम कुशधारणम् वरदं हस्तं' मग त्याची ती स्तोत्र-बित्र वगैरे ते सगळे तयार होतात, त्याची वर्णनं तयार होतात, त्याचं उदात्तीकरण व्हायला लागते. याचं संपूर्ण विश्लेषण 'लोकायत' नावाच्या ग्रंथामध्ये देवीप्रसाद चटोपाध्याय यांनी पहिल्यांदा केलेले आहे. केवळ गणपतीचेच नव्हे तर एकूणच सबंध संस्कृतीमध्ये जे सर्वसामान्य किंवा आदिम जनांचे असते, ते अभिजन लोक हळू हळू हळू उसनवारी करतात, उचलतात, त्याचे उदात्तीकरण करतात, खऱ्या अर्थाने ते लुबाडतात आणि त्याच्यावर आपले आधिपत्य गाजवायला सुरुवात करतात. तसा हा गणपती, तो खरं म्हणजे विनायक. आता विनायकची व्युत्पत्ती आपण विघ्ननाशक अशी करतो, तर त्याची व्युत्पत्ती त्यांनी सांगितली आहे, 'विपरीतनायक' की तो विपरीत करणारा आहे. तर

त्याला जो विनाशक आहे विघ्नकारक आहे त्याला विघ्नहारक केला. या देवीप्रसाद चटोपाध्याय यांच्या पुस्तकाचे एक सुलभ असे मराठीकरण स. रा. गाडगीळांनी 'लोकायत' याच नावाने केलेले आहे आणि त्याच्यात ही सगळी वर्णने केलेली आहेत. तेव्हा सबंध संस्कृतीमध्ये अभिजन मंडळी ही लोकपरंपरेतल्या अनेक गोष्टी उचलतात. त्या देवता उचलतात, भाषा उचलतात, पोशाख उचलतात, चालीरीती उचलतात, दागिने उचलतात... काय उचलत नाहीत? आणि मग त्याला एक प्रतिष्ठेचं स्थान देत असतात. याची कितीतरी उदाहरणे आपल्याला सांगता येतील.

''माझ्या अनुभवातले एक छोटसं उदाहरण सांगते. आमच्या कुळदेवतेसंबंधी आमच्या आईने सांगितले होते की, आपली कुळदेवता फिरंगाई नावाची देवी आहे. आता ही फिरंगाई देवी आली कुठून, नावसुद्धा बघा हा तिचं, फिरंगाई. ती दौंडच्या जवळ कुरकुम नावाच्या गावामध्ये ती फिरंगाई देवी आहे. तर मग आमच्या भावाचं लग्न झाल्यानंतर ती म्हणाली की, 'तू त्यांच्याबरोबर जा. त्यांना काही कळत नाही.' आता मला तरी कुठे माहीत होतं ते फिरंगाई देवी वगैरे. आम्ही आपले गेलो दौंडला आणि मग तिथल्या कुरकुमला गेलो. मला भटांनी दाखवलं, एक खूप मोठं मंदिर पेशवाई पद्धतीचे, दगडी बांधकाम केलेले, छानसं सजवलेलं आणि तिथे देवीची अतिशय चांगली मूर्ती, बाजूला शंकराचं देऊळ. ह्या देवीचीपण मूर्ती त्या ठिकाणी होती. ती मूर्ती पाहिली आणि मी म्हटले, ही जर लोकदेवता आहे कारण, आमची अक्कल हे दुसरं काहीतरी वाचून तिकडे धावणारी. मी म्हटले, 'एवढी सुबक मूर्ती आणि एवढे सुंदर देऊळ हे लोकदेवतेचं कसं? कारण लोकदेवता म्हणजे स्त्री देवता विशेषत: या अनघड तांदळ्याच्या स्वरूपामध्ये असतात. म्हणजे ओबडधोबड अशा प्रकारचा तो दगड असतो आणि मग त्याला नाक, डोळे वगैरे असं, काहीतरी अलंकार वगैरे सजवलेले असते माणसांनी आपल्या कल्पनेप्रमाणे आणि हा अनघड तांदळा कुठल्यातरी देवळीमध्ये ठेवलेला असतो.' त्याचे उपासक हे सहसा ब्राह्मण नसतात. जातीपातींची जी कोंडाळी आहेत आपल्याकडे ती फार मोठी विचित्र आहेत. त्यामुळे मी ते चौकशी केली की, ही मूर्ती पहिल्यापासूनची आहे का? अमुक आहे का, तमुक आहे का? कारण शंकराचा पुजारी गुरव, त्या देवीचा पुजारी एक ब्राह्मण होता. मी म्हटलं हा गुरव आहे, इकडे हा ब्राह्मण आहे हे दोघे जण एकत्र कसे काय नांदतात? तर मी म्हटले, 'या देवीचे मूळ ठाणं दुसरीकडे कुठे आहे का?' मग त्यांनी मला सांगितलं, ती एक बाई होती, ती म्हटली, 'आहे ना! त्या टेकडावर आहे.' मग भावाला म्हटलं 'चल.' ते कोणी यायला तयार नाही, म्हणे 'आता झाले देवीचे दर्शन.' म्हटलं 'तुम्ही करा मी जाते,' मी त्या टेकडीवर गेले. त्या टेकडीवर एक घुमटी होती आणि त्या घुमटीच्या आत एक अनघड तांदळा होता आणि तिथे एक बाई बसलेली होती. ती श्रमकरी वर्गातली बाई होती, तिच्या पोशाखा बिशाखावरनं आणि तिला मी म्हटले की, 'हे काय आहे?' ती म्हणाली, 'हीच न्हवं का फिरंगाई! हे मूळ ठाणं आहे आणि ते बामणांनी पळवलेलं ठाणं आहे.' मग म्हटलं, 'तुम्ही कोण आहात आजी?' 'मी मातंगी नाही कागं आवशे.' तिला काय आपली जात पात सांगायला काही शरम वाटली नाही. ती म्हटली, 'मी मातंग समाजाची बाई आहे आणि मुळामध्ये ही आमची देवी आहे आणि ती बामणांनी तिथं पळवली आणि तिथं त्याला बक्कळ पैशे मिळायला लागले आणि आता इथे या देवीच्या दर्शनाला कुणीच येत नाही, तुमच्यासारखीच अशी एखादी बाई येते नाहीतर कोणी येत नाही. एखाद्या देवतेचं उदात्तीकरण करून ती देवता आणि तिच्या उत्पन्नाची स्थानं ही आपल्या स्वाधीन करून घेणे, हा एक संस्कृतीच्या प्रवासातला मोठा टप्पा आहे आणि

‘लोकायत’मध्ये तो देवीप्रसाद चटोपाध्यायांनी आणि स. रा. गाडगीळांनी खूप विस्ताराने मांडलेला आहे. त्यातला एक माझा छोटासा अनुभव फक्त सांगते की, या लोकमंदिरांचे मग जीर्णोद्धार होतात. कोकणामध्ये अशा आपल्याला बऱ्याच देवता दिसतील की, ज्या ओबडधोबड होत्या एकेकाळच्या आणि मग त्यांचे जीर्णोद्धार केलेले आहेत आणि ते जीर्णोद्धार करताना त्या मंदिरातलं मंदिरपण पूर्ण नाहीसे होऊन माझ्या भाषेमध्ये त्याच्या ‘बाथरुमा’ बनवलेल्या आहेत म्हणजे टाईल्स वगैरे लावलेल्या आहेत आत आणि असा त्याचा जीर्णोद्धार केलेला आहे. तो भाग आपण सोडून देऊ.

‘‘आणखीन एक महत्त्वाची गोष्ट की, लोकपरंपरेतल्या काही गोष्टी आपल्या स्वाधीन करून त्याचे विपरीतीकरण अभिजन परंपरा बऱ्याच वेळेला कशी करते? अभिजात, अभिजात ज्या वेळेला आपण म्हणत असतो त्या वेळेला ही अभिजात अशा प्रकारची संस्कृती नेमकं काय काय करते, आणि अभिजन परंपरा नेमकं काय काय करते? आपल्या लोकपरंपरेमध्ये देवतांचे निरनिराळे गजर असतात, म्हणजे जयजयकार असतात. त्या उत्सवाच्या काळामध्ये वगैरे किंवा एरवीसुद्धा, भक्त इष्ट देवतेचा जयजयकार करतात. जेवायची पंगत बसली की कुणी कुठलातरी लोक म्हटला की, मग शेवटी ‘पार्वतीपते हर हर महादेव’, विठ्ठलाचं भजन करायला लागलं – ‘विठ्ठल रखुमाई’, रामाचं भजन करायला लागलं– ‘सीताकांत स्मरण जय जय राम.’ आता या ठिकाणी ही जे सगळे गजर आहेत, याच्यामध्ये त्या देवतेच्या दांपत्याचा सगळीकडे उच्चार आहे. म्हणजे पार्वती आणि मग तिचा पती हर हर महादेव आहे, सीतेचा पती श्रीराम आहे, रुक्मिणीचा पती विठ्ठल आहे, असे कितीतरी आहेत. असे गजर जर शोधून काढायचे म्हटलं तर खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. आता या सगळ्या देवतांमध्ये नुसत्या एकेरी देवतांचा गजर कुठे आहे का? तो अलीकडे सुरू झालेला आहे. एका देवाचा. ते आपल्याला माहिती आहे आणि उत्तरेकडेसुद्धा तुलसीदासांनी ‘तुलसी रामायण’ लिहिलं त्या वेळेस तुलसीदासांच्या परंपरेमध्येसुद्धा ‘सिया वर रामचंद्र की जय’ अशा प्रकारचा तो गजर होता. आपल्याकडे ‘सीताकांत स्मरण जय जय राम’ असा आहे तो, आणि या ठिकाणी आता एकीकडे त्या स्त्री देवतेचा उच्छेद करून टाकलेला आहे, असं आपल्याला अनेक ठिकाणी दिसते, या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान होतो का, असा हा प्रश्न आहे. तेव्हा अभिजन परंपरा ही उदात्त परंपरा आहे, उच्च आहे, सुसंस्कृत आहे असे जे म्हटले जाते त्याला बाध देणाऱ्या अशा अनेक गोष्टी मला या संस्कृतीच्या प्रवासामध्ये प्रत्यक्ष आचरणामध्ये अनेक पातळ्यांवर दिसतात. देवतांच्याही पातळ्यांवर दिसतात, आचरणामध्ये दिसतात. सगळीकडे आपल्याला दिसत असतात. म्हणून लोकसंस्कृतीचा विचार करत असताना आणि अभिजन संस्कृतीचाही विचार करत असताना तो एकेरी विचार करता येत नाही. त्याच्या पाठीमागे असलेली 'anthropology' म्हणजे मानववंश कसा चालत आलेला आहे ते पाहावं लागतं. जसं त्या सवतीच्या बाबतीतही सांगितले की, काळ बदलत आला, उत्पादनाची साधने बदलत आली; पण तरीसुद्धा काही लोकांच्या श्रद्धा किंवा चालीरीती, रूढी या तशाच राहतात आणि काही अभिजनांच्या, म्हणजे सत्ताधारी व संपत्तीधारी लोकांच्या हिताच्या सोयीने बदलल्याही जातात, असे अनेक बाबतींमध्ये आपल्याला दिसते. समाजशास्त्राचा विचार त्या ठिकाणी करावा लागतो आणि या समाजशास्त्रात जाती–पाती, त्यांचे तिढे दिसतात. अर्थशास्त्राचाही विचार करावा लागतो. लोकसंस्कृतीमध्ये विचार करत असताना आजपर्यंत अर्थशास्त्राचा विचार कुणीही केला नाही. माझ्या मते, तो अतिशय महत्त्वाचा विचार आहे कारण आर्थिक स्तराशीच तुमचं जीवन सगळं

बांधलेलं असते म्हणून अर्थोत्पादनाची साधनं जशीजशी बदलतात तसतसं माणसाचं जीवन बदलतं हे मार्क्सनी सांगितले आहे. हे अर्थशास्त्रातले तत्त्वं हे सगळं खरं आहे; परंतु नुसतं तेवढंच नाहीये की, अर्थोत्पादनाची साधनं, त्याच्यावरची मालकी आणि मी त्याला आणखीन एक मुद्दा जोडते, त्याच्या विनिमयाचे अधिकार! विशेषत: स्त्रियांच्या बाबतीमध्ये बायका जन्मभर अर्थोत्पादन करत आलेल्या आहेत म्हणजे अगदी रानात-शेतात काम करणाऱ्या, घरकाम करणारी बाईसुद्धा हे अर्थोत्पादनच करत असते. परवा एक गंमतशीर असा विनोद आला होता. डाव्या चळवळीतल्या बायकांनी तर हा मुद्दा मांडलेलाच आहे. ज्या घरगुती काम करतात म्हणजे गृहिणी ज्याला आपण म्हणू, ज्या बाहेर जाऊन नोकरी चाकरी काही करत नाहीत आणि मग त्या पैसे मिळवत नाहीत म्हणून स्वत:ला कमी मानतात आणि घरातले लोकही तिला कमी दर्जाची मानतात की, 'बायको काय करते?' 'काही नाही घरातच असते.' बाईला विचारले, 'तू काय करते?' 'काही नाही घरातच असते.' मग त्या डाव्या चळवळीतल्या बायकांनी हे विचारायला सुरुवात केली, 'घरातला स्वयंपाक कोण करत?' 'मीच करते!' 'स्वयंपाकाला जर तू बाई ठेवली तर किती पैसे घेतील?' 'इतके-इतके घेतील.' असं करत करत, 'कपडे कोण धुतं?' 'मीच धुते!' मग कपडे धुवायला बाई ठेवली तर इतके जातील, भांडी घासायला, इतके जातील. मग हे सगळे पैसे जर तू वाचवत असशील किंवा बाहेर देत नसशील तर तू काय करते? 'To Save money is to earn Money.' अर्थशास्त्रातले जे पुढचे तत्त्व आहे की, पैसे वाचवणे म्हणजे पैसे मिळवणे हे बायकांच्या लक्षातच आले नाही. अर्थशास्त्र जे आहे तिच्या ते जगण्याच्या पाठीमागचे आहे हे तिच्या लक्षातच आले नाही म्हणून अर्थशास्त्राचा विचार हा सर्वांत महत्त्वाचा विचार आहे, असे मला वाटते. म्हणून संस्कृतीचा अभ्यास करत असताना भले ती अभिजन संस्कृती असूदेत की लोकसंस्कृती असूदेत, तिचा सगळा प्रवास कसा कसा झालेला आहे. आदिम अवस्थेपासून ते आजपर्यंत म्हणजे 'anthropology' मानववंशाची समाजव्यवस्था कशी कशी बदलत आलेली आहे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि बाकीची शास्त्रं या सगळ्यांचा समन्वय केल्याशिवाय खऱ्या अर्थाने संस्कृतीचा अभ्यास करता येत नाही. विशिष्ट मंत्र तंत्र आणि देवदेवता म्हणजे संस्कृती असत नाही. माणसाची जगण्याची जी रीत आहे आणि जगण्यासाठी आवश्यक असलेली जी सर्व साधनं, ती मिळून संस्कृती होते. लोकसाहित्याची व्याख्या आपण पाहिली तर 'साहित्य', साहित्य म्हणजे साधनं! तेव्हा लोकजीवनाच्या जडण-घडणीच्यासाठी असलेली जी सगळी साधनं भले ती आदिम अवस्थेतील असूदेत, अनक्षर असूदेत, ग्रामीण असूदेत, शहरी असूदेत, जुनी असूदेत, नवीन असूदेत ही सगळी कायम आहेत आणि या सगळ्यांचा विचार केल्याशिवाय आपल्याला त्या संस्कृतीचा, त्या समाजाचा, त्या व्यक्तीचा विचार करता येत नाही. म्हणून हा सगळा विचार करत असताना अनेक संदर्भ लक्षात घ्यावे लागतात किंवा अनेक ज्ञानशाखांचा आपल्याला विचार करावा लागतो. म्हणजे त्याला अभिजात मराठीत अंतरज्ञानशाखीय 'Interdisciplinary Study Approach' म्हणतात. तेव्हा 'Interdisciplinary Study Approach' घेतल्याशिवाय कुठल्याही संस्कृतीचा पूर्णपणे विचार करता येत नाही. भले ती अभिजन संस्कृती असू देत किंवा लोकसंस्कृती असू देत. लोकसंस्कृतीमधून अभिजन संस्कृती ही क्रमाक्रमाने उन्नत होत गेलेली आहे म्हणा किंवा उसनवारी करत घेतलेली म्हणा. ती उसनवारीच करत गेलेली आहे, आणि एका विशिष्ट जाती-जमातीला आदर्श ठेवणे हे तर अशक्यच आहे कारण या सर्व गोष्टी करत असताना सर्व जाती-जमातींचे उद्योग,

व्यवसाय, राहणीमान, त्यांचं खाणंपिणं, त्यांची हवामान, इतिहास, भूगोल या सगळ्याचा विचार करावा लागतो की. माणसाचं जगणं हे काही तुमच्याजवळ असलेले केवळ पैसे ठरवत नाहीत. तुम्ही कुठल्या प्रदेशात राहता, तिथे उत्पादन काय होते, ती उत्पादने तुमचे राहणीमान ठरवत असतात, तुमचं खाणंपिणं ठरवत असतात, तुमचे कपडेलत्ते ठरवत असतात. हा सगळा व्यापक विचार केल्याशिवाय ज्यांना आज आपण अभिजात, अभिजात असे म्हणतो आहोत ते अभिजात म्हणजे नेमकं काय आहे? लोकसंस्कृतीचा हा प्रवास लक्षात घेतल्याशिवाय 'अभिजात' म्हणजे काय, हे ही नेमकं कळेल असे मला वाटत नाही आणि म्हणून या अभिजन संस्कृतीमध्ये किंवा इतर काळामध्ये या सगळ्याच विचार करणाऱ्या काही बाबी संस्थात्मक पातळीवर निर्माण व्हायला पाहिजेत. त्याच्यासाठी काही सूचना कराव्याशा वाटतात. म्हणजे मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळालेला आहे त्याच्यामुळे काही कोटी रुपये वगैरे मिळणार आहेत त्याच्यातून काय व्हायला पाहिजे? तर ज्या एका प्रदेशामध्ये ज्या निरनिराळ्या भाषा चाललेल्या आहेत म्हणजे महाराष्ट्र घेतला, तर नुसती मराठी तिथे नाहीये तर अनेक बोली तिथे आहेत. त्या अनेक बोलींचा अभ्यास करणारी अशी एक संस्था पाहिजे; इथे सीमाप्रदेश आहेत दोन भाषिक, त्या सीमाप्रदेशामध्ये दोन्ही भाषांच्या शाळा, महाविद्यालये आणि शिक्षणसंस्था पाहिजेत. म्हणजे कन्नड-मराठी हा जो सीमाप्रदेश आहे त्या मराठी प्रदेशामध्ये कन्नड बोलणारे बरेच लोक असतील, तिकडच्या कन्नड भाषकांमध्ये भौगोलिक कन्नड रेषा जी असेल तिथे मराठी बोलणारी जी मुलं असतील त्या मराठी बोलणाऱ्या मुलांची शिक्षणाची सोय व्हायला पाहिजे म्हणून त्या सीमाप्रदेशांमध्ये उभय भाषांची शिक्षण व्यवस्था शालेय स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर आणि संशोधनाच्या स्तरावरही व्हायला पाहिजे. त्यांच्या सोयी व्हायला पाहिजेत आणि त्यांच्यासाठी शासनाने व्यवस्था करायला पाहिजे. म्हणजे हा सीमाप्रदेशातला लोकसांस्कृतिक अनुबंध आहे तो भांडणापेक्षा, संघर्षापेक्षा संवादातून मिटायला पाहिजे आणि अभ्यासातून तो संवाद शक्य होईल, हे होऊ शकते. असे झाले तर वर्षानुवर्षे भिजत पडलेले भाषावार सीमांचे प्रश्न सुटणे सुलभ होईल. म्हणजे भारतामध्ये राजस्थानमध्येच हा छोटासा प्रयोग झालेला आहे, दक्षिणेकडे मद्रासला तमिळनाडूच्या भाषेच्या प्रदेशामध्ये म्हैसूर विद्यापीठाची 'मानस गंगोत्री' नावाची विद्यापीठाचीच एक शाखा आहे. तिथे लोकसंस्कृतिक विभाग हा स्वतंत्र आहे आणि त्या ठिकाणी लोकसंस्कृती हा विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घेता येते. म्हणजे एम.ए., पीएच.डी या पदवी लोकसंस्कृतिक विषयात घेता येतात. तिथे त्याला 'लोकवेद विभाग' असेच म्हटलेले आहे. तिथे म्युझिअम (वस्तुसंग्रहालय) आहे. अतिशय सुंदर अशा प्रकारचं म्युझिअम/वस्तुसंग्रहालय दोनही प्रकारच्या संस्कृतींचे दर्शन घडवणारे असे आहे. केरळमध्ये त्रिवेंदमला अशा प्रकारचे एक वस्तुसंग्रहालय आहे की, तिकडचे सांस्कृतिक अनुबंध सांगणारे. अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये आहेत. तेव्हा भाषावार प्रांतरचना जरी झालेली असली तरी सीमाप्रदेशांमध्ये उभय भाषांमध्ये शाळांची सोय पाहिजे, महाविद्यालयांची सोय पाहिजे, संशोधनाची सोय पाहिजे आणि मुख्य म्हणजे वस्तुसंग्रहालयही पाहिजे आणि तो अभ्यास पुढे चालत राहावा. तिसरी गोष्ट 'ग्रंथ प्रकाशन' हा मोठ्या प्रकारचा संशोधन प्रकल्प त्या त्या उभय भाषिक प्रदेशांमध्ये असावा कारण आपला देश हा विविधतेने नटलेला आहे वगैरे असे आपण भाषणामध्ये बोलतो, तर ही जी विविधता आहे ती विविधता अभ्यासपूर्ण रीतीने जास्त विकसित करणे म्हणजे संघर्षापेक्षा संवादातून ते करण्यासाठी अशा प्रकारचे संशोधनात्मक ग्रंथ त्या त्या ठिकाणी जे निर्माण झालेले असतील, ते प्रकाशित व्हावेत, नवीन

प्रकाशनाला प्रेरणा मिळावी, म्हणजे ‘अभ्यासवृत्ती’ ज्याला म्हणता येईल ती देता यावी. जे जुने विलुप्त झालेले ग्रंथ आहेत म्हणजे जसे महाराष्ट्रामध्ये ‘लोकसाहित्य समिती’ होती. त्यांनी प्रकाशित केलेले ग्रंथ आहेत. एक काळ असा होता की, त्या लोकसाहित्य समितीतर्फे अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले होते. म्हणजे चाफेकर, दाते आणि पुढे सरोजिनीबाई बाबर यांनी या ठिकाणी काम केलेले होते आणि त्यांनी पुष्कळ ग्रंथ प्रकाशित केलेले होते, अगदी वाकोड यांच्यापर्यंत. पुढे ते सगळं बंद झाले आणि ते आता ग्रंथच मिळेनासे झालेले आहेत. आम्ही साहित्य संस्कृती मंडळाकडे मागणी केली आणि त्यांनी सांगितले, ‘असे काही ग्रंथ असतील तर आम्हाला सांगा, आम्ही प्रकाशित करू.’ ते साहित्य संस्कृती मंडळ चार ग्रंथ प्रकाशित करेल कदाचित; परंतु कायमसाठी ती लोकसाहित्य संशोधन समिती होती तशा प्रकारची एखादी संस्था या प्रत्येक प्रदेशामध्ये निर्माण व्हायला पाहिजे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यापीठांवर दिवसेंदिवस शासकीय बंधने जास्त येत आहेत. म्हणजे कुलगुरूंच्या नेमणुका, कुलगुरूंनी नेमकं काय करायचे, याचे आदेश शासन स्तरावरून येत आहेत. मी ज्या वेळेला विद्यापीठाशी संबंधित अशा व्यक्तींशी बोलते त्या वेळेस त्यांचे म्हणणे असे आहे की, विद्यापीठांवर शासनाने काय करावे आणि काय नाही याची बंधने घालू नयेत. एखादा शासकीय आदेश पटकन येतो आणि अमुक दिवशी, अमुक दिवस साजरा करा हे शासनाने सांगण्याची गरज नाही, त्या विद्यापीठांना ठरवूदेत. ती विद्यापीठे ज्या प्रदेशात आहेत त्या विद्यापीठांचे अग्रक्रम ज्याच्यासाठी आहेत, त्या क्षेत्रामधली जी मंडळी असतील त्यांना महत्त्व कशाला द्यायचे आणि कशाला नाही, ते त्या विद्यापीठांना, कुलगुरूंना, तिथल्या विभाग प्रमुखांना ठरवूदेत आणि त्यांच्यावर शासकीय बंधने, विशेषत: मध्यवर्ती शासकीय बंधने नसावीत! किमान बंधने असावीत. अशा प्रकारची मागणी विद्यापीठांकडून होते आहे आणि म्हणून ज्ञानक्षेत्रातले जर निरनिराळे प्रयोग निरनिराळ्या ठिकाणी व्हावेत आणि ज्ञान जास्त मोकळं व्हावे असे वाटत असेल तर शासकीय बंधने ही किमान असावीत. आंतरज्ञानशाखीय संशोधनासाठी प्रत्येक विद्यापीठामध्ये एक विभाग असावा की, जो कुठेही नाही. किंबहुना ज्याला आपण मानव्यशाखा म्हणतो, त्या मानव्यशाखांचे विभाग सगळ्याच विद्यापीठांत दिवसेंदिवस संकुचित होत आहेत. मानवी जीवन हे जास्त निरामय राहायचे असेल, तर मानव्य शाखांमधले अभ्यास हे जास्त बारकाईने आणि जास्त संवेदनशीलतेने व्हायला पाहिजेत. ते विभाग बंद न होता ते जास्त विकसित कसे होतील याच्यासाठी त्यांना मोकळीक देणे हे महत्त्वाचे आहे असे वाटते. तेव्हा अशा काही महत्त्वाच्या सूचना ज्या संमेलनाच्या निमित्ताने, अनेकांशी पूर्व संवाद साधल्यानंतर एक निवृत्त शिक्षक म्हणून, एक समाज घटक म्हणून, एक मराठी भाषक म्हणून मला आवर्जून कराव्याशा वाटतात.

या निमित्ताने मला बऱ्याच गोष्टी मांडण्याची इथे संधी मिळाली आणि त्याची अंमलबजावणी योग्य त्या पातळीवर दखल घेऊन होईल अशी अपेक्षा करते, सगळ्यांना धन्यवाद देते आणि थांबते.’’

# नई दिल्ली में अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन के उद्घाटन के दौरान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी का संबोधन



''कार्यक्रम में उपस्थित वरिष्ठ नेता श्रीमान शरद पवार जी, महाराष्ट्र के लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस जी, अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन के अध्यक्ष डॉ. तारा भवालकर जी, पूर्व अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभने जी, सभी सदस्यगण, मराठी भाषा के सभी विद्वतगण और उपस्थित भाइयों और बहनों।

''अभी डॉक्टर तारा जी का भाषण पूरा हुआ तो मैंने ऐसे ही कहा 'फार छान', तो उन्होंने मुझे गुजराती में जवाब दिया, 'मने भी गुजराती आवड़े छे।' देशाच्या आर्थिक राजधानीच्या, राज्यातून देशाच्या, राजधानीत आलेल्या सर्व मराठी, सारस्वतांना माझा नमस्कार.

''आज दिल्ली की धरती पर मराठी भाषा के इस गौरवशाली कार्यक्रम का आयोजन हो रहा है। अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन एक भाषा या राज्य तक सीमित आयोजन नहीं है, मराठी साहित्य के इस सम्मेलन में आजादी की लड़ाई की महक है, इसमें महाराष्ट्र और राष्ट्र की सांस्कृतिक विरासत है। ज्ञानबा-तुकारामांच्या मराठीला आज राजधानी दिल्ली अतिशय मनापासून अभिवादन करते।

''भाइयों-बहनों, १८७८ में पहले आयोजन से लेकर अब तक अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन देश की १४७ वर्षों की यात्रा का साक्षी रहा है। महादेव गोविंद रानडे जी, हरि नारायण आपटे जी, माधव श्रीहरि अणे जी, शिवराम परांजपे जी, वीर सावरकर जी, देश की कितनी ही महान विभूतियों ने इसकी अध्यक्षता की है। शरद जी के आमंत्रण पर आज मुझे इस गौरवपूर्ण परंपरा से जुड़ने का अवसर मिल रहा है। मैं आप सभी को, देश दुनिया के सभी मराठी प्रेमीयों को इस आयोजन की बहुत-बहुत बधाई देता हूं। आणि आज तर 'जागतिक मातृभाषा दिवस' आहे. तुम्ही दिल्लीतील साहित्य सम्मेलनासाठी दिवससुद्धा अतिशय चांगला निवडला.

''साथियों, मैं जब मराठी के बारे में सोचता हूं, तो मुझे संत ज्ञानेश्वर का वचन याद आना बहुत स्वाभाविक है। 'माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजा जिंके।' यानी मराठी भाषा अमृत से भी बढ़कर मीठी है। इसलिए मराठी भाषा और मराठी संस्कृति के प्रति मेरा जो प्रेम है, आप सब उससे भलीभांति परिचित हैं। मैं

आप विद्वानों की तरह मराठी में उतना प्रवीण तो नहीं हूं, लेकिन मराठी बोलने का प्रयास, मराठी के नए शब्दों को सीखने की कोशिश मैंने निरंतर की है।

''साथियों, ये मराठी सम्मेलन एक ऐसे समय हो रहा है, जब छत्रपति शिवाजी महाराज के राज्याभिषेक के ३५० वर्ष पूरे हुए हैं। जब पुण्यस्लोक अहिल्याबाई होलकर जी की जन्मजयंति के ३०० वर्ष हुए हैं और कुछ ही समय पहले बाबा साहेब अंबेडकर के प्रयासों से बने हमारे संविधान ने भी अपने ७५ वर्ष पूरे किए हैं।

''साथियों, आज हम इस बात पर भी गर्व करेंगे कि महाराष्ट्र की धरती पर मराठी भाषी एक महापुरुष ने १०० वर्ष पहले राष्ट्रीय स्वयं सेवक संघ का बीज बोया था। आज ये एक वटवृक्ष के रूप में अपना शताब्दी वर्ष मना रहा है। वेद से विवेकानंद तक भारत की महान और पारंपरिक संस्कृति को नई पीढ़ी तक पहुंचाने का एक संस्कार यज्ञ, राष्ट्रीय स्वयं सेवक संघ पिछले १०० वर्षों से चला रहा है। मेरा सौभाग्य है कि मेरे जैसे लाखों लोगों को आरएसएस ने देश के लिए जीने की प्रेरणा दी है। और संघ के ही कारण मुझे मराठी भाषा और मराठी परंपरा से जुड़ने का भी सौभाग्य प्राप्त हुआ। इसी कालखंड में कुछ महीने पहले मराठी भाषा को अभिजात भाषा का दर्जा दिया गया है। देश और दुनिया में १२ करोड़ से ज्यादा मराठी भाषी लोग हैं। मराठी को अभिजात भाषा का दर्जा मिले, इसका करोड़ों मराठी भाषियों को दशकों से इंतज़ार था। ये काम पूरा करने का अवसर मुझे मिला, मैं इसे अपने जीवन का बड़ा सौभाग्य मानता हूँ।

''माननीय विद्वतजन, आप जानते हैं, भाषा केवल उसके संवाद का माध्यम भर नहीं होती है। हमारी भाषा हमारी संस्कृति की संवाहक होती है। ये बात सही है कि भाषाएँ समाज में जन्म लेती हैं, लेकिन भाषा समाज के निर्माण में उतनी ही अहम भूमिका निभाती है। हमारी मराठी ने महाराष्ट्र और राष्ट्र के कितने ही मनुष्यों के विचारों को अभिव्यक्ति देकर हमारा सांस्कृतिक निर्माण किया है। इसीलिए, समर्थ रामदास जी कहते थे– 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म

**मराठी भाषा और मराठी साहित्य ने समाज के शोषित, वंचित वर्ग के लिए सामाजिक मुक्ति के द्वार खोलने का भी अद्भुत काम किया है। ज्योतिबा फुले, सावित्री बाई फुले, महर्षि कर्वे, बाबा साहेब आंबेडकर, ऐसे कितने ही महान समाज सुधारकों ने मराठी भाषा में नए युग की सोच को सिंचा। भारत में दुनिया की सबसे बडी भाषाई विविधता है। हमारी ये भाषाई विविधता ही हमारी एकता का सबसे बुनियादी आधार भी है। आज मराठी साहित्य ने विज्ञान कथाओं से लेकर आधुनिक साहित्य तक में अपनी अमिट छाप छोडी है। महाराष्ट्र ने हमेशा नए विचारों और प्रतिभाओं को आमंत्रित किया है। मुंबई, महाराष्ट्र ही नही, बल्कि पूरे देश की आर्थिक राजधानी बनकर उभरी है।**

वाढवावा, आहे तितके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे।' मराठी एक सम्पूर्ण भाषा है। इसीलिए, मराठी में शूरता भी है, वीरता भी है। मराठी में सौंदर्य भी है, संवेदना भी है, समानता भी है, समरसता भी है, इसमें अध्यात्म के स्वर भी हैं, और आधुनिकता की लहर भी है। मराठी में भक्ति भी है, शक्ति भी है, और युक्ति भी है। आप देखिए, जब भारत को आध्यात्मिक ऊर्जा की जरूरत हुई, तो महाराष्ट्र के महान संतों ने ऋषियों के ज्ञान को मराठी भाषा में सुलभ कराया। संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास, संत नामदेव, संत तुकड़ोज़ी महाराज, गाडगे बाबा, गोरा कुम्हार और बहिणाबाई महाराष्ट्र के कितने ही संतों ने भक्ति आंदोलन के जरिए मराठी भाषा में समाज को नई दिशा दिखाई। आधुनिक समय में भी गजानन दिगंबर माडगूलकर और सुधीर



फड़के की गीतरामायण ने जो प्रभाव डाला, वो हम सब जानते हैं।

''साथियों, गुलामी के सैकड़ों वर्षों के लंबे कालखंड में, मराठी भाषा, आंक्रांताओं से मुक्ति का भी जयघोष बनी। छत्रपति शिवाजी महाराज, संभाजी महाराज और बाजीराव पेशवा जैसे मराठा वीरों ने दुश्मनों को नाको चने चबवा दिए, उनको मजबूर कर दिया। आज़ादी की लड़ाई में वासुदेव बलवंत फड़के, लोकमान्य तिलक और वीर सावरकर जैसे सेनानियों ने अंग्रेजों की नींद उड़ा दी। उनके इस योगदान में मराठी भाषा और मराठी साहित्य का बहुत बड़ा योगदान था। केसरी और मराठा जैसे समाचार पत्र, कवि गोविंदाग्रज की ओजस्वी कवितायें, राम गणेश गडकरी के नाटक मराठी साहित्य से राष्ट्रप्रेम की जो धारा निकली, उसने पूरे देश में आज़ादी के आंदोलन को सींचने का काम किया। लोकमान्य तिलक ने गीता रहस्य भी मराठी में ही लिखी थी। लेकिन, उनकी इस मराठी रचना ने पूरे देश में एक नई ऊर्जा भर दी थी।

''साथियों, मराठी भाषा और मराठी साहित्य ने समाज के शोषित, वंचित वर्ग के लिए सामाजिक मुक्ति के द्वार खोलने का भी अद्भुत काम किया है। ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे, बाबासाहेब आंबेडकर, ऐसे कितने ही महान समाज सुधारकों ने मराठी भाषा में नए युग की सोच को सींचने का काम किया था। देश में मराठी भाषा ने बहुत समृद्ध दलित साहित्य भी हमें दिया है। अपने आधुनिक चिंतन के कारण मराठी साहित्य में विज्ञान कथाओं की भी रचनाएँ हुई हैं। अतीत में भी, आयुर्वेद, विज्ञान, और तर्कशास्त्र में महाराष्ट्र के लोगों ने अद्भुत योगदान दिया है। इसी संस्कृति के कारण, महाराष्ट्र ने हमेशा नए विचारों और प्रतिभाओं को भी आमंत्रित किया और महाराष्ट्र ने इतनी प्रगति की है। हमारी मुंबई महाराष्ट्र ही नहीं, बल्कि पूरे देश की आर्थिक राजधानी बनकर उभरी है।

''और भाइयों बहनों, जब मुंबई का ज़िक्र आया है, तो फिल्मों के बिना न साहित्य की बात पूरी होगी, और न मुंबई की! ये महाराष्ट्र और मुंबई ही है, जिसने मराठी फिल्मों के साथ-साथ हिन्दी सिनेमा को ये ऊंचाई दी है। और इन दिनों तो 'छावा' की धूम मची हुई है। संभाजी महाराज के शौर्य से इस रूप में परिचय शिवाजी सावंत के मराठी उपन्यास ने ही कराया है।

''साथियों, कवि केशवसुत का एक पद है- 'जुनें जाऊं द्या, मरणालागुनि जाळुनि किंवा, पुरुनि टाका सडत न एक्या ठायी ठाका', यानी हम पुरानी सोच पर थमे नहीं रह सकते। मानवीय सभ्यता, विचार और भाषा लगातार विकसित होते रहते हैं। आज भारत दुनिया की सबसे प्राचीन जिवंत सभ्यताओं में से एक है। क्योंकि, हम लगातार विकसित हुये हैं, हमने लगातार नए विचारों को जोड़ा है, नए बदलावों का स्वागत किया है। भारत में दुनिया की सबसे बड़ी भाषाई विविधता इसका प्रमाण है। हमारी ये भाषाई विविधता ही हमारी एकता का सबसे बुनियादी आधार भी है। मराठी खुद इसका सबसे बड़ा उदाहरण है। क्योंकि, हमारी भाषा उस माँ की तरह होती है, जो अपने बच्चों को नए से नया, अधिक से अधिक ज्ञान देना चाहती है। माँ की तरह ही भाषा भी किसी से भेदभाव नहीं करती। भाषा हर विचार का, हर विकास का आलिंगन करती है। आप जानते हैं, मराठी का जन्म संस्कृत से हुआ है। लेकिन, इसमें उतना ही प्रभाव प्राकृत भाषा का भी है। ये पीढ़ी-दर-पीढ़ी आगे बढ़ी है, इसने मानवीय सोच को और अधिक व्यापक बनाया है। अभी मैंने लोकमान्य तिलक जी की गीता रहस्य का ज़िक्र किया। गीता रहस्य संस्कृत गीता की व्याख्या है। तिलक जी ने




मूल गीता के विचारों को लिया, और मराठी बोध से उसे और ज्यादा जन-सुलभ बनाया। ज्ञानेश्वरी गीता में भी संस्कृत पर मराठी में टिप्पणी लिखी गई। आज वही ज्ञानेश्वरी देश भर के विद्वानों और संतों के लिए गीता को समझने के लिए एक मानक बन गई है। मराठी ने दूसरी सभी भारतीय भाषाओं से साहित्य को लिया है, और बदले में उन भाषाओं को भी समृद्ध किया है। जैसे कि भार्गवराम विठ्ठल वरेरकर जैसे मराठी साहित्यकारों ने 'आनंदमठ' जैसी कृतियों का मराठी अनुवाद किया। विंदा करंदीकर, इनकी रचनाएँ तो कई भाषाओं में आईं। उन्होंने पन्ना दाय, दुर्गावती और रानी पद्मिनी के जीवन को आधार बनाकर रचनाएँ लिखीं। यानी, भारतीय भाषाओं में कभी कोई आपसी वैर नहीं रहा। भाषाओं ने हमेशा एक दूसरे को अपनाया है, एक दूसरे को समृद्ध किया है।

''साथियों, कई बार जब भाषा के नाम पर भेद डालने की कोशिश की जाती है, तो हमारी भाषाओं की साझी विरासत ही उसका सही जवाब देती है। इन भ्रमों से दूर रहकर भाषाओं को समृद्ध करना, उन्हें अपनाना, ये हम सबका सामूहिक दायित्व है। इसीलिए, आज हम देश की सभी भाषाओं को mainstream language के रूप में देख रहे हैं। हम मराठी समेत सभी प्रमुख भाषाओं में शिक्षा को बढ़ावा दे रहे हैं। अब महाराष्ट्र के युवा मराठी में हायर एज्युकेशन, इंजिनिअरिंग और मेडिकल की पढ़ाई वहां का युवा आसानी से कर सकेंगे। अंग्रेजी न जानने के कारण प्रतिभाओं की उपेक्षा करने वाली सोच को हमने बदल दिया है।

''साथियों, हम सब कहते हैं कि हमारा साहित्य समाज का दर्पण होता है। साहित्य समाज का पथप्रदर्शक भी होता है। इसीलिए, साहित्य सम्मेलन जैसे कार्यक्रमों की, साहित्य से जुड़ी संस्थाओं की देश में बहुत अहम भूमिका होती है। गोविंद रानडे जी, हरिनारायण आपटे जी, आचार्य अत्रे जी, वीर सावरकर जी, इन महान विभूतियों ने जो आदर्श स्थापित किए, मैं आशा करता हूँ, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडल उन्हें और आगे बढ़ाएगा। २०२७ में साहित्य सम्मेलन की इस परंपरा को १५० वर्ष पूरे होंगे। और तब १००वां सम्मेलन होगा। मैं चाहूँगा, आप इस अवसर को विशेष बनाएँ, इसके लिए अभी से तैयारी करें। कितने ही युवा आजकल सोशल मीडिया के जरिए मराठी साहित्य की सेवा कर रहे हैं। आप उन्हें मंच दे सकते हैं, उनकी प्रतिभा को पहचान दे सकते हैं। ज्यादा से ज्यादा लोग मराठी सीखें, इसके लिए आप ऑनलाइन platforms को, भाषिणी जैसे initiatives को बढ़ावा दें। मराठी भाषा और साहित्य को लेकर युवाओं के बीच प्रतियोगिताओं का आयोजन भी किया जा सकता है। मुझे विश्वास है, आपके ये प्रयास, और मराठी साहित्य की प्रेरणाएं विकसित भारत के लिए १४० करोड़ देशवासियों को नई ऊर्जा देंगे, नई चेतना देंगे, नई प्रेरणा देंगे। आप सभी महादेव गोविंद रानडे जी, हरि नारायण आपटे जी, माधव श्रीहरि अणे जी, शिवराम परांजपे जी, जैसे महान व्यक्तित्वों की महान परंपरा को आगे बढ़ाएं, इसी कामना के साथ, आप सभी का एक बार फिर बहुत-बहुत धन्यवाद!''



# ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्वागताध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार यांचे भाषण

''९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी उद्घाटक म्हणून लाभलेले भारताचे प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महामंडळाच्या अध्यक्ष प्राध्यापक श्रीमती उषा तांबे, संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या लोकसाहित्यिक डॉ. तारा भवाळकर, केंद्रातील विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री तथा संमेलनाचे सहकार्यवाह श्री. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे, महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री श्री. आशिष शेलार, ह्या साहित्य संमेलनासाठी विशेष कष्ट घेणारे निमंत्रक सरहद संस्थेचे प्रमुख श्री. संजय नहार, महामंडळाचे उपाध्यक्ष श्री. गुरय्या स्वामी, डॉ. शैलेश पगारिया, कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, डॉ. ज्ञानेश्वर मुळे, श्री. प्रकाश पागे, अनुज नहार, लेशपाल जवळगे, शैलेश वाडेकर आणि उपस्थित साहित्यिक आणि मराठी साहित्य रसिकांनो, आज मराठी सारस्वतांची दिंडी दिल्लीच्या दरबारी आली आहे, याचा मला विशेष आनंद होत आहे. मराठी माणूस केवळ नर्मदापार महाराष्ट्रातच नाही तर आपल्या पराक्रमाचा झेंडा अटकेपार फडकवणारा मराठी माणूस दिल्ली, हरियाणा, इंदौर, ग्वाल्हेर, वडोदरापासून तंजावरपर्यंत स्थिरावला आहे. नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने आपला मराठी माणूस संपूर्ण भारतात दिसून येतो. भीमथडीच्या तट्टांनी म्हणजे घोड्यांनी जसे यमुनेचे पाणी चाखले त्याचप्रमाणे मराठी साहित्याचा अमृतानुभव घेण्यासाठी आज पुन्हा आपण यमुनेच्या तीरी जमलो आहोत, याचा मला आनंद झाला आहे.

''अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन देशाच्या राजधानीत दुसऱ्यांदा आयोजित होत आहे. विशेष म्हणजे ह्या सारस्वतांच्या महामेळाव्यास देशाचे प्रधानमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी हजर राहिले आहेत, याचा मला विशेष आनंद आहे. मोदीजी नुकतेच फ्रान्स आणि अमेरिका देशांचा यशस्वी दौरा करून भारतात परतले आहेत. फ्रान्समध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता ह्या नव्या वैज्ञानिक संकल्पनेचा सामाजिक आणि आर्थिक क्षेत्राला लाभ होण्यासाठी आश्वासक चर्चा झाली आणि त्याचबरोबर अमेरिका दौऱ्यात संरक्षण, व्यापार क्षेत्रासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा झाली, करार घडून आले. याबद्दल मी प्रधानमंत्र्यांचे

अभिनंदन करतो. आजचे साहित्य संमेलन मराठी भाषकांच्या दृष्टीने अत्यंत आनंददायी घटनेच्या पार्श्वभूमीवर संपन्न होत आहे. महाराष्ट्र शासन व साहित्यिक– रसिकांकडून सातत्याने पाठपुरावा झाल्यानंतर आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, आणि हा दर्जा मिळवून देण्यात माननीय नरेंद्र मोदींनी जी भूमिका बजावली त्याबद्दल समस्त मराठी जनतेतर्फे मी त्यांच्याविषयी कृतज्ञता व आदरभाव प्रकट करतो.

''१९५४ मध्ये दिल्लीत पहिल्यांदा ३७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. देशाचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संमेलनाचे उद्घाटन केले होते. त्याचीच पुनरावृत्ती होताना त्यानंतर सत्तर वर्षांनी होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. मी निमंत्रण देण्यासाठी गेलो असता सन्माननीय नरेंद्र मोदींनी क्षणार्धात उद्घाटनासाठी होकार दिला. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहे.

''चंद्रभागेकाठी आषाढी, कार्तिकीला दरवर्षी लाखो वारकरी भक्तिभावाने जमतात. त्याच पद्धतीने या साहित्य संमेलनासाठी हजारो साहित्यप्रेमी दरवर्षी पदरमोड करून येत असतात. देशाच्या राजधानीत मराठी सारस्वतांच्या दिंडींचे मला स्वागत करण्याची संधी मिळाली, हा माझ्या आयुष्यातला अविस्मरणीय क्षण आहे. ३७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष महाराष्ट्राला सांस्कृतिक दिशा देणारे मराठी विश्वकोशकार, साहित्यप्रभू पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते, तर स्वागताध्यक्ष होते ज्ञानतपस्वी, अर्थतज्ज्ञ व थोर स्वातंत्र्यसैनिक काकासाहेब गाडगीळ. आज तीच जबाबदारी माझ्याकडे आली आहे.

''मीही आपल्यातीलच एक साहित्यरसिक आहे. आतापर्यंत मी अनेक साहित्य संमेलनांचा उद्घाटक म्हणून उपस्थित राहिलो आहे. नाशिक, घुमान, सासवड, चिपळूण, पिंपरी चिंचवड अशा अनेक संमेलनांचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले होते. माझ्या ग.दि.मा., पु.ल., ना.धो.महानोर अशा अनेक साहित्यिकांशी ऋणानुबंधांच्या गाठी जुळून आल्या. मला गुरुस्थानी असलेले यशवंतराव चव्हाण हे एक उत्तम साहित्यिक होते. या सर्वांच्या सहवासाने मी ही लिहिता झालो. 'लोक माझे सांगाती'च्या रूपाने आपल्यापुढे व्यक्त झालो. मी सार्वजनिक जीवनातील सुमारे ३० वर्षांहून अधिक काळ दिल्लीच्या दरबारी मराठी अस्मिता राखण्याचा प्रयत्न केला. या सर्व बाबींचा विचार करून संयोजकांनी मला स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी देण्याचे ठरवले असावे. त्याबद्दल मी संयोजकांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

''साहित्यरसिक हो, सारस्वतांच्या ह्या सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची आठवण येणे स्वाभाविक आहे. साहित्य–संस्कृतीशी राज्यकर्त्यांनी कसे संबंध ठेवावेत, याचा वस्तुपाठ यशवंतरावांनी घालून दिला. परदेशात गेले तरी पहिल्यांदा पुस्तकांच्या दुकानात जाऊन दुर्मीळ पुस्तकांची खरेदी करणारे यशवंतराव चव्हाण हे वेगळेच व्यक्तिमत्त्व होते. ते स्वत: एक उत्तम लेखक होते. त्यांच्यामुळेच सुसंस्कृत महाराष्ट्राची उभारणी झाली. त्यांनी भाषा संचालनालयाची सुरुवात केली. साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. साहित्य संमेलनाला उपस्थित राहताना श्रोत्यांमध्ये बसण्यात त्यांनी कमीपणा मानला नाही. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मला गुरुस्थानी असणाऱ्या यशवंतराव चव्हाण साहेबांच्या स्मृतींना मी अभिवादन करतो.

''माझ्या दृष्टीने आणखी एक उल्लेखनीय आणि मला विशेष आनंद देणारी बाब म्हणजे लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची अध्यक्षपदी झालेली निवड. चिपळूणच्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनावेळी मी एक खंत व्यक्त केली होती की, आतापर्यंत इतकी संमेलने झाली; परंतु फक्त चारच महिलांना अध्यक्षपदाचा मान मिळाला आणि ही गोष्ट काही बरोबर नाही. १९४३ साली

**बारामती म्हटले की, मला मोरोपंत यांचे स्मरण होते. त्यांनी आर्या वृत्तात काव्य रचना लिहून मराठी साहित्यात फार मोठी भर घातली आहे. मोरोपंतांसारख्याच अन्य अनेक साहित्यिकांचा उल्लेख मला करता येईल. अलीकडच्या काळात ज्या ज्या ठिकाणी साहित्य संमेलने झाली त्या ठिकाणी सुदैवाने मला सहभागी होण्याची संधी मिळाली. नाशिक, घुमान, सासवड, चिपळूण, पिंपरी-चिंचवड, उदगीर अशा अनेक संमेलनास मी उपस्थित होतो. त्यामुळे पु. ल. देशपांडे, गदिमा, ना. धो. महानोर यासारख्या जाणकार सारस्वतांशी सुसंवाद करण्याची संधी माझ्या व्यक्तिगत जीवनात मला मिळाली.**

कुसुमावती देशपांडे, १९७५ मध्ये दुर्गा भागवत, १९९६ मध्ये शान्ता शेळके, २००१ मध्ये विजया राजाध्यक्ष अशा चारच महिलांना अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. अध्यक्षपदासाठी निवडणूक बंद होऊन सन्मानाने निवडीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आपण डॉ. अरुणा ढेरे यांची २०१९ मध्ये निवड केलीत, आणि आता या संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर यांची निवड केलीत. एका महिला साहित्यिकाला अध्यक्षपदाचा सन्मान मिळालेल्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष आपण आहोत, ही माझ्यासाठी विशेष आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. मी डॉ. तारा भवाळकर यांचे अभिनंदन करतो आणि त्यांच्या निवडीसाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळालाही धन्यवाद देतो.

''दिल्लीचे आणि महाराष्ट्राचे नाते- अकराव्या शतकामध्ये अनंगपाल तोमरने दिल्लीची स्थापना केली तेव्हापासूनचे महाराष्ट्र आणि दिल्लीचे राजकीय व सांस्कृतिक संबंध आहेत. देवगिरीच्या यादव घराण्याच्या अस्तानंतर मोहम्मद तुघलकाच्या काळात अल्प काळासाठी का होईना देवगिरी देशाची राजधानी बनली होती. तुघलकाने दिल्लीहून जे लोक सोबत आणले होते त्यातील काही महाराष्ट्रातच स्थायिक झाले. महाराष्ट्रात सुफी पंथाचा उदय याच काळात झाला. त्याच सुमारास संत नामदेवांच्या भारतभ्रमंतीचा लगतच्या पंजाब- हरियाणा परिसराला स्पर्श झाला होता.

''१६६६ मध्ये पातशाह औरंगजेबाने त्याचा वाढदिवस आग्र्याला साजरा केला. अन्यथा शिवछत्रपतींचा स्वाभिमानी साक्षात्कार इथे घडला असता; पण त्या घटनेपासून प्रेरणा घेऊन मराठेशाहीने आपला झेंडा अटकेपार फडकवला. याचा मराठी भाषकांना सार्थ अभिमान आहे.

''१७१८ मध्ये पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी दिल्लीत फौजा नेऊन दिल्लीचा पातशहा बदलला होता. पहिल्या बाजीरावाने साहित्य संमेलन संपन्न होत असलेल्या तालकटोरापर्यंत मजल मारून पातशहावर दबाव आणला आणि आपल्या मागण्या पूर्ण करून घेतल्या होत्या. १७५२ साली मल्हारराव होळकरांनी पेशव्यांच्या वतीने पातशहाच्या रक्षणाचा 'अहदनामा' नामक करार केला. पानिपतचे युद्ध मराठे लढले ते दिल्लीच्या तख्ताच्या रक्षणासाठी. पुढे महादजी शिंदे या सेनानीने तब्बल वीस वर्षे पातशाहीवरच राज्य गाजवले. महादजींनी १७७१ ते १७९४ अशी २३ वर्षे दिल्लीचा कारभार करून लाल किल्ल्याचे रक्षण केले. १७९५ पासून पातशहा इंग्रजांच्या कह्यात गेला, तर यशवंतराव होळकर यांनी दिल्लीवर स्वारी करून पातशाहाला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी पातशाही तख्त राखण्यासाठी आणि पातशाहामार्फत आपली सत्ता राबवण्यासाठी तब्बल साठहून अधिक वर्षं शिकस्त केली. १८०३ मध्ये दिल्ली जिंकणाऱ्या इंग्रज सेनापती जनरल लेक याने लिहून ठेवले आहे की, दिल्ली आम्ही मुघलांशी नव्हे, तर मराठ्यांशी लढून जिंकली.

‘‘ह्या सगळ्या राजकीय संक्रमणकाळात भाषिक अभिसरणदेखील झाले. मराठी माणसे दिल्ली आणि दिल्लीच्या अवतीभोवती स्थिरावली. आज दिल्लीच्या लोकसंख्येमध्ये सुमारे पाच लाख मराठी बांधव आहेत. हरियाणामध्ये आपल्या रोड मराठांचे एक प्रभावक्षेत्र आहे. त्यांनाही मराठीशी जोडून घेण्यासाठी हे साहित्य संमेलन महत्त्वाची भूमिका बजावेल, असा मला विश्वास वाटतो.

‘‘दिल्लीसंदर्भात मराठी कवींनीही वीरश्रीयुक्त गीते लिहिली आहेत. कवी राजा बढे यांनी लिहिले आहे –

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्र्यांच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा।।

ह्या ओळींचा अर्थ नव्याने समजून घेण्याची आवश्यकता आहे.

‘‘नेहरूंच्या भाषणाची आठवण– ‘साहित्यिक उपक्रमांशिवाय माणूस बौद्धिकदृष्ट्या स्थिर होऊन जाईल,’ असे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ७० वर्षांपूर्वी या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात म्हटले होते. ते खरेच आहे. त्या दृष्टीने साहित्य आणि अशा संमेलनांची आवश्यकता आहे. ‘मजबूत आणि समृद्ध भारताची पायाभरणी करण्यासाठी लेखक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात,’ असेही नेहरूंनी त्या वेळी म्हटले होते. लेखकांनी ही भूमिका किती प्रभावीपणे बजावली आहे, याचे नीट अवलोकन करण्याची आवश्यकता आहे. लेखकांची जबाबदारी काय असते, यासंदर्भात प्रत्येकाची भूमिका वेगळी असू शकते. स्वान्तसुखाय लिहिणाऱ्या लेखकाकडून समाजाला दिशा देण्याची अपेक्षा कशी करायची, असाही प्रश्न पडेल; परंतु मधल्या काळात अनेक राजकीय, सामाजिक स्थित्यंतरे झाली. त्या त्या काळात मूठभर का असेना; पण काही लेखकांनी सत्तेला आरसा दाखवण्याचे, प्रश्न विचारण्याचे काम केले, हे मला आवर्जून नोंदवावेसे वाटते. कुणाचाही मुलाहिजा न ठेवता लेखन करताना लेखकांनी सतत प्रश्न उपस्थित करीत राहिले पाहिजे. लेखकांच्या विद्रोहाला कुणी कागदी बंड म्हणून हिणवले असले तरी त्या बंडाची झळ सत्ताधाऱ्यांच्या किती जिव्हारी लागते, हे आपण वेळोवेळी अनुभवले आहे. असे लेखकच समाजाला दिशा देऊ शकतात. ज्या माणसांना आवाज नाही त्यांचा, कष्टकरी, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त अशा मुक्या माणसांचा आवाज बनू शकतात.

‘‘ज्ञानपीठाचे मानकरी वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, भालचंद्र नेमाडे या चार मराठी लेखकांना आजवर ‘ज्ञानपीठ पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले. विविध भारतीय भाषांमध्ये त्यांचे साहित्य पोहोचले आहे आणि त्याद्वारे मराठी भाषेची पताका देशभर फडकत राहिली आहे. त्याशिवाय विजय तेंडुलकर यांच्यासारख्या नाटककाराची नाटके देशभरात सादर केली जातात. तेंडुलकरांनीही कुणाचा मुलाहिजा न ठेवता लेखन केले. ‘घाशीराम कोतवाल’, ‘सखाराम बाईंडर’ या त्यांच्या नाटकांमुळे त्यांनाही काही घटकांच्या रोषाला सामोरे जावे लागले; परंतु ते आपल्या भूमिकेपासून हटले नाहीत. ज्या ज्या वेळी लेखकांनी भूमिका घेण्याची वेळ आली त्या त्या वेळी तेंडुलकरांनी पुढे येऊन लिहिणाऱ्यांचा आवाज बुलंद केल्याचे पाहावयास मिळते.

‘‘नामदेव ढसाळ यांची कविता देशाच्याच नव्हे, तर जगाच्या मंचावर लक्ष वेधून घेते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीने खेड्यापाड्यातील तरुणांना आत्मभान देऊन लिहिते केले. त्याच सुमारास मराठी साहित्याला आलेले साचलेपण दूर करण्याचे काम दलित साहित्याने केले, ज्याला आंबेडकरी साहित्यही म्हटले जाते. महात्मा फुले–डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आलेल्या या साहित्याने मराठी साहित्याला जगाच्या पातळीवर प्रतिष्ठा मिळवून दिली

हे नाकारून चालणार नाही. 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही, सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले.' असे प्रारंभीच्या काळात लिहिणारे यशवंत मनोहर जेव्हा, 'सजीवांना फोडासम जपतो इतका माणूस खुळा हवा' असे लिहितात तेव्हा दलित कविता आशयाच्या अंगाने किती व्यापक बनत चाललीय हे दिसते. नारायण सुर्वे यांच्यासारख्या कवीने मराठी साहित्यात एका स्वतंत्र विद्यापीठाची उभारणी केली. सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांनीही गावकुसाबाहेरचे, उपेक्षितांचे जगणे मराठी साहित्यात आणले. त्यांच्या साहित्याचा डंका रशियापर्यंत वाजला आणि रशियातही या महान लेखकाचे स्मारक उभे राहिले आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. 'उपरा', 'बलुतं', 'उचल्या', 'आठवणींचे पक्षी', 'जिणं आमचं', 'माझ्या जल्माची चित्तरकथा' यांसारख्या स्वकथनांनी मराठीच नव्हे तर भारतीय साहित्याची समृद्धी वाढवली. हमीद दलवाई, फक्रुद्दिन बेन्नूर यांच्यापासून ते आजच्या काळातील रफीक सूरज, हबीब भंडारेपर्यंत अनेक मुस्लिम साहित्यिकांनीही मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

''स्त्रियांचे योगदान- स्त्रियांनीही मराठी साहित्यात मोठी भर घातली असून ती संख्यात्मक आहे, तशीच गुणात्मकसुद्धा आहे.

''महानुभाव पंथातील महदंबेपासून 'स्मृतिचित्रे' लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक, आनंदीबाई शिर्के, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, ज्योत्स्ना देवधर, मेहरुन्निसा दलवाई, माधवी देसाई, पुष्पा भावे, वीणा गवाणकर, आशा बगे, बेबी कांबळे, शांताबाई कांबळे, गौरी देशपांडे, सानिया, रूपा कुलकर्णी अशा अनेक लेखिकांची नावे समोर येतात. जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, सावित्रीबाई फुले, शांता शेळके, इंदिरा संत, अरुणा ढेरे, मल्लिका अमर शेख, कविता महाजन, सिसिलिया कार्व्हालो, संजीवनी तडेगावकर, प्रज्ञा दया पवार, नीरजा अशी कवितेतही सशक्त परंपरा दिसून येते. ही नावे समोर आल्यानंतर मी जी खंत व्यक्त केली की, आजवर फक्त मोजक्याच स्त्रियांना अध्यक्षपद मिळाले, ती योग्य वाटल्यावाचून राहणार नाही.

''संमेलन अधिक व्यापक बनावे- दिल्लीत आज जे संमेलन भरतेय त्याला १४० वर्षांची परंपरा आहे, आणि इतकी दीर्घ परंपरा असलेल्या संमेलनात आपण सहभागी होतोय, ही तुम्हा-आम्हा प्रत्येकासाठी अभिमानाची बाब आहे. संमेलनांची वाटचालही शतकाकडे चालली आहे. दोनच वर्षांत शतकमहोत्सवी संमेलन होईल. एवढी दीर्घ परंपरा असलेल्या संमेलनाच्या आवश्यकतेसंदर्भात काही घटकांकडून प्रश्न उपस्थित केले जातात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्याची आपली तयारी हवी कारण साहित्य हे समन्वयाचे क्षेत्र आहे. ग्रंथकार सभेच्या पहिल्या संमेलनावेळी महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस लिहिलेल्या पत्राचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्या पत्राकडे आणि त्या अनुषंगाने उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. जोतिरावांनी पहिल्या संमेलनावेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची आपली १४० वर्षांनी तरी तयारी आहे किंवा नाही, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. मूळचे प्रश्न जसेच्या तसे आहेत. शिवाय काळाच्या प्रवाहात अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा प्रश्नांना भिडण्याचा प्रयत्न संमेलनाने करावयास हवा, तरच साहित्याचा प्रवाह जिवंत, खळाळता राहील. साहित्य ही कुणा ठरावीक वर्गाची मक्तेदारी नाही, हे यशवंतराव चव्हाण यांनी पन्नास वर्षांपूर्वी ठणकावून सांगितले होते. तरीसुद्धा मूठभर लोक साहित्य क्षेत्रावर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याच्या तक्रारी ऐकू येतात, हे योग्य नाही. साहित्य क्षेत्रातील जुन्या संस्थांनी अधिक व्यापक बनायला हवे. आपण करतो तेच खरे कार्य, असा अहंकार किमान साहित्य क्षेत्रातील संस्थांनी तरी बाळगायला नको. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोकण मराठी साहित्य परिषद अशा दीर्घकाळ साहित्य क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना सामावून घेण्याचा



प्रयत्न महामंडळाने करावयास हवा.

''महात्मा फुले यांचे पत्र– नवे वाचक घडवण्यासाठी, वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. साहित्य संमेलनांतूनही लोकांना आपल्या वाटणाऱ्या विषयांची चर्चा व्हायला पाहिजे. महात्मा फुले यांनी ग्रंथकार सभेस लिहिलेल्या पत्रात काय म्हटले होते?

'माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थांकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्कांविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुशीनें व उघडपणें देववत नाहींत व चालू वर्तनावरून अनुमान केलें असतां पुढेंही देववणार नाहींत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनीं व त्यांनीं केलेल्या पुस्तकांतील भावार्थांशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाहीं.'

जोतिराव फुले यांच्या पत्रातील या भावना आजही अनेकांना आपल्याच वाटत असतील, तर आपण आपल्या भूमिकांचा पुनर्विचार करायला हवा. संमेलन अधिक सर्वसमावेशक करण्याचे प्रयत्न करायला हवेत.

''राजकीय नेते आणि संमेलन राजकीय नेत्यांनी संमेलनाच्या मंचावर यावे की येऊ नये, यासंदर्भात दरवर्षी वाद झडतात. मी या मंचावर येऊन त्यासंदर्भात माझी भूमिका मांडत असतो. माझे म्हणणे असे की, आम्ही राजकारणात असलो तरी आम्ही वाचत असतो. आमच्यापैकी काही लोक लिहीत असतात. आम्ही साहित्य रसिक म्हणून येत असतो. तुम्ही मंचावर नाही जागा दिली तरी खाली बसायला आम्हाला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. कराडच्या संमेलनात यशवंतराव चव्हाण श्रोत्यांमध्ये बसले होते. राजकारण आणि साहित्य यांच्यातील परस्पर प्रवाह हा दुतर्फा आहे. बाळ गंगाधर टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू, अटलबिहारी वाजपेयी ते सध्याचे शशी थरूर अशी मोठी नावे वानगीदाखल देता येतील. कलेला केवळ राजाश्रय लाभला नाही तर स्वत: राजांनी साहित्यकला जोपासली. 'बुधभूषण'कार छत्रपती संभाजी महाराजांच्या लेखणीलादेखील तलवारीची धार होती हे आपण जाणतो. एकूणच राजकारण व साहित्याची फारकत होऊ शकत नाही. ते परस्परांना पूरक आहेत.

''महाराष्ट्रात साहित्याच्या प्रांतातून राजकीय आखाड्यात उतरलेल्या आचार्य प्रल्हाद केशव अत्रेंचा विरोधी पक्षाचे प्रभावी नेते म्हणून आजही आम्हाला अभिमान आहे. निसर्गकवी ना. धों. महानोर विधिमंडळात आले, भाष्यकविता लिहिणारे रामदास फुटाणे आले, 'उपरा'कार लक्ष्मण माने आले, तर त्याची तक्रार विधिमंडळात कुणी केली नाही. ग. दि. माडगूळकर यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल चर्चा होऊ शकत नाही. मराठी माणसाच्या सर्व वर्गामध्ये ज्यांच्याबद्दल प्रचंड आस्था असा महाकवी मराठीत होऊन गेला. त्यांनी लिहिलेले 'गीतरामायण' आजही मराठी माणसांच्या ओठावर आहे. अयोध्येतील राममंदिराच्या उभारणीच्या काळातही महाराष्ट्रात सगळीकडे ऐकू येत होते, ते गदिमांनी लिहिलेले गीतरामायणच.

''साहित्यिक आमच्या क्षेत्रात आले तर स्वागतच आहे. जनमानसात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपण लेखणी झिजवली, तर मनापासून समाधान वाटेल. आम्ही चुकीच्या रस्त्याने जात असलो, तर परखडपणे लिहिण्याची भूमिका घेतली तर त्याचेही स्वागत आमच्या क्षेत्रातले बव्हंशी लोक करतात. स्तुतीपाठकांच्या गर्दीपेक्षा परखडपणे सुनावणारा साहित्यिक महत्त्वाचा असतो. अशा रोखठोक भूमिका घेणाऱ्यांशी संवाद ठेवण्यातच सत्तेचे शहाणपण

असते. दुर्दैवाने अलीकडच्या काळात टीका करणारा, विरोधी लिहिणारा तो विरोधक मानण्याची प्रथा रूढ होत चालली आहे, ही असहिष्णुता फारशी योग्य नाही.

''वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी पूर्वी पुस्तकांसाठी ग्रंथालयांवर अवलंबून राहावे लागायचे. सुविधा मुबलक नव्हत्या तरीही वाचनसंस्कृती रुळली होती. आता साधने वाढली; परंतु वाचनाला अनेक पर्याय आले. दूरचित्रवाणी आली. मनोरंजनाच्या वाहिन्या आल्या, वृत्तवाहिन्या आल्या. स्मार्टफोन आले. माणसांना गुंतवून ठेवणारी अशी अनेक साधने आली. असे असले तरी पुस्तके मोठ्या प्रमाणावर छापली जात आहेत. चांगली पुस्तके खपलीही जात आहेत. गावोगावी ग्रंथप्रदर्शने भरवली जात आहेत. त्या माध्यमातून लोकांपर्यंत पुस्तके पोहोचत आहेत. तरीसुद्धा नव्या पिढीला पुस्तकांशी बांधून ठेवण्यासाठी नव्या माध्यमांचा कल्पकतेने वापर करायला हवा. नव्या पिढीमध्ये साहित्याची गोडी टिकून राहिली तरच साहित्याला भवितव्य असेल. त्या दृष्टीने शाळेपासून प्रयत्न करावयास हवेत. यामध्ये शासनाबरोबरच शिक्षकांचीही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. मराठी शाळा टिकल्या, तर मराठी साहित्य टिकेल. याचा विचार करून शिक्षकांनी त्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करावयास हवेत. मुलांच्यामध्ये वाचनाची गोडी लागण्यासाठी विविध उपक्रम राबवायला हवेत. सकस वाचणारे वाचक वाढले पाहिजेत. तालुका, गावपातळीवर वाङ्मयीन उपक्रम वाढले पाहिजेत. गाव तिथे ग्रंथालय-योजना पूर्वी होती. गाव तिथे ग्रंथप्रदर्शन हा उपक्रम राबवायला पाहिजे. युवा पिढी साहित्य व्यवहाराशी जोडून राहिली तरच सुसंस्कृत आणि नव्या विचारांची पिढी साहित्याच्या माध्यमातून घडू शकेल, याचे भान ठेवायला हवे.

''बदलत्या काळात साहित्यिकांची जबाबदारी- काळ झपाट्याने बदलत आहे. काळाबरोबर समाजासमोरची आव्हानेही बदलत आहेत. समाजाला या आव्हानांची जाणीव करून देण्याबरोबरच त्यांचा सामना करण्यासाठीची मनोभूमिका तयार करण्याची जबाबदारी साहित्यिकांची आहे. साहित्य माणसे जोडण्याचे काम करते; परंतु सध्या समाजाच्या एकात्मतेची वीण त्यामुळे उसवत असल्याचे चित्र दिसते. समाज अत्यंत कठीण आणि नाजूक परिस्थितीतून जात असताना साहित्यिकांची जबाबदारी वाढली आहे. राजकारणामुळे बिघडलेली समाजाची घडी दुरुस्त करण्याची जबाबदारी साहित्यिकांनी आपल्या खांद्यावर घ्यायला हवी. जादूच्या कांडीसारखे ते काम लगेच होणार नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न व्हायला हवेत. भोवताली वणवा पेटला असताना आत्ममग्न राहणाऱ्यांना काळ माफ करणार नाही. महानुभाव, वारकरी परंपरांचे भान ठेवून महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, न्या. रानडे, र. धों. कर्वे, आगरकर वगैरे सुधारकांच्या वाटेने समाजाला नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

''ह्या साहित्यसंमेलनाचे आयोजक, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे व पदाधिकारी, संयुक्त आयोजक सरहद संस्थेचे श्री. संजय नहार व त्यांचे सहकारी यांनी संमेलनाच्या यशस्वितेसाठी खूप कष्ट केले असून संमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचे सुंदर आयोजन केले आहे. यमुनाकिनारी होणाऱ्या ह्या सारस्वतांच्या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. मी जमलेल्या सर्व साहित्यिक, साहित्य अभ्यासक आणि रसिकांचे या प्रसंगी हार्दिक स्वागत करतो. संमेलनाची शोभा वाढविण्यासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीजी यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे, मान्यवर मंत्री महोदयांचे, मंचावरील सर्व मान्यवरांचे आभार मानतो. धन्यवाद!''

■■

# लोकसंस्कृतीच्या स्त्रीवादी अभ्यासक

**वर्षा गजेंद्रगडकर**

'संस्कृती कोणतीही असो, ती सतत बदलत असते. तिचं अंतर्जीवन बदलत असतं. तिचं बाह्यजीवनही बदलत असतं. मात्र तिच्या इतिहासाचे, पूर्वस्थितीचे काही धागेदोरे पुढच्या टप्प्यात या ना त्या रूपाने शिल्लक राहतात. त्यांच्या आधारे संस्कृतीच्या विकासाचा आणि बदलाचा पट उलगडून दाखवता येतो. कधी कधी त्याचं स्वरूप विकृत होऊन ते टिकून राहतं. भाषा, चालीरीती, लोकसमज, व्रतवैकल्यं, वाक्प्रचार यांचा शोध घेता घेता मानवी जीवनाची अनेक गूढं उकलताना दिसतात.' लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर यांनी लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांच्यातला अनुबंध स्पष्ट करताना काढलेले हे उद्गार त्यांच्या संशोधनदृष्टीचा गाभा स्पष्ट करणारे आहेत.

**ग्रामीण जीवनाचा रसरशीत अनुभव**

गेली तीन-साडे तीन दशकं लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या क्षेत्रात अभ्यासक म्हणून ताराबाईंचा ठळक आणि सातत्यपूर्ण वावर आहे. आधी शालेय शिक्षिका आणि नंतर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून त्या ज्ञानक्षेत्राशी निगडित राहिल्या ते केवळ व्यावसायिक उद्देशानं नव्हे. लहानपणापासूनच शिक्षणाकडे त्यांचा ओढा होता. त्यांचा जन्म मध्यमवर्गीय कुटुंबातला; १९३९ सालचा. घरची थोडीफार शेती होती. बरचंसं लहानपण ग्रामीण भागात गेलं. त्यामुळे शेतीचा आणि एकूणच पारंपरिक ग्रामीण जीवनाचा रसरशीत अनुभव त्या घेत गेल्या. चुली वैरणं, अंगण सारवणं, अंगणात रांगोळ्या घालणं, आई-आजीला जात्यावर दळायला मदत करणं, गावातल्या जत्रा-यात्रांमध्ये सामील होणं, तिथे निघणारे छबिने आणि वेगवेगळे उरुस बघणं-अनुभवणं, गावात नित्यनेमानं चालणारी भजनं-कीर्तनं ऐकणं या सगळ्यामधून संपन्न ग्रामीण आयुष्याशी त्यांची नाळ जुळली. अर्थात वडिलांच्या रेल्वेतल्या नोकरीमुळे महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्या बदल्या झाल्या. पुणं, कल्याण, कुर्डूवाडी, नाशिक अशा अनेक गावांमध्ये हे कुटुंब फिरत राहिलं. तरी पण गावाशी असलेला संबंध तुटला नाही. त्यांच्या मनानंही जगण्याचं पारंपरिक दर्शन त्यांच्या अंतर्दृष्टीसमोर सतत लख्ख ठेवलं आणि पुढच्या

वाङ्मयीन प्रवासात त्यांना शिदोरीसारखं ते उपयोगीही पडलं.

### विद्याभ्यासाचा ध्यास

कुटुंबातल्या या थोरल्या लेकीच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणारं घरात कुणी नसलं तरी शाळा आणि अभ्यासाची आणि अवांतर वाचनाची त्यांच्या मनातली ओढ कायम राहिली आणि त्यामुळेच अनेक प्रकारच्या प्रतिकूलता सोसत ताराबाई मॅट्रिक झाल्या. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण मात्र त्यांनी एकीकडे शिक्षिकेची नोकरी करत बहिस्थ पद्धतीनं पूर्ण केलं. पुढे १९८२ मध्ये त्यांनी पीएच.डी.ची पदवीही मिळवली. बहिस्थ पद्धतीनं झालेल्या उच्च शिक्षणामुळे स्वतः भरपूर वाचन करणं, टिपणं काढणं, आवश्यक संदर्भ शोधणं, आशयाची सुसूत्र आणि सुसंगत मांडणी करणं या सगळ्या सवयी अंगात मुरल्या आणि पुढच्या काळातल्या संशोधनाला त्यांची भक्कम बैठक मिळाली.

शालेय वयापासून असलेली वाचनाची आवड नोकरी लागल्यावरही कायम राहिली. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयासारख्या संस्थांमुळे ही आवड चांगली पोसली गेली. कविता, चरित्रं, ऐतिहासिक, ललित, वैचारिक, समीक्षात्मक असं अनेक प्रकारचं साहित्य वाचताना एक दिवस प्रख्यात हिंदी कवी हरिवंशराय बच्चन यांचं ‘मधुशाला’ त्यांच्या हातात आलं आणि ताराबाई झपाटून गेल्या. ‘मधुशाला’तल्या रुबायांचा त्यांनी मराठीमध्ये समछंद अनुवाद केला. या अनुवादाची प्रशंसा खुद्द हरिवंशराय बच्चन यांनीच केली होती. १९७९ मधला हा अनुवाद म्हणजे ताराबाईंचं प्रसिद्ध झालेलं पहिलं पुस्तक. पुढे कवितेशी त्यांचं थेट नातं राहिलं नाही; मात्र त्यांच्या लेखनशैलीत कवितेचा रंग मिसळून गेला आणि गद्य लेखनालाही एक सुंदर प्रवाहीपणा आला.

### नाट्यवेड

नाटक हा लहानपणापासून ताराबाईंच्या प्रेमाचा विषय. १९६७ साली त्या सांगलीत स्थिरावल्या तेव्हा सुरुवातीलाच त्यांनी तिथल्या ॲमॅच्युअर ड्रॅमॅटिक असोसिएशनशी स्वतःला जोडून घेतलं. या संस्थेच्या त्या क्रियाशील सदस्य आणि पदाधिकारीही होत्या. या काळात त्यांनी अभिनय, नाट्यलेखन, दिग्दर्शन अशा सगळ्या भूमिकांमधून नाट्यकलेला आपलंसं केलं. ‘माझे घरटे’, ‘माझी पिल्ले’, ‘एक होती चिमणी’, अशासारख्या अनेक नाटकांमध्ये त्यांनी ठळक भूमिका केल्या. ‘शांतता कोर्ट चालू आहे’, या नाटकातल्या प्राध्यापक बेणारेंच्या भूमिकेसाठी तर त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचा राज्य पुरस्कारही मिळाला. पुढे रंगभूमीशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध राहिला नाही; पण नाटकाच्या अभ्यासातून त्यांचं रंगभूमीशी असलेलं नातं कायम राहिलं. खरं तर नाट्यप्रेमामुळेच त्या संशोधनाकडे वळल्या. अध्यापन करत असतानाही ज्ञानार्जनाची ओढ ताराबाईंना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे त्यांनी पीएच.डी. करायचा निर्णय घेतला. ‘मराठी पौराणिक नाटकांची जडणघडण: प्रारंभ ते १९२०’ हा विषय त्यांनी निवडला होता. या प्रबंधाच्या निमित्ताने, म्हणजेच मराठी रंगभूमीचं मूळ शोधण्याच्या ओढीतून महाराष्ट्रासह केरळ, कर्नाटक अशा काही दक्षिणेकडच्या राज्यांचा प्रवास ताराबाईंनी केला. दशावतार, यक्षगान, कथकली यांसह संपूर्ण दक्षिण भारतातल्या पारंपरिक नाट्यरूपांचा, लोकनाट्यविधींचा त्यांनी अभ्यास केला. १९८२ साली त्यांना पीएच.डी. पदवी मिळाली आणि त्यांच्या प्रबंधाला पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट प्रबंधाचा पुरस्कारही मिळाला.

### संशोधकीय वाटचाल

ताराबाईंच्या प्रारंभिक वाटचालीविषयी इतक्या तपशिलाने लिहिण्याचं कारण लोकसाहित्याच्या त्यांच्या अभ्यासाची पायाभरणी त्यांच्या स्वयंप्रज्ञेनं आणि ज्ञानाच्या विलक्षण ओढीनं जितकी केली आहे, तितकीच ती त्यांनी लहानपणी पाहिलेल्या-अनुभवलेल्या पारंपरिक कौटुंबिक आणि कृषिजीवनानं आणि त्यांच्या नाटकाविषयीच्या उत्कट


अंतस्थ जिव्हाळ्यानंही केली आहे. खरं तर लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि भारतीय स्त्रीजीवन या इतर ज्ञानशाखांच्या अध्ययनाकडे त्या वळल्या, त्याही नाट्यविषयक अध्ययनाच्या गरजेतूनच. गेली जवळ जवळ चार दशकं लोकसंस्कृती आणि अभिजात संस्कृती यांच्या सीमाप्रदेशात वावरताना त्यांच्यातले दुवे ताराबाई अभ्यासत आल्या आहेत. साहित्य आणि संस्कृतीचा जगण्याशी असलेला अनुबंध सातत्यानं आणि डोळसपणे तपासत राहिल्या आहेत. नाटक, कला, साहित्य, स्त्रीजीवन अशा अनेक अंगांचा त्या लोकसांस्कृतिक दृष्टिकोनातून मागोवा घेत आल्या आहेत.

भारतातल्या वैविध्यपूर्ण लोकसाहित्याच्या संकलनाचं काम स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांच्या पुढाकारामुळे सुरू झालं असलं तरी स्वतंत्र विद्याशाखा म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास भारतात सुरू झाला तो १९७० च्या दशकात. मात्र अभ्यासक आणि इथले विविध लोकसमूह यांच्यात असणारी दरी दूर करून या अभ्यासाला देशी दृष्टी देण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले ते १९८० च्या दशकात. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाला अशी नवी दिशा दिली ती दुर्गाबाई भागवत यांच्या अध्ययनदृष्टीने. त्यांच्यासह राजारामशास्त्री भागवत, वि.का. राजवाडे, श्री.व्यं.केतकर, ना.गो.चापेकर या विद्वानांची देशी परंपरा अनुसरत डॉ.रा.चिं.ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे, द.ग.गोडसे या अभ्यासकांनी महाराष्ट्रातल्या लोकसाहित्याच्या आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचा पाया घातला. ताराबाई या सकस आणि समृद्ध अध्ययन परंपरेच्या पाईक आहेत. पाश्चिमात्य सैद्धांतिक अध्ययन पद्धतीवर भर न देता लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टी वापरून आणि आंतरविद्याशाखीय अध्ययन पद्धतीचा अवलंब करून आपल्या सांस्कृतिक परंपरेची रहस्यं उलगडण्याचा प्रयत्न करणाऱ्या महाराष्ट्रातल्या अभ्यासकांच्या मांदियाळीत त्यांचं स्थान आहे.

### नाटक आणि मिथक

गेली जवळजवळ चार दशकं ताराबाईंचा लेखनाचा आणि व्याख्यानांचा प्रपंच अव्याहत सुरू आहे. या काळातल्या त्यांच्या लेखनाचा जमाखर्च मांडायचा झाला, तर प्रारंभी त्यांचं नाट्यविषयक लेखन जास्त झालं कारण सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे नाटक हा त्यांच्या प्रेमाचा आद्य विषय आहे. मात्र तोही रूढ मार्गापेक्षा थोड्या वेगळ्या वाटेने व्यक्त होत राहिला आहे. मिथक आणि नाटक यातला अनुबंध शोधताना अपरिहार्यपणे पुराणकथा, लोकरंगभूमी, आणि सांस्कृतिक पर्यावरण यांच्यातलं नातं शोधण्यात त्यांना अधिक रस होता. त्यातूनच आधुनिक रंगभूमीवरची लोकनागर प्रक्रिया शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 'यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा', 'मिथक आणि नाटक', 'लोकनागर रंगभूमी', 'मराठी नाटक : शोध आणि आस्वाद', 'मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे' या सगळ्या पुस्तकांमधून त्यांनी एकूण नाट्यसंकल्पनेच्या स्वरूपावर वेगळा प्रकाश टाकला आहे. ही नाट्यविषयक पुस्तकं सिद्ध होत असताना एकीकडे ताराबाईंनी लोकसंस्कृतीच्या विस्तृत परिघावर लक्ष केंद्रित केलं कारण नाटक अथवा कोणतीही कला हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. लोकरंगभूमीचा विचार तर एकूण सांस्कृतिक पार्श्वभूमीवरच करावा लागतो. भारतीय मातीतल्या सगळ्याच पारंपरिक कलांना मिथकांचं झळाळतं अस्तर आहे. अर्थातच नाटकही याला अपवाद नाही. मिथक आणि नाटक यांचं तर अतूट नातं आहे.

मिथक हा इंग्रजीतल्या 'मिथ' या संज्ञेचा भारतीय पर्याय आहे. पुराणकथा, दैवतकथा, प्राक्कथा, पुराकथा आणि दिव्यकथा असे या संज्ञेला इतरही पर्यायी शब्द आहेत. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी म्हटल्याप्रमाणे 'माणसाची मूळ प्रवृत्तीच मिथक निर्माण करणारी आहे. प्रारंभिक लोकसमूहांच्या अशा मिथकातूनच नाटक उदय पावलं आणि उत्क्रांतही झालं.' हे तथ्य डोळ्यापुढे ठेवून मराठी पौराणिक




नाटकांची आणि त्या निमित्तानं एकूणच मराठी नाट्यपरंपरेची जडणघडण कशी झाली हे ताराबाईंनी विशिष्ट कालसंदर्भात उलगडून दाखवलं आहे. या कालखंडातल्या विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्कर आणि काकासाहेब खाडिलकर या तीन प्रातिनिधिक नाटककारांच्या विशेष संदर्भात परंपराशील नाट्यरूपांपासून आधुनिक तंत्र वापरणाऱ्या प्रगल्भ नाटकांपर्यंतची मराठी पौराणिक नाट्यसृष्टी त्यांनी अत्यंत बारकाव्यानं तपासली आहे. मिथक आणि नाटक यांच्यातलं नातं हे या तपासणीतलं मुख्य विचारसूत्र आहे. अनिष्टाचं निवारण करून इष्टप्राप्तीसाठी आदिम लोकसमूह जे यातुविधी करत असत, त्या यातुविधींनीच नंतर विधिनाट्याचा पाया घातला. ताराबाईंच्याच शब्दात सांगायचं, तर 'मिथक आणि विधी यांचा संबंध इतका अभिन्न आहे की, मिथक हे विधीचे शब्दरूप आहे, तर विधी हे मिथकाचे क्रियारूप आहे. मिथक म्हणजे नाट्यात्म विधीची संहिता होय, तर विधी म्हणजे मिथकाचे प्रयोगरूप होय. या नाट्यात्म आद्य यातुविधीतूनच नाटकाचा जन्म झाला. नंतरच्या कालखंडात हळूहळू विधिनाट्यातून श्रद्धा हा घटक जसजसा नाहीसा होत गेला, तसतसं करमणूक किंवा रंजनमूल्य प्रभावी ठरत गेलं आणि कला म्हणून नाटक उत्क्रांत होत गेलं,' अशी ताराबाईंची मांडणी आहे. आदिम यातुविधींपासून आजच्या प्रगल्भ नाटकापर्यंतचा जो नाट्यप्रवास घडला, त्यात मूळ यातुविधीची सगळी अंगं हीच नाट्यकलेची अंगं कशी बनली, हेही ताराबाईंनी सैद्धांतिक आणि भावे–किर्लोस्कर–खाडिलकर यांच्या आणि त्यांच्या काळातल्या इतर अनेक नाटककारांच्या नाटकांची समीक्षा करताना उपयोजित स्वरूपातही विशद केलं आहे.

प्रागैतिहासिक अवस्था, शेतीचा शोध लागल्यानंतरचं स्थिर जीवन, शेतीशी निगडित इतर व्यवसायांची उपलब्धता, यंत्रयुगाचा प्रारंभ आणि अर्थकेंद्रित समाजव्यवस्थेचा उदय अशा ५ टप्प्यांवरच्या नाट्यामागचे उद्देश, प्रेरणा, त्यात सहभागी होणाऱ्यांची शारीर आणि मानसिक अवस्था, परिणामी नाट्याचं सिद्ध होणारं रूप या सगळ्या घटकांच्या अनुषंगानं मराठी नाट्याची वाटचाल ताराबाईंनी अभ्यासली आहे. शिवाय या निमित्तानं पौराणिक नाटक आणि संगीताचा अनुबंध, धर्म आणि करमणूक, पौराणिक नाटकं आणि प्रचार, पौराणिक नाटक आणि अद्भुतता यांविषयी ताराबाईंनी केलेलं विवेचनही मराठी नाट्यअभ्यासकांना मार्गदर्शक ठरणारं आहे.

विष्णुदास भावे यांनी मराठी रंगभूमीचा श्रीगणेशा केला असं म्हटलं जात असलं तरी त्यांनी नेमकं नवीन काय केलं याचा स्पष्ट उलगडा कोणी केला नव्हता. तो उलगडा करताना ताराबाई म्हणतात, 'विधिनाट्यातील श्रद्धा विष्णुदासांनी जाणीवपूर्वक वगळल्या असल्या तरी त्यांचा प्रेक्षक हा अजून पारंपरिक श्रद्धांमध्येच गुरफटलेला होता. विष्णुदासांच्या प्रयोगाचे रूपही श्रद्धांना पोषक असेच होते. ज्या वेळी समाजात परंपरेने चालत आलेल्या नाट्यप्रयोगरूपातून धर्मश्रद्धा वगळली जाते, त्या वेळी ते लोकनाट्य होते. या दृष्टीने विचार करता विष्णुदासांचे नाटक हा विधिनाट्यातून लोकनाट्याकडे प्रवास करत असलेला मराठी नाट्यप्रयोगाचा दुवा ठरतो... विधिनाट्यात सर्व कलाघटक उपस्थित असतातच. मात्र त्यांच्या अलग अस्तित्वाची जाणीव नसते. धर्मश्रद्धेचाच पगडा इतका

जबरदस्त असतो की, तिच्या पोटात सगळे कलाघटक एकरूप होऊन सामावलेले असतात. कथावस्तू, संघर्ष, पात्रांच्या विविध स्वभाववृत्ती, त्यांचे संवाद, संगीत, वाद्य, नृत्य, कथेचा निष्कर्ष इत्यादी नाटकातील सर्व प्राथमिक व आद्य घटक विधिनाट्यातही असतात; परंतु धर्मश्रद्धेच्या आवरणाखाली त्यांच्या पृथकत्वाची जाणीवच अद्याप झालेली नसते. मराठी नाटकात ही जाणीव निर्माण करण्यास अनुकूल भूमिका प्रथम विष्णुदास निर्माण करतात, हे त्यांचे सर्वांत मोठे श्रेय आहे.'

मराठी पौराणिक नाटकांविषयी साक्षेपानं लिहिणाऱ्या ताराबाईंनी लोकनाट्य शैलीचा स्वीकार करत सादर झालेल्या अलीकडच्या काळातल्या काही नाटकांचा परामर्शही 'लोकनागर रंगभूमी' या पुस्तकाच्या निमित्तानं घेतला आहे. 'घाशीराम कोतवाल', 'हयवदन', 'महानिर्वाण' या स्वतंत्र नाट्यकलाकृतींचा आणि 'अजब न्याय वर्तुळाचा', 'तीन पैशाचा तमाशा' या ब्रेख्तच्या नाटकांच्या रूपांतराचा सविस्तर विचार करणारं हे पुस्तक आहे. नाट्यनिर्मितीमागचा मूळ विचार आणि त्याची अभिव्यक्ती कितपत आणि कोणत्या अंगानं जाते, याचा देशीयतेच्या मार्गानं शोध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. ब्रेख्तची नाटकं आणि त्याच्या अनुकरणातून सिद्ध झालेली देशी नाटकं यातला फरक स्पष्ट करताना ताराबाईंनी म्हटलं आहे, 'ब्रेख्तचे नवीन नाटक हे खऱ्या अर्थाने लोकांसाठी, एकाच प्रेरणेने एकत्र आलेल्या समूहासाठी, जनतेसाठी होते. लोकनाट्यशैलीतील ही मराठी नाटके मात्र सर्वसामान्यपणे ज्यांना लोक म्हणता येईल अशा, लोकनाट्यशैलीचे प्रचलन ज्या ग्रामीण भागांमध्ये आहे, त्या ग्रामीण भागातील लोकांसाठी नाहीत. इंग्रजोत्तर काळात जी महानगरी संस्कृती निर्माण होऊ घातली होती आणि आज जिचा विस्तार अनेक शाखांनी झाला आहे, त्या संस्कृतीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या पुण्या-मुंबईसारख्या शहरांसाठीच आहेत.' ब्रेख्तच्या प्रभावामुळे १९६० नंतरच्या कालखंडात लोकनाट्यशैलीकडे आकृष्ट झालेल्या मराठी रंगभूमीच्या प्रवासाचा ताराबाईंनी साकल्यानं विचार केला आहे. 'आधुनिक मराठी रंगभूमीचा प्रवास, लोकरंगभूमीच्या वाटा पुसत पुसत (नष्ट करत) सुरू झाला आणि आज स्वातंत्र्योत्तर पाव शतकानंतर तो पुन्हा या लोकरंगभूमीला वाटा पुसत पुसत (विचारीत विचारीत) होताना दिसतो आहे. आज लोकरंगभूमी दात्री आहे, देणारी आहे; तर नागर रंगभूमी धात्री आहे, धारण करणारी, घेणारी आहे,' असं नमूद करत ताराबाईंनी केलेली मराठी नाट्यप्रवासाची ही मांडणी मराठी साहित्यक्षेत्रात स्वतंत्र म्हणावी अशी आहे.

### दक्षिणेतील नाट्येतिहास आणि धर्मेतिहास

मराठी नाटकांच्या जडणघडणीचा अभ्यास करतानाच ताराबाईंनी तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात बसून त्या संस्थेतल्या बहुतेक आद्य नाटकांची हस्तलिखितं बारकाईनं अभ्यासली होती. त्या नाटकांच्या अभ्यासासाठी ज्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचं आकलन आवश्यक होतं, त्या पार्श्वभूमीविषयीची सामग्री पाहण्याचा शक्य तेवढा प्रयत्नही त्यांनी केला होता. शिवाय दक्षिणेतल्या अनेक लोकनाट्यविधींचे प्रयोग त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. या सगळ्या अभ्यासात तंजावरच्या 'कुरवंजी' नाटकातल्या कैकाडणीचं कोडं उकलण्याची गरज त्यांना प्रकर्षानं वाटली. तंजावरच्या मराठी राजपुरुषांनी रचलेल्या या नाटकांत कैकाडी स्त्रीच्या रूपात महामायेचं किंवा आदिमायेचं चित्रण केलेलं आहे आणि मराठी संतांनी रचलेल्या कैकाय नावाच्या भारूडगीतातही अशाच प्रकारचं वर्णन आहे. मराठी संतसाहित्यातल्या या कैकाईशी समरूप असल्यामुळे कुरवंजी नाटकातल्या कैकाडणीच्या चित्राकडे संतसाहित्य आणि लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांचं लक्ष वेधलं गेलं होतं आणि कैकाडणीचा रहस्यभेद करण्याच्या निकडीतून ताराबाईंना संतांच्या भारुडातल्या कैकाईचं महत्त्व जाणवलं होतं. त्यामुळेच या दोघा अभ्यासकांना या दोन प्रकारच्या रचनांमधील

चित्रणाचा एकत्रित अभ्यास करताना, संपूर्ण दक्षिण भारतातल्या समाज, धर्म आणि कला यांच्यासंबंधीची काही रहस्यं उलगडताहेत असं वाटलं आणि यातूनच नाट्यासह साहित्य आणि संस्कृतीच्या विविध अंगांना गवसणी घालणारं 'महामाया' हे पुस्तक डॉ. ढेरे यांच्या सहयोगानं ताराबाईंनी सिद्ध केलं. अभिजनांच्या परंपरेनं रंजन आणि प्रबोधन यांसाठी जिचं महामाया-रूप गौरवलं आहे, त्या स्त्रीच्या आणि तिच्या प्रजेच्या दीर्घकालीन दुरवस्थेचं भेदक दर्शन या पुस्तकानं घडवलं आहे.


बहुविद्याशाखीय दृष्टिकोन अधोरेखित करणारा हा विषय वरवर पाहता 'कैकाय' आणि 'कुरवंजी' यांच्याशी निगडित असला तरी डॉ. ढेरे आणि ताराबाई या दोघांनी या विषयाच्या सर्वांगीण आकलनाच्या निमित्तानं समाज, धर्म, आणि कला यांच्या परस्पर संबंधांच्या अभ्यासाचा एक वस्तुपाठच सादर केला आहे. दक्षिण भारताच्या धर्मेतिहासातली काही कोडी या विषयाच्या अनुषंगाने त्यांनी उकलून दाखवली आहेत आणि भारतीय संदर्भात कलांचं समाजशास्त्र कसं मांडता येईल, हेही सूचित केलं आहे. मुख्य म्हणजे आत्मभान जागृत होऊ लागलेल्या भटक्या-विमुक्त जमातींपैकी कुरव-कैकाडी समाजानं दक्षिण भारताच्या सांस्कृतिक विकासात जे योगदान दिलं आहे, त्यावरही या पुस्तकाने प्रकाश टाकला आहे. भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि अनेक चळवळींना भक्कम सामाजिक-सांस्कृतिक आधार पुरवणारं आणि त्यायोगे त्यांच्या अस्मितेचं सकस पोषण करणारं हे लेखन आहे. म्हणूनच ते मराठी वाङ्मयक्षेत्राच्या दृष्टीनं जेवढं लक्षणीय आहे, तेवढंच भारताची, विशेषतः दक्षिण भारताची सांस्कृतिक-सामाजिक वीण घट्ट करण्यासाठीही महत्त्वपूर्ण योगदान देणारं आहे.

### लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि स्त्रीजीवन

मराठी भाषेला मौखिक साहित्याची दीर्घ परंपरा आहे. लिखित साहित्याची निर्मिती सुरू झाल्यावरही मराठी मातीत मौखिक परंपरा चालू राहिली आहे; पण लोकसाहित्याचा परीघ याहून अधिक व्यापक आहे. पारंपरिक लोकसमूह जे करतात आणि जे बोलतात त्या सगळ्या गोष्टी लोकसाहित्याच्या परिघात सामावलेल्या आहेत. शब्द साहित्याबरोबरच (कथा, गाणी, म्हणी, उखाणे, कोडी इ.) पिढ्यानपिढ्या प्रवाहित झालेल्या चालीरीती, श्रद्धा-समजुती, लोकभ्रम, सगळ्या पारंपरिक कला, कारागिरी आणि क्रीडा, पारंपरिक ज्योतिष आणि वैद्यक, कृषिपद्धती या सगळ्याचा समावेश लोकसाहित्यात होतो. ताराबाई म्हणतात त्याप्रमाणे 'लोकसाहित्य ही जीवनरीतच असते. लोकजीवनपरंपरा अखंड पुढे नेणारी सगळी स्थूल-सूक्ष्म, वैचारिक-भावनिक साधनं (साहित्य) म्हणजे लोकसाहित्य!' लोकसाहित्याची ही व्याप्ती लोकसंस्कृतीच्या सगळ्या क्षितिजांना आपल्या कवेत सामावणारी आहे.

नाट्यकला हा आस्थेचा विषय असल्यामुळे तिचा मूलस्रोत शोधण्यासाठी प्रथम प्रयोगात्म लोककलेचा वेध ताराबाईंनी घेतला. अध्ययनाच्या पातळीवर त्यांचा लोकसाहित्याशी पहिला संबंध जुळला तो असा लोकनाट्याशी. शिवाय त्यांचं संस्कारक्षम वय पारंपरिक एकत्र कुटुंबात गेल्यामुळे स्त्रियांच्या मौखिक साहित्याशीही त्यांचा जवळून परिचय झाला. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे दळण-कांडण, व्रत-वैकल्यं, प्रथा-परंपरा यांच्या सोबतीनं त्या मोठ्या झाल्या. घरातल्या आई-आजी, मामीबरोबर कामं करताना ओव्या, म्हणी, उखाणे, कथा-कहाण्या तोंडपाठ झाल्या. नंतर अभ्यास, नोकरी आणि शहरातलं वास्तव्य यामुळे या पारंपरिक आयुष्याचा धागा हातातून निसटला खरा; पण जाणत्या वयात स्त्रियांच्या संदर्भात वाचन आणि अभ्यास करताना हे पूर्वसंचित आतून उसळून आलं. पूर्वीच्या त्या पारंपरिक जगण्याचा, विशेषतः स्त्रियांच्या आयुष्याचा, त्या वेळी ऐकलेल्या-पाठ झालेल्या कहाण्यांचा आणि गाण्यांचा अन्वय नव्या दृष्टीनं लागत गेला. हळूहळू त्यांना जाणवलं की, स्त्रियांच्या संदर्भात





आजवर झालेलं लेखन हे अभिजन स्तरावरच्या, पुरुषांनी लिहिलेल्या साहित्यातल्या संदर्भांच्या आधारे उभं आहे. स्त्रीला स्वतःच्या जगण्याबद्दल काय म्हणायचं आहे, याचा विचार सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासकांनी केलेलाच नाही, असं ताराबाईंच्या लक्षात आलं. एकीकडे आधुनिक स्त्रीवादी, मुख्यतः पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव असणारं लेखनही त्या वाचत होत्या आणि भारतीय स्त्रीवादी चळवळींच्या दृष्टीनं, हे आधुनिक म्हणवणारं सैद्धांतिक लेखन पोषक नाही, हेही त्यांना जाणवत होतं. अशा वेळी लोकसाहित्यातल्या स्त्री प्रतिमा त्यांना खुणावत राहिल्या. इथली लोकपरंपराच त्यांच्या मनातल्या स्त्रीवादाला देशी ओळख देण्यासाठी त्यांच्या मदतीला आली. मग आधुनिक तात्त्विक स्त्रीवादी विचारांना परंपराशील स्त्रीसाहित्याच्या उदाहरणातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न लेखन आणि व्याख्यानं या दोन्ही माध्यमांतून ताराबाई करत राहिल्या. 'मातीची रूपे' या पुस्तकाच्या मनोगतातले ताराबाईंचे उद्गार या संदर्भात उल्लेखनीय आहेत. त्या म्हणतात, '...पारंपरिक स्त्रीसाहित्यातून स्त्रीचं मन त्या त्या प्रादेशिक लोकबोलींतून उत्कटतेने व्यक्त झाले आहे. विशेष म्हणजे प्राचीन काळापासूनच्या अभिजन साहित्यातून जी स्त्री चित्रित केली गेली आहे, त्यापेक्षा ही स्त्री वेगळी तर आहेच; पण ती अधिक वास्तव आणि सर्वसामान्य स्त्रीमनाची प्रामाणिक अभिव्यक्ती आहे. तिने रूढ अभिजनप्रधान वर्णित स्त्रीप्रतिमेला छेद दिला आहे. अनेकदा रूढ प्रतिमा उद्ध्वस्त करणारी बंडखोर भूमिका घेतली आहे. ती सतत कालसंवादी राहिली आहे. सुख-दुःख, आनंद-असमाधान, वेदना-विद्रोह हे सगळेच स्त्री व्यक्त करीत आली आहे. स्त्रीच्या भोवती पुरुषकेंद्री, पितृसत्ताक व्यवस्थेची कुंपणे अनेक अंगांनी बांधली गेलेली असूनही कधी परंपरेला शरण जात संवादी तर कधी विसंवादी सूरही ती आळवत आली आहे. व्रतवैकल्ये, देवधर्म, कुलधर्म-कुलाचार यांद्वाराही स्त्रीचे गौणत्व अधोरेखित करण्याचा वारंवार प्रयत्न झाला. आदिम स्त्रीसत्ताकाच्या खुणा पुसून तर टाकल्या गेल्याच; पण अनेकदा त्याच प्रथा-कथांची स्त्रीला परवश करणारी मांडणी केली गेली. कधी भय दाखवून तर कधी गौरवाचा मुलामा देत हे होत गेले. संपूर्ण संस्कृतीच्या प्रवाहात आणि प्रवासात दिसणाऱ्या अशा अनेक खुणा शोधण्याचा प्रयत्न मी माझ्या लेखनातून करत आले आहे.'

'लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा' (याच पुस्तकाचं परिवर्धित रूप नंतर 'लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिमा' या नावानं प्रकाशित झालं.), 'लोकसंचित', 'मातीची रूपे' यांसारख्या पुस्तकांमधून ताराबाईंनी याच खुणांचा मागोवा घेतला आहे. पूर्वीच्या अनेक अभ्यासकांनी स्त्रियांच्या पारंपरिक साहित्याच्या संकलनाचं मोठं काम केलेलं होतं; पण ताराबाईंच्याच शब्दांत सांगायचं तर 'या पूर्वसंचिताकडे पाहण्याचा बहुतेकांचा दृष्टिकोन उमाळ्याचा, काहीसा भाबडेपणाचा होता.' ताराबाईंच्या लेखनाचं वेगळेपण हे की, त्यांनी भारतीय स्त्रीजीवन, प्रथा-परंपरा, कला-साहित्य यांचा लोकसांस्कृतिक पार्श्वभूमीवर आणि लोकसंस्कृतीतल्याच घटकांच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि लोकसाहित्याची स्त्रीवादी चिकित्सा करणाऱ्या लेखनाद्वारे मराठीतल्या स्त्रीवादी लेखनाला आणि स्त्रियांच्या चळवळीलाही नवा आयाम दिला.










बायकांच्या जात्यावरच्या ओव्या असतील, म्हणी–उखाणे असतील, शेतात काम करताना म्हटली जाणारी गाणी असतील, व्रत–वैकल्यांशी निगडित कथा–कहाण्या असतील किंवा शतकानुशतकं चालत आलेल्या अनेकानेक रीतीभाती असतील, या सगळ्या साहित्याद्वारे–साधनांद्वारे ताराबाईंनी पारंपरिक समाजजीवनाकडे रहस्यवेधी दृष्टीनं पाहिलं आहे आणि भूतकाळाला वर्तमानाच्या उजेडात निरखलं–तपासलं आहे. समाजेतिहासाच्या अभ्यासाचं साधन म्हणून त्यांनी सगळ्या लोकसाहित्याचा विचार केला आहे. याचं एखादं उदाहरण द्यायचं तर ऋषिपंचमीच्या व्रताचा ताराबाईंनी लावलेला अन्वयार्थ बघू या. त्या म्हणतात, 'शेतीचा शोध हा स्त्रीचा! पूर्वी शेती, स्त्रीच्या आधीन होती, तेव्हा समाजव्यवस्था मातृसत्ताक होती. पुढे स्त्री आणि भूमी दोन्हींवर पुरुषाने स्वामित्व मिळवले. नांगराचा शोध लागल्यावर शेतीला बैलाचा उपयोग होऊ लागला. हे बैल खच्ची केलेले असत. 'पौरुषहीन बैलाने निर्माण केलेले मला काही नको. निदान एक दिवस तरी मी माझ्या अस्मितेच्या खुणा जपेन', असं म्हणत सुरुवातीला ती स्वतःच्या हाताने लावलेले, आपल्या अंगणात–परसात पिकेल ते खाऊ लागली. अशा तऱ्हेने या व्रताची सुरुवात स्त्रीच्या सामर्थ्याच्या, सन्मानाच्या खुणा जपण्यासाठी झाली. पुढे पुरुषप्रधान संस्कृतीत, हे व्रत स्त्रीने रजस्वला अवस्थेत, विटाळ कालवून केलेल्या पापाचे परिमार्जन करण्यासाठी करावे, असा अर्थ या व्रताला चिकटला. पुरुषांनी आपल्या फायद्यासाठी तो चिकटवला.' समाजरचना आणि सामाजिक मानसिकता बदलत गेल्यावर या व्रताचा अर्थ कसा बदलत गेला हे स्पष्ट करून त्या विचारतात, 'स्त्री निर्मितीक्षम आहे. गर्भवतीचे कौतुक आपल्या संस्कृतीने नेहमीच केले आहे. मग या अवस्थेची पूर्वअट असलेली रजस्वला अवस्था अपवित्र कशी असेल? सगळी बंधनं झुगारून स्त्रीनं आपलं स्वतंत्र अस्तित्व जपलं पाहिजे, असा आग्रह धरणाऱ्या आधुनिक स्त्रीवादी विचारसरणीपेक्षा, परंपरेचाच उजेड स्त्रियांच्या ओंजळीत ठेवत त्यांचं आत्मभान जागं करू पाहणारी ताराबाईंची अध्ययनदृष्टी अधिक मूलगामी, स्त्रीवादाला भारतीय बैठक देणारी आणि सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनं अधिक पोषक आहे, असं निश्चित म्हणता येईल.

रंगभूमीइतकाच स्त्रीजीवन हा ताराबाईंच्या आत्मीयतेचा विषय. आधुनिक स्त्रीपासून थेट आदिकाळातल्या स्त्रीपर्यंत स्त्रीची अनेक रूपं त्यांनी निरखली आहेत आणि तिच्या कौटुंबिक–सामाजिक स्थानाचा, तिच्या शोषणाचा, तिच्या प्रश्नांचा आणि तिच्या अस्मितेचा विचार त्यांनी केला आहे. समकालीन मध्यमवर्गीयच नव्हे तर ग्रामीण आणि दलित स्त्रीजीवनही त्यांनी जिव्हाळ्यानं अभ्यासलं आहे. लोकवाङ्मय हे प्रामुख्यानं स्त्रीनिर्मित असल्यामुळे ताराबाईंनी या वाङ्मयाच्या अध्ययन–

संशोधनाद्वारे पारंपरिक भारतीय स्त्रीजीवनाचा समग्र पटच धांडोळला आहे आणि पूर्वीच्या अभ्यासांमध्ये ज्याचा बहुतांशी अभाव होता, तो स्त्रीमनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांच्या संवेदनशील अंतर्दृष्टीनं केला आहे. 'सीतेला सासुरवास सासू कैकयीनं केला, रामासारखा भरतार तिला भोगू न्हाई दिला' यासारख्या ओवीद्वारे आपल्याला होणारा सासुरवास सीतेच्या मुखातून व्यक्त करणारी स्त्री असेल, घाम गाळायला लावणारे कष्ट करतानाही 'कपाळीचं कुंकू माझ्या घामानं पांगलं, त्या धन्याला देई देवा आयुष्य चांगलं' असा नवऱ्याविषयीचा मनःपूत प्रेमभाव व्यक्त करणारी स्त्री असेल, 'ज्याला नाही लेक त्याने तुळस लावावी, लगीन लावून देव करावे जावई' असं म्हणताना आपल्या भवतालावर, झाडापानांवरही निर्व्याज प्रेम करणारी स्त्री असेल, 'गाण्याच्या नादात तुला ओढीते दगडा', असं म्हणत जात्याच्या दगडाशीही संवाद करणारी, त्याच्याजवळ मन मोकळं करणारी स्त्री असेल, किंवा 'राम म्हणू राम नाही सीतेच्या तोलाचा, हिरकनी सीताबाई, राम हलक्या दिलाचा' असं रामकथेचं रोखठोक मूल्यमापन करणारी स्त्री असेल, ताराबाईंनी अशा लोकसाहित्यातल्या अनेक स्त्री प्रतिमांचा शोध सातत्यानं घेतला आहे.

एकोणिसाव्या शतकातल्या द्रष्टया, उदारमतवादी सुधारकांनी भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले; पण तोवर इथल्या समाजानं स्त्रीला पायातल्या वहाणेचा दर्जा आणि तशीच वागणूक दिली होती. पुरुषप्रधान समाजाची हीच विचारधारा पुरुषांनी निर्माण केलेल्या त्या वेळच्या साहित्यातून व्यक्त झाली आहे. या विचारधारेचा उगम मनुस्मृतीमध्ये असल्याचं ताराबाईंनी 'स्त्रीपीडक विचारधारेचा मूलस्रोत' या लेखात ('लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिमा' या पुस्तकात समाविष्ट लेख) म्हटलं आहे. मात्र मनुस्मृती ही एका व्यक्तीची निर्मिती नाही; तर ती त्या काळातली लोकधारणा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. तत्कालीन समाजाच्या ज्या धारणा होत्या, जी लोकरहाटी होती, त्या आचारपद्धतीलाच मनुस्मृतीत शब्दबद्ध केले आहे. स्त्रीला मन आहे, भावना आहेत, ही जाणीव त्या वेळच्या समाजाला, त्यातील पुरुषांना नव्हती, म्हणून पुरुषांच्या वाङ्मयात ती जाण उतरली नाही, हे पुरुषांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाचं लक्षण सांगून स्त्रीचे मन, तिच्या भावना, स्वतःच्या आयुष्याविषयी तिला बोचत असलेली अन्यायाची जाणीव, त्यातून उमटणारी वेदना, आणि उठणारे बंडखोर विचार, परंपरेचा स्वतंत्र अर्थ लावणारी तिची प्रज्ञा आणि जीवनाविषयीची प्रगल्भ जाण ही जात्याच्या घरघरीपलीकडे कधी पोहोचलीच नाही; पण पारंपरिक स्त्रीगीते ही तिच्या भावाभिव्यक्तीची स्वगते आहेत, हेही ताराबाईंनी स्पष्ट केलं आहे आणि लोकसाहित्यातून दिसणारा स्त्रीचा खराखुरा चेहरा, तिची संवेदनशीलता आणि तिची सामर्थ्यंही समोर आणली आहेत.

अर्थात ताराबाई केवळ पारंपरिक स्त्रीप्रतिमांवर प्रकाश टाकून थांबलेल्या नाहीत. लोककथा, लोकगीतं, ओव्या, म्हणी, उखाणे यांसारख्या स्त्रीनिर्मित वाङ्मयाचा आणि स्मृति-पुराणं यांसारख्या पुरुषांनी निर्माण केलेल्या वांङ्मयाचा धांडोळा घेताना त्यांनी इथल्या सामाजिक स्थित्यंतरांचाही वेध घेऊ पाहिला आहे. स्त्रीचा गौरव करणाऱ्या मातृसत्ताक समाजव्यवस्थेकडून स्त्रीला गौण लेखणाऱ्या समाजरचनेपर्यंत भारतीय समाज कसा पोहोचला याचं विश्लेषणही ताराबाईंनी आपल्या लेखनातून वारंवार केलं आहे. स्त्रीच्या ठायी निसर्गदत्त असलेल्या मातृशक्तीचं भय वाटण्यातून पुरुषमनाने जो आक्रमणाचा पवित्रा घेतला, आणि पिढ्यानपिढ्या संस्कृतीच्या नावावर विकृत समर्थने देत जो भ्रांत अहंगंड (शसे) पोसला, त्याचीच प्रतिक्रिया म्हणून स्त्रीने नेमके आपल्या मातृसामर्थ्यालाच दुबळेपण मानले. मातृत्व हे पूर्णतः पुरुषसापेक्ष असेल तरच ते सुप्रतिष्ठित असते, असे मानल्याने स्त्रीमध्ये एक भ्रांत न्यूनगंड निर्माण झाला आहे, तिला स्वतःच्या सामर्थ्याचा विसर पडला आहे. अशी विवेचक मांडणी

करणाऱ्या ताराबाई या न्यूनगंडातून बाहेर येण्यासाठी परंपराच कसं बळ देऊ शकते, हेही सूचित करत राहिल्या आहेत. दुर्गा, काली, महालक्ष्मी, महासरस्वती ही मिथकं स्त्रीच्या स्वतंत्र प्राकृतिक सामर्थ्याची साक्ष देणारी आहेत, हे चैतन्यपूर्ण भान जागवून स्त्रीची न्यूनगंडातून आणि पुरुषाची अहंगडातून मुक्तता झाली, तर उभयपक्षी निर्भय, आनंदपूर्ण आणि खऱ्या अर्थानं सुसंस्कृत जग निर्माण होऊ शकेल, असा जो आशावाद ताराबाईंच्या लेखनातून (उदा. स्त्रीची सर्जनशीलता, कामवासना आणि मुक्ती हा 'लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिमा' मधला लेख) व्यक्त होतो, तो स्त्रीवादी विचारसरणीला अधिक विवेकी आणि समाजाभिमुख करणारा आहे आणि मराठीतल्या स्त्रीविषयक वाङ्मयात त्यांच्या परंपरा आणि नवता यांचा मेळ घालणाऱ्या या दृष्टिकोनानं महत्त्वाची भरही घातली आहे.

स्त्रीवादी कार्यकर्ते किंवा अभ्यासक असोत किंवा एकूणच परिवर्तनवादी विचारवंत असोत, या सगळ्यांनीच परंपरेकडे पूर्ण पाठ फिरवण्यापेक्षा परंपरेतलं सकस ते निवडून आधुनिक विचारसरणीला त्याची जोड द्यायला हवी, असं ताराबाई आग्रहपूर्वक सांगत आल्या आहेत. ताराबाईंनी डॉ. ढेरे यांच्यासारख्या त्यांना गुरुस्थानी असणाऱ्या अभ्यासकाच्या विचारसूत्रांचा मागोवा घेत, लोकपरंपरेकडे बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून बघण्याची आवश्यकताही आपल्या लेखनातून कायम व्यक्त केली आहे. या संदर्भात त्यांचं विवेचन मुळातून वाचण्याजोगं आहे. 'अस्मितेच्या शोधाची पाऊलवाट' (लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिमा) या लेखात त्या म्हणतात, '..परंपरेचा अभ्यास करताना अधिक साक्षेपी असण्याची गरज आहे. समाजशास्त्रीय भूमिकेतून पारंपरिक लोकसाहित्याचा अभ्यास व्हायला हवा. परिवर्तनासाठी अनेकदा परंपरेतच फार सबळ स्थाने सापडतात. सीतेवरच्या अन्यायाबद्दल आपण शिक्षित मंडळी आपल्या परिभाषेत बोलू लागलो की, खरे-खोटे परंपरावादी बिचकतात आणि परिवर्तनापासून फारच दूर जातात; पण परंपरेतल्याच स्त्रीच्या ओव्यांनी केलेले राम-सीतेचे मूल्यमापन पाहिले की, त्यांनाही विचारोन्मुख व्हावेच लागते. परिवर्तनवाद्यांनी परंपरेतील अशा बलस्थानांचा आवर्जून धांडोळा घ्यायला हवा. त्यासाठी समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, धर्माच्या उदय-विकासाची मीमांसा, चालीरीती-रूढींच्या मागची समाजाची मानसिकता यांचा शोध घ्यायला हवा. नवसासायासापासून परावृत्त करण्यासाठी एक व्याख्यान देण्यापेक्षा संत तुकारामांच्या परखड अभंगांचा हवाला अधिक लाभदायक होईल. 'नवसे पुत्र होती, तरी का करणे लागे पती?' असा खडा सवाल टाकणारे तुकारामबाबा येथील समूहमनाला आजही अधिक जवळचे, अधिक आपले वाटतात, याचे भान परिवर्तनात असणे आवश्यक आहे.'

लोकसाहित्याच्या जोडीनं, लोकमानसाची नस नेमकी जाणणाऱ्या ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेवादी संतांच्या मांदियाळीत आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या संतकवयित्रींचा, त्यांच्या कार्याचा, काव्याचा आणि त्यांच्या मुक्तिसंकल्पनेचा विचारही ताराबाईंनी साकल्यानं केला आहे. संतांचा मुक्तिमार्ग आणि आधुनिक स्त्रीमुक्तिविचार यांच्यातला अनुबंध शोधताना भारतातलं समग्र लोकजीवन आणि मध्ययुगीन लोकसंस्कृतीची बैठक लक्षात घेऊन स्त्रीसंतांच्या कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केलं आहे आणि संत स्त्रियांची भक्तिक्षेत्रातली मुक्तिआंदोलनाची भूमिका देशातल्या सांस्कृतिक पर्यावरणात तपासून पाहिली आहे. 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर' हे ताराबाईंचं पुस्तक म्हणजे संत स्त्रियांच्या आध्यात्मिक मुक्तिसंकल्पना आणि प्रत्यक्ष जीवनसंघर्ष यांचा आजच्या स्त्रीमुक्तीच्या संदर्भात काही संबंध आहे का हे शोधण्याचा प्रयत्न आहे. 'पती हाच परमेश्वर' ही शतकानुशतकांची समजूत रक्तात मुरलेल्या भारतीय संत स्त्रियांनी पतीचा त्याग करून परमात्म्याला आपलंसं केलं आहे, असामान्य धैर्य दाखवून स्वतःला

उघडपणे स्वैरिणी म्हणवून घेतलं आहे, आणि लोकमर्यादेची सगळी बंधनं झुगारून देत आपल्या ‘निर्लज्जपणा’ची ग्वाही मुक्तपणे दिली आहे. अब तो बात फैल गई, होनी हो सो होई’, अशी सामाजिक संकेतांविषयीची बेफिकिरी असो, ‘डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी’ असं उघड सांगणारी जनाबाई असो किंवा ‘सोडूनी लाज झाले निर्लज्ज, डौर घेत हाती, प्रेमभरे नाचत पुढती अविद्या करुनी परत’ असा स्वैरिणी झाल्याचा दांडोरा पिटणारी बहिणाबाई असो, ‘या सगळ्या जणींचा परमश्रेयाच्या दिशेने जाणारा जो प्रवास आहे, ते त्या त्या स्त्रीचं व्यक्तिगत कर्तृत्व आहे, त्यांचं व्यक्तिगत अलौकिक धाडस आहे, त्यामुळे एका अर्थानं संत स्त्रिया या स्त्री मुक्ती आंदोलनाच्या अग्रदूत आहेत’, असं ताराबाईंनी म्हटलं आहे. आजची आधुनिक स्त्री संत स्त्रियांना गवसलेला मुक्तीचा अंतस्थ ‘आत्मस्वर’ आत्मसात करण्याचा प्रयत्न करते आहे, असं सांगताना संत स्त्रियांनी जो स्वप्नादर्श म्हणून पाहिला, तो प्रत्यक्षादर्श करण्याकडे आजची स्त्रीमुक्ती चळवळ जाते आहे की काय, याचा शोध घेण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली आहे. स्त्रीवरच्या अनेक शतकांच्या दडपणातून सुटण्यासाठी संत स्त्रियांनी (आणि परममुक्तीसाठी पुरुष संतांनीही) ‘सौरी’ (स्वैरिणी) व्हावं, ‘वेसवा’, ‘घररिघी’, ‘पुरुषरत’ व्हावं या परिभाषेतच आपल्या अंतस्थ मुक्तीचा स्वर मुखरित का केला असेल, या प्रश्नाचा शोध ताराबाईंनी घेतला आहे आणि ‘प्रकृती’च्या, देहाच्या, भौतिक हव्यासाच्या मोहातून मुक्त झाल्याखेरीज स्त्री-पुरुष कुणालाच आत्मिक मुक्तीचा आनंद मिळणार नाही, हेच सगळ्या स्त्री -पुरुष संतांनी स्वैरिणीच्या रूपकातून सांगितलं आहे, या प्रतिपाद्यापर्यंत त्या पोहोचल्या आहेत.

मध्ययुगीन साहित्य आणि संतसाहित्य यांच्या अध्ययनाचा धागा असा वर्तमानाशी जोडून घेताना ताराबाईंनी आजच्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीतला गुंताही पुनःपुन्हा स्पष्ट केला आहे. आजचं भौतिक वास्तव अधिकाधिक गोंधळात टाकणारं होत चालल्याची जाणीव त्यांना आहे. ‘शारीर देहा’वरची केवळ पुरुषांचीच नव्हे तर स्त्रियांचीही नजर अजून सुटली नसल्याची खंत त्यांना आहे, मात्र माणूस चुका करत शिकत जाईल, अपूर्णातून अधिक पूर्णत्वाकडे, महामानवतेकडे जात राहील, कधी तरी, केव्हा तरी संतांना अभिप्रेत असलेला आत्ममुक्तीचा मार्ग त्याला उमगेल, असा आशावादही त्यांच्या लेखनात कायम आहे.

### संशोधकीय लेखनाला लालित्याचा स्पर्श

ताराबाईंच्या नावावर आजमितीला जी ३०-३२ पुस्तकं आहेत, त्यापैकी ८-१० ग्रंथ संशोधकीय स्वरूपाचे आहेत. ललित गद्य आणि समीक्षात्मक लेखनही ताराबाईंनी पुष्कळ केलं आहे. मात्र या सगळ्याच लेखनाला लालित्याचा गडद रंग आहे. त्यांचं संशोधकीय लेखनही सहज-सोपं आणि प्रवाही आहे. संशोधकीय लेखनात स्वारस्य नसणाऱ्या वाचकांनाही सहज आकृष्ट करणारी त्यांची लेखणी आहे. त्यामुळेच लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासकांखेरीज सर्वसामान्य वाचकांनीही त्यांचं संशोधकीय लेखन आपलंसं केलं आहे. शिवाय संशोधनाचे अनेक विषय ताराबाईंनी जसे लेखनातून विशद केले आहेत, तसे ते व्याख्यानरूपानं त्यांनी वेगवेगळ्या स्तरांवर मांडले आहेत. रंगभूमीवर अभिनय करण्याच्या कलेनं कदाचित त्यांच्या वक्तृत्वालाही आकर्षक शैली दिली असेल. फड गाजविण्याच्या या कौशल्यामुळे त्यांचं अध्ययन-संशोधन अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचलं आहे. रंगभूमी, लोकसंस्कृती आणि स्त्री या तीन धाग्यांनी विणली गेलेली ताराबाईंच्या अध्ययनाची वीण जशी दुर्मीळ आहे, तशी त्यांची ही अभ्यासक म्हणून लोकाभिमुखताही ठळक आहे.

■■

**वर्षा गजेंद्रगडकर**
९८२२०५६१२४

सरहद, पुणे आयोजित
अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

# दिल्लीत मराठीचा अखिल भारतीय जागर

**ज्योत्स्ना चांदगुडे**

महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेतील साहित्य संमेलनाचे एक लखलखते सुवर्णपान म्हणजे नवी दिल्ली येथे झालेले ९८ वे अ. भा. म. साहित्य संमेलन.

मराठी साहित्याच्या परंपरेला अनुसरून, साहित्याचा जागर करण्यासाठी अतिशय उत्साहाने आणि अभिमानाने ग्रंथदिंडीची सुरुवात झाली. ग्रंथदिंडीचे उद्घाटन मा. उषा तांबे अध्यक्ष अ. भा. म. सा. महामंडळ यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे मा. मिलिंद मराठे नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाचे चेअरमन उपस्थित होते. या ग्रंथ दिंडीत महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्याध्यक्ष मा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह मा. सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष मा. विनोद कुलकर्णी आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. संसद भवन म्हणजे लोकशाहीचे मंदिर ते साहित्याचे मंदिर म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी, तालकटोरा स्टेडियम पर्यंत अतिशय आनंदाने ढोल लेझीमच्या गजरात उत्साहवर्धक प्रारंभ झाला.

त्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन ९७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे मा. विकास खारगे सांस्कृतिक सचिव महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते .

यानंतर संमेलनात ज्या कार्यक्रमाची सगळेच आतुरतेने वाट पाहत होते त्या संमेलनाचे उद्घाटन विज्ञान भवन इथे निवडक निमंत्रितांच्या उपस्थितीत झाले. सुरुवातीला काश्मिरी गायिका शमीम अख्तर यांनी गायलेल्या, 'जय जय महाराष्ट्र माझा,' या महाराष्ट्र गौरवगीताने झाली. त्यानंतर संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. शरद पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविकात मा. संजय नहार यांनी साहित्य संमेलनाची पार्श्वभूमी विशद केली. 'भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्राचा वाटा असावा, तो प्रेमाचा असावा. अशा साहित्य संमेलनांतून त्याचीच पायाभरणी होत असते. बंदुका मोडून लेखणीने माणसे जोडायला हवीत. माणसे प्रेमाने एकत्र यायला हवीत' हे ही आवर्जून सांगितले.

संमेलनाच्या अध्यक्ष मा. तारा भवाळकर यांनी आपल्या रसाळ पण रोखठोक शैलीत आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या, 'जी विठ्ठल मूर्ती पंतप्रधानांना

भेट दिली आहे ती उदार संस्कृतीचे प्रतीक आहे कारण विठ्ठल कर्नाटकातून आला आणि महाराष्ट्रात स्थिर झाला. अभिजात मराठीचे पायाभरण संतांनी केले. त्यांच्या बोलीमधून भाषा जिवंत राहिली म्हणून भाषा ही जैविक आहे. भाषा संस्कृतीचे बलस्थान आहे. ती आपलेपण निर्माण करते. आपली भाषा जोडणारी असावी. महाराष्ट्राला पांडुरंगाचे स्मरण करायला लावणारी ही भाषा संतांनी जिवंत ठेवली. मराठी भाषेचा उगम ज्या दिवशी आईने बाळाला पहिली ओवी म्हटली त्या दिवशी झाला. महाराष्ट्रातील संत पुरोगामी होते. जातपात, स्त्री, पुरुष या भेदाच्या पलीकडे गेलेले होते म्हणून स्त्री अध्यक्ष आहे हे महत्त्वाचे नसून गुणवत्ता महत्त्वाची आहे. हे संमेलन लोकभाषा ते अभिजात भाषा असे आहे. ते सर्व बोली भाषांचे संमेलन आहे' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी संमेलन दिल्ली येथे का घेतले जात आहे ते स्पष्ट केले. ते म्हणाले, 'सरस्वतीचे पुत्र वाट पाहत होते की, जेव्हा मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळेल तेव्हाच हे संमेलन दिल्लीत होईल. त्यानुसार हे संमेलन दिल्लीत होत आहे.' त्यांनी संमेलनाला शुभेच्छा दिल्या.

'मराठी साहित्य संमेलन सीमित नसून स्वातंत्र्याच्या लढाईचा त्याला गंध आहे आणि सांस्कृतिक विरासत आहे' अशा शब्दांत भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेविषयी गौरवोद्‌गार काढले. 'ज्ञानबा तुकारामांच्या मराठीला राजधानी दिल्ली अतिशय मनापासून अभिवादन करते' असे म्हणत शुभेच्छा दिल्या. 'जागतिक मातृभाषा दिना'च्या दिवशीच हे संमेलन घेतले म्हणून कौतुक केले. मराठी भाषेवर प्रेम आहे म्हणून ती बोलण्याचा आणि नवीन शब्द शिकण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आवर्जून सांगितले. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांचे उल्लेख ओघवत्या शैलीत केले. गजानन दिगंबर माडगूळकर आणि सुधीर फडके यांच्या गीत रामायणाचा उल्लेख केला, तर स्वातंत्र्य प्राप्तीची आस असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि बाजीराव पेशवे, वासुदेव बळवंत फडके, टिळक, सावरकर यांच्या योगदानातून स्वातंत्र्य मिळाले हे ही सांगितले. गडकरी, केशवसुत, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, आंबेडकर यांच्या साहित्यातून आणि कार्यांतून नव्या युगाची विचारधारा पेटली आणि नवीन समाजाची निर्मिती झाली. अशा मराठीतील नामवंत संत, पराक्रमी योद्धे, लेखक, कवी, समाज सुधारक यांचे अस्खलित मराठीत उल्लेख करत त्यांनी रसिकांची मने जिंकली.

या साहित्य संमेलनात प्रथमच दोनदा उदघाटन झाले. माजी केंद्रीय मंत्री मा. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. पूर्वाध्यक्ष मा. रवींद्र शोभणे यांनी पूर्व संमेलनातील अनुभव सांगून शिक्षकांशी संवाद साधला. त्यानंतर संमेलनाध्यक्ष मा. तारा भवाळकर यांनी अध्यक्षीय भाषणात साहित्य आणि संस्कृतीच्या मिलाफातून मराठी वाङ्‌मयाच्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी इंद्रजित भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन झाले. वैविध्यपूर्ण कवितांनी हे संमेलन खूप रंगले. यात साधारण ४० ते ४२ कवी सहभागी झाले. सर्वच कवींच्या उत्तम आणि विविधरंगी कवितांनी कविसंमेलन छान रंगत गेले.

डॉ. अनुपमा उजगरे यांच्या अध्यक्षतेखाली बहुभाषिक कविसंमेलन उत्साहात पार पडले. १४ ते १५ कवींनी विविध अनुभवाच्या कवितांनी रसिकांना समृद्ध केले.

'आनंदी गोपाळ' यावर झालेली परिचर्चा सुंदर झाली. रवींद्र वाटाणे अध्यक्ष होते, तर डॉ. समिता जाधव, मा. सुनील पाटील, मा. चित्रा वाघ, डॉ. वंदना चव्हाण, डॉ. तेजस चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात




'सामाजिक कार्य आणि मराठी साहित्य' या विषयावर परिसंवाद मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिभा बिस्वास, डॉ. कोमल ठाकरे, मोहिब कादरी, विश्वास लीलावती, जयदेव ठाकूर या मान्यवरांनी परिसंवादात सहभाग घेत, सामाजिक कार्य आणि मराठी साहित्याची परस्पर सांगड उलगडून दाखवली.

'असे घडलो आम्ही' डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात मा. पृथ्वीराज चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री मा. सुरेश प्रभू, माजी केंद्रीय मंत्री डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषद उपसभापती यांची मुलाखत मुलाखतकार - श्री. राजीव खांडेकर, श्री. प्रवीण बर्दापूरकर यांनी घेतली.

साहित्य संमेलनात अनुवाद ह्या विषयावर देखील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या परिसंवादात 'अनुवाद मराठी भाषेतून इतर आणि इतर भाषेतून मराठीत' ह्या विषयाच्या अनुषंगाने सकस आणि महत्त्वपूर्ण चर्चा झाली. वक्त्यांनी विषयाचा आढावा घेताना अनुवाद ह्या अत्यंत आवश्यक पण काहीशा उपेक्षित राहिलेल्या साहित्य प्रकारावर अनेक अंगांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मते मांडताना अनुवादाचे महत्त्व ठळकपणे अधोरेखित केले.

परिसंवादाचे अध्यक्षपद प्रख्यात लेखक, संपादक, अनुवादक प्रफुल्ल शिलेदार यांनी भूषवले तर अनुवादक्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले आजचे महत्त्वाचे अनुवादक पृथ्वीराज तौर, डॉ. दीपक बोरगावे, सुनीता डागा आणि विजय नाईक ह्यांनी ह्या परिसंवादात आपला महत्त्वाचा सहभाग नोंदवला.

मा. यशवंतराव चव्हाण सभामंडपात 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसाचे जीवन व साहित्य' या विषयावर परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादात मा. अलकनंदा साने, मयुरेश वाटवे, अवधूत विश्वनाथ सुमंत आणि डॉ. अनुराग लव्हेकर यांनी आपले विचार मांडले. डॉ. अर्चना मिरजकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. वृषाली देशपांडे यांनी या परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.

या परिसंवादात बृहन्महाराष्ट्रात वसलेल्या मराठी माणसाचे सांस्कृतिक, सामाजिक व साहित्यिक योगदान, तसेच त्यांच्यासमोरील आव्हाने आणि साहित्याच्या माध्यमातून त्यावर होणारा प्रभाव या संदर्भात सखोल चर्चा झाली. उपस्थित रसिकांनी

वक्त्यांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'मराठी भाषा आणि महाराष्ट्र धर्म' हा परिसंवाद अध्यक्ष श्रीराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. श्रीपाद अपराजित, डॉ. अनिरुद्ध मोरे, अरुणा भास्करराव देशपांडे, संजय सोनवणी, भास्कर ओव्हाळ यांनी आपली मते मांडली, तर या वेळी परिसंवादात मराठी भाषा तिच्या भविष्यातील वाटचालीसह महाराष्ट्र धर्माच्या संकल्पनेवर विचारमंथन झाले. श्रीराम पवार यांनी अध्यक्षीय समारोप केला.

'नाते दिल्लीचे मराठीशी' यात विशेष सन्मान करण्यात आले. मा. वसुंधरा राजे सिंधीया (शिंदे) माजी मुख्यमंत्री, राजस्थान, मा. शिवेंद्रसिंह भोसले – मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य. मा. भूषणराजे होळकर– प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, शरदचंद्र पवार पक्ष. आणि मा. शुभांगिनीराजे गायकवाड, राजमाता बडोदे संस्थान. या सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मिलिंद खांडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात 'राजकारणाचे मराठी साहित्यात उमटणारे प्रतिबिंब' या विषयावर एक परिसंवाद संपन्न झाला. जयदेव डोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या परिसंवादात डॉ. समीर जाधव, श्री. धीरज वाटेकर, श्री. शैलेश पांडे, श्री. सुरेश भटेवरा आणि संजय आवटे यांनी मराठी साहित्यावरील राजकीय प्रभावावर सखोल चर्चा केली.

साहित्य संमेलनात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व्यासपीठावर 'मराठी पाऊल पडते पुढे' हा विशेष मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला. मा. रवी पंडित, श्री. हणमंतराव गायकवाड आणि पराग करंदीकर यांनी आपले विचार मांडले. मा. प्रसन्न जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात 'लोकसहित्य भूपाळी ते भैरवी' या विषयावर एक विचारमंथनात्मक सादरीकरण झाले. श्री. संपत कदम आणि श्री. कृष्णात पाटोळे व सहकारी यांनी लोकसाहित्याच्या प्रवासाचा अतिशय सुंदर वेध घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात झालेल्या मनमोकळा संवाद – 'मराठीचा अमराठी संसार' या परिसंवादाला उत्तम प्रतिसाद मिळाला. या परिसंवादात डॉ. ज्ञानेश्वर मुळे, डॉ. साधना शंकर, राजदीप सरदेसाई, सागरिका घोष, रेखा रायकर – मनोज कुमार, डॉ. मंजिरी वैद्य – प्रसन्न अय्यर यांनी सहभाग घेतला. भारती विद्यापीठाचे कार्यवाह, मा. आमदार डॉ. विश्वजीत कदम या वेळी विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात लेखिका संजीवनी खेर, डायमंड पब्लिकेशनचे श्री. दत्तात्रय पाष्टे आणि कमल पाष्टे यांचा उषा तांबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मा. प्रतिभा सराफ यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

साहित्य संमेलनातील एक आकर्षण म्हणजे कविकट्टा. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महामंडळाचे सभासद श्री. राजन लाखे यांनी कवी कट्ट्याचे उत्तम नियोजन केले. कवीकट्ट्याचे उद्घाटन आमदार नीलमताई गोऱ्हे यांनी केले. अतिशय उत्साहात २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दोन दिवस कवी कट्ट्यावर साधारण १७० कवींनी सहभाग घेतला. अतिशय समृद्ध अनुभव देणाऱ्या कविता येथे सादर झाल्या.

याशिवाय मधुरा वेलणकर यांनी 'मधुरव' हा सुंदर कार्यक्रम सादर केला.

अशा विविध विषयांवरील आशयघन परिसंवादांनी आणि इतर कार्यक्रमांनी दिल्लीतील ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले.

■■

**ज्योत्स्ना चांदगुडे**
७३८५४०६६७३

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच कशासाठी?

**प्रा. मिलिंद जोशी**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकहितवादी आणि न्या. महादेव गोविंद रानडे यांनी 'ग्रंथकार संमेलनां'ची सुरुवात केली. १८७८ मध्ये पहिले ग्रंथकार संमेलन न्या. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात हिराबागेत भरले. दुसरे १८८५ मध्ये बुधवार पेठेतील सार्वजनिक सभेच्या जोशी सभागृहामध्ये भरले. तिसरे संमेलन १९०५ मध्ये सातारा येथे भरले. ही संमेलने अनेकदा काही कारणांमुळे खंडित होत होती. ती खंडित होऊ नयेत यासाठीचा प्रयत्न पुण्यात भरलेल्या चौथ्या ग्रंथकार संमेलनात झाला. पुण्यात २६ आणि २७ मे १९०६ रोजी चौथे ग्रंथकार संमेलन विद्वान कवी गो.वा.कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली नागनाथ पाराजवळच मळेकर वाड्यात भरले होते. लोकमान्य टिळक, न.चिं.केळकर, चिंतामणराव वैद्य, विसुभाऊ राजवाडे, पांगारकर, रेव्हरंड टिळक या संमेलनात सहभागी झाले होते. २७ मे रोजी समारोपाच्या दिवशी न.चिं.केळकर यांनी 'महाराष्ट्र साहित्य परिषद आज रोजी स्थापन झाली आहे' अशी घोषणा केली. लोकमान्य टिळकांनी उठून या घोषणेला पाठिंबा दिला. महाराष्ट्र साहित्य परिषद गेली ११९ वर्षे मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत आहे. हा मुळीचा झरा अनेक सारस्वतांसाठी अक्षय ऊर्जा केंद्र आहे. ग्रंथकार संमेलन 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' या नावाने पुढे नेण्याचे काम महाराष्ट्र साहित्य परिषदेने निष्ठेने केले. १९६४ साली गोव्यात मडगावला, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पंचेचाळिसावे साहित्य संमेलन झाले. महाराष्ट्र साहित्य संमेलन या नावाने भरलेले ते शेवटचे संमेलन होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची ही संमेलने महाराष्ट्रभर होत असली तरी आपल्या परिसरातील लोकांसाठी वेगळे संमेलन असावे, असे त्या काळी साहित्यधुरीणांना वाटणे स्वाभाविक होते. त्यातूनच विदर्भात बाबासाहेब खापर्डे यांनी १३ व १४ जानेवारी १९२३ रोजी विदर्भाचे वेगळे साहित्य संमेलन अमरावती येथे भरवले. या संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी 'विदर्भ साहित्य संघा'ची स्थापना झाली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यक्षेत्राबाहेर असलेल्या मराठी प्रदेशाला विदर्भ साहित्य संघाने स्वत:त

**एकेकाळी साहित्यनिर्मितीचा केंद्रबिंदू पुण्यामुंबईतच होता. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील लोक लिहू लागले आहेत. त्यांचेच साहित्य आज मुख्य प्रवाहात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. साहित्य संस्थांनी त्यांची विभागीय साहित्य संमेलने आणि महामंडळाने अ. भा. मराठी साहित्य संमेलन महानगराबरोबरच अशा ग्रामीण आणि निमशहरी भागात घेऊन तेथील नव्या प्रतिभेला उत्तेजन मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. ज्या गावात किंवा शहरात अ.भा.म.साहित्य संमेलन होते त्या संमेलनाच्या निमित्ताने त्या परिसरात जी वातावरणनिर्मिती होते, त्यामुळे तिथली साहित्य चळवळ अधिक गतिमान होते. त्याचा फायदा लेखक-वाचकांबरोबरच ग्रंथालयांनाही होतो. संमेलन होऊन गेले तरी त्याची स्पंदने दीर्घकाळ त्या मातीत घुमत राहतात. हेच अशा संमेलनाचे फलित असते.**

सामावून घेताना मराठवाडा आणि जुन्या मध्यप्रदेशातील मराठी भागांचाही घटनेत समावेश केला. विदर्भ साहित्य संघाचे पहिले अध्यक्ष न्या. केशवराव कोरटकर हे मात्र मराठवाड्याचे होते. १९१२ ते १९३२ या काळात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबईत होते. या काळात मुंबईतील साहित्यप्रेमी परिषदेशी जोडले गेले होते. परिषदेचे कार्यालय पुण्यात स्थलांतरीत झाल्यानंतर आपले साहित्य प्रेम जपण्यासाठी तसेच मुंबई आणि मुंबईच्या उपनगरांसाठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यासाठी तिथल्या साहित्य प्रेमींना स्वतंत्र संस्थेची गरज भासू लागली. १९३४ मध्ये पहिले मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन झाले आणि त्यानंतर वर्षभरातच संस्थेच्या निर्मितीसाठी आवश्यक बाबींची पूर्तता करून २१ जुलै १९३५ रोजी 'मुंबई मराठी साहित्य संघा'ची स्थापना झाली. कृ.अ.केळुसकर, अ.बा.गजेंद्रगडकर आणि डॉ.अ.ना.भालेराव यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेनंतर मराठवाड्याने चौदा वर्षांनंतर आपल्या प्रादेशिक साहित्य संमेलनाची सुरुवात केली आणि वीस वर्षांनंतर दुसऱ्या साहित्य संमेलनात २९ सप्टेंबर १९४३ रोजी नांदेड येथे 'मराठवाडा साहित्य परिषदे'ची स्थापना केली. त्या वेळी मराठवाडा निजाम प्रांतात होता. या संमेलनाचे अध्यक्ष असणारे दत्तो वामन पोतदार यांनाच मराठवाडा साहित्य परिषदेचे पहिले अध्यक्ष करण्यात आले. अशा रीतीने स्थापना झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, मुंबई मराठी साहित्य संघ आणि मराठवाडा साहित्य परिषद या संस्था आपापल्या कार्यक्षेत्रात वाङ्मयीन चळवळ गतिमान करू लागल्या.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. सुधारणांचा रथ कितीही वेगाने धावला तरी त्याचे सारथ्य संस्कृतीनेच करायला हवे, अशी भूमिका असणारे द्रष्टे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या रूपाने महाराष्ट्राला मिळाले. महाराष्ट्रात भाषा लेखनाच्या दृष्टीने एकसारखेपणा आणण्यासाठी लेखन नियम तयार करण्याची आणि लोकांपर्यंत पोहोचविण्याची गरज यशवंतरावांनी ओळखली. त्यांनी हा विचार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष दत्तो वामन पोतदार यांना बोलून दाखविला आणि महाराष्ट्राच्या विविध भागांतील प्रमुख साहित्य संस्थांच्या सहकार्याने लेखन नियम तयार करून ते शासनाकडे द्यावेत, असे त्यांना सांगितले. 'शासन ते तत्काळ स्वीकारून त्यांची अंमलबजावणी करेल,' असा शब्दही त्यांनी दिला. पोतदारांनी कामाला सुरुवात केली. या निमित्ताने पुणे, मुंबई, मराठवाडा

आणि विदर्भातील साहित्य संस्था एकत्र आल्या. भाषेच्या लेखन नियमांचे काम सुरू झाले. भाषेचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्र राहणे गरजेचे आहे, असे सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना वाटले. त्यातूनच ३ ऑक्टोबर १९६१ रोजी 'मराठी साहित्य महामंडळा'ची स्थापना झाली. चार संस्था महामंडळाच्या घटक असल्यामुळे त्यांना घटक संस्था मानण्यात यावे, असेही ठरविण्यात आले. या वेळी दत्तो वामन पोतदार यांच्या समवेत विदर्भ साहित्य संघाचे ग.त्र्यं.माडखोलकर, वि.भि.कोलते, मुंबई मराठी साहित्य संघाचे श्री.शं.नवरे, वा.रा.ढवळे, मराठवाडा साहित्य परिषदेचे भगवंतराव देशमुख, अनंत भालेराव, न.शे.पोहनेरकर सहभागी होते. दरम्यानच्या काळात बृहन्महाराष्ट्रात असणाऱ्या मराठी माणसांनी त्यांच्यासाठी संस्था स्थापन केल्या होत्या. त्या मराठी साहित्य मंडळात येण्यासाठी उत्सुक होत्या. त्यांच्या प्रस्तावांचा विचार करून मराठी साहित्य महामंडळाने त्यांना समाविष्ट करून घेतले.

साहित्य महामंडळाची स्थापना झाल्यानंतर घटनेतच मराठी भाषकांसाठी साहित्य संमेलन घेण्याचे महामंडळाने ठरविले. गोव्यात १९६४ साली कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली झालेले ४५ वे संमेलन हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शेवटचे संमेलन. १९६५ पासून साहित्य महामंडळाने संमेलनाची जबाबदारी स्वीकारली. त्यानुसार १९६५ मध्ये हैदराबादला प्रा.वा.ल.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरविले. ते साहित्य महामंडळाचे पहिले संमेलन. तरीही संमेलनाच्या गणनेसाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने दाखविलेल्या उदारतेमुळे हे ४६ वे संमेलन ठरले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे संमेलने होत असताना संमेलनाध्यक्ष निवडीची जी प्रक्रिया होती, तीच महामंडळानेही स्वीकारली होती. बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन मतदारांची संख्याही वेळोवेळी वाढविण्यात आली.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली की, वातावरण गढूळ होऊन जायचे. साहित्य संस्थांच्या प्रमुखांनी कितीही नि:पक्षपातीपणाचा आव आणला तरीही अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांची भूमिका निर्णायक असायचीच. साहित्य संस्थांच्या इतक्या हजार आजीव सभासदांपैकी अमुक सदस्यांनाच मतदार का केले, त्यांची पात्रता काय, असे अनेक प्रश्न बातम्यांमधून चघळले जायचे. साहित्य संस्थांच्या प्रमुखांनी 'एक गठ्ठा पाकिटे' गोळा करून देण्याची संस्कृती पुढे फोफावली. दिसायला अध्यक्षपदासाठी मतदान करणारे हजार मतदार दिसत असले, तरी एक गठ्ठा पाकीट संस्कृतीचा पुरस्कार करून संस्थांचे लोकच निवडणूक पार पाडत होते. लोकशाहीच्या नावाखाली राजकारणात जे जे घडत होते ते इकडेही घडू लागले. पुढे पुढे तर वाङ्मयीन योगदान आणि गुणवत्ता या निकषांपेक्षाही संस्थांच्या प्रमुखांशी असलेली जवळीक आणि त्यांची मर्जी हा निकषही तितकाच महत्त्वाचा ठरू लागला. जी लेखक मंडळी आयुष्यभर केवळ लेखन कार्यात मग्न राहिली, साहित्यिक गटातटांपासून दूर राहिली, त्यांना हा अध्यक्षपदासाठीचा चक्रव्यूह भेदणे कठीण असल्यामुळे ते या भानगडीतच पडले नाहीत. लोकशाहीच्या नावाखाली वाङ्मयविश्वातील गलिच्छ राजकारण उग्र रूप धारण करू लागले. संमेलनाध्यक्षपदाची निवडणूक खर्चिकही होऊ लागली होती. महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात प्रवास करण्याचा खर्च, तिथल्या निवासाचा खर्च, फोन आणि पत्रव्यवहाराचा खर्च, पत्रकार परिषदांसाठीचा खर्च ही यादी वाढतच चालली होती. आर्थिक ऐपत नसणाऱ्या साहित्यिकांना ही निवडणूक झेपणारी नव्हती. प्रवासाच्या दगदगीचा त्रास होताच दया पवार आणि शिवाजी सावंत या मराठी साहित्याचे वैभव असणाऱ्या साहित्यिकांना या निवडणुकीपायी झालेल्या दगदगीमुळे प्राण गमवावे लागले. त्याच्या कटू आठवणी निवडणुकीच्या निमित्ताने निघायच्याच. त्यामुळे निवडणूक पद्धतीचा पुनर्विचार करण्याची

आवश्यकता भासू लागली. अखिल भारतीय नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षांची निवड सन्मानाने होते, तर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड सन्मानाने व्हायला काय हरकत आहे, असा विचार पुढे येऊ लागला; पण त्यासाठीची घटना दुरुस्ती होण्यासाठी २०१८ साल उजाडावे लागले.

२०१२ च्या घटना दुरुस्ती नंतरही संमेलनाध्यक्षपदाच्या निवडणुका आल्या की, चर्चेचे आणि टीकेचे गुऱ्हाळ सुरूच राहायचे. 'वाघ म्हटले तरी खाणारच आहेत आणि वाघोबा म्हटले तरी खाणारच आहेत.' अध्यक्ष निवडीची पद्धत कोणतीही असली तरी टीका होणारच आहे. वातावरण गढूळ केले जाणारच आहे, तर हे टाळण्यासाठी 'सन्मानाने अध्यक्षपद' देण्याचा विचार करायला काय हरकत आहे, असा विचार नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाकडे महामंडळाचे कार्यालय गेल्यानंतर झाला. श्रीपाद भालचंद्र जोशी त्या वेळी महामंडळाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेने त्यासाठी पुढाकार घेऊन प्रथम कार्यकारी मंडळात आणि नंतर वार्षिक सर्वसाधारण सभेतही हा ठराव मंजूर करून घेतला. साहित्य महामंडळातही तो मंजूर व्हावा यासाठी पुढाकार घेतला. निवडणुकीऐवजी 'सन्मानाने निवड' हा पर्याय स्वीकारला गेला. यात लोकशाहीचा गळा घोटला गेल्याची भावनाही काहींनी व्यक्त केली. साहित्य संस्थांच्या त्या त्या विभागातील आजीव सदस्यांनी निवडलेले पदाधिकारी साहित्य महामंडळावर त्या त्या संस्थांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे राष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीत जसे मतदार प्रत्यक्ष भाग घेत नसले तरी त्यांनी निवडलेले लोक प्रतिनिधी मतदान करतात. त्याच धर्तीवर हा विचार करण्यात आला. निवडणुकीच्या निमित्ताने साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या 'सत्ताकेंद्राचे' महत्त्व या निवड पद्धतीत खूपच कमी झाले. त्यामुळेही काही लोक नाराज झाले. एक गठ्ठा पाकिटे एखाद्या उमेदवाराच्या हातात दिल्यानंतर आणि तो विजयी झाल्यानंतर त्याला उपकाराच्या ओझ्याखाली ठेवून पदाधिकाऱ्यांना आपले हेतू साध्य करून घेता यायचे, त्याला यामुळे खीळ बसली. अनेक लाभांपासून पदाधिकारी वंचित राहिले. त्या त्या घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थेतही संस्थेने कोणाला पाठिंबा द्यायचा यावरून पदाधिकाऱ्यांत मतभेद व्हायचे आणि या निवडणुकीच्या निमित्ताने संस्थेत दुफळी निर्माण व्हायची. तिला या पर्यायामुळे पायबंद बसला. चर्चा आणि टीकेची गुऱ्हाळे कमी झाली. साहित्यक्षेत्रात एक चांगला संदेश गेला. निवडणुकीच्या राजकारणापासून लेखिका कायम चार हात दूर राहिल्या, त्यामुळे अनेक कर्तृत्वसंपन्न लेखिका संमेलनाध्यक्षपदापासून वंचित राहिल्या. नव्या घटना दुरुस्तीमुळे हे चित्र बदलले. या घटना दुरुस्तीनंतर डॉ. अरुणा ढेरे यांची संमेलनाध्यक्षपदी सन्मानाने निवड करण्यात आली. त्याचे साहित्य विश्वाने आणि माध्मांनीही जोरदार स्वागत केले. बऱ्याच वर्षांनंतर महामंडळाचे कौतुक करणारे अग्रलेख आले. फादर फ्रान्सिस दिब्रिटो, डॉ. जयंत नारळीकर, भारत सासणे, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. तारा भवाळकर यांच्यासारख्या मान्यवर लेखकांना अध्यक्षपदाचा मान मिळाला.

या जगात एकच गोष्ट कायम आहे ती म्हणजे बदल. तो स्वीकारतच कोणत्याही संस्थेला वाटचाल करावी लागते. संस्थेच्या आणि समाजाच्या वाटचालीत कोणताही पर्याय अंतिम नसतो. भविष्यात एखादा नवा पर्यायही समोर येईल. त्या वेळी कदाचित हा आता निवडलेला पर्याय कालसुसंगत वाटणार नाही, तेव्हा नवा पर्यायही स्वीकारला जाईल. संस्थात्मक कार्यही नदीसारखे प्रवाही असावे लागते. काठावरचे भले-बुरे, मागून वाहून आलेले सगळे बरोबर घेऊन पुढे जावे लागते. संस्था प्रवाही राहिल्या नाहीत आणि काळानुसार बदलल्या नाहीत, तर त्यांचे डबके व्हायला वेळ लागत नाही. ते झाले की, संस्थांची संस्थाने होतात आणि चळवळींचा जीव गुदमरतो. म्हणून संस्थांनी सतत प्रयोगशील राहिले पाहिजे. निवडणुकीऐवजी 'सन्मानपूर्वक निवड' हा

**जुन्यातले नवे आणि नव्यातले अगदी नवे स्वीकारत परंपरा आणि आधुनिकतेचा मिलाफ साधत साहित्य महामंडळाने आजवर वाटचाल केली आहे. ती अधिक जोमाने करताना बदललेले समाजमानस, तंत्रज्ञानातील क्रांती, तरुणाईच्या आशा-आकांक्षा आणि महामंडळाचा व्यवहार यांची सांगड घालायला हवी.**

एक प्रयोग आहे. तो फसतो आहे असे लक्षात आले, तर नव्या प्रयोगाचा विचार होईल. प्रयोगच करायचे नाहीत ही मानसिकता नव्या वाटांचे स्वागत करणारी नाही. असे प्रयोग महामंडळाने सातत्याने केले आहेत.

संमेलन घेण्याखेरीज महामंडळ काय करते, असा एक प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. हा प्रश्न निरर्थक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात सहभागी असणाऱ्या सर्व संस्था त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात वर्षभर साहित्यिक कार्यक्रम घेत असतात. त्या त्या संस्थांची विभागीय संमेलने त्यांच्या भागात होत असतात. त्यामुळे साहित्य महामंडळानेही पुन्हा तेच काम करावे हे अभिप्रेतही नाही आणि अपेक्षितही नाही. एकेकाळी साहित्यनिर्मितीचा केंद्रबिंदू पुण्यामुंबईतच होता. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील लोक लिहू लागले आहेत. त्यांचेच साहित्य आज मुख्य प्रवाहात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. साहित्य संस्थांनी त्यांची विभागीय साहित्य संमेलने आणि महामंडळाने अ.भा.मराठी साहित्य संमेलन महानगराबरोबरच अशा ग्रामीण आणि निमशहरी भागात घेऊन तेथील नव्या प्रतिभेला उत्तेजन मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. ज्या गावात किंवा शहरात अ.भा.म.साहित्य संमेलन होते त्या संमेलनाच्या निमित्ताने त्या परिसरात जी वातावरणनिर्मिती होते, त्यामुळे तिथली साहित्य चळवळ अधिक गतिमान होते. त्याचा फायदा लेखक-वाचकांबरोबरच ग्रंथालयांनाही होतो. संमेलन होऊन गेले तरी त्याची स्पंदने दीर्घकाळ त्या मातीत घुमत राहतात. हेच अशा संमेलनाचे फलित असते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने लोक चळवळ उभी केली. पंतप्रधान कार्यालयाला एक लाख पत्रं पाठवली. राजकीय इच्छाशक्तीला आवाहन करण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना पत्रं पाठवली. त्यांच्या भेटी घेतल्या. आमदार-खासदारांना आवाहन केले. एवढेच नाही तर दिल्लीत जाऊन धरणे आंदोलनही केले. साहित्य संस्थेने भाषिक प्रश्नांसाठी दिल्लीत जाऊन आंदोलन करण्याची ही घटनाच ऐतिहासिक आहे. महामंडळातील इतर संस्थांनीही या विषयासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबिले. मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यात यावा यासाठीच्या धरणे आंदोलनात महामंडळातील सर्व साहित्य संस्था इतर संस्थांसह मुंबईच्या आझाद मैदानावर एकत्र आल्या होत्या. साहित्य महामंडळाने संमेलनाखेरीज भाषिक प्रश्नांसाठी जे जे करायला हवे ते ते महामंडळ आजवर करत आले आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जे ठराव मंजूर केले जातात, त्याचे पुढे काय होते, असा प्रश्न नेहमी चर्चिला जातो. शासनाकडे त्याचा पाठपुरावा करून संबंधित विषय धसास लावण्याचे काम कार्यक्षम अध्यक्षांनी यापूर्वी केलेले आहे. संमेलनासारख्या मोठ्या व्यासपीठावर ठराव झाल्यामुळे तो विषय केंद्रस्थानी येतो, त्याच्यावर अनेक बाजूंनी चर्चा होते, विचारमंथन होते, ही गोष्ट दुर्लक्षित करता येणार नाही.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर हे मूठभरांचे संमेलन आहे अशीही टीका होते; पण टीका करणाऱ्यांना त्यांच्या मनातील आदर्श पर्यायी संमेलन आजवर उभे करता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. हे मूठभरांचे संमेलन आहे, तर या संमेलनाला

समाजाकडून एवढा उदंड प्रतिसाद कसा मिळतो, या समाज मानसिकतेचाही अभ्यास संबंधितांनी करायला हवा. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांना जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, ती सातत्य आणि वैविध्यामुळेच. या संमेलनाला समृद्ध अशी परंपरा आहेच, ती समर्थपणे पुढे नेण्याचे काम साहित्य महामंडळाने आजवर केले आहे. त्यामुळेच संमेलनात व्यासपीठाला यांचेच नाव हवे, प्रवेशद्वाराला त्यांचेच नाव हवे, असा आग्रह फक्त याच संमेलनाकडून धरला जातो. इतके हे संमेलन सर्व प्रवाहांच्या आस्थेचा आणि अस्मितेचा विषय आहे. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मराठी समाजाचे वैचारिक नेतृत्व करतात अशी भावना मराठी माणसांच्या मनात आहे. त्यामुळे त्यांनी अध्यक्षीय भाषणात असा विचार मांडला, तर तो केंद्रस्थानी येईल असे लोकांना वाटत असते. महाराष्ट्रात एवढी शेकडो संमेलने होतात; पण चर्चा होते ती केवळ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणाचीच.

संमेलनाला कर्मकांडाचे रूप आले आहे. या टीकेकडे महामंडळाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. उद्‌घाटन आणि समारोपाचा साचेबद्ध कार्यक्रम, परिसंवादाच्या विषयांचा ठरलेला ढाचा, रटाळ कविसंमेलने, साहित्यसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मर्जीतल्या वाङ्मयीन कर्तृत्व नसलेल्या लेखकांचा भरणा यामुळे संमेलनांना साचलेपण आले आहे. ते वेळीच दूर करावे लागेल. त्यासाठी कार्यक्रमांचा साचा मोडावा लागेल. तरुणाईचे प्रतिनिधित्व वाढवावे लागेल. वर्षानुवर्षे निमंत्रित म्हणून संमेलनाला हजेरी लावणाऱ्या प्रस्थापितांना थोडे बाजूला ठेवावे लागेल. चार चार तास चालणारे उद्‌घाटनाचे, समारोपाचे सोहळे आटोपशीर आणि नेटके करावे लागतील. केवळ मिरवण्यासाठी येणाऱ्या राजकारण्यांना थोडे दूर ठेवावे लागेल. पदाधिकाऱ्यांचे हितसंबंध आणि वशिलेबाजी यांना फाटा द्यावा लागेल.

त्यासाठीचा वाईटपणा विकत घेण्याची मानसिक तयारी महामंडळाला आणि त्यातील संस्थांना करावी लागेल. ग्रंथप्रदर्शन अधिक देखणे होईल हे बघावे लागेल, तरच या संमेलनाचा रुबाब आणखी वाढेल.

संमेलनाचे उत्सवी स्वरूप पाहता संमेलनात साहित्यिक आणि सामाजिक विषयांवर गांभीर्याने चर्चा होत नाही अशी तक्रार करणारीही काही मंडळी आहेत. संमेलन हा मराठी भाषेचा उत्सव आहे, ती साहित्यप्रेमींची आणि वाचकांची जत्रा आहे. गांभीर्याने साहित्य चर्चा करण्यासाठी विद्यापीठांचे मराठी विभाग आहेत. साहित्य परिषदही **‘समीक्षा संमेलन’** घेते. त्यातील सगळेच विषय गंभीर असतात जिथे संमेलनाला सामान्य रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळतो तिथे लोकमानस समजून घेऊन थोडा लोकानुनय केला म्हणून भाषेचे आणि साहित्याचे न भरून येणारे नुकसान होते, असे समजण्याचे काहीच कारण नाही.

संमेलन साधेपणाने, आशयसंपन्न आणि कमी खर्चात व्हावे अशीच महामंडळाची अपेक्षा आहे; पण ज्या गावात हे संमेलन होते तेथील संयोजकांना ते पूर्वीच्या संमेलनांपेक्षा भव्यदिव्य व्हावे, असे वाटत असते. त्या स्पर्धेतूनच **‘कोटीच्या कोटी उड्डाणे’** होतात. संमेलने खर्चिक होतात. महामंडळाने कठोर भूमिका घेतली आणि संयोजकांनी ऐकले तर हे चित्र बदलू शकते, हे महामंडळाने उस्मानाबादच्या संमेलनातून दाखवून दिले आहे.

जुन्यातले नवे आणि नव्यातले अगदी नवे स्वीकारत परंपरा आणि आधुनिकतेचा मिलाफ साधत साहित्य महामंडळाने आजवर वाटचाल केली आहे. ती अधिक जोमाने करताना बदललेले समाजमानस, तंत्रज्ञानातील क्रांती, तरुणाईच्या आशा-आकांक्षा आणि महामंडळाचा व्यवहार यांची सांगड घालायला हवी.

■■

**प्रा. मिलिंद जोशी**

९८५०२७०८२३

(लेखक महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आहेत.)

# 'महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - एक दृष्टिक्षेप'

## सुरेश देशपांडे

कार्यकर्त्यांचे मोठे पाठबळ असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय आल्यामुळे ९९, १०० आणि १०१ वे अशी तीन महत्त्वाची अखिल भारतीय मराठी संमेलने आयोजित करण्याची संधी आणि जबाबदारी आली आहे. त्यानिमित्ताने मसापच्या जडणघडणीवर हा एक दृष्टिक्षेप..!

महाराष्ट्र साहित्य परिषद या आद्य साहित्य संस्थेची स्थापना २७ मे १९०६ रोजी पुणे येथील मळेकर वाड्यात झाली. संस्थेच्या स्थापने मागचा इतिहास जाणून घेण्यासारखा आहे.

झाले होते असे की, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे नेमके सांगायचे, तर १८७८ मध्ये पुण्यात हिराबागेत साहित्यिकांचे पहिले संमेलन लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांच्या पुढाकाराने भरले होते आणि या संमेलनाला 'ग्रंथकार संमेलन' असे नामानिधान होते. अर्थात अलीकडील साहित्य संमेलनाला जसे कोणत्या ना कोणत्या कारणाने विरोध होत असतो तसाच विरोध त्याही संमेलनाला झाला होता आणि त्या विरोधाचे अग्रणी होते ज्योतिराव फुले! 'या संमेलनात माझा शेतकरी कुठे आहे?' असा खडा सवाल त्यांनी या पहिल्या ग्रंथकार संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना विचारला होता. त्यानंतरचे दुसरे ग्रंथकार संमेलन पुण्यातील सार्वजनिक सभेच्या सभागृहात १८८५ मध्ये, श्री. कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले, तर तिसरे ग्रंथकार संमेलन १९०५ मध्ये, सातारा येथे कृष्णाजी पांडुरंग करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. चौथे संमेलन मात्र लगेच पुढच्या वर्षी म्हणजे २६, २७ मे १९०६ या काळात, पुणे येथे नागनाथ पाराजवळील मळेकर वाड्यात, वासुदेव गोविंद कानेटकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याचाच अर्थ असा होता की, ही ग्रंथकार संमेलने भरविण्यात सातत्य नव्हते. या संमेलनास साहित्यिक न. चिं. केळकर, लोकमान्य टिळक, इतिहासकार चिंतामणराव वैद्य, रेव्हरंड टिळक आदी मान्यवर उपस्थित होते. संमेलनाला काही एक स्थायी रूप द्यायला हवे या विचारातून, २७ मे १९०६ रोजी म्हणजे याच संमेलनात 'महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना झाली,' अशी घोषणा न. चिं केळकर, रानडे

यांच्या प्रेरणेने करण्यात आली आणि लोकमान्य टिळक यांनी उठून या सूचनेला पाठिंबा दिला. मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्य याचे जतन करणे, संवर्धन करणे अशी उद्दिष्टे या स्थापनेमागे होती आणि संपूर्ण महाराष्ट्र हे परिषदेचे कार्यक्षेत्र राहील असेही ठरविण्यात आले आणि त्या अनुषंगाने आजमितीला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या, ८२ शाखा महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी अत्यंत उत्साहात कार्यरत आहेत. या नव्याने स्थापन झालेल्या संस्थेचे कार्यालय आधी पुणे, त्यानंतर काही काळ मुंबईत होते; पण नंतर कार्यालय पुण्यातच आले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची आज पुण्यात टिळक रस्त्यावर जी इमारत उभी आहे ती एकदम उभी राहिली नाही. ज्या जागेवर इमारत उभी आहे ती जागा (जमीन) औंधचे संस्थानिक पंतप्रतिनिधी यांनी दिली आहे. ही जागा मिळाल्यावर टप्प्याटप्प्याने इमारत उभी राहिली तेव्हा १९३७ साल उजाडले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना झाल्यावर एक मोठा फरक पडला, तो म्हणजे विलंबाने किंवा काहीशा खंडित स्वरूपात आयोजित केली जाणारी साहित्य संमेलने नियमितपणे आयोजित केली जाऊ लागली. क्वचित काही वेळेस वर्ष दोन वर्षांचा खंड पडला, नाही असे नाही.

१९६१ साली, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष होते. त्यांच्या पुढाकाराने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना झाली. महाराष्ट्र साहित्य परिषद– पुणे, विदर्भ साहित्य संघ– नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद– औरंगाबाद आणि मुंबई मराठी साहित्य संघ– मुंबई या चार मुख्य साहित्य संस्था, साहित्य महामंडळाच्या घटक संस्था होत्या. या मंडळाच्या स्थापनेमागचा प्रमुख उद्देश होता तो म्हणजे मराठी भाषेसंबंधी तत्कालीन प्रश्न तसेच पुढील काळात उद्भवणाऱ्या भाषिक समस्या सोडविण्यासाठी एकच मोठे व्यासपीठ, संस्था असावी. शासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे, तसेच आपल्या उद्देशाला समाजातून व्यापक पाठिंबा मिळविणे हाही उद्देश होता. तसेच साहित्य महामंडळाने साहित्य संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारीही स्वीकारावी अशीही तरतूद घटनेत करण्यात आली होती. साहित्य महामंडळाच्या स्थापनेत अनंतराव भालेराव, वा. रा. ढवळे, गं.त्र्यं.माडखोलकर आदी मान्यवरांचे सहकार्य लाभले होते.

संमेलन आयोजित करण्याची जबाबदारी स्वीकारल्यावर १९६५ पासूनची संमेलने महामंडळाच्या नावावर नोंदण्यात आली. १९६४ चे संमेलन, जे गोवा येथे कवी कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते ते महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेले ४५ वे संमेलन होते. त्यानंतर १९६५ साली हैदराबाद येथे प्रा. वा.ल.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन झाले ते साहित्य महामंडळाचे पहिले संमेलन होते. असे असले तरी, महाराष्ट्र साहित्य परिषदेने भरविलेली आपली ४५ संमेलने, महामंडळाच्या नावावर दाखविण्यात यावी असे सांगितल्याने; महामंडळाचे हैदराबाद येथील पहिले संमेलन हे क्रमाने ४६ वे ठरले. आपली संमेलने, महामंडळाला देण्यात मसापचा मोठेपणा वाखाणायला हवा.

या साहित्य संमेलनांच्या आयोजनाशिवाय मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संदर्भात काम करायचे, याचाच अर्थ वाङ्मयीन कार्याचे आयोजन करणे आवश्यक होते. सुदैवाने महाराष्ट्र साहित्य परिषदेतच कविवर्य माधवराव पटवर्धन सभागृह असल्यामुळे तेथे विविध साहित्यिक कार्यक्रम, प्रकाशन समारंभ, मान्यवरांची व्याख्याने, वाङ्मयीन परिसंवाद असे अनेक कार्यक्रम नित्य आयोजित करण्यात येऊन, त्यायोगे नवीन कलाकार आणि लेखक यांनाही व्यासपीठ उपलब्ध झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अन्य ८२ शाखाही अशाच प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन महाराष्ट्रातील विविध शहरांत आयोजित करीत असतात.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वास्तूत मागील ८४

वर्षे कार्यरत असलेले वा.गो.आपटे संदर्भ ग्रंथालयही जुने संदर्भ ग्रंथ, जुनी नियतकालिके, दुर्मीळ ग्रंथांचे जतन करून वाङ्मयीन अभ्यासकांना उत्तम सेवा देत आहे.

यासोबतच महाराष्ट्र साहित्य परिषद अनेक जुन्या दुर्मीळ ग्रंथांचे जतन, प्रकाशन तसेच 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'सारखे खंड प्रकाशित करीत असते. तसेच दर वर्षी साधारणपणे ५० प्रकारच्या वाङ्मय प्रकारातील ग्रंथांना आणि लेखकांना पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुरस्कार मिळविण्यासाठी लेखकांना किंवा प्रकाशकांना अर्ज करावे लागत नाहीत, आणि म्हणूनच महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार मिळणे हे साहित्यिकांना अभिमानाचे वाटते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आणखीन एक महत्त्वाचे कार्य म्हणजे, आर्थिकदृष्ट्या विकल असलेल्या साहित्यिकांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जरी साहित्य महामंडळाकडून आयोजित केले जात असले तरी या आयोजनात साहित्य परिषदेचा महत्त्वाचा सहभाग असतो; आणि या संमेलनातून प्रथितयश तसेच नवोदितांना संधी देण्याचा प्रयत्न असतो; परंतु एका संमेलनात किती जणांना सामावून घेतले जाऊ शकते यालाही मर्यादा आहेत. त्यामुळे मग साहित्य परिषदेने त्यातून मार्ग काढण्यासाठी 'विभागीय साहित्य संमेलन' घेण्याची सुरुवात केली आणि आज महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी ही विभागीय साहित्य संमेलने, साहित्य परिषदेच्या तिथल्या स्थानिक शाखांच्या माध्यमातून आयोजित केली जातात. या संमेलनांतून अनेक होतकरू साहित्यिकांना संधी मिळू शकते. महाराष्ट्र साहित्य परिषद केवळ 'विभागीय साहित्य संमेलन' आयोजित करते असे नव्हे, तर 'समीक्षा संमेलन', 'युवा नाट्य संमेलन' आणि साहित्य परिषदेच्या सर्व शाखांचा मेळावाही आयोजित करत असते. या सर्व कार्यक्रमांव्यतिरिक्त अन्य काही आयोजने आहेत. वानगीदाखल उल्लेख करायचा झाला, तर मान्यवर साहित्यिकांशी, कलाकारांशी मनमोकळ्या गप्पांचा कार्यक्रम, कथालेखकाकडून कथेच्या निर्मिती प्रक्रियेविषयी आणि कवींकडून कवितेच्या अभिव्यक्तीविषयी ऐकणे हा कार्यक्रम. लेखक कवींसाठी लेखन कार्यशाळेचे आयोजन केले जाते. केवळ साहित्य आणि समीक्षा याच विषयाला वाहिलेले 'साहित्य पत्रिका' हे त्रैमासिक १९१२ पासून प्रकाशित होत असून आपला दर्जा टिकवून आहे. मराठी भाषाविषयक अभ्यासक्रम आखून त्यांची परीक्षा साहित्य परिषदेतर्फे घेतली जाते. अशा प्रकारे विविध उपक्रम आणि कार्यक्रम यांच्याद्वारे मराठी भाषेची जपणूक करण्याचा प्रयत्न केला जातो.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष दिल्लीत जाऊन आंदोलन केले आहे, तर पुणे, डोंबिवली, मुंबईसारख्या शहरांत स्वतंत्रपणे आणि अन्य साहित्य संस्थांबरोबर आंदोलने केली आहेत.

आधी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ८२ शाखांमार्फत कार्य सुरू असून ठाणे जिल्ह्यात साहित्य परिषदेच्या १५ शाखा असून नवीन शाखा सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

आपण जर काही नावांवर नजर टाकली, तर किती मोठ्या व्यक्तींनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे ते लक्षात येईल. सर्वश्री श्रीनिवास बनहट्टी, ना. ग. गोरे, गं. बा. सरदार, वसंत कानेटकर यांच्यापासून ते प्रा. द. मा. मिरासदार यांच्यापर्यंत. महत्त्वाचे म्हणजे मसापचा आणि पुणे शहराचा चालताबोलता इतिहास म्हणून ओळखले जाणारे, आणि ज्यांच्या नावाची पायरी साहित्य परिषदेच्या इमारतीला लावली आहे ते म.श्री.दीक्षित यांनी साहित्य परिषदेत सर्व पदांवर काम केले आहे.

आता १०० वर्षांनंतरच्या काळात साहित्य परिषददेखील बदलली आहे असे वाटते. तिने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा केल्या आहेत. ऑनलाईन कार्यक्रम असतील किंवा परिषदेच्या इमारतीत लिफ्टसह केले जाणारे बदल, दुर्मीळ आणि

संदर्भ पुस्तकांचे संगणकीकरण, पटवर्धन सभागृहाचे नूतनीकरण असे अनेक प्रकल्प आहेत. भौतिक आणि बौद्धिक गती प्रगतीत सामील होत आहे. बदलत्या सामाजिक, आर्थिक परिप्रेक्ष्यात साहित्यानेदेखील नावीन्याची कास धरायला हवी. बदलत्या सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब साहित्यात पडायला हवे. आज जग एवढ्या वेगाने बदलत आहे की, तो वेग स्तिमित करणारा आहे. मानवी जीवनाचे ताणेबाणे आणि व्यामिश्रता यामुळे मानवी मूल्ये हरवतील की काय अशी भीती वाटावयास लागली आहे. संपर्क साधने वाढली असूनसुद्धा किंवा असल्यामुळेच माणूस एकटा पडत चालला आहे की काय, अशी साधार भीती वाटते आहे. माणसे शरीराने जवळ असूनही मनाने दूर जात चालली आहेत. भोवळ आणणारी ही परिस्थिती साहित्य चांगल्या प्रकारे हाताळू शकेल. एखादी चांगली साहित्यकृती वास्तवाचे भान देऊन त्यातून कसा मार्ग काढायचा हे सांगू शकेल.

यासाठी साहित्याने आपली चौकट ओलांडून बाहेर पडावयास हवे. मराठी भाषेतील साहित्याशिवाय अन्य भाषेतील साहित्याकडे जायला हवे. फक्त अन्य भाषाच नव्हे, तर मराठीच्या बोलीभाषादेखील लोकसाहित्याने समृद्ध आहेत. त्यातील लोककथा, लोकसंगीत यांचा वेध घेऊन ते साहित्य जे आज खेडोपाडी विखुरलेल्या अवस्थेत आहे, त्याचे परिशीलन करून जर प्रकाशात आणले, तर आपल्या जीवनातील अनेक समस्या सहजपणे सोडविता येऊ शकतील एवढे सामर्थ्य लोकसाहित्यात आहे. जगभरातील लोकसाहित्यानेच मानवाला जगण्याचे मूल्यभान दिले आहे हे आपण विसरलो आहोत आणि म्हणूनच आजची गोंधळाची, भीतीची, अस्वस्थतेची अवस्था निर्माण झाली आहे.

मराठी साहित्यातदेखील प्रमाणभाषा आणि तिच्या बोलीभाषा यांचा संगम दिसायला हवा. साहित्यातील विविध प्रवास एकत्र येऊन एक मोठाच प्रवाह निर्माण व्हायला हवा. तसेच मराठी साहित्य अधिकाधिक समृद्ध व्हायला हवे असेल, तर अन्य भाषेतील साहित्याचे अनुवाद आपल्याकडे यायला हवेत आणि आपले साहित्य दुसऱ्या भाषेत जायला हवे. अशा प्रकारे साहित्याचे आदानप्रदान. मानवी जीवनाच्या आकाशात नवरंग भरायचे, असतील तर साहित्याचा फार मोठा सहभाग असायला हवा. केवळ भाषिक अस्मिता गोंजारून साहित्य परिपूर्ण होणार नाही, भाषिक अस्मिता हवीच; पण अट्टहास नको, दुराग्रह नको. अशामुळे उलट समाजातील दुरी वाढेल, आणि साहित्याचे काम तर मानवी जीवांना एकत्र आणणे आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद अशाच प्रकारे कार्य मागील ११६ वर्षे करीत आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापनदिनी नेहमीच अन्य भाषेतील मोठ्या साहित्यिकास आवर्जून बोलावले जाते. जुने न सोडता नावीन्याची कास धरणारी महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थेचे कार्य वर्धिष्णू आहे.

'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळा'च्या घटनेप्रमाणे दर तीन वर्षांनी साहित्य महामंडळाचे कार्यालय प्रत्येक घटक संस्थेकडे येते. त्याप्रमाणे या वर्षीपासून पुढील तीन वर्षे साहित्य महामंडळाचे कार्यालय, महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे तरुण कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी हे महामंडळाचे अध्यक्ष झाले आहेत आणि सुनिताराजे पवार या कार्यवाह, तर विनोद कुलकर्णी कोषाध्यक्ष झाले असून त्यांना मसापच्या कार्यकारिणीची जोरदार साथ आहे. ९९, १०० आणि १०१ वे ही पुढील तीन महत्त्वपूर्ण संमेलने आयोजित करण्याचे भाग्य आणि आव्हान या तिघांपुढे आहे.

पुढील तीन वर्षांत संमेलनाचा चेहरामोहरा बदलला जाईल, अशी साहित्य रसिकांकडून अपेक्षा आहे. संमेलन अधिक लोकाभिमुख आणि व्यापक होत सर्वांना बरोबर घेऊन आयोजित केले जाईल, यात शंका नाही. महामंडळाच्या या तीन नवीन पदाधिकाऱ्यांना मन:पूर्वक शुभेच्छा!

■■

**सुरेश देशपांडे**
८३५६०३१७१०

# मराठी साहित्यसंमेलने अधिकाधिक लोकाभिमुख व्हावी

**माजी संमेलनाध्यक्षांनी व्यक्त केली अपेक्षा, अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन.**

पुणे – आगामी काळातील अखिल भारतीय साहित्य संमेलने ही अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे असून त्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी संमेलनाध्यक्षांनी आज केले.

निमित्त होते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाच्या उद्घाटनाचे. या निमित्ताने माजी संमेलनाध्यक्ष राजेंद्र बनहट्टी, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अरुणा ढेरे, लक्ष्मीकांत देशमुख, भारत सासणे या संमेलनाध्यक्षांच्या उपस्थितीत हे उद्घाटन झाले. या वेळी व्यासपीठावर महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाह सुनिताराजे पवार व कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये पुढील तीन वर्षांसाठी हे महामंडळाचे कार्यालय आता कार्यरत असणार आहे.

या वेळी राजेंद्र बनहट्टी म्हणाले, ''१९८८ ते १९९२ या कालात पुण्यामध्ये महामंडळाचे कार्यालय होते तेव्हा मी अध्यक्ष होतो. त्या वेळी मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठी अक्षर वाङ्मय योजना आणण्याचा आमचा प्रयत्न होता. त्यामध्ये १०० उत्कृष्ट पुस्तके अवघ्या एक हजार रुपयांत द्यायची योजना होती. मात्र ती योजना शासनदरबारी धूळ खात पडली. आता महामंडळाने अशीच एक नवी योजना नूतनीकरण करून आणावी आणि वाचकांना त्याचा लाभ मिळवून द्यावा.''

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, ''साहित्य संमेलनाच्या रूपाने साहित्याचा उत्सव जरूर व्हावा; परंतु काही ठोससुद्धा व्हावे अशी अपेक्षा आहे. सध्याच्या काळामध्ये भाषेवर आक्रमण करणारे एक नवे आव्हान कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या रूपाने आलेले आहे. सगळ्याच भाषांना या एआयचा सामना करावा लागणार आहे कारण हे तंत्रज्ञान जगण्याला व्यापून टाकणार आहे. त्यामुळे त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.''

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, ''साहित्य संमेलने लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. इंग्रजी लिट फेस्टिव्हलला युवकांचा जो प्रतिसाद मिळतो तो इतका का असतो याचा अभ्यास आपणही करणे गरजेचे आहे. त्यानुसार संमेलनात बदल करणे गरजेचे आहे. परिसंवादकेंद्रित संमेलनाकडून ती पुस्तककेंद्रित आणि लेखककेंद्रित होणे गरजेचे आहे. वाचकांचा विचार करून उपक्रमांची आखणी होणे गरजेचे आहे. मराठी साहित्य आणि संस्कृतीला नवे वळण कसे देता येईल, हे पाहायला हवे.''

भारत सासणे म्हणाले, ''नोबेल, बुकर पुरस्कार मिळवणाऱ्या नामांकित व्यक्ती, लेखक साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर येणे गरजेचे आहे. त्यातून वैश्विक विचार आपल्याला समजतील. संमेलने अधिक उंचीवर जाण्यासाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. बालसाहित्य हा विषय दुर्लक्षित राहत असल्याने संमेलनात त्याला महत्त्वाचे स्थान देणे गरजेचे आहे.''

या वेळी माजी संमलेनाध्यक्ष श्रीपाल सबनीस हे प्रकृतीअस्वास्थ्यामुळे येऊ न शकल्याने त्यांनी लिहून शुभेच्छा पाठवल्या. प्रास्ताविक सुनिताराजे पवार यांनी केले. विनोद कुलकर्णी यांनी आभार मानले.

## अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याची विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दखल.






# परिसंवादांचे दळण कमी करून तरुणांचा सहभाग वाढविण्याला प्राधान्य

## साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मांडली साहित्य संमेलनाची नवी दिशा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

साहित्य संमेलनातील परिसंवाद सलग तीन-तीन तास चालतात. त्यामुळे परिसंवादांचे स्वरूप बदलून त्याला चर्चासत्राचे स्वरूप देणे, वक्त्यांची संख्या कमी करणे, परिसंवादाचा कालावधी कमी करणे, हा प्रयत्न आम्ही करणार आहोत. तरुणांचाही सहभाग वाढविण्यावर भर देणार आहोत, अशा शब्दांत साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी साहित्य संमेलनाची नवी दिशा मंगळवारी (दि.१५) मांडली.

'साहित्य संमेलनाचा ठरलेला साचा मोडावा लागणार'

'एआय'वर संमेलनात चर्चा व्हावी : डॉ. सदानंद मोरे



# 'संमेलनाचा साचा मोडायला हवा'

प्रा. मिलिंद जोशी यांचे प्रतिपादन

माजी संमेलनाध्यक्षांच्या महामंडळास सूचना

''अक्षय वाङ्मय'साठी पाठपुरावा करावा'



# साहित्य संमेलने पुस्तककेंद्री, लेखककेंद्री व्हावीत

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन

हार्दिक अभिनंदन



सकाळ

# संमेलने साहित्यकेंद्री अन् वाचककेंद्री व्हावीत

माजी साहित्य संमेलनाध्यक्षांची अपेक्षा; महामंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन

साहित्यिक हेच संमेलनांचे 'ब्रँड ॲम्बेसिडर'

# विलास वरे लिखित
# ‘बहिष्कृतांचे अंतरंग’ : करुणेचा गहिवर

**डॉ. वैभव ढमाळ**




पुस्तकाचे नाव : **बहिष्कृतांचे अंतरंग**
लेखक : **विलास वरे**
प्रकाशक : **सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.**
प्रथमावृत्ती : **२३ मे २०२४**
मुखपृष्ठ : **संतोष घोंगडे**
मूल्य : **५००/–**

हे जग देवाने निर्माण केले खरे; पण दुःख आणि वेदनांनी ओथंबून वाहणाऱ्या या जगाची वेदना वाटून घेण्याची जबाबदारी मात्र देवाने माणसाकडेच दिली. मग देवाचे दूत बनून अनेक संतांनी, समाजसुधारकांनी, समाजसेवकांनी, डॉक्टरांनी, रुग्णसेवकांनी समाजाची वेदना शमविण्याची जबाबदारी पार पाडली. वेदनेवर फुंकर घालण्याच्या या सहवेदनेला फार मोठा इतिहास आणि परंपरा आहे. गाडगेबाबा, बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन, मदर तेरेसा, मनोहर दिवाण अशा अनेक समाजसेवकांनी विविध आजार, अगतिकता, दैन्य यांनी ग्रासलेल्या जीवनांत आनंद निर्माण केला. रुग्णांची शारीरिक व मानसिक वेदना समजून घेतली. आपली आयुष्यं अशा दुःखितांसाठी समिधेसम वाहून टाकली.

बाबा आमटे त्यांच्या ‘ज्वाला आणि फुले’ या काव्यसंग्रहामधील ‘दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही’ या कवितेमधून जी आर्त भावना आणि दुर्दम्य आशावाद व्यक्त करतात तो सेवाधर्माचा मूलमंत्र आहे, असे मला वाटते. ते लिहितात,

‘भोवती होते घृणेचे ते थवे घोंगावणारे

संपले होते निवारे, बंद होती सर्व दारे
वाडगे घेऊन हाती जिद्द प्राणांची निघाली
घाबरी करुणा जगाची, लांबोनी चतकोर झाली
माझिया रक्तासवे अन् चालली माझी लढाई,
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही...'

या कवितांना निरुपणाची गरजच नसते. अशा करुणेच्या गहिवराला आपल्या समाजात देदीप्यमान परंपरा आहे. आपल्या माणूसपणाची सर्वांत मोठी खूण! जी वेदना वाटून घ्यायला देवही कमी पडला, तिथे माणूस माणसासाठी उभा राहिला.

या सर्व समाजसेवकांच्या महान कार्याचा वृत्तान्त कथन करणारी अनेक पुस्तके आपल्याकडे आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील, सेवाभावी संस्था चालविणारे, उपक्रमांचे सक्रिय सदस्य असणारे अशा अनेकांनी त्यांच्या अनुभवांवर आधारित पुस्तके लिहिली आहेत. लेखक श्री. विलास वरे याच कुळातले. अशा ग्रंथांमुळे नव्या कार्यकर्त्यांना बळ मिळते. लिखित वृत्तान्त इतिहासाच्या रूपाने पुढच्या पिढीकडे जातो. पुढच्या पिढीसाठी तो अभिमानास्पद वारसा असतो. नवी मुले ते वाचतात. त्यांची हृदयं प्रेरणेने भारावून जातात. समाजसेवेसाठी प्रेरित होतात. म्हणून अशा पुस्तकांचं महत्त्व शब्दातीत आहे.

मानवाच्या शारीरिक व मानसिक वेदनांवर फुंकर घालणे हा निजध्यास अंतरंगात बाळगून सेवाकार्य करणारे असंख्य ज्ञात-अज्ञात लोक आपल्या आजूबाजूला असतात. अशी माणसे, त्यांचे कार्य समाजासमोर प्रकर्षाने आले, तर समाजाची फार मोठी शक्ती त्यांच्यासोबत उभी राहते. माणसाला माणसाचा चांगुलपणा कळायला मदत होते. 'अंधार फार झाला,' असे म्हणण्यापेक्षा शक्य तितके अधिक लोक उजेडाकडे पाहतात, उजेड अधिक तेजस्वी होत राहील यासाठी प्रयत्न करतात.

१९८० च्या दशकात श्री. विलास वरे हे महाराष्ट्र शासनाच्या कुष्ठरुग्ण सेवेत दाखल झाले. कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम तसेच निर्मूलन योजना सुरू झाल्यानंतरचा हा कालखंड. तरीही समाजात या आजाराविषयी फार गैरसमज होते. रुग्णांची संख्या नियंत्रणात येत होती; परंतु आजारासोबत बहिष्कृतता आणि अंधश्रद्धा अशा समस्या होत्याच. ३५ वर्षे कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणून तरडगाव, लोणंद आणि साखरवाडी इ. ठिकाणी सेवा केल्यानंतर २०१२ साली श्री. विलास वरे शासकीय सेवेतून निवृत्त झाले. आपली शासकीय सेवा बजावत असताना त्यांनी कुष्ठरुग्णांचे पुनर्वसन व लेखन ही दोन कामे निष्ठेने केली. सेवाकाळातील आपले अनुभव, चिंतन यांच्या आधारावर साहित्यसेवा केली.

अनेक वर्षांचे सेवाकार्य, अंतरंगातील सहवेदना, लिखाणाची हतोटी आणि प्रांजळ मनोबुद्धी लाभलेल्या श्री. विलास वरे यांचे अलीकडेच म्हणजे २६ मे २०२४ रोजी प्रकाशित झालेले नवे उत्तम पुस्तक म्हणजे 'बहिष्कृतांचे अंतरंग' होय. खरे तर वेदनांच्या अनुभवांनी ओतप्रोत भरलेल्या या पुस्तकास सुंदर, उत्तम म्हणावे तरी कसे? हो! पण, लेखकाच्या अंतरंगातील करुणा, सेवाभाव, साधेपणा, खरेपणा मात्र नितांत सुंदर आहे. सायन पब्लिकेशन्स प्रा. लि. ने प्रकाशित केलेले हे समृद्ध अनुभवकथन त्यांनी कुष्ठरोग सेवेत आपले निःस्पृह योगदान दिलेल्या सर्व समाजसेवकांना आणि शासकीय अधिकारी अन् कर्मचाऱ्यांना अर्पण केले आहे. या अर्पणपत्रिकेतील एक अदृश्य; परंतु सर्वांत मोठे नाव म्हणजे सौ. सुनिता विलास वरे हेच आहे कारण संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर जसा विलास वरे यांचा सेवाभाव प्रकर्षाने जाणवला तेवढाच सौ. सुनिता वरे यांचा समर्पण भावही जाणवला. या बाईंची साथ नसती तर श्री. वरे एवढे मोठे आणि चांगले काम करू शकले नसते, हे श्री. वरेदेखील मान्य करतील. पुस्तकाचे मुखपृष्ठ सुरेख व समर्पक झाले आहे. चित्रकार श्री. संतोष घोंगडे यांनी पुस्तकाचा आशय आपल्या चित्रात नेमकेपणाने मांडला आहे.

२७ प्रकरणे आणि ३८८ पाने असणारा हा अनुभवसिद्ध ग्रंथ पानोपानी वेदनांनी भरलेला आहे. तुमच्या माझ्यासारखीच माणसे; पण त्यांचे बहिष्कृत

जीवन भटक्या प्राण्यांपेक्षाही वाईट म्हणावे असे होते. आज आपल्यापैकी फार कुणी कुष्ठरोग झालेला रुग्ण पाहिला नसेलच कारण, हा आजार आता मोठ्या प्रमाणावर नियंत्रणात आला आहे. शासन आणि श्री. विलास वरे यांच्यासारख्या अनेक कुष्ठरोग तंत्रज्ञांनी घेतलेले अपार कष्ट, यामुळे हे शक्य झाले आहे. हा आजार आता अगदी अपवादात्मक रूपात आढळतो. त्यामुळे अलीकडच्या काही पिढ्यांना याचा अनुभव नाही. आपल्या व यानंतरच्या पिढ्यांना मात्र हे अनुभव अशा अनेक पुस्तकांमधून वाचायला मिळतील. हे वाचन आपल्याला केवळ माहिती देणार नाही, तर अशा प्रकारच्या दुर्धर आजारासोबत येणाऱ्या समाजमनांच्या विकृती कशा प्रकारे दूर करता येतात, याचा परिपाठ वाचकांना आणि कार्यकर्त्यांना मिळेल. समाजमनाची वेदना दूर करण्याच्या कोणत्याही कार्यात योगदान देणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी शक्तिस्रोत ठरणारी अशी पुस्तके म्हणजे करुणेचा गहिवर असतात.

आपल्या मनोगतात श्री. विलास वरे लिहितात, 'ज्या वेळी मी कुष्ठरोग सेवेत आलो, त्या वेळी मला त्या सेवेची भीती कधीच वाटली नाही; पण सामाजिक गैरसमजांना बळी पडून जे बहिष्कृत झाले, उपेक्षित झाले, त्यांच्या वेदनांची भीती माझ्या मनात कायम राहिली अन् त्या भीतीनंच या सेवेबद्दल अंतःकरणात एक असीम सहानुभूती निर्माण केली.' हे वाक्य अंतर्मुख करणारे आहे. अंतरंगातील तळमळ खरी असेल तरच असे साक्षात्कार होतात, असे मला वाटते. कारण कुष्ठरोग झालेला रुग्ण कधी काळी आपल्या आजूबाजूला असणे हेच जेव्हा सहन होण्यासारखे नव्हते, त्या वेळी अशा रुग्णांच्या शारीरिक – मानसिक अवस्थेचा विचार कोण करणार? आणि मग आजार झाल्यानंतर तसेच बळावल्यानंतर तर त्या रुग्णाच्या जिवाची जी फरपट होत असेल ती केवळ कल्पनेपलीकडची... अशा काळात श्री. वरे या सच्च्या कार्यकर्त्याच्या मनात नेमका प्रश्न उमटला व त्याचे उत्तरही त्यांनी शोधले. आजारापेक्षा बहिष्कृतता अधिक वेदनादायी. रुग्णांच्या जीवनाची दुर्दशा त्या बहिष्कृततेमुळेच होते, हे या संवेदनशील लेखकाने व कुष्ठरोग तंत्रज्ञाने जाणले. आपल्या कार्याचे महत्त्व व आवश्यकता समजून घेतली. त्यामुळे त्यांच्या कार्यात अधिक करुणा, समंजसपणा, त्याग, कल्पकता व आनंद निर्माण झाला, असे माझे आकलन आहे.

मनोगतात ते असंही सांगतात की, बहिष्कृतांच्या वेदनेचा इतिहास पुढच्या पिढीच्या विस्मरणात जाऊ नये, म्हणून हा लेखनप्रपंच मी केला. हा विचारही लेखक म्हणून त्यांची जबाबदारी निश्चित करणारा आहे. या अनुभवसंपन्न पुस्तकाच्या निर्मितीमुळे पुढील पिढ्यांसाठी निश्चितपणे हे पुस्तक मार्गदर्शक व प्रेरणादायक ठरणार आहे. विविध साहित्य प्रकारांमधील २७ पुस्तके लिहिणारे श्री. विलास वरे अत्यंत जाणीवपूर्वक आपल्या साहित्यसेवेची प्रेरणा ही कुष्ठरोग सेवाच आहे, असे सांगतात. या सेवाकार्यामुळे झालेला प्रवास, लोकसंपर्क, असंख्य अनुभव, मानवी जीवन व स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण यांच्या बळावर त्यांना आपले लेखन कार्य केल्याचे जाणवते आहे.

कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणून अत्यंत उल्लेखनीय काम केलेल्या श्री. विलास वरे आणि त्यांना तितक्याच तोलामोलाची साथ दिलेल्या सौ. सुनिता वरे यांनी त्यागाच्या आणि सहजीवनाच्या रूपाने स्वत:च्या माणूसपणाचा दाखला दिला आहे. हे पुस्तक वाचून या दांपत्याचे अंतरंग व कार्य उमगले आणि वाचकांच्या डोळ्यांतून सहवेदनेचे अश्रू ओघळले तरी तोही आपल्या माणूसपणाचा दाखला असेल.

कारण वेदना वाटून घ्यायची असेल तर आधी स्वतःची वेदना बाजूला ठेवून आपले हृदय आभाळासारखे विशाल करावे लागते आणि मग कितीही अडथळे आले तरी आपल्या कार्यापासून विचलित न होता, नि:स्वार्थीपणे दुर्बलांना, गांजलेल्यांना आधार देण्याचे काम करावे लागते. अशी माणसं आणि त्यांचे कार्य पाहिले की, कविवर्य विंदा करंदीकर यांची विश्वाचे आर्त मांडणारी व

मानवतेच्या अतिविशाल क्षमतांचे दर्शन घडविणारी ही कविता आठवते...

'पर्वतांनो दूर व्हा रे ! सागरांनो दूर व्हा रे !
उघडिले मी दार माझे; मानवांनो आत या रे
दुर्बलांना, दु:खितांना, शापितांना, शोषितांना,
आज क्षितिजाच्या करांनी देत मी आलिंगना रे'

लेखक श्री. विलास वरे यांची स्मरणशक्ती उत्तम आहे कारण अनेक अनुभव नोंदवताना सर्व बारकावे नेमकेपणाने सांगत ते प्रसंगातील ताजेपणा टिकवून ठेवतात. लेखनतंत्र संवादी असल्याने वाचकाला थेट प्रसंगांना अनुभवता येते. कथा सांगण्याची शैली ग्रामीण आहे, त्यातील संवाद देशी बोलीतील असल्याने वाचकांना जवळचे वाटतील. त्यांचे अनुभवविश्व व्यापक आहे. विविध माणसांचे तऱ्हेतऱ्हेचे स्वभाव त्यांनी जवळून अनुभवले, त्यातून मानवी मनांचे असंख्य अदृश्य कप्पे त्यांच्या दृष्टीस पडले असावेत. या संवेदनशील लेखकाने माणसाला माणूस म्हणून पाहिल्याने त्यांच्या अनुभव कथनात कोणाविषयी राग, विषाद जाणवला नाही. लोक असे का वागतात, यापेक्षा माझे कर्तव्य काय, हे पाहणारे व ते निस्सीम भावाने पार पाडणारे श्री. विलास वरे यामुळेच विलक्षण व्यक्तिमत्त्व भासतात. त्यांचे हे अनुभवकथनदेखील विलक्षण प्रत्ययकारी झाले आहे. प्रत्यक्ष वाचन आपल्याला असाच अनुभव देईल.

'कुष्ठरुग्ण सेवेतले पहिले पुनर्वसन' या पहिल्याच प्रकरणापासून श्री. विलास वरे यांच्या मनस्वी आणि भारावलेल्या रुग्णसेवेचा परिचय वाचकांना होईल. फलटण तालुक्यातल्या तरडगाव या गावी त्यांची पहिली नियुक्ती झाली. हे ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गावरचे गाव. पालखीच्या दरम्यानच घडलेला तो प्रसंग श्री. वरे यांच्या कामावर व विचारांवर फार मोठा प्रभाव पाडणारा आहे. संपूर्ण प्रकरण वाचून त्याचा प्रत्यय येईल; परंतु पान क्रमांक १५-१६ वरील त्यातील एक संवाद आपल्याला त्या प्रकरणाच्या परिणामकारकतेचा अनुभव देईल.

'एक चिरंजीव आनंद' या अनुभवकथनामधील आजारातून बऱ्या झालेल्या श्रीपती माने या रुग्णाला केलेली पैशाची मदत आणि त्या पैशातून हॉटेलशेजारी टपरी टाकून चालवलेला प्रपंच, हा अनुभवदेखील चांगला आहे. कैकाडी समाजातील एका कष्टकरी कुष्ठरुग्णाच्या पुनर्वसनाची 'आणि माधव स्वाबलंबी झाला' ही व्यथाही प्रभावी आहे. भावकी आणि पोटच्या मुलाकडूनही नाकारले जाणे आणि मग वस्ती सोडून आश्रितासारखे बायकोच्या गावात राहून स्वावलंबी होणे, ही गोष्ट वाचताना मनात अनेक भावनांची आंदोलने होत राहतात.

'सेवेतला नवा प्रयोग' हे अनुभवकथन मला व्यक्तिशः फारच भावले. कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये आंतरिक तळमळ असेल, तर नियमित कामाच्या पलीकडे जाऊन आपण ते काम नावीन्यपूर्णरीत्या तसेच अधिकाधिक परिणामकारक होईल यासाठी प्रयत्न करतो. अशाच भावनेतून श्री. वरे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळेचे विद्यार्थी व ग्रामस्थ यांचे समुपदेशन करून त्यांच्या मदतीने रुग्ण शोधण्याची अवलंबलेली पद्धत फारच उपयुक्त असल्याचे जाणवते. त्यायोगे मुले व ग्रामस्थांच्या अंधश्रद्धा दूर होणे, रुग्णांप्रति सजग राहणे, आपला सहभाग नोंदवणे अशा अनेक गोष्टी साध्य झाल्या.

या अनुभवकथनामधील 'परीस भेटला, स्पर्श राहून गेला' हे प्रकरण म्हणजे लेखक वरे यांच्या कुष्ठरुग्ण सेवा व साहित्य सेवा यांचा सुवर्णाध्याय आहे. तळमळीचा सेवक आणि होतकरू लेखक अशा दुहेरी भूमिकेत कार्यरत असताना आपल्या सेवाकार्याला व लेखनाला साक्षात पु. ल. देशपांडे यांचे पाठबळ लाभावे म्हणून त्यांनी पुलंची भेट घेतली. भेटीची पार्श्वभूमी वाचनीय व उत्कंठावर्धक आहे. पुलंची व विलास वरे यांची ती प्रत्यक्ष भेट भीती, शाबासकी, मार्गदर्शन, आस्थेवाईक चौकशी, आश्वासन अशा वैविध्यपूर्ण आठवणींनी भरलेली आहे. भेटीचा प्रसंग वाचताना पुस्तकाच्या पानात दिसतो, इतक्या आत्मीयतेने लेखक विलास वरे यांनी तो लिहिला आहे. दुर्दैवाने पुलंची प्रस्तावना त्यांच्या पुस्तकाला

लाभली नाही; परंतु श्री. वरे मोठे भाग्यवंत की, त्यांना पुलंचा पाहुणचार, आशीर्वाद आणि कौतुकाची थाप लाभली.

'एक अनोखा कलावंत'सारखा छान अनुभव देणारा प्रसंग, 'एक निःस्पृह स्वातंत्र्यसैनिक' ही राजकारण, कुष्ठरोग आणि खरी राष्ट्रनिष्ठा यांचा अनुभव मांडणारी गोष्ट, अंतःकरण ढवळून काढणारा 'अखेर नानीनं मरण स्वीकारलं.' हा करुण अनुभव, 'लावणीत माझ्या संगे पांडुरंग नाचला' सारखी विलक्षण रुग्णकथा, प्रेमकथा आणि लोककलेवरील निष्ठेची गोष्ट सांगणारा अनुभव असो किंवा अगदी अलीकडचा, कोविड दरम्यानचा एका लोकनाट्य कलावंताच्या जीवनातील चढउतार मांडणारा 'सोंगाड्या रडू लागतो तेव्हा' सारखा प्रसंग असो. प्रत्येक अनुभवकथन एक वेगळा भाव निर्माण करते; पण त्या सर्व भावनांमधील एक समान धागा म्हणजे श्री. वरे यांची निःस्पृह सेवा हाच आहे. यासारख्या प्रत्येक प्रसंगात श्री. वरे यांचा बरे झालेल्या कुष्ठरुग्णांचे समाजातच पुनर्वसन झाले पाहिजे, त्यांना सामाजिक स्थान लाभले पाहिजे. ते स्वावलंबी असले पाहिजेत, ही तळमळ प्रकर्षाने जाणवते.

श्री. विलास वरे यांनी आपले विहित कार्य करताना आपल्यासारखे अथवा आपल्यापेक्षा कैक पटींनी मोठे कार्य करणाऱ्या अनेकांना पाहिले. त्यांच्याकडून काम करण्याची प्रेरणा घेतली. अंतःकरणातील सद्भाव व सजग कर्तव्यबुद्धी यामुळे श्री. वरे यांच्या हातून चांगली रुग्णसेवा घडली. कार्याला प्रार्थनेचे रूप प्राप्त झाले.

'जाणवाया दुर्बलांचे दुःख आणि वेदना
तेवत्या राहो सदा रंध्रातुनी संवेदना
धमन्यातल्या रुधिरास या खल भेदण्याची आस दे
सामर्थ्य या शब्दांस आणि अर्थ या जगण्यास दे'

अशा कवितांची एक एक ओळ आणि प्रत्येक कडवे अनेक धर्मग्रंथांचे सार सांगतात. गाडगेबाबा, बाबा आमटे अशा थोर विभूतींच्या सेवाभावास सुमनांजली वाहणारे कवितेमधील भाव त्यांच्या कार्याला चिरंजीव शब्दांत गुंफतात. समकालीन कवी गुरू ठाकूर हे वरील काव्य रचना अशा महान लोकांच्या कार्याला समोर ठेवून तुम्हा– आम्हासाठी लिहितात. कवितांमधील भाव आपल्याही मनांमध्ये करुणा, धैर्य, सहवेदना निर्माण करतात. श्री. विलास वरे यांच्या सारखे निःस्पृह कार्यकर्ते हे अशा काव्यांमधील खरी प्रेरणा असतात.

एका मोठ्या कालखंडाचा वृत्तान्त या अनुभवकथनाच्या माध्यमातून शब्दबद्ध झाला आहे. वेदना चिरंजीव असते. शब्दही चिरंजीव असतात. सेवाकार्यही चिरंजीव व्हावे, असा उदात्त मानवतावादी विचार मांडणारे हे पुस्तक याच कारणासाठी आपण वाचावे. जेवढा उजेड वाढेल… तस तसा अंधार कमी होत जाईल… यासाठी वाचावे. कर्मसिद्धान्ताचे पाईक असणारे श्री. विलास वरे याच सेवा कुळातले आहेत. अनेकांची वेदना समजून घेऊन त्या शमविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करून आपल्या कार्यास व जीवनास अर्थ प्राप्त करून घेणारी ही माणसं समाजाची आभूषणं असतात.

**डॉ. वैभव ढमाळ**
९९२१९६८६८६

# भावपूर्ण श्रद्धांजली!



**रावसाहेब रंगनाथ बोराडे**
(१९४०–२०२५)

लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे जन्मलेले रा. रं. बोराडे हे प्रामुख्याने ग्रामीण कथाकार, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध होते. बदलत्या काळानुसार बदलत गेलेले ग्रामीण जीवन, ग्रामीण समाजव्यवस्था आणि त्या बदलाचा मानवी नातेसंबंधांवर होणारा परिणाम याचे वेधक आणि प्रत्ययकारी वर्णन त्यांच्या ग्रामीण कथा आणि कादंबऱ्यांतून दिसते. बालसाहित्यकार म्हणूनही त्यांची ख्याती होती. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले. 'पाचोळा' ही त्यांची गाजलेली कादंबरी.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!




**डॉ. मीना सुधाकर प्रभू**
(१९३९– २०२५)

वैद्यक व्यावसायिक असूनही मराठी साहित्यात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविणाऱ्या लेखिका म्हणजे मीना प्रभू. 'प्रवासवर्णन' या साहित्य प्रकाराला मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान मिळवून देणाऱ्या मीना प्रभू यांनी जवळपास सर्व जगभर प्रवास केला होता आणि वाचकांना स्थळ वर्णनाचा प्रत्यक्ष अनुभव यावा आणि त्या स्थळांचा इतिहासही ज्ञात व्हावा अशी त्यांची चित्रदर्शी लेखनशैली होती. त्यांची प्रवासवर्णनपर अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'जीवन गौरव पुरस्कारा'सहित अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!

# भावपूर्ण श्रद्धांजली!




**नरेंद्र पुरुषोत्तम चपळगावकर**
(१९३७– २०२५)

न्यायमूर्ती म्हणून प्रसिद्ध असलेले नरेंद्र चपळगावकर हे आपल्या वैचारिक लेखनामुळे मराठी साहित्यात सुपरिचित आहेत. न्यायविषयक कथा तसेच भारतीय राज्यघटना यांसारख्या विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. लातूर येथील दयानंद महाविद्यालयात ते पहिले मराठी विभागप्रमुख होते. हैदराबादच्या मुक्ती लढ्यातील ते एक नेते होते. स्वातंत्र्य चळवळीतील अनेक घटनांशी त्यांचा संबंध आला होता. चरित्र लेखनही त्यांनी केले असले तरी राजकीय आणि वैचारिक विषय हेच त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी होते.

२०२३ या वर्षी वर्धा येथील ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. अन्य अनेक पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!



**प्राध्यापक अनंत भावे**
(१९३७ – २०२५)

प्राध्यापक असलेले अनंत भावे हे उत्तम वक्ते आणि साहित्यिक म्हणून प्रसिद्ध असले तरी दूरदर्शनवरील वृत्तनिवेदक म्हणून ते महाराष्ट्रातील घराघरात पोहोचले. 'माणूस' साप्ताहिकातील त्यांचे स्तंभलेखन उल्लेखनीय होते. स्वभावाने मिश्किल आणि खेळकर असलेल्या भावे यांनी मुलांसाठी जवळपास पन्नास पुस्तके लिहिली. कुणी लहान मूल केव्हाही भेटले तरी त्यांच्या खिशात त्या मुलासाठी खाऊ असेच!

२०१४ या वर्षीचा बालसाहित्यासाठी असलेला साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळाला होता. विनोदी साहित्य संमेलनातील परिसंवादाचे ते अध्यक्ष होते. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांचे निधन झाले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# कार्यवृत्त

### मसाप, धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि. शाखा

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालय म्हसदी (ता. साक्री, जि. धुळे) आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, धुळे जि. आणि नंदुरबार जि. शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजीव गिरासे होते. या प्रसंगी धुळे-नंदुरबार जि. प्रतिनिधी प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी 'अभिजात मराठी भाषा आणि त्यापुढील आव्हाने' या विषयावर संवाद साधला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा दीड ते अडीच हजार वर्षे प्राचीन असावी, त्या भाषेला स्वयंभूपण असावे, त्या भाषेचा प्रवास अखंडित असावा, हे निकष मराठी भाषेने पूर्ण केल्याने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. हा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कोणते फायदे आणि अभिजाततेचा दर्जा मिळाल्यानंतरची कोणती आव्हाने या विषयी अनेक दाखले, उदाहरणे देऊन मराठी भाषेचे श्रेष्ठत्व आणि वैभव संपन्नता डॉ. पवार यांनी विशद केली. याच वेळी अहिराणी साहित्य परिषदेचे (धुळे) अध्यक्ष प्रा. भगवान पाटील यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्या संदर्भात मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाची प्रत्येकाची जबाबदारी आहे, म्हणून  दैनंदिन जीवनात माय मराठीचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे, असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मिलिंद देवरे यांनी केले, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. भैय्यासाहेब देवरे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त लेखक प्रकाश सुखदेव कोल्हे लिखित 'मी मला शोधताना' या आत्मकथनावर परीक्षणात्मक चर्चा करण्यात आली. प्रा. डॉ. मिलिंद कुमार देवरे (म्हसदी कॉलेज, ता. साक्री) आणि प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी 'मी मला शोधताना' आत्मकथनाची गुणवैशिष्ट्ये, त्यातील आशय संपन्नता, अर्थवत्ता या दृष्टीने उत्कृष्ट परीक्षण केले. डॉ. देवरे म्हणाले, 'प्रकाश कोल्हे यांनी जे जगलं, भोगलं त्याचा जीवनपट 'मी मला शोधताना' आत्मकथनातून मांडला आहे.' प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी लेखक प्रकाश कोल्हे यांचा जीवनसंघर्ष अधोरेखित केला. 'लेखकाने कष्टपूर्ण जीवन प्रवास 'अलक' (अतिलघुकथा) या नव्या प्रकारातून मांडला आहे. त्यामुळे त्या लघुकथा वाचनीय व अंतर्मुख करणाऱ्या आहेत. 'एक सालकऱ्याचा मुलगा इंजिनिअर ते संस्थापक (मानवघन सामाजिक, शैक्षणिक विकास संस्था, नाशिक)' कसा घडत गेला हे साध्या, सरळ, ओघवत्या शैलीत मांडल्याने 'मी मला

शोधताना' आत्मकथन प्रभावी झाले आहे.' युवकांनी आवर्जून वाचावे असे आत्मकथन असल्याचे त्या म्हणाल्या.

प्राचार्य संजीव गिरासे यांनी लेखक प्रकाश कोल्हे यांचा परिचय करून दिला. समारोपात डॉ. गिरासे म्हणाले की, सुंदर शब्दात प्रकाश कोल्हे यांनी शिल्प साकारले आहे.

प्रकाश कोल्हे यांनी संघर्षातून घडत गेलो, ऊर्जा शोधली तर काय होऊ शकते हे माझे आत्मकथन वाचल्यानंतर कळते, असे सांगितले.

प्रा. डॉ. वाल्मीक आढावे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. उमेश शिंदे यांनी आभार मानले.

या सर्व कार्यक्रमांना दोन्ही शाखांच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. रसिक श्रोत्यांचा सर्व कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

दि. १५ मार्च २०२५ रोजी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत धुळे-नंदुरबार जि. प्रतिनिधी प्रा. डॉ. शशिकला पवार यांची विभागीय कार्यवाह म्हणून निवड झाल्याबद्दल मसाप, पुणेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्य यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील सभासदांनी डॉ. शशिकला पवार यांचे अभिनंदन केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-इस्लामपूर

राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने...

**२९ वे मराठी साहित्य संमेलन २०२५**

रविवार दि. १२/०१/२०२५ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा- इस्लामपूर राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २९ वे 'मराठी साहित्य संमेलन' ज्ञानप्रबोधिनीच्या सभागृहात संपन्न झाले. या साहित्य परिषदेच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम साहित्यिक प्रा. प्रवीण बांदेकर (सावंतवाडी) हे होते. तर उद्घाटक म्हणून प्रा. डॉ. संजय थोरात (ज्येष्ठ पत्रकार) आणि प्रा. डॉ. सुरज चौगुले हे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या वेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रवीण बांदेकर म्हणाले की, संभ्रमाचे वातावरण थांबवण्यासाठी साहित्यिकांनी लेखणीचा वापर करावा. जाणीवपूर्वक मेंदू बधिर केले जात आहेत. वैचारिक बधिरपण घातक असून त्याला वेळीच प्रतिकार साहित्यिकांनी केला पाहिजे. या पहिल्या सत्राचे प्रास्ताविक डॉ. दीपक स्वामी यांनी केले, तर आभार प्रा. दशरथ पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना थोरात यांनी केले. या वेळी आंतरराष्ट्रीय मराठी दिवाळी अंकांच्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्र. 'कूळवाडी' या दीपावली अंकाचे संपादक माधव जाधव, द्वितीय क्रमांक - मुंबई येथील अरुण शेवते यांनी संपादित केलेल्या 'ऋतुरंग' व तृतीय क्रमांक - मंगळवेढा येथील संपादक इंद्रजित घुले यांनी संपादित केलेल्या 'शब्दशिवार' या अंकांना व त्यांच्या संपादकांना सन्मानित करण्यात आले, तर विशेष उल्लेखनीय जळगांव येथील संपादक नामदेव कोळी यांनी संपादित केलेल्या 'वाघूर' गारगोटी येथील संपादक राजन गवस यांच्या 'मुराळी' व पुणे येथील संपादक शिरीष पत्की व मकरंद गांगल संपादित 'काणसागर' दिवाळी अंकांच्या संपादकांना सन्मानित करण्यात आले.

तर राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार 'कथा' विभागामध्ये 'पिसरा' आणि 'बाईच्या कथा' या कथासंग्रहाचे लेखक गणेश मुळे, पुणे तर कादंबरी विभागामध्ये 'डी. पी. होता म्हणून' या कादंबरीचे लेखक नितीन गणपत शिंदे तर कवी विलास माळी गडहिंग्लज यांच्या 'झांझरझाप' व कवी धनाजी धोंडीबा घोरपडे यांच्या 'जामिनावर सुटलेला काळा घोडा' या साहित्यकृतींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**सत्र २ रे**

या सत्रामध्ये प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे कोल्हापूर

यांच्या हस्ते प्रा. डॉ. भीमराव पाटील यांच्या 'शहरशिळप' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. याचवेळी डॉ. श्रीकांत पाटील घूणकी यांनी डॉ. सुनीलकुमार लवटे यांची प्रकट मुलाखत घेऊन त्यांच्या जीवन कार्याचे बंध व अनुबंध उलगडले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक परिचय डॉ. सुरेश साळवे यांनी करून दिला, तर आभार डॉ. कालिदास पाटील यांनी व्यक्त केले.

**सत्र ३ रे**

३ या सत्रामध्ये कवयित्री वर्षा चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रित कवींचे संमेलन संपन्न झाले. यामध्ये नीलम माणगावे, एकनाथ पाटील, बबलू वडर, शिवाजी पाटील, अभिजीत पाटील, लता ऐवळे, रमजान मुल्ला, रवि बावडेकर, सुनील नायकल, मनिषा रामजादे, विनायक कुलकर्णी, वृषाली पवार, उत्तम सावंत, भारती पाटील, प्रा. राजा माळगी यांनी सहभाग घेऊन आपल्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवी साहिल कबीर यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक कवी आनंदहरी यांनी केले, तर आभार कवी उत्तम सावंत यांनी व्यक्त केले.

संमेलनाचा समारोप संपन्न झाला. या समयी राजारामबापू सह. बँकेचे चेअरमन मा. शामराव पाटील (आण्णा), डी. बा. पाटील, प्रा. सुनिल पाटील, प्रा. शैलजा यादव, उदयसिंह पाटील, डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रकाश जाधव, श्री. धर्मवीर पाटील, डॉ. सुरेश साळवे, सूर्यकांत शिंदे, प्रा. डॉ. दीपा देशपांडे, श्री. डी. आर. सलगर यांनी या कार्यक्रमात संयोजन करून सायंकाळी ६.०० वाजता साहित्य संमेलनाचा समारोप करण्यात आला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आजीव सदस्य डॉ. विवेक देशपांडे यांचा २८ वा स्मृतिदिन ३१ मार्च २०२५ रोजी राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी सभागृहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सोनाली नवांगुळ या होत्या. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'थोडी वजाबाकी पुष्कळ बेरीज' हा होता. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक दीपक स्वामी यांनी केले. परिचय डॉ. अर्चना थोरात यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार डॉ. दीपा देशपांडे यांनी करून दिले. सूत्रसंचालन प्रा. शैलजा यादव-पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमास प्रा. शामराव पाटील, कार्याध्यक्ष सुनिल पाटील, उपाध्यक्ष प्रा. सुभाष खोत, जिल्हा प्रतिनिधी प्रा. दशरथ पाटील, धर्मवीर पाटील, आनंदहरी उपस्थित होते.

**मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५**

शाखा इस्लामपूरच्या वतीने राजारामबापू ज्ञानप्रबोधिनीच्या सभागृहात विशेष सभा आयोजित करून मराठी साहित्यातील ख्यातनाम कवी प्रा. एकनाथ पाटील यांना 'यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार' २०२५ या 'केशवसुत' पुरस्कार त्यांच्या 'अरिष्ट काळाचे भयसूचन' या काव्यसंग्रहास प्राप्त झाला. त्यांचा विशेष सत्कार मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा) यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या गौरवार्थ प्रसिद्ध साहित्यिक वि. बा. पाटील, प्रा. डॉ. दीपा देशपांडे, सौ. वृषाली आफळे, शाखेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीपक स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. याविषयी सूचना कार्याध्यक्ष प्रा. सुनिल पाटील यांनी व्यक्त केली, तर डॉ. अर्चना थोरात यांनी आभार व्यक्त केले.

या प्रसंगी 'पाचोळा'कार ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संवेदनशील लेखक व क्रीडा समालोचक द्वारकानाथ संझगिरी यांनादेखील श्रद्धांजली वाहिली.

**गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५**

शाखा इस्लामपूरच्या वतीने 'मराठी भाषा गौरवदिन' निमित्ताने मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध साहित्यिक विश्वविख्यात कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाखेतील प्राचार्य डॉ. दिपा देशपांडे, प्रा. सुभाष खोत, डॉ. अर्चना थोरात, श्री. उदयसिंह पाटील, प्रा. सुनिल पाटील, श्री. धर्मवीर पाटील, डॉ. कालिदास पाटील,

कवी उत्तम सावंत यांनी मनोगते व्यक्त करून त्यांच्या काव्याचे वाचन केले. तसेच याप्रसंगी मराठीतील ग्रामीण साहित्यिक कादंबरीकार राम आण्णा पाटील यांच्या दु:खद निधनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सदर कार्यक्रमांचे आभार डॉ. अर्चना थोरात यांनी व्यक्त केले.

### महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा–चाळीसगाव

**सारस्वतांच्या हस्ते झालेला सत्कार चिरस्मरणीय.**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखेतर्फे चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांचा गौरव.

**(१६ फेब्रुवारी २०२५)**

'महाराष्ट्र साहित्य परिषदेची चाळीसगाव शाखा नामांकित साहित्य सेवा करणारी शाखा आहे. या शाखेतर्फे राबवले जाणारे विविध साहित्यिक उपक्रम तसेच सामाजिक व सांस्कृतिक बांधिलकी प्रशंसनीय आहे. अशा संस्थेतील सारस्वतांच्या हस्ते झालेला गौरव आगळावेगळा सन्मान आहे. हा सत्कार मी विसरू शकणार नाही. सोबतच मला अधिकच्या जबाबदारीची आठवण करून देणारा हा सत्कार असून, तो माझ्यासाठी चिरस्मरणीय राहील,' असे भावपूर्ण प्रतिपादन आमदार मंगेश चव्हाण यांनी केले.

येथील धुळे रोडवरील 'मसाप' शाखेच्या कार्यालयात आमदार मंगेश चव्हाण यांचा शाल, पुष्पहार, बुके, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट देऊन शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. 'मसाप' शाखेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील राजपूत अध्यक्षस्थानी होते. आमदार मंगेश चव्हाण यांचे आगमन होताच सुवासिनींच्या हस्ते त्यांचे औक्षण करण्यात आले. सुरुवातीला कार्याध्यक्ष मनोहर आंधळे यांनी मनोगतात 'मसाप'च्या शाखेसाठी हक्काचे कार्यालय साकारताना झालेल्या कष्टांवर प्रकाशझोत टाकला. प्राचार्य तानसेन जगताप यांनी शाखेतर्फे राबविण्यात आलेले शिवार संमेलन, संत साहित्य संमेलन, समीक्षा संमेलन, शाखा मेळावा व राष्ट्रसंत गाडगेबाबा व्याख्यानमाला आदी उपक्रमांची माहिती दिली.

आमदार चव्हाण यांनी 'मसाप'च्या चाळीसगाव शाखेच्या कार्याचे कौतुक करून भविष्यात भरीव काम करण्यासंदर्भात आश्वासित केले. डॉ. सुनील राजपूत यांनी शाखेच्या कार्यकारी मंडळाच्या कामकाजाचे कौतुक करीत आमदार मंगेश चव्हाण यांच्या साहित्य रसिकतेबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर यांनीही आमदार मंगेश चव्हाण यांचे अभिनंदन करून मनोगत व्यक्त केले.

विश्वस्त मंडळाचे सदस्य तथा कवी, गझलकार शिवाजी साळुंके यांनी स्वरचित अष्टाक्षरी कविता फोटोफ्रेम देऊन आमदार मंगेश चव्हाण यांचा सत्कार केला. याप्रसंगी 'मसाप' शाखेचे विश्वस्त सदस्य सुधीर पाटील, कार्यकारिणी उपाध्यक्ष गणेश आढाव, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी, कार्यवाह शालिग्राम निकम यांच्यासह कार्यकारिणी सदस्य अशोक वाबळे, सुषमा पाटील, अशोक ब्राह्मणकार, विजय कदम, सभासद डॉ. राकेश बोरसे, समाधान बच्छाव, संदीप पाटील, नाना पाटील, लीलावती जगताप, लता सोनजे, विशाखा सोनजे, रोहिणी पाटील, शोभा वाघ व आरती पाटील आदी उपस्थित होते. शालिग्राम निकम यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे यांनी आभार मानले.

**राष्ट्रसंत गाडगेबाबा मसाप व्याख्यानमाला**

(दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२५)

**पुष्प –१ ले दि. २३ फेब्रुवारी २०२५**

संतकुळीतील अखेरचे संत म्हणजे संत गाडगेबाबा – प्रा. डॉ. दिलीप धोंडगे

'संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगाप्रमाणे 'बुडती हे जन, न देखवे डोळा, म्हणोनी कळवळा येतसे'

या जाज्वल्य विचाराने भारावलेले गाडगेबाबा निरक्षर होते. गाई गुरं वळणे, शेतीत राबणे ही कामे करताना अज्ञान व अंधश्रद्धेनं सर्व सामान्य माणूस नाडला जातोय, दिशाहीन जगतोय, अस्वच्छता, दारिद्र्य व संभ्रमाने खितपत पडलेला आहे, हे पाहून बाबांनी संसार त्यागला. मुक्या प्राण्यांची हत्या करून दगडाच्या देवासमोर अर्पण करणारे लोक पाहून बाबा हळहळले. लोकप्रबोधन करत असताना स्वतःच्या मुलाच्या मृत्यूची वार्ता ऐकूनही न विचलित होता ते लोकांना म्हणाले, 'एवढ्या मोठ्या जगात दररोज अनेक मृत्युमुखी पडतात. त्यात माझा एक लेक गेला तर काय नवल? मला असंख्य लेकरांना सावरायचंय.' संत तुकारामादी संतांनी तहहयात हेच प्रबोधन केलं आणि औदार्य दाखवलं. म्हणूनच संतकुळीतील अखेरचे संत म्हणजे संत गाडगेबाबा हे होत.' असे संत साहित्याचे गाढे अभ्यासक व साहित्य अकादमी दिल्लीचे सदस्य असलेले सेवानिवृत्त प्रा. दिलीप धोंडगे यांनी आपले मत मांडले. राष्ट्रसंत गाडगेबाबा मसाप व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना 'लोकसंस्कारपीठ संत गाडगेबाबा' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी विचारमंचावर अध्यक्षस्थानी मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर, शाखा कार्याध्यक्ष मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे व प्राचार्य एस. आर. जाधव हेही मंचावर विराजमान होते.

व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम यांनी सूत्रसंचालन केले, तर कार्यकारिणी युवा सदस्य विजय कदम यांनी उपस्थितांसह मान्यवरांचे आभार मानले.

**पुष्प – २ रे दि. २४ फेब्रुवारी २०२५**

लोककला ही लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग ठरली : डॉ. अलका गायकवाड

'लोकसंस्कृती ही शहाणपण देणारी संस्कृती होय. लोकसंस्कृतीत माणूस सुसंस्कृतच असतो. तो पशू, पक्षी, नदी, डोंगर, शेती व शेती आवजारे या सार्‍यांविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांची प्रसंगावधान राखून पूजा, स्तवन करणे हा धर्म मानतो. अर्थातच पंच महाभूतांची पूजा करणारी लोकसंस्कृती होय! लोकसंस्कृतीतील माणूस समाधानी, आनंदी आणि उदार असतो. गाडगेबाबांनी दिलेली आदर्श लोकजीवनाची दशसूत्री जगवणे हीच लोकसंस्कृती होय. जीवनाच्या बासुरीला असलेले सहा स्वर नादवा. त्याचा षड्रिपु होऊ देऊ नका, हेच लोककला सांगते. म्हणूनच लोककला ही लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग ठरली. लोकसंस्कृतीतील स्त्रिया आपल्या मनातल्या भावना मोकळ्या करण्यासाठी जात्यालाच आपला सखा मानून दळण दळताना ओव्या गात असत. लोककथा सांगणे, ऐकणे, वडीलधाऱ्यांचा आदर करणे हा समृद्ध वारसा लोकसंस्कृतीचा अनमोल ठेवा होय.' असे प्रतिपादन भारतीय महाविद्यालय अमरावती येथील मराठी विभाग प्रमुख व लोकसंस्कृतीच्या अभ्यासक प्रा. डॉ. अलका गायकवाड यांनी केले. त्या सोमवार दि. २४-२-२०२५ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता राष्ट्रसंत गाडगेबाबा मसाप व्याख्यानमालाचे द्वितीय पुष्प गुंफताना चाळीसगाव येथील वाणी मंगल कार्यालयात उपस्थित श्रोत्यांसमोर 'लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा' या विषयावर बोलत होत्या. या प्रसंगी विचारमंचावर मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, शाखा विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा व्याख्यान प्रायोजक डॉ. सुनील राजपूत, चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा सहप्रायोजक आर. सी. पाटील शाखा कार्याध्यक्ष मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे आदी मंचावर उपस्थित होते.

सूत्रसंचालन कार्यकारिणी सदस्य विजय कदम यांनी केले, तर वंदना रोकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**पुष्प – ३ रे दि. २५ फेब्रुवारी २०२५**

मातीशी इमान राखायला शिकवते ती कविता : कवी प्रभाकर साळेगावकर

'ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञ मेकॉले याने आपली गुरुकुल

शिक्षण पद्धत नष्ट करून इंग्रजी शिक्षण भारतीयांवर थोपवले अन् दीडशे वर्षे आम्हांवर राज्य केलं. शिक्षणात काव्य असलं की अभ्यासाशी आपुलकी निर्माण होते आणि तेच शिक्षण चिरस्मरणीय ठरते. सर्जनशीलतेनं भावनांचा विचार केलेला असतो, तेव्हा कविता तयार होते. म्हणूनच कविता असते भावनेचा उद्गार! कविता जगणं, वागणं शिकवते. आपणास पदोपदी कविता भेटत असते. सर्व क्रांतीच्या मुळाशी कविताच आहे. पं. जवाहरलाल नेहरू म्हणत असत... 'हमे अपने जीवन को कविता बनाना चाहिए!' कविता आणि कृती शिक्षणाला समृद्ध करतात. म्हणूनच कविता आणि शिक्षण वेगळं करता येत नाही. कवीनं स्वानंद होताना परमानंदाचं व्रत घेतलं पाहिजे. कविता ही रसिकाच्या काळजाला कुरवाळणारं शस्त्र असावं,' असे विचार प्रभाकर साळेगावकर माजलगाव (जि. बीड) यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी मसाप चाळीसगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, शाखा विश्वस्त मंडळ अध्यक्ष डॉ. सुनील राजपूत, व्याख्यानाचे सहप्रायोजक प्राचार्य पी. एस. चव्हाण, शाखा कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, उपाध्यक्ष गणेश आढाव, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी मंचावर उपस्थित होते.

कवी साळेगावकर यांनी विद्यार्थ्यांसाठीची 'छान, छान गुरुजी माझे, छान, छान बाई' गात असताना श्रोत्यांनी टाळ्यांचा ठेका दिला. तब्बल दीड तास कवी प्रभाकर साळेगावकरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. व्याख्यान प्रारंभी व्याख्याते साळेगावकर यांना व्याख्यानमाला प्रमुख शालिग्राम निकम यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

व्याख्याते– परिचयासह सूत्रसंचालन वंदना रोकडे यांनी केले. प्रा. अशोक वाबळे यांनी आभार मानले.

**पुष्प –४ थे दि. २६ फेब्रुवारी २०२५**

लेकरांना कधी बाप आईसारखा... तर कधी आई बापासारखी कणखर वाटते : प्रशांत मोरे

'हंबरूनी वासराले चाटते जव्हा गाय...' ही कविता कातर स्वरात गात... रसिकांना हेही माहीत असावं की, या कवितेची चाल अनेक वर्षांपूर्वी मी लावली; पण माझा कुठेही उल्लेख झाला नाही. बाप आणि आई हेच आपल्या जीवनाचे शिल्पकार. आईविषयी अमाप कविता लिहिल्या जातात, म्हणजे बापाला आदराचं स्थान नाही, असं नाही. दोघांच्या भूमिका तितक्याच जबाबदारीच्या असतात. लेकरांना कधी बाप आईसारखा भासतो. तर कधी आई बापासारखीच कणखर भूमिका निभावते. म्हणूनच... 'मी मायले बाप म्हणालो... बापाले माय म्हणालो... समजले का तुला मी काय म्हणालो,' असे प्रतिपादन कवी प्रशांत मोरे यांनी केले.

शहरातील वाणी मंगल कार्यालयात २५ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चाळीसगाव शाखेतर्फे आयोजित चौथ्या दिवसाचे विचारपुष्प गुंफताना ते बोलत होते. या प्रसंगी मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, शाखा विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील राजपूत, व्याख्यानाचे मुख्य प्रायोजक रवींद्र शिरुडे, सहप्रायोजक संग्रामसिंग शिंदे, शाखेचे उपाध्यक्ष गणेश आढाव, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे व कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी विचारमंचावर उपस्थित होते.

व्याख्याता परिचयासह सूत्रसंचालन शाखा कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे यांनी केले. प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे यांनी आभार व्यक्त केले. व्याख्यानासाठी शाखा कार्यकारिणी सदस्य प्रा. अशोक वाबळे, सुधीर देवरे, बी. एल. ठाकरे, सुषमा पाटील, अशोक ब्राह्मणकर, वंदना रोकडे, प्रतिभा बागुल व विजय कदम यांनी सहकार्य केले. व्याख्यानास अंधशाळेतील विद्यार्थ्यांसह श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

**पुष्प ५वे – दि. २७ फेब्रुवारी २०२५**

शासन दरबारी अनेक औपचारिक कसोट्या पार पाडून मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवावा लागला : प्रा.डॉ. सूर्यवंशी

'शिवराय राजे होतेच पण त्यांना राजा, छत्रपती सिद्ध करण्यासाठी राज्याभिषेक करावा लागला. तसेच मराठी भाषा अभिजात होतीच; पण व्यवहारी जगताच्या काही औपचारिक कसोट्या शासन दरबारी पार पाडण्यासाठी मराठीला अभिजात दर्जा मिळवावा लागला. जुन्नर जवळील नाणेघाट येथे पडलेला शिलालेख २०२० वर्षे पुरातन आहे. हा लेख अभिजात दर्जासाठी मुख्य पुरावा स्रोत ठरला,' असे धुळे येथील खान्देश साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सूर्यवंशी यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा मसाप व्याख्यानमालेचे पाचवे व शेवटचे विचार पुष्प गुंफताना मत मांडले.

''मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी तब्बल ११ वर्षे संघर्ष करावा लागला. ३१ मे २०१३ रोजी पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना या विषयीचा अहवाल सादर केला गेला होता. दुर्दैवाने या प्रवासातले माय मराठीच्या पालखीचे भोई अनुक्रमे नागनाथ कोतापल्ले, कळसेकर, हरी नरके हे संघर्षयात्री ही फलश्रुती बघायला राहिले नाहीत,'' असेही सूर्यवंशी म्हणाले.

''मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला पुढे काय?

जगात चौफेर ज्ञान मिळवायचं असेल तर व्यावहारिक ज्ञानभाषा गरजेची आहे; पण माणूस म्हणून जगायचं असेल तर मातृभाषाच गरजेची आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा तर मिळाला; पण पुढे विधायक वाटचालीसाठी मराठी भाषेतून तंत्रशिक्षण निर्माण करून व्यावहारिक कौशल्य विकसित करावे लागेल. पदरात जो निधी पडणार आहे त्याचं संकलन आणि समायोजन सुयोग्य पद्धतीने करावे लागेल,'' असेही सूर्यवंशी म्हणाले.

या प्रसंगी विचारपीठावर मसाप शाखा संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, डॉ. मुकुंद करंबेळकर, विकास शुक्ल, डॉ. राकेश बोरसे व मसाप पदाधिकारी गणेश आढाव, नितीन खंडाळे, कवी मनोहर आंधळे, रामचंद्र गोसावी विराजमान होते. सूत्रसंचालन सुषमा पाटील तर शालिग्राम निकम यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा – ठाणे

### २६ ऑक्टोबर २०२४

सीसीटीव्हीच्या गर्द छायेत : गीतेश शिंदे

स्त्रीच्या अंतर्मनाचा ठाव अचूकपणे फार कमी कवींना घेता येतो, त्याविषयी आपल्या कलाकृतीतून भाष्य करता येते; परंतु कवी गीतेश शिंदे यांच्या 'सीसीटीव्हीच्या गर्द छायेत' कवितासंग्रहात कवितांमधून स्त्रीवादी जाणिवांचे सखोल दर्शन उमटते. आधुनिक जीवन सरणीतील नातेसंबंध, प्रतीकात्मक चिंतन, स्त्रीवादी जीवन जाणिवांचे नवे प्रारूप कवीने आपल्या कवितेतून मांडलेले असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख, समीक्षक, प्रा. डॉ. वंदना महाजन यांनी कवितासंग्रह उलगडताना केले. महाराष्ट्र साहित्य परिषद ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने कवी गीतेश शिंदे यांच्या 'सीसीटीव्हीच्या गर्द छायेत' या कवितासंग्रहावर आधारित कार्यक्रम दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय येथे सायंकाळी सहा वाजता आयोजित केला होता. डॉ. वंदना महाजन या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. या कार्यक्रमात प्रा. डॉ. आदित्य देसाई यांनी कवितेवर प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक आणि उत्तर आधुनिक काव्यप्रकाराचे संस्कार आढळून येतात. मुक्तछंद, अभंग व ओवी रचनांमधून समकालीन अनेक महत्त्वाची आशयसूत्रे कवितेतून टिपल्याची उदाहरणे देत त्यांनी आपल्या निबंध वाचनात मत व्यक्त केले. मानसी आमडेकर यांनी या कविता संग्रहातील काही कविता वाचून सादर केल्या. डॉ. देविदास पोटे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिरीष सराफ यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### २२ डिसेंबर २०२४

काव्यसंध्या

'काव्यसंध्या' हा कार्यक्रम रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे आयोजित करण्यात आला

होता. यात संकेत मात्रे, आदित्य दवणे, सचिन शिंदे, वृषाली विनायक, प्रथमेश पाठक, निकिता भागवत, विशाखा विश्वनाथ, गोविंद नाईक, सुप्रिया हळबे आणि जयदीप जोशी यांनी सहभाग घेतला होता. या सर्व तरुण कवींच्या कविता या वेळी सादर झाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तरुण कवी संकेत म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अगोदरचा भाग हा परिसंवादाचा होता. यात 'सन २००० नंतरची कविता' हा विषय होता. या विषयावर रवींद्र लाखे, रुपेश महाडिक, आणि सुजाता राऊत यांनी आपली अभ्यासपूर्ण अशी मते व्यक्त केली. कवितेला असे कालखंडाचे बंधन घालता येत नाही. साठोत्तरी, नव्वदोत्तरी हा कालखंड त्या त्या काळी असलेल्या केशवसुत, मर्ढेकर यानंतर बापट, पाडगावकर, महानोर, विंदा करंदीकर, बोरकर यांच्या काव्यप्रवासानुसार त्यांच्या कालखंडाचे वर्णन करण्यात येते. अलीकडच्या कवींमध्ये सामाजिक भानाबरोबरच अनेक भवतालाच्या संदर्भांचा संदर्भ येतो. त्यामुळे ही कविता अधिक सकस होत चाललेली आहे, हे मान्यच करावे लागेल. असे कवी अशोक बागवे यांनी या वेळी मत व्यक्त केले. रवींद्र लाखे यांनी एकूणच कवितेचा होत असलेला प्रवास, या प्रवासात असलेले चढ-उतार यांचा अभ्यासपूर्ण असा परखड आढावा घेतला. पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष, यांनी या सर्व कवींचा पुस्तक भेट देऊन सत्कार केला, तसेच आपले मनोगतदेखील या निमित्ताने व्यक्त केले. प्रा. डॉ. आदित्य देसाई यांनी आभार व्यक्त केले.

**८ मार्च २०२५**

डॉ. इरावती कर्वे: व्यक्ती आणि कार्य

महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने प्राध्यापक डॉ. प्रतिभा कणेकर यांचे 'इरावती कर्वे व्यक्ती आणि कार्य' या विषयावर व्याख्यान शनिवार, दिनांक ०८/०३/२०२५ रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय येथे सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आले होते. पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष, यांनी सुरुवातीला प्रास्ताविक आणि डॉ. कणेकर यांचे स्वागत केले. यानंतर डॉ. प्रतिभा कणेकर यांनी इरावती कर्वे यांच्याविषयी अभ्यासपूर्ण अशी माहिती उलगडून दाखविली. इरावती कर्वे या भारतातील पहिल्या मानववंशशास्त्रज्ञ होत्या. दिनकरराव कर्वे यांच्याशी झालेल्या विवाहानंतर त्यांच्या आयुष्यात आलेल्या वेगवेगळ्या स्थित्यंतरांवर त्यांनी प्रकाश टाकला. त्यांचे परदेशातील शिक्षण, संशोधन याविषयीची विस्तृत माहिती त्यांनी दिली. आपल्या संशोधनातून इरावती बाईंनी वसाहतवादी आकलनाला कसा छेद दिला यावर विस्तृत विवेचन केले. भारतातील जातीव्यवस्था पाश्चिमात्य देशातील वंशवादापेक्षा वेगळी आहे, या त्यांच्या प्रबंधावरसुद्धा प्रतिभा कणेकर यांनी भाष्य केले. मराठी संस्कृती व त्यांनी केलेले अभ्यासपूर्ण संशोधन आज किती सयुक्तिक आहे याचे त्यांनी दाखले दिले. त्यांच्या लेखनाव्यतिरिक्त कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कसे करावे, याबद्दल इरावती बाईंनी त्यांच्या काळात मांडलेले विचारसुद्धा प्रतिभा कणेकर यांनी या वेळी मांडले. शेवटी चांगदेव काळे कार्यवाह यांनी आभार व्यक्त केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद,
## शाखा - डोंबिवली

**दिनांक - १० नोव्हेंबर २०२४** रविवार सकाळ १०.३० वाजता विनायक सभागृह, गणेश मंदिर डोंबिवली पूर्व इथे 'सहस्र भाव धारा' हा विजयसिंह कुडे यांचा कार्यक्रम प्रेम या विषयावरची जुनी गीते, कविता, किस्से, आठवणी असा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, आभार या जबाबदाऱ्या शीतल दिवेकर यांनी पार पाडल्या.

**रविवार, दिनांक ५ जानेवारी २०२५** सकाळी १०.३० वाजता विनायक सभागृह गणेश मंदिर डोंबिवली पूर्व. इथे, 'इतिहासाच्या पानात डोकावताना' हा कार्यक्रम संपन्न झाला. या व्याख्यानाचे वक्ते होते, श्री. कौस्तुभ कस्तुरे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद करकरे यांनी केले. या वक्त्यांचा परिचय हेरंब ओक

यांनी करून दिला. आभार महेश वझे यांनी मानले.

### महाराष्ट्र साहित्य परिषद,
### शाखा – जुळे सोलापूर

**दिनांक – २०/१/२०२५**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर तसेच मसाप दक्षिण सोलापूर, सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, उपनगरीय शाखा, सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक २० जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ असा साजरा करण्यात आला. त्याचे उद्घाटन ग्रंथदिंडी काढून करण्यात आले. ग्रंथदिंडी महानगरपालिका ते डॉ. कोटणीस स्मारक नेण्यात आली. तिथे संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अप्पासाहेब पुजारी, मंगळवेढा यांचे हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर त्यांचा सत्कार हा उपायुक्त आशिष बोकरे यांनी केला. डॉ. अप्पासाहेब पुजारी यांचे मनोगत झाल्यावर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, मसाप दक्षिणेचे कार्याध्यक्ष श्री. प्रशांत बडवे यांनी आपापले मनोगत व्यक्त केले. त्या वेळी सोलापूर महानगर पालिकेतर्फे पत्रकार श्री. प्रशांत जोशी, मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, मसाप दक्षिणचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, मसाप परिषद उपनगरीय शाखा अध्यक्ष दादासाहेब साळुंके यांचा सत्कार करण्यात आला. या उद्घाटनाचे प्रास्ताविक उपायुक्त श्री. आशिष लोकरे यांनी केले, त्या वेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, साहाय्यक आयुक्त अनिता मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे साहाय्यक कुलसचिव श्री. डॉ. शिवाजी शिंदे आणि कार्यकारिणी सदस्य तसेच साहित्य रसिक, पत्रकार, मनपा अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांनी केले. तर आभार डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमात मनपा पत्रकार संघ अध्यक्ष किरण बनसोडे, तसेच डॉ. नानासाहेब गव्हाणे, प्रा. अमोगासिद्ध चेंडके, कामगार कल्याणचे अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, आदी मान्यवर अधिकारी हजर होते.

या उद्घाटन सोहळ्यानंतर २१ जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी पुस्तक परिचय, गीतरामायण, २ नाटके, बालनाट्य, चर्चासत्रे, लेखन, वाचन, हस्ताक्षर कार्यशाळा, आणि बक्षीस वितरण व या पंधरवड्याचा समारोप असा भरगच्च कार्यक्रम सादर करण्यात आला, या वेळी साहित्य, काव्य, नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिनांक –१६/०२/२०२५**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर आयोजित आणि डॉ. माधवी रायते परिवार पुरस्कृत, 'स्व. श्री निवास विष्णू रायते गुरुजी स्मृती बालाजी साहित्यिक राज्यस्तरीय पुरस्कार २०२५' आणि 'स्व. डॉ. वासुदेव रायते स्मृती पुरस्कार २०२५' पुरस्कार सोहळा हा रविवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी हि. ने. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सायंकाळी ५:३० वा. आयोजित केलेला होता. ते पुरस्कार अनुक्रमे, 'श्यामची आई' चित्रपटामध्ये श्याम ही भूमिका केलेले प्रा. माधव वझे यांना आणि दुसरा पुरस्कार ज्येष्ठ सिने/नाट्यकलावंत डॉ. मोहन आगाशे यांना प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे शुभ हस्ते, सौ. सायली जोशी, कार्याध्यक्षा म. सा. प. शाखा जुळे सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली आणि मा. श्री. जयंत रायते यांचे प्रमुख उपस्थितीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार आणि आभारप्रदर्शन मसाप जुळे सोलापूरचे प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी केले. या कार्यक्रमाच्या पाहुण्यांच्या स्वागत सत्कारात, प्रा.

मिलिंद जोशी यांचे स्वागत/सत्कार श्री. पद्माकर कुलकर्णी यांनी, सौ. सायली जोशी यांचा सत्कार डॉ. सौ. माधुरी भोसले यांनी, तर प्रमुख उपस्थिती असलेल्या श्री. जयंत रायते यांचा सत्कार उपाध्यक्ष मसाप जुळे सोलापूरचे श्री. श्रीकांत कुलकर्णी यांनी केला.

या कार्यक्रमाला मसाप जुळे सोलापूर कार्यकारिणी सदस्य श्री. सचिन चौधरी, श्री. रामचंद्र धर्मसाळे, श्री. प्रशांत जोशी आणि श्री. सुनिल चिनखडे, सौ. स्नेहा चिनखेडे, प्रा. नमीता पठाण, ॲड. जे. जे. कुलकर्णी, डॉ. शिवाजी शिंदे, ॲड. धनंजय माने, डॉ. श्रुती वडगबाळकर, गोविंद काळे, डॉ. स्मिता पाटील, मारुती कटकधोंड यांचे सह सोलापुरातील मान्यवर मंडळी तसेच अनेक साहित्य रसिक उपस्थित होते. या वेळी डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ. विद्या देशपांडे, डॉ. क्षमा वळसंगकर, डॉ. सतीश वळसंगकर, सौ. अचला सायली, अशोक खानापुरे, श्री. बाबुराव मैदर्गीकर आदी मंडळीही उपस्थित होती. एक उत्तम पुरस्कार सोहळा पाहायला मिळाला, अशी प्रतिक्रिया मान्यवर लोक आणि साहित्य रसिक देत होते.

**दिनांक – २८/०२/२०२५**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर आणि जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर संयुक्त विद्यमाने, ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'मराठी भाषा गौरव दिन' हा दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील नियोजन भवन हॉलमध्ये सकाळी ११ वा. आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. कुमारजी आशीर्वाद साहेब, जिल्हाधिकारी सोलापूर होते; पण ते न येऊ शकल्याने अप्पर जिल्हाधिकारी अध्यक्षस्थानी होत्या, तर निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार उपजिल्हाधिकारी सौ. अंजली मरोड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रथम मान्यवर उपस्थितांनी, कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर डॉ. शिवाजी शिंदे यांनी मराठी भाषेवर आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले. त्यानंतर कवी मारुती कटकधोंड, श्री. रामचंद्र धर्मजाळे, गिरीश दुनाखे, उपजिल्हाधिकारी सदाशिव पददुणे, गजानन गायकवाड यांनी कविता सादर केल्या. वैशाली जमदाडे यांनी एक गीत सादर केले. या वेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्षीय समारोप करताना अप्पर जिल्हाधिकारी मा. मोनिकासिंह ठाकूर यांनी मराठी बोली व शासकीय भाषा यावर मनोगत व्यक्त करून छत्रपती संभाजी महाराज आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाधारीत दोन हिंदी गझल सादर करून कार्यक्रमाचा समारोप केला. शेवटी मसाप जुळे सोलापूर उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कवी कुसुमाग्रज यांचे प्रतिमापूजन चालू असताना 'लाभले अम्हांस भाग्य बोलतो मराठी' आणि कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी 'गर्जा महाराष्ट्र माझा' ही दोन गीते कवी रामचंद्र धर्मसाले यांनी त्यांचे मोबाईलवर लावून तत्परता दाखविल्याने कार्यक्रमात एक प्रकारे वातावरण निर्मिती झाली. या वेळी मसाप जुळे सोलापूर कार्यकारिणी सदस्य, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व साहित्य रसिकांसोबतच तहसीलदार श्रीकांत पाटील, करमणूककर अधिकारी शिल्पा ओसवाल, तहसीलदार शिल्पा पाटील, पुरवठा अधिकारी संतोष सरडे, समीर यादव, नीलिमा मते, सरस्वती पाटील, साहायक कुलसचिव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ डॉ. शिवाजी शिंदे आदी मान्यवर रसिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र साहित्य परिषद,
## शाखा – पश्चिम (मनोरमा) सोलापूर

**दि. १०/०३/२०२५**

मराठी भाषा समृद्धीसाठी वाचनसंस्कृती आवश्यक : श्रीकांत मोरे

मनोरमा बँकेत मराठी भाषा गौरव दिन जागतिक

महिला दिन साजरा.

सोलापूर - मराठी भाषेच्या समृद्धीसाठी वाचनसंस्कृती चांगली असायला पाहिजे. तरच मराठी भाषा उत्तम प्रकारे तग धरू शकेल. पंतप्रधान मोदी यांनी मराठी भाषेचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र शासनानेसुद्धा दरवर्षी ३ ऑक्टोबर रोजी अभिजात मराठी भाषा सन्मान दिन साजरा करण्याचे घोषित केले आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक मसाप पश्चिम सोलापूरचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी केले.

मसाप पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर, मनोरमा साहित्य मंडळी, अस्मिता व्हीजन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन, जागतिक महिला दिन सोमवारी सायंकाळी मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यालयात पार पडला, त्या वेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून मनोरमा पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजशेखर शिंदे उपस्थित होते. व्यासपीठावर मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन सौ. शोभा मोरे, कार्याध्यक्षा सौ. अस्मिता गायकवाड, डॉ. ऋचा मोरे पाटील, प्रा. राजेश्वर शिंदे, पद्माकर कुलकर्णी, ॲड. सुरेश गायकवाड, मसापच्या कोषाध्यक्षा शिल्पा कुलकर्णी, सौ. कविता कुलकर्णी निमंत्रित कवयित्री आदी उपस्थित होते.

प्रा. शिंदे म्हणाले, 'मनोरमा परिवार निरपेक्ष परिवार आहे. मराठी आपली बोलीभाषा असून नवनवीन शब्द स्वीकारले पाहिजेत. त्याचा वापर लेखक, कवींनी केला पाहिजे. बोलीमुळे मराठीला स्वतंत्र भाषेचा दर्जा मिळाला आहे. कोकणी भाषेलाही अभिजात दर्जा मिळायला हवा. लेखकांनी स्वत: यासाठी पुढाकार घ्यावा. आता मराठीचा सन्मान दिन शासनाने घोषित केला आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे कविसंमेलन या वेळी पार पडले. यामध्ये प्रा. डॉ. श्रुती वडगबाळकर, वंदना कुलकर्णी, संगीता एखंडे, सुनंदा काळे, विजयलक्ष्मी हंजगी, विनीता घोडके, रेणुका बुधाराम, निर्मला शितोळे, दीपलक्ष्मी कुलकर्णी, प्रा. माउली पवार, पद्माकर कुलकर्णी यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. या वेळी सौ. शोभा मोरे व सौ. अस्मिता गायकवाड यांच्या हस्ते मान्यवर कवयित्रींचा सत्कार करण्यात आला.

प्रा. लता विलास मोरे, प्रीती नायर, दीपाली पवार, सुवर्णा व्हटकर, निर्मला शितोळे, स्नेहल राठोड, सुरेखा साळवी, शोभा वाले यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी सौ. शोभा मोरे, सौ. अस्मिता गायकवाड, प्रा. माउली पवार यांनी विचार व्यक्त केले. डॉ. ऋचा मोरे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले, तर सौ. कविता कुलकर्णी यांनी आभार मानले. या वेळी मसापचे सर्व सदस्य उपस्थित होते.

**म. सा. प. पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर व मनोरमा साहित्य मंडळी यांच्या वतीने काव्य संमेलन**

सोलापूर : महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर आणि मनोरमा साहित्य मंडळी, मल्टिस्टेट सांगोला व मंगळवेढा शाखेच्या संयुक्त विद्यमाने संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू, तिळगूळ समारंभ व काव्यसंमेलन सोहळा रविवारी (ता. १ फेब्रुवारी) पार पडला.

सांगोल्याचे ज्येष्ठ साहित्यिक कवी डॉ. कृष्णा इंगवले अध्यक्षस्थानी होते. महिलांच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात एक आगळा साहित्यिक उपक्रम मनोरमा परिवार राबवत आहे. तो एक वैचारिक वाण लुटत आहे, हे कौतुकास्पद आहे, असे ते म्हणाले. साबळे गुरुजी (वय ८८) या ज्येष्ठ कवीसह सीताराम सावंत, शिवाजी बंडगर, ज्ञानेश डोंगरे, सुनील जवंजाळ, महादेव कांबळे, प्रेमकुमार वाघमारे, प्रा. डॉ. नितीन बाबर, ना. मा. कांबळे, सौ. पुष्पलता मिसाळ, तानाजी वाघमारे, किसन माने, सौ. सुवर्णा तेली, सौ. सुप्रिया कांबळे, हर्षदा गुळमेरे, सौ. कविता कुलकर्णी, प्रा. धनाजी चव्हाण या कवींनी आपल्या सादरीकरणात स्त्रीच्या नातेसंदर्भात विविध पैलू उलगडले. डॉ. स्नेहल भोसले

यांनी महिलांशी संवाद साधला. 'महिलांचे आरोग्य' या विषयी बोलताना त्यांनी आहार व व्यायाम या विषयावर मार्गदर्शन केले. मनोरमा परिवार हा आर्थिक क्षेत्रासोबत साहित्यिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातही कार्यरत आहे. महिला सक्षमीकरण करण्यासाठी मल्टिस्टेट विविध योजना राबवित आहे, असे उपाध्यक्षा सौ. शोभा मोरे यांनी सांगितले.

कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यातील अनेक साहित्यिक, कवी, मनोरमा साहित्य मंडळीचे सभासद उपस्थित होते. या वेळी कल्याणराव शिंदे, प्राचार्य हनुमंत लामकाने, प्रा. डॉ. भजनाबळे, वैजीनाथ धोंगडे, संतोष जगताप, लेंडवे, अमोल शेंडगे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते. कविता कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन सुनील जवजाळ, विद्या भगरे भोसले यांनी केले. अजय भोसले यांनी आभार मानले. हा कार्यक्रम मसाप पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर शाखेच्या वतीने घेण्यात आला.

**मनोरमा साहित्य मंडळीचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त काव्य मैफल**

सोलापूर : महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर आणि मनोरमा साहित्य मंडळी यांच्या वतीने मनोरमा प्लांटेशन, विजापूर रोड, सोलापूर येथे मनोरमा साहित्य मंडळीचे अध्यक्ष, मार्गदर्शक श्रीकांतजी मोरे यांचा (गुरुवारी ता. १६) वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुमित मोरे होते.

सकाळच्या सत्रात ज्येष्ठ कवींची काव्यमैफल पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. अस्मिता गायकवाड होत्या. श्वेता हुल्ले यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यात मारुती कटकधोंड, राजेंद्र भोसले, रेणुका बुधारम, विमलताई माळी, पुष्पा करे (मोहोळ), पद्माकर कुलकर्णी, देवेंद्र औटी, सुनिता गरड, सुनेत्रा पंडित, संगीता एखंडे, रामप्रभू माने, अशोक भांडवलकर. डॉ. शिवाजी शिंदे, संध्या हेब्बाळकर, प्रा. माधव कुलकर्णी आदींनी आपल्या कविता सादर केल्या.

कार्यक्रमास संभाजीराव काकडे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पुणे, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार राजन पाटील, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, माजी महापौर मनोहर सपाटे, मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे, शिखर बँकेचे संचालक अविनाश महागावकर, जकराया शुगरचे चेअरमन बिराप्पा जाधव, धाराशिवचे उद्योगपती जाधव, राजेंद्र पाटील, संचालक दामाजी कारखाना, सरपंच विलास पाटील, कुरुल, डॉ. गोरे, डॉ. गिरीश क्षीरसागर, डॉ. प्रशांत दौंड, गोरख देखमुख, मनोरमा परिवाराचे तसेच मनोरमा मल्टिस्टेट व पतसंस्थेचे कर्मचारी, यांच्यासह शहर व जिल्ह्यातील वरिष्ठ मान्यवरांनी उपस्थित राहून श्री. श्रीकांत मोरे यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी सर्व मान्यवरांसाठी महाराष्ट्रीय मेवा हुरडा पार्टी व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अतुल बेले यांचा 'भावसंध्या' हा भावगीत कार्यक्रम पार पडला.

हा कार्यक्रम मसाप पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर शाखेच्या वतीने घेण्यात आला.

## महाराष्ट्र सहित्य परिषद,
## शाखा – शाहुपुरी

**दि. ०१/१२/२०२४**

कविवर्य बा. सी. मर्ढेकर यांना त्यांच्या नूतनीकरण केलेल्या घरात अभिवादन कार्यक्रम.

**दि. ०७/१२/२०२४**

म. सा. प. शाहुपुरी शाखा व नगरवाचनालय सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने मा. विद्याधर पुंडलिक जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने त्यांच्या कथांचे अभिवाचन–सहभाग– वैदेही कुलकर्णी, चंद्रकांत कांबिरे, डॉ. अदिती काळमेख.

**दि. १६/१२/२०२४**

म. सा. प. शाहुपुरी शाखेची वार्षिक सभा व नवीन

कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

**दि. १६/०१/२०२५**

रोजी म. सा. प. शाहुपुरी शाखा व आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या विद्यमाने लेखन कौशल्य कार्यशाळा. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवलिंग मेणकुदळे सहसचिव रयत शिक्षण संस्था. वक्ते– राजीव मुळ्ये, निलेश महिगांवकर, वसंत शिंदे.

**दि. ०२/०२/२०२५**

रोजी रहिमतपूर येथे चौंडेश्वरी शिक्षण संस्थेत वसंत कानेटकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. मा. ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या हस्ते, मा. आ. मनोजदादा घोरपडे, सुनिताराजे पवार यांच्या उपस्थितीत झाले. या पुतळ्याचा खर्च म. सा. प. शाहुपुरी शाखेने केला आहे.

दि. २७ फेब्रु. ते २० मार्च मराठी भाषा पंधरवडा. २७ फेब्रु. उद्घाटन 'रावण' या पुस्तकाचे लेखक श्री. शरद तांदळे यांचे व्याख्यान.

दि. १ मार्च घुमान ते अमळनेर साहित्यवारी यावर प्रदीप कांबळे आणि डॉ. अदिती काळमेख यांचे व्याख्यान, प्रमुख पाहुणे – श्री. रविंद्र बेडकीहाळ, मा. रविंद्र झुटींग, मा. मुकुंद फडके.

दि. ३ मार्च – प्रसिद्ध अभिनेते श्री. सुबोध भावे यांची मुलाखत. मुलाखतकार – श्री. विनोद कुलकर्णी, श्री. हरिष पाटणे. प्रमुख पाहुणे – पद्माकर पाठकजी, श्रीराम नानल.

दि. ५ मार्च– मा. रविमुकुल यांचे 'मुखपृष्ठाची गोष्ट' या विषयावर व्याख्यान. प्रमुख पाहुणे – डॉ. राजेंद्र माने, डॉ. संदीप श्रोत्री, श्री. अजित कुबेर.

दि. ९ मार्च– 'एक भाकर तीन चुली' या पुस्तकाचे लेखक देवा झिंजाड यांची मुलाखत. मुलाखतकार – मा. सुनिताराजे पवार, श्री. शिरीष चिटणीस.

दि. १२ मार्च– मा. डॉ. सुनिलकुमार लवटे यांचे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' या विषयावर व्याख्यान.

दि. १६ मार्च – मा. सुधीर गाडगीळ यांची प्रकट मुलाखत व त्यांच्या पंचाहत्तरी निमित्ताने सत्कार– मुलाखतकार – सौ. स्नेहल दामले व श्री. घन:श्याम पाटील. प्रमुख पाहुणे – मा. ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, श्री. अविनाश कदम, श्री. अमोल मोहिते, श्री. जयेंद्र चव्हाण.

दि. २० मार्च– बा. सी. मर्ढेकर यांचा स्मृतिदिन मर्ढे येथे त्यांच्या नूतनीकरण केलेल्या घराच्या स्मारकात संपन्न. प्रमुख पाहुणे– मा. सुनिताराजे पवार, श्री. शिरीष चिटणीस, रविंद्र बेडकिहाळ.

## महाराष्ट्र साहित्य परिषद,
## शाखा – पिंपरी चिंचवड

**ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५**

**१) ६ ऑक्टोबर २०२४**

मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात दर्जा मिळाल्याने पिंपरी चिंचवड शाखेने आनंदोत्सव कार्यक्रम साजरा केला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तसेच सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे होते. त्या वेळी रस्त्यावर मिरवणूक काढली आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबाबत सर्वांना साखर वाटण्यात आली आणि आनंदोत्सव साजरा केला. त्या वेळी तळेगावचे अंबरचे संस्थापक सुरेश साखवळकर, श्रीकृष्ण पुरंदरे, देहू शाखेचे दत्तात्रय अत्रे तसेच पिंपरी चिंचवड शाखेचे सर्व पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**२) १५ ऑक्टोबर २०२४**

रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित पिंपरी चिंचवड शाखेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित सर्वांना एक पान वाचण्याची संधी देण्यात आली. त्या वेळी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक अरुण बोऱ्हाडे, प्रभाकर ओव्हाळ, सोपान खुडे, शाखेचे अध्यक्ष राजन लाखे, ॲड. मनाली गाडगीळ, उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात ज्येष्ठ कवी संजय पवार यांनी मॉरिशसचे अनुभव कथन केले.

सदर कार्यक्रमात कामगार आनंद चव्हाण यांच्या

'प्रेरणा' पुस्तकाचे प्रकाशन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जयश्री श्रीखंडे, श्रीकांत जोशी, किरण लाखे, नागेश गव्हाड, दत्तू ठोकळे यांनी संयोजन केले तर संजय जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

**३) शनिवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२४**

'दिवाळी काव्य पहाट' या कार्यक्रमात प्रसिद्ध संगीतकार राम कदम यांच्यावर आधारित 'अक्षरवेध' दिवाळी अंक २०२४ चे प्रकाशन राम कदम यांचे सुपुत्र विजय कदम तसेच गायिका अनुराधा मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी कथ्थक गुरू पंडित नंदकिशोर कपोते, गायिका जयश्री कुलकर्णी, राजश्री शहा, गायक दयानंद घोटकर उपस्थित होते. त्यांनी संगीतकार राम कदम यांची काही गाणी गायिली.

तदनंतर कविसंमेलन तसेच प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम घेण्यात आला, ज्यामध्ये ४२ कवींनी सहभाग घेतला. किरण लाखे यांनी सूत्रसंचालन केले. जयश्री श्रीखंडे, किरण जोशी, श्रीकांत जोशी यांनी संयोजन केले.

**४) दिनांक ५ नोव्हेंबर २०२४**

रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा आणि स्वरसागर चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पुढे काय' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. सदर परिसंवादात डॉ. सदानंद मोरे, लक्ष्मीकांत देशमुख, रामदास फुटाणे, संजय गुळवणी या ज्येष्ठ साहित्यिकांनी सहभाग घेतला. राजन लाखे यांनी सूत्र समन्वयकाची भूमिका बजावली. प्रवीण तुपे यांनी प्रास्ताविक तसेच आभार मानले.

**५) दिनांक २१ डिसेंबर २०२४**

रोजी शाखेतर्फे दिघी येथे किरण जोशी यांच्या पुढाकाराने काव्यस्पर्धा – कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी अध्यक्षस्थानी राजन लाखे होते. घर, निवारा, आश्रम, वास्तू, गृहप्रवेश आदी विषयावर घेतलेल्या काव्य स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय, आणि उत्तेजनार्थ विजेत्यांना रोख रकमेची बक्षिसे देण्यात आली. यामध्ये ३४ कवींनी भाग घेतला. किरण जोशी यांनी प्रास्ताविक केले, तर संजय जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

**६) शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी**

रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आणि सरहद संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने चिंचवड येथील शान्ता शेळके सभागृहात संमेलन पूर्व कविसंमेलन घेण्यात आले. त्या वेळी पाहुणे म्हणून कवी अरुण म्हात्रे, प्रकाशक राजीव बर्वे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोबत मसाप पिंपरी चिंचवडचे राजन लाखे, विनीता ऐनापुरे, डॉ. रजनी शेठ, किरण लाखे, जयश्री श्रीखंडे उपस्थित होते. सदर कविसंमेलनात पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून ३२ कवींचा सहभाग होता. राजन लाखे यांनी प्रास्ताविक केले, तर संजय जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

**७) महिला दिनाच्या निमित्ताने दिनांक ८ मार्च २०२४**

रोजी शाखेतर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्या वेळी व्यासपीठावर सातारा जिल्हा प्रतिनिधी रवींद्र बेडकिहाळ तसेच मसाप पुणेचे कार्यवाह वि. दा. पिंगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोबत राजन लाखे, विनीता ऐनापुरे उपस्थित होते. कला क्षेत्र, साहित्य क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, पत्रकारिता क्षेत्र, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र आदींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

किरण लाखे, किरण जोशी, जयश्री श्रीखंडे, श्रीकांत जोशी यांनी संयोजन केले, संजय जगताप यांनी सूत्र संचालन केले, तर डॉ. रजनी शेठ यांनी आभार मानले.

■■

# अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाचा उद्घाटन सोहळा


















# पुस्तक सूची

| | |
|---|---|
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : | रु. ५००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : | रु. ४००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : | रु. ३००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : | रु. ८००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : | रु. ७००/– |
| भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : | रु. ८००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड १ : | रु. ५००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड २ : | रु. ३००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : | रु. २००/– |
| म. सा. पत्रिका लेख – सूची : | रु. ४००/– |

## सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०– २४४७ ५९ ६३